

श्रीगुरुचरण–प्रथम वर्ष स्मरण

# ‘श्रीवामनदर्शन

ॐ श्री卐

श्रीगुरुचरण-प्रथमवर्ष स्मरण

# श्रीवामन-दर्शन

पौष शु. ८, शके १८९६

दि. २ फेब्रुवारी १९७५

मूल्य ७ रु.

श्रीगणेशदत्त गुरुभ्यो नमः ।

# श्रीसद्गुरूंचा सहज योग

परंपरा

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य
श्रीवासुदेवानंद सरस्वती

श्रीमत् परहंस परिव्राजकाचार्य
श्रीलोक नाभतीर्थ

श्रीदत्तयोगी श्रीगुळवणी महाराज
श्रीविद्यावाचस्पती
ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर

प्रकाशक : पं. दत्तमहाराज कवीश्वर, प्रमुख विश्वस्त, श्रीवासुदेवनिवास ट्रस्ट,
श्री वासुदेव निवास, ४२/१७, एरंडवणे पुणे ४११००४

मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव पेठ, पुणे २.

# प्रकाशकांची प्रार्थना

परब्रह्म सद्‌गुरु श्रीवामनराव गुळवणी महाराज यांनी या जड कायेचे कवच टाकून आज बरोबर एक वर्ष झाले. ते कवच असताना त्याच्या समोर येऊन जाणे शक्य नसणाऱ्यांनाही त्याची जशी प्रतीती यावयाची तशीच त्यानंतरही ती अनेकांना येत आहे. अशा या नित्य आत्मस्वरूपाचे दर्शनाने ते असताना जे साधत असे तेच आता स्मरणानेही साधते. "स्मरणादेवहि साधवः" अशी अनंत ज्ञानदात्या दत्तावतारपरंपरेची प्रणाली आहे व ही प्रणाली श्री महाराजांनी अविच्छिन्नपणे चालविली आहे. म्हणूनच त्यांच्या चरणाच्या प्रथम-वर्ष-स्मरणाची ही पहिली अंजली आम्ही त्यांच्या चरणीच अर्पण करतो आहो.

ही स्मरणांजली अर्पण करण्याचा आम्ही संकल्प केल्यापासून ती स्मरणांजली अर्पण, पूर्ण होण्यास फारच थोडे दिवस उरले होते. तथापि त्याची तयारी होत असतानाच साधकांना हे पुष्प आल्हादक आकर्षक, उद्‌बोधक व उद्धारक होईल असा आंतरिक विश्वास आम्हाला वाटत होता. तो विश्वास किती सत्य आहे याचे मूर्त स्वरूपच "श्री गुरुचरण–प्रथम वर्षस्मरण" हे आहे. या प्रकाशनाला अगदी थोडा अवधी असता मुद्रक, आनंद मुद्रणालयाचे मालक श्री. दादासाहेब जोशी व तेथील सर्व कामगार तसेच के. जोशी आणि कंपनी या ब्लॉक मेकर्समधील सर्वांनी अत्यंत आत्मीयतेने काम करून हे काम अगदी वेळेवर पुरे करण्यास साह्य केले याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहो. इतर साहाय्यकांच्या नामाचा निर्देश केला तर त्यांच्या गुरुसेवेला उणेपणा आहे असे वाटत असल्यामुळे, त्यांच्या नामाशिवाय त्यांचे साह्याबद्दल, त्यांचे कल्याण करावे अशी श्री गुरुमहाराजांचे चरणी आमची नम्र प्रार्थना आहे. "श्री गुरुचरण प्रथमवर्ष स्मरण" म्हणजेच श्रीवामनदर्शन मालिकेतील हे पहिले पुष्प असून प्रतिवर्षी अशी "स्मरणांजली" प्रकट करावी असा आमचा संकल्प आहे. या स्मरणांजलीत आपलीही पुष्पे असावीत अशी अनेकांना कळकळ असणार हे आम्ही जाणतो. परंतु काळ व स्थळमर्यादामुळे ते अशक्य झाले याबद्दल आम्ही त्या साधक बंधूंची क्षमा मागतो.

आमचा तो संकल्प म्हणजे श्री महाराजांचाच संकल्प होय असा आमचा विश्वास आहे. तो अमोघ ठरो अशी आमची श्रीसद्‌गुरुचरणी प्रार्थना.


विश्वस्त—**श्रीवासुदेव निवास, ट्रस्ट**

# दर्शनाआधीचे ध्यान

'श्रीगुरुचरण प्रथमवर्ष स्मरण' मालिकेत श्रीवामनदर्शन हे अगदी छोटेसे पुस्तक श्रीसद्गुरुभक्तांचे हाती देताना आम्हास परमानंद होत आहे. गेल्या वर्षात श्री महाराजांचे स्मरण नाही असा एकही दिवस त्यांच्या भक्तास गेला असेल असे वाटत नाही. परंतु श्रीमहाराजांच्या ब्रह्मलोकगमनाच्या दिवशी त्यांच्याबद्दलचे आपले भाव व्यक्त करण्याची संधी मिळावी याच एका सदिच्छेने आम्ही ही "स्मरणे" ग्रंथित करण्याचा उपक्रम केला. आणि त्या उपक्रमाला अनेक सद्भक्त लेखक–कवींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला हे श्रीगुरुमहाराज आमच्या पाठीशी उभे राहून कार्य प्रेरणा देतात व कार्यही करून घेतात याचेच प्रतीक आहे.

या छोट्याशा पुस्तिकेत पुष्कळच लेख आहेत. व कविताही आहेत. त्या सद्भक्तांनी वाचून आपल्या श्रीमहाराजभक्तीला उजाळा देता येईल इतके हे लेख व कविता भाव व भक्तिसंपन्न आहेत. या लेखांत दृष्टिकोनाची, अनुभवांची आणि श्रीमहाराजांच्या सातत्याची गंगा संपूर्णपणे वाहात आहे. ही गंगा अत्यंत पावन व निर्मळ आहे. श्रीमहाराजांनी केलेल्या अनुग्रहामुळे, त्यांच्या विरहातही आत्यंतिक विकलता न येता आपण विवेकपूर्ण कसे राहू शकतो याची ग्वाही मिळते. देह व वास्तूत बंदिस्त असलेले आत्म–ब्रह्म चैतन्य अणुरेणूंत व्यापक झाल्यामुळे माझ्या सद्भक्तीच्या प्रेमरज्जूने श्रीमहाराजांना मी माझ्याजवळ सतत बांधून ठेवू शकतो याचाही प्रत्यय हे लेख–कविता–वाचताना येतो. श्रीमहाराजांचे मार्गदर्शन ते असताना जितक्या अचूकपणाचे असे तितक्याच अचूकपणे आताही श्रीसद्गुरु

## प. पू. योगिराज श्री वामनरावजी गुळवणी महाराज



यदच्छा लाभे जो, परम सहजानंद भरितें ।
सदा योगाभ्यासी, हरिगुरुपदीं मानसरते ।
मुखी चाले दत्तात्रय गुरु अशी नाम लतिका ।
यथान्याये कालक्रमण करणे भाव इतुका ॥

श्रीसद्गुरु आपणास सद्बुद्धी देतात. "ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते" या श्रीभगवद्वचनानुसार श्रीमहाराज स्वतःच तद्रूप होते हे मनावर ठसल्याशिवाय राहत नाही.

श्रीमहाराजांच्या या रूपाचा आपणास अविरत लाभ असण्यासाठी कोणत्या गुणाची वृद्धी आपण आपल्या ठायी करावी याविषयीचा महाराजांचा संदेश श्रीमहाराजांचे उत्तराधिकारी श्रीदत्तमहाराज, संत–अंतरंग ज्ञाते माजी सभापती श्री. मारदे महोदय, श्रीगुरुभक्त केसरी श्री. कुबडे यांनी दिला आहे. श्रीशिवोऽतीर्थ, वेंकटेशशास्त्री जोशी, श्रीराजराजेश्वर शास्त्री द्रवीड, उपनबेटिगिरीशास्त्री, पं. भालचंद्रशास्त्री मुळे यांच्या लेखांतून श्रीमहाराज सातत्याने व चैतन्यरूपाने आश्रमात आहेतच याचे आश्वासक निवेदन आहे. तर श्री. पटवर्धन, डॉ. लिमये, पं. शेवडेप्रभृतींच्या लेखांत श्रीमहाराज देहात व विदेहातही आपले मार्गदर्शन करीत असल्याचा आपलाच अनुभव आपण वाचतो आहो असे वाटते. कोणास काय भाग्य लाभले, श्रीमहाराज आपलेच आहेत अशी भावना होण्याचे भाग्य कसे लाभले, इत्यादि विविध वृत्तींचे चित्रण करणारे लेखही वाचक भक्तांस बोधप्रद वाटतील व काही अनुभव न आले तरी श्रीमहाराजांच्या सन्निकर्षाचा स्वतःच्या जीवनावर झालेला परिणाम वाचूनही आपण श्रीमहाराजांच्या सन्निकर्षात आलो ही केवढी भाग्याची गोष्ट आहे हे कळून आपण अधिक उत्साहाने त्यांचे ज्ञात झालेले आदेश पाळावेत अशीही स्फूर्ती काही लेखांतून मिळेल. या स्थानाचा महिमा म्हणून आम्हाला एक घटना ठाऊक आहे. श्रीमहाराज असताना त्यांच्याकडून दीक्षा न मिळाल्याने एक वयस्कर गृहस्थ म्हणाले की, आता काय करायचे? तेव्हा त्यांना सांगण्यात आले की, आश्रमात जाऊन श्रीमहाराज, श्रीमद्वासुदेवानंद व श्री लोकनाथतीर्थ यांच्या प्रतिमांस प्रणाम करून त्यांच्या अनुग्रहाचे दान करावे अशी प्रार्थना करा. या गृहस्थांचा पाय दुखत असे व काही मिनिटे सुद्धा स्थिर बसता येत नसे. वरील सांगण्याप्रमाणे ते प्रार्थना करून पुढील हॉलमध्ये बसले. त्यांना २ तासपर्यंत डोळे उघडावे लागले नाहीत व पायही हालवावे लागले नाहीत. ह्या घटनेवर विवेचन करण्याचे काही कारण नाही.

अशा तऱ्हेचे विविध अनुभव, भाव व घटना यांच्या द्वारा श्रीमहाराजांचे

निर्वाणाकडे कसे पाहावे, श्रीमहाराज माउली स्वरूप व व श्रीसंत कुळीचा राजा होते हे ठसविण्याचा प्रयत्न डॉ. केरूर व श्री. नखाते यांनी केला आहे. त्यांच्या या प्रयत्नासह या सर्व ग्रंथाबद्दल असे म्हणता येईल की श्रीमहाराजांच्या कृपानुग्रहामुळे आपले मन शुद्ध व निकोप कसे होते याचेच दर्शन या सर्व लेख-कवितांतून आहे. असे शुद्ध अंतःकरण म्हणजेच श्रीगुरूंच्या बोधाचे बीज पेरले जाण्याचे सुक्षेत्र होय. असे सुक्षेत्र श्रीगुरुमहाराजांच्या कृपेनेच झाले आहे असा नम्र व अनासक्त भावही या लेख व कवितांतून आहे. अशा या निकोप श्रीगुरुचरण प्रथम वर्ष-स्मरणाचा आस्वाद व सर्व भक्तांनी घेतला तर त्यांचे कल्याण करण्यास श्रीसद्गुरूच समर्थ आहेत. असे सुचवून ही प्रार्थना संपवितो.

* *

# गुरुशक्ति-अनुभव का अद्भुत प्रसंग

(लेखक : **श्री. प. प. शिवोम्तीर्थ स्वामी महाराज**, हृषिकेश)

वर्षों पुरानी बात है। उन दिनों बद्रीनारायण की यात्रा में देव प्रयाग तक ही बस जाती थी। आगे की सारी यात्रा पैदल ही करनी पड़ती थी। उस समय, आज की भान्ति, मार्ग सुगम-व्यवस्थित नहीं थे। हिंसक पशुओं, मक्खी-मच्छरों तथा बीमारियों का प्रकोप था। पेय जल एवं खाद्य सामग्री प्राप्त करने में असुविधाएं थीं। सब मिला कर यात्रा अत्यन्त कठिन थी।

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

संभवतः गुलवणी महाराज की वह प्रथम बद्रीकेदार यात्रा थी। केदारनाथ हो कर बद्रीनारायण जाने का विचार था। ऋषिकेश से रुद्रप्रयाग तक एक ही मार्ग है। रुद्रप्रयाग से एक मार्ग अलकनन्दा के साथ साथ बद्रीनारायण को जाता है और दूसरा मन्दाकिनी के सहारे केदारनाथ की ओर मुड़ जाता है। केदारनाथ से सात मील पहले गौरीकुण्ड है जहां तप्तकुण्ड, दूकानें तथा ठहरने की पर्याप्त व्यवस्था है। अब तो गौरीकुण्ड से केदारनाथ मार्ग को लम्बा कर दिया गया है जिस से चढ़ाई का सीधापन कम हो गया है। किन्तु उन दिनों सात मील का यह मार्ग कठिन चढ़ाई का था जिस में यात्री को छः हजार फीट की चढ़ाई चढ़नी होती थी। प्रायः यात्री यहीं रात्री निवास कर के प्रातः-काल चढ़ाई आराम्भ करते है। श्रीगुलवणी महाराज भी रात यहीं ठहरे और प्राप्तःस्नान–संध्या से निवृत्त हो कर चढ़ाई आराम्भ कर दी। मार्ग में जो घटना घटी उसे श्री गुलवणी महाराज ने इस प्रकार सुनाया :—

" मैं उस समय जंगल चट्टी के समीप चला जा रहा था कि सामने से एक संन्यासी नीचे आते हुए दिखाई दिए। उन्हें देख कर मुझे कुछ आत्मीयता का अनुभव हुआ। जैसे २ हम एक दूसरे के समीप आते गए उन की ओर आकर्षण बढ़ता गया किन्तु संकोचवश, बिना कुछ बात किए, हम दोनों एक दूसरे के पास से निकल गए। विचारों का क्रम तीव्र होता गया और क्रिया–शक्ति का आवेग बढ़ने लगा। मेरे कदम रूक गए। पीछे घूम कर देखा तो स्वामी जी भी पीछे मुड़ कर मेरी ओर ही देख रहे थे। उन्हें अपनी ओर आकर्षित देख कर मैं भी उत्साहित हो गया। भाग कर उन के पास गया और चरण स्पर्श कर के पूछा कि क्या वह स्वामी विष्णुतीर्थ महाराज हैं? उन से हां कहने तथा मेरा परिचय पूछने पर मैंने कहा, 'गुलवणी, स्वामी लोकनाथ तीर्थ महाराज का शिष्य' इस प्रकार हमारा प्रथम मिलन हुआ।"

पाठक इस तथ्य से परिचित ही हैं कि स्वामी विष्णु तीर्थ महाराज तथा स्वामी लोकनाथतीर्थ महाराज गुरु बंधु थे। बंगाल के स्वामी नारायण तीर्थ देव महाराज द्वारा प्रवर्तित गुरुशक्ति ही दोनों में क्रियाशीला थी और फिर

वही शक्ति स्वामी लोकनाथ तीर्थ महाराज के माध्यम से भी गुलवणी महाराज में उद्भूत हुई थी। इस प्रकार स्वामी विष्णुतीर्थ महाराज एवं श्री गुलवणी महाराज ने, एक ही वृक्ष की दो शाखाएं होने के समान, परस्पर एक दूसरे में आत्मीयता एवं स्वशक्ति के दर्शन किए। यद्यपि दोनों, एक दूसरे को, उस समय तक, केवल नाम से ही जानते थे, प्रत्यक्ष साक्षात्कार यह प्रथम ही था। इस प्रकार की अनुभूति के लिए यह आवश्यक है कि साधक, प्रारम्भावस्था तथा घटावस्था से ऊपर उठ कर, कम से कम परिचयावस्था की स्थिति प्राप्त हो क्योंकि परिचयावस्था में जा कर ही शक्ति का परिचय प्राप्त होता है एवं तभी अपने शरीर में तथा अन्य साधक-शरीरों में शक्ति की अभिन्नता का अनुभव होना सम्भव है। अन्यथा गुरु-बंधुत्व का प्रत्यक्ष ज्ञान होने पर भी, शक्ति की अभिन्नता एवं आत्मीयता की अनुभूति नहीं होती।

सामान्यतः, प्रसंगवश, कारणवश अथवा किसी तीसरे व्यक्ति द्वारा परिचय कराए जाने पर ही, किसी से परिचय होता है किन्तु बिना किसी प्रसंग अथवा कारण के, जंगल एवं मार्ग में, जहां किसी परिचित के मिलने की कल्पना भी नहीं हो, वहां सूक्ष्म स्तर पर, दोनों शरीरों में एक ही गुरुशक्ति की विद्यमानता के अनुभव का यह प्रसंग साधकों को चिन्तनार्थ सूक्ष्म महत्त्वपूर्ण विषय उपस्थित करता है। इस उदाहरण से यह भी प्रमाणित होता है कि दोनों महापुरुषों के समक्ष मुख्यतया क्रियाशक्ति के सूक्ष्म स्तर ही विद्यमान थे, वैसे देखने पर दोनों भौतिक जग में विचरण करते थे लोगों से मिलते–बोलते थे, किन्तु यह सारा व्यवहार बाह्यमात्र था। शिष्यों के साथ उन के संबंध का वास्तविक आधार गुरुशक्ति ही था। गुरुशक्ति ही वास्तविक गुरुतत्त्व है जो शिष्यों के कल्याणार्थ गुरुशरीरों में कार्यरत है। वह गुरु शक्ति जन्म मरण से अतीत है तथा शिष्यों के प्रत्येक कर्म को, उन की चित्त स्थिति को प्रभावित करता है, ऐसे अवगत है।

शक्तिपात में दीक्षित प्रत्येक शिष्य का कर्तव्य है कि साधना सेवादि से चित्त

की निर्मलता सम्पादित कर के गुरु शक्ति से अधिकाधिक तादात्म्य स्थापित करे ताकि अपने में तथा अन्य सभी साधकों में एक ही शक्ति के दर्शन कर के रागद्वेष से मुक्त हो सके। रागद्वेष ही जगत मे बंधन का कारण है और रागद्वेष से ऊपर उठना ही मुक्ति का मार्ग है।

श्री गुरुशक्ति सब का कल्याण करे। ॐ शान्ति।

* *

# ‘ श्रीकाशीविश्वेश्वर कृपाप्रसाद ’

‘ पंडितराज राजराजेश्वरशास्त्री द्रवीड महोदय शुभ संदेश ’

द्वारा **पं. हेब्बारशास्त्री**

शक्तिपातयोगसिद्धयोगीश्वराणां पवित्रकीर्तीनां श्रीवामनरावजी दत्तात्रेय गुळवणी महाराजानां सत्त्वप्रभावेण संस्थापिता विद्यावाचस्पति राष्ट्रीय पण्डित श्रीदत्तात्रेय-शास्त्री कवीश्वर महाराजानां उत्तराधिकारे प्रवर्तमाना चेयं श्रीसद्गुरु स्मारक श्री वासुदेवनिवास संस्था भगवतः श्री काशीविश्वेश्वरस्य परमानुग्रहेण सात्त्विकता प्राधान्येन प्रवर्धमाना लोककल्याणसंपादिका समेधतामिति प्रातःस्मरणीय श्री गुरुचरणानां पण्डितराज श्रीराजराजेश्वरशास्त्री द्रविड महोदयानामभिमतं शुभ-शंसितं समाशंसते।

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# श्रीपंढरीनाथ संदेश

" महायोगपीठे तटे भीमरथ्याम् ।
वरं पुंडरीकाय दातुं मुनींन्द्रैः ॥
समागत्य तिष्ठंतमानन्दकंदम् ॥
परब्रह्मलिंग भजे पांडुरंगम् ॥ "

" नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ । मद्भक्ता यत्र गायंती तत्र तिष्ठामि नारद ॥ "

श्रीक्षेत्र पैठण येथे श्रीविष्णुयागानिमित्त दिनांक २७ डिसेंबर १९७४ ते ३ जानेवारी १९७५ पर्यंत अखिल भारतामधून विविध ठिकाणचे वैदिक, शास्त्री ब्रह्मवृंद व अनेक साधुसंत उपस्थित झाले होते. हा महायज्ञ औरंगाबाद जिल्ह्यामधील गाढे पिंपळगाव येथील श्रीबजरंगबलीभक्त अधिकारी महापुरुष 'श्री गोटीराम बाबामहाराज' यांचे दिव्य प्रेरणेने साजरा झाला. बाबांचे भक्त आमदार श्री बाळासाहेब पवार प्रभृती अनेक लोक त्या ठिकाणी सेवेस हजर होते. अमाप अन्नदान झाले. नाथांचा परिसर भगवन्नामानी निनादून निघाला– रात्रंदिवस कथा, कीर्तन, प्रवचन, भजन, गायन आदि चालू होते.

वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू ह. भ. प. श्री धुंडामहाराज देगलूरकरही पैठणला आले होते. पं. दत्तमहाराज कवीश्वरशास्त्री महोदय यांनाही निमंत्रण होते. पं. दत्तमहाराज यांचे समवेत श्री जगन्नाथशास्त्री पुजारी गुरुजी, श्री बापूसाहेब कुबडे, श्री भाऊसाहेब क्षीरसागर प्रभृती मंडळी होती. पहिले दिवशी श्रीधुंडामहाराज यांचे प्रवचन होते. त्या प्रवचनास पं. दत्तमहाराज प्रभृती मंडळी उपस्थित सोती. दुसरे दिवशी पं. दत्तमहाराज कवीवरशास्त्री महोदय यांचे प्रवचन झाले. त्या प्रवचनास ह. भ. प. धुंडामहाराज प्रभृती वारकरी सांप्रदायाचे अनेक अधिकारी मंडळी उपस्थित होती. पं. भगवान्शास्त्री किनणेळकरही होते.

प. पू. श्री गुळवणी महाराज यांचा हा प्रथम वार्षिक पुण्यस्मृति महोत्सव ह. भ. प. श्री धुंडामहाराज यांचे उपस्थितीत व्हावा असा पं. दत्तमहाराज कवीश्वर यांनी आपला मनोदय व्यक्त केला. श्री. धुंडामहाराजांनी सर्व हकीकत

चौकशीपूर्वक समजावून घेतली व समाधान व्यक्त केले. श्री धुंडामहाराज हे अखिल भारतीय यात्रेस जात असलेमुळे उपस्थित राहू शकले नाहीत. तथापि श्री गुळवणी महाराज व त्यांचे उत्तराधिकारी यांचेविषयी अत्यंत आत्मीय आदरयुक्त प्रेम व्यक्त केले व वरील भीमातीरनिवासी श्री पांडुरंग संदेशद्वारा कृपाप्रसाद स्वाधीन केला.

* *

# आशीर्वाद

॥ श्री शङ्करः शरणम् ॥

ब्राह्मण्यरक्षणे दक्षं शरण्यञ्चामृतान्धसाम् ॥

परिग्रहभयैर्हीनं स्मरामो योगि वामनम् ॥

यद्यप्यद्यत्वे महामहिम्नां, जन्मसहस्रादप्यशक्यनियंत्राणां प्राणजयैकसाध्यां चित्तवृत्तिमात्मायत्तां प्रकुर्वतां, योगिपुङ्गवानां वैधुर्यमायविर्तमाविलयत्यति वेलं, परमेतदपि कुसुमाभावेऽपिदलेनेव समाहितिं प्रापयति तादृशीनामसदृशव्यक्तीनां योगिराजश्रीवामनरावसदृशीनां पुण्यस्मरणमपि सुपथि प्रवर्तयति विनेयान् तच्चित्रचरित्रावगाहिनः इति। नूनं तराचन्द्रतारकं प्रकाशमानः प्रत्यष्ठापि प्रात्यहिक वैदिक भक्तिपथ योगचर्यादि निर्वाको वासुदेवनिवासाश्रमोऽयं, यत्र किल विराजन्ते तरेव साधिकारं प्रतिष्ठापिताः प्रातःस्मरणीयचरिता पारेगिरं पाडित्यप्रकर्षः-दैवसम्पत्यादिपरिकर्मिताः कर्मशूराः श्रीविद्यावाचस्पत्यादि बिरुदावलिमन्वर्थक यन्तश्चा द्रोहशान्तिप्रभृतिदुरवापगुणगणगरिमाणः श्रीकवीश्वरमहाराजो-

पाभिधा ब्रह्मश्रीजुष्ठो दत्तात्रेयशास्त्रि महाभागाः। सुदृढं विश्वसिमो वयमेतासा-मेब महानुभावानां सान्निध्येनाश्रमोऽयं श्रमं परिहारयेद्भक्तस्तोमस्य भवदाव प्लुष्टान्तरस्येति। विदध्याद्भूतभावनो भगवान् भवानीजानिरेतस्याश्रमपदस्य साधुतर व्यवस्थापकसेवकवर्गसचिवस्योत्तरोत्तरमुत्कर्षं सर्वतोमुखमिति सहार्दं प्रार्थयामह इति शिवम्.

श्रीशके १८९६ तमानन्दाब्दीय
सहः कृष्ण सप्तम्या स्थिरवासरे
श्रीमज्जगद्गुरु शङ्कराचार्य
संस्कृत पाठशालायां धारवाड नगरे

**भालचन्द्रशास्त्री**
उप्पिनबेट्टगिर्युपाख्यः

* *

# 'भक्तोत्तमो योगिराट्'

लेखक : **पं. वकटेशशास्त्री जोशी,** पुणे

प्रातःस्मरणीय योगिराज गुळवणीमहाराजानामकम्पानुकम्पा– संपादितानुग्रह-विशेषवशान्नैके जनाः स्वजीवनसाफल्यमनुभवन्तो दृश्यन्ते साम्प्रते निखिलेऽपि भारते। करालेऽस्मिन् कलिकाले विविधदुःखपीडितानां बहूनां जनानामयमेक-श्छायाशाली आधारवटवृक्ष आसीत्। अस्य शीतलच्छायायां नैकैर्भक्तैस्त्रिविध दुःखतापो महताऽनन्देन सोढ इति तु प्रत्यक्षमेवात्रत्यानां सर्वेषाम्। स्वगुरुपरम्परा-

प्राप्तयोगसिद्धिबलात् कुण्डलिनीजागरणं कृत्वा निरतिशयानन्दसागरनिमग्नचित्त-वृत्तयः कृता बहवो भक्तोत्तमाः पूजनीयैर्गुरुमहाराजैः ।

योगविद्यायां यद्यपि विशिष्याधिकार आस्था चासीन्महाराजानाम्, अथापि मनःशुद्ध्यर्थं भक्तिमार्गः, आचारशुद्ध्यर्थं च विधिविहितः कर्ममार्ग एव शिष्येभ्य उपदिष्टो यावज्जीवं स्वयमाचरितश्च । एतेषां शिष्यवृन्दो निखिलेऽपि महाराष्ट्रे कोणे कोणे सर्वत्र प्रसृतो दृश्यते । तेभ्यः शिष्येभ्यस्तत्तदधिकारानुसारं भिन्न-भिन्नान् मार्गानुपदिश्याप्यन्ततो गत्वा ज्ञानमार्गस्यैव प्राधान्यं "न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते" "ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते तथा" इत्यादि वचनैर्भारतीयतत्त्वज्ञानानुसारं बहुवारं स्पष्टीकृतं महाराजैः ।

एतेषां शिष्यगणेषु भक्तोत्तमेषु च विविधाः प्रकारा आसन् । केचन महा धनिकाः, अन्ये तु निर्धनप्रायाः । केचन प्रज्ञाशालिनौ धीमन्तो विद्वांसो वाग्मि-प्रवराः, अपरे तु जीवनव्यवहारार्थं यथामतिसम्पादितसामान्यज्ञानकणाः । केचन तपःस्वाध्यायनिरता विधिविहिताचारमग्ना आधुनिककालमहर्षयः, इतरे तु जडा वा अश्रद्धा वा सदाचाररहिताः । राजपुरुषाः समाजधुरीणाः, दातृत्वशालिनः । बालाः, वृद्धाः, नरनार्यः । सर्वेष्वप्येतेषु निरुपाधिकः समान एव प्रेमा महाराजा-नाम् । एतैः सह संभाषणादिव्यवहारस्तु तत्तदधिकारानुसारं नियतविषय एवासीत् । श्रीमदाद्यशंकराचार्यैः कस्मिंश्चित् श्लोके जीवन्मुक्तस्य वा आत्मसाक्षात्कारिणो वा आदर्शपुरुषस्य वा वर्णनं परमयाथातथ्येन कृतम् । तत्र किञ्चिदिव विपरिवर्तनं कृत्वा–यथा—

मौने मौनी गुणिनि गुणवान् पण्डिते पण्डितश्च  
दीने दीनः सुखिनि सुखवान् **योगिनि प्राप्तयोगः ।**  
**भक्ते भक्तो मुनिषु च मुनिर्वाग्मिनि** प्रौढवाग्मी  
धन्यः कोऽपि त्रिभुवनजयी योऽवधूतेऽवधूतः ॥

एवं रीत्या पठ्यते चेत् तर्हि योगिराज गुळवणी महाराजानां वर्णनं यथार्थतया संपन्नं भवतीत्यत्र वासुदेवाश्रमनिवासिनोऽधिकारिणः पुरुषः एव प्रमाणं भवितुमर्हन्ति ।

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

स्वगुरुकृपासंपादितयोगविद्याया अविच्छिन्नशिष्यपरंपरातः सर्वेषां मुमुक्षूणां जिज्ञासूनां च लाभार्थं योगिराज गुरुमहाराजैः भक्तानुग्रहकाङ्क्षया " श्रीवासुदेवाश्रमः " इति नाम्ना एकः सर्वव्यवस्थापरिपूर्णः प्रासादतुल्य आश्रमोऽपि निरमायि। अस्मिन्नाश्रमे पूजनीयैर्ब्रह्मश्रीदत्तमहाराजैरन्येषां शिष्याणां भक्तोत्तमानां विश्वस्तानां च साहाय्येन प्रतिदिनं नित्यनैमित्तिकविधिपरिप्लुतः क्रियाकलापोऽपि गुरुमहाराजविलिखितनिदेशानुसारं यथावदनुष्ठीयते। नूनं " श्रीवासुदेवाश्रमस्थानम् " पुण्यपुत्तनस्य भूषणम्। तत्र च महाराजपदमधिरूढाः पूज्या ब्रह्म श्रीदत्तमहाराजाः सर्वेषां भक्तानां सौभाग्यवशात् अनुग्रहपूर्वकं मार्गदर्शनार्थं दक्षा विद्यन्ते। सर्वेषामेतदेवैकमाशास्थानं साम्प्रतमत्यन्तकठिनतमपरिस्थितौ। वैराग्यपाण्डित्याचारशीलतेत्यादिविविधगुणसंपन्नानां ब्रह्मश्रीदत्तमहाराजानां योगविद्यायामसाधारणमधिकारं दृष्ट्वैव तेषां श्रीवासुदेवाश्रमपीठे नियुक्तिः कृता श्रीगुरुमाहाराजैः। अत एव,

वासुदेवाश्रमे पुण्ये योगिराट् वामनो गुरुः।
शिष्यं श्रीदत्तनामानं स्थापयामास योगिनम्॥

इति वचनं सर्वेषामेव भक्तानां हृदयाह्लादकं संप्रदायसंवर्धनार्थम् आशास्थानं च। गुरुमहाराजानां निर्याणानन्तरं गते संवत्सरात्मके काले नैका विपत्तीः सोढ्वा पुनश्च " हरिः ॐ " इत्युक्त्वा आश्रमकार्यं महतोत्साहेन वेगेन चाश्रमस्थजनैः प्रारब्धम्। तस्यैव परिपूर्त्यर्थं सच्चिदानन्दघनः परमेशः शिष्येभ्यो भक्तेभ्यश्चोचितां बुद्धिं प्रददातु इत्येव योगिराज श्रीगुळवणी महाराज प्रथमवर्ष श्रद्धाञ्जलिसमर्पणसमये प्रार्थना।

* *

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः

# मोक्षसाधक महापुरुषांचे तीन गुण

लेखक—ब्रह्मश्री पं. दत्तमहाराज कवीश्वर

भगवान् श्रीकृष्णांची पूर्ण शक्ती, तावून सुलाखून पाहिल्यानंतर ब्रह्मदेवांनी जी कृष्णस्तुती केली त्यात पुढीलप्रमाणे एक महत्त्वाचा श्लोक आलेला आहे—

'तत्तेऽनुकम्पां सुसमीक्षमाणः भुञ्जान एवात्मकृतं विपाकम् ।
हृद्वाग्वपुर्भिर्विदधन्नमस्ते जीवेत यो मुक्तिपदे स दायभाक्' ॥ १ ॥

(श्रीमद्भागवत दशमस्कंध अ. १४)

यात, मोक्षाचा मुख्य अधिकारी कोण होऊ शकतो याचा विचार केलेला आहे. मोक्षाधिकारी सिद्ध पुरुषाचे जीवन कसे असते हेही व्यक्त केले आहे यामुळे सात्त्विक साधकांना त्याप्रमाणे वागून मोक्षाधिकारी बनणे शक्य होणारे आहे.

१. ईश्वराच्या अनुकंपेची तळमळ निर्माण होणे. २. आपण केलेल्या कर्मांचे फळ बिनतक्रार भोगणे, ३. विश्वात्मक ईश्वराविषयी कायावाचा मनाने नम्र असणे हे तीन गुण मोक्षाधिकारी बनविणारे आहेत असे ब्रह्मदेवांचे सांगणे आहे. ईश्वराची अनुकंपा आपणास लाभावी अशी इच्छा सर्वच जीवांना असते. तथापि ती अनुकंपा अनेकविध आहे की, एकविध आहे म्हणजे तिच्यात काही तरतमभाव आहे काय ? हाही विचार येथे गर्भित आहे : 'ठेविले अनंते तैसेचि रहावे । चित्ती असो द्यावे समाधान' या संतांच्या उद्‌गारावरून ईश्वराच्या अनुकंपेत तरतमभाव मानणे योग्य नाही असे दिसते. इतकेच नव्हे तर जीवनातील अनुकूल–अतिकूल वाटणाऱ्या सर्वही अवस्था अथवा घटना ही ईश्वराची अनुकंपाच आहे अशी संतांची धारणा असल्याने 'चित्ती असो द्यावे समाधान' ही

स्वतःचीच भूमिका त्यांनी लोकांपुढे मांडली आहे आणि या श्लोकातही ब्रह्मदेव, ' भुञ्जान एवात्मकृतं विपाकम् ' या वाक्याने तेच व्यक्त करीत आहेत. कर्मभोग समाधानाने भोगावा ही संतांची भूमिका सयुक्तिक आहे यात संशय नाही. एक तर आपणास मिळणारा भोग हा आपल्याच कर्माचा असल्याने त्याबद्दल तक्रार करण्यात हशील नाही. यामुळे ईश्वराची निःपक्षपाती वृत्तीही सिद्ध होऊ शकते. ज्याच्या त्याच्या कर्माचे फळ ज्याच्या त्याच्याकडे पोचविणे हाच स्वतःचा निःपक्षपातीपणा, ' समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ' या वाक्याने भगवान् व्यक्त करीत आहेत. यामुळेच ईश्वराचे अनंतत्वही सिद्ध होऊ शकते. जीव कोठेही गेला, काळ कितीही लोटला तरी त्याच्या कर्माचे फळ त्याला मिळते. यावरून कर्मफलदाता ईश्वर सर्व देशांत व सर्व कालात असला पाहिजे असे मानल्यावाचून गत्यंतर नाही, हाच अनंत शब्दाचा अर्थ आहे.

तिसरा गुण नम्रता हा, ' आता विश्वात्मके देवें । येणे वाग्यज्ञे तोषावें । तोषोनि मज द्यावें । पसायदान हे '—या वाक्यात श्रीज्ञानराजांनी व्यक्त केलेला आहे. ' जितेंद्रियत्वं विनयस्य लक्षणं गुणप्रकर्षो विनयादवाप्यते । गुणाधिके पुंसि जनोनुरज्यते जनानुरागप्रभवा हि संपदः ' या श्लोकात विनयाचे स्वरूप व फल नीतिशास्त्रज्ञांनी दाखविले आहे. ' नम्र झाला भूतां । तेणें कोंडिले अनंता ' ही संतांची उक्ती प्रसिद्धच आहे. श्रीमहाराजांच्या सारख्या सिद्धपुरुषांच्या सर्व जीवनात शेवटपर्यंत हा गुण सर्वांनी पाहिलेला असल्यानेही याचे महत्त्व कळून येईल. ' निर्वैरः सर्वभूतेषु ' हे गीताशास्त्राचे सार, श्रीमहाराजांच्या मुखातून निघालेले अनेकवेळा अनेकांना ऐकण्यास मिळाले आहे. ' सदा सन्तोऽभिगंतव्याः ' या आदेशाप्रमाणे वरील तीन महत्त्वाचे गुण प्राप्त करून घेण्यातच मानवजन्माचे साफल्य आहे. परंतु याकरिता केवळ मानवी प्रयत्नाचा तादृश उपयोग होणार नाही. याकरिता ईशस्वरूप महापुरुषांची अनुकंपाच कार्यकारी ठरणारी आहे म्हणून याबद्दल भगवत्स्वरूप श्रीमहाराजांची प्रार्थना करीत राहणे यापेक्षा स्वकर्मसूत्रग्रथित साधक जीव दुसरे काय करू शकणार ?

त्वयि भक्तिं मे वर्धय दुहृत्तम ईश नाशय अशेषम् ।
यच्च तवेष्टं तत्कुरु मयि भोः सर्वज्ञवक्तुमसमर्थः ॥ १ ॥

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# ‘ सामान्य गुरु ते असामान्य सद्‌गुरु ! ’

लेखक : माजी सभापती **श्री. बाळासाहेब भारदे,** महोदय

मार्गाधारे वर्तावे। विश्व हे मोहरे लावावे। अलौकिक नोहावे। लोकांप्रति ॥

—ज्ञानेश्वर

श्री गुळवणी महाराज हे समाधिस्थ झाले त्यास वर्ष झाले. ज्या सत्पुरुषाने हजारो लोकांना उपाधिमुक्त करून, समाधिसुखाचा काही ना काही प्रत्यय आणून दिला. त्याच्या श्राद्धदिनी त्या सर्वांचे अष्टांगभाव दाटून आल्यावाचून राहणार नाहीत. पुण्यासारख्या विद्यानगरीत सुविद्य लोकांना आत्मविद्येची दीक्षा देऊन त्यांचे जीवन कृतार्थ करणाऱ्या महापुरुषाचे पामर लेखणीने काय वर्णन करावे ? चित्रकलेच्या साधनेत जीवन व्यतीत करणाऱ्या या साधकाला सर्व जीवसृष्टीच परमेश्वराची चित्रलीला वाटावी, त्यातून कागद रंगविण्याऐवजी स्वतःच रंगून जावे अशी प्रेरणा व्हावी, आणि रंगेल्या दुनियेतील सर्व रंग साफ पुसून केवळ रंगातीत असे अंतरंग सिद्ध व्हावे व त्यामुळे बेरंग झालेल्या हजारो जीवांच्या जीवनात रंग भरावा हा चमत्कार केवढा विलक्षण आहे ? विद्यार्थ्यांतून शिक्षक, शिक्षकातून गुरु आणि गुरूतून सद्‌गुरु हा गुळवणी महाराजांचा विभूतिविकास कुणालाही विनम्र करू शकेल. शालेय जीवनातील शिक्षक म्हणजे मध्यमवर्गातील ओढगस्त जीवनातही आपली ऋजुता कायम टिकविण्यासाठी धडपड करणारा प्राणी ! अशा चाकोरीतील शिक्षकी पेशात क्रांतिकारी साक्षात्काराची सिद्धी हस्तगत होणे ही केवढी महासिद्धी ?

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

## विषयांचे ज्ञान करणारा तो शिक्षक
## विषयांचे भान हरणारा तो सद्गुरु !

सामान्य शिक्षकांनाही गुरु अशा बहुमानाने संबोधण्यात येते व ते रास्तही आहे. परंतु शालागुरु आणि सद्गुरु यांमध्ये जमीनअस्मानाचे अंतर आहे. शाळा कॉलेजचे अध्यापक गुरु विषयांचे ज्ञान करून देतात. विषय म्हणजे Subjets . शास्त्र कला इत्यादि अनेक विषयांचे ज्ञान करून देणे हेच शिक्षणाचे कार्य समजले जाते. परंतु केवळ विषयांचे ज्ञान देऊन जीवनाचा कार्यभाग होत नाही. आज तर असे चित्र जगात दिसू लागले आहे की, विषयांचे ज्ञान वाढता वाढता विषयांचे ध्यानही वाढते आहे. सुखसोयींच्या वाढीमुळे आता सुखाचीही गैरसोय वाटू लागली आहे. ज्ञानाने मनुष्य निरपेक्ष होण्याऐवजी अधिक अपेक्षा वाढवू लागला आहे. विकास आणि हव्यास यांचीच जणू चढाओढ लागली आहे. त्यामुळे शिकलेले लोकही जीवनाच्या चक्रव्यूहाचा भेद करण्याऐवजी सुखमोहाने त्या चक्रव्यूहात योजनापूर्ण रीतीने अधिक गुरफटून गेले आहेत. विषयांच्या ज्ञानाला शिक्षण आणि विषयांच्या ध्यानाला जीवन असे तथाकथित सुधारलेले जगही मानू लागले आहे. परिणामी विकासाच्या भ्रमांत विनाशाच्या गर्तेकडे आपण चाललो आहोत याची जाणीवही अनेक बुद्धिमन्ताना राहिलेली नाही. शिक्षण हा जीवनाचा व्यापार आहे असे मानण्याऐवजी शिक्षण हा डोक्याचाच व्यापार आहे हा गैरसमज शिक्षणशास्त्रज्ञांनी महासिद्धांत मानला आहे. त्यामुळे डोकेबाजांची डोकी फिरण्याची वेळ आली आहे. सारांश, बौद्धिक शिक्षणाच्या पलीकडे जाऊन आत्मिक शिक्षणाची जोड जर आपण दिली नाही तर बुद्धी ही केवळ बुद्धिवादच करील; बुद्धियोग करणार नाही. हे गुळवणी महाराजांनी ओळखले आणि शिक्षकातून आचार्य व आचार्यातून सद्गुरु या परमपदी विराजमान होऊन लोकांना त्यांनी खरेखुरे ज्ञान दिले.

अज्ञानांधकार विनाशी । ब्रह्मज्ञान उपदेशी । जीवात्मा परमात्मयासी । भेटी करी ।।

हे सद्गुरुलक्षण आपल्या साक्षात्कारी जीवनाने महाराजांनी कृतार्थ केले.

*।। दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ।।*

## ज्ञान म्हणजे शिक्षा नव्हे तर दीक्षा !

हल्लीच्या शिक्षणपद्धतीत विद्यार्थ्यांना शिक्षण वा शिक्षा देणे अभिप्रेत आहे. परंतु त्या शिक्षणाचा मनाशी काहीही साक्षात् संबंध नाही. जीवनसंस्काराचा आजच्या शिक्षणपद्धतीत अभावच दिसून येतो. त्यामुळे वाचण्याचे शहाणपण असणाऱ्या अनेक सुबुद्धांना वागण्याचे शहाणपण आलेले नाही हे अनेक ठिकाणी दिसून येऊ लागले आहे. विद्येने जीवनयोग साधावा तर ती जीवनभोगालाच साध्य मानू लागली आहे; त्यामुळे सर्व जीवनच जणू दिशाहीन बनू लागले आहे. आपल्या स्वरूपाची जर जाणीव नसेल तर जगाचे ज्ञान होऊनही उपयोग नाही. समर्थांनी म्हटल्याप्रमाणे, 'पहावे आपणाशी आपण । त्यास म्हणणे ते ज्ञान ॥' विज्ञान म्हणजे विश्वज्ञान पण ज्ञान म्हणजे आत्मज्ञान ! हा सिद्धांत विसरल्यामुळेच शिक्षणाची शोकांतिका होऊ लागली आहे. म्हणूनच सुशिक्षित मनुष्य सुशिक्षित झाला नाही तर त्याचे आणि समाजाचेही भले होणार नाही. संस्कार म्हणजे संस्कृति ! परंतु मनावर संस्कार करावयाचाच नाही पण संस्कृती शब्द मात्र सवंग वापरावयाचा असा काही विद्वज्जनांचा खाक्या आहे. संस्कारलीन मन अचंचल व मंगल बनते; संस्कारहीन मन चंचल व अमंगल बनते ही अडाणी मनालाही पटणारी गोष्ट, मानसशास्त्राची जाणीव असणाऱ्या अनेक पढिक पंडितांना पटू नये हा दैवदुर्विलास होय. परंतु त्यांच्या दुर्दैवाने आत्मशांती तर राहोच, पण साधी मनःशांतीही अनेक सुशिक्षितांना लाभत नाही हे सिद्ध झाले आहे आणि मानसिक स्वास्थ्यशांतीसाठी पाश्चात्य देशांतलेही अनेक सुविद्यलोक भारतीय आत्मविद्येकडे आकृष्ट होऊ लागले आहेत. आधुनिक विद्या आणि आत्मविद्या यांमधील दुवा बनून सुविद्यांनाही आत्मविद्येची दीक्षा देण्याचे महान् कार्य श्री गुळवणी महाराजांनी केले ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. वकील, व्यापारी, डॉक्टर, शिक्षक, एन्जीनिअर, अधिकारी इत्यादी अनेक क्षेत्रांतील सुविद्य लोकांना महाराजांनी दिव्य दीक्षा देऊन शांतचित्त व अधिक समाधानी बनविले आहे. समाधी–कैवल्याचा अधिकारी सद्गुरु साधकांना मोठ्या समाधानाचा अधिकारी कसा बनवू शकतो याची मूर्तिमंत साक्ष म्हणजे गुळवणी

महाराजांचे अवतारकार्य आहे.

**काय सांगू आता या संतांचे उपकार !**

माझ्या जीवनाचा हे एक विशेष भाग आहे की, माझी पात्रता नसताना अनेक सत्पुरुषांचा सत्संग मला लाभला. श्री गुळवणी महाराजांना मी पाहिले तेव्हा सर्वसामान्य सद्‌गृहस्थाच्या राहणीत असामान्य करणी असेल अशी कल्पनाही मला आली नाही. अर्थात् त्यांचा लौकिक तर मी ऐकून होतोच शिवाय त्यांनी दीक्षित केलेल्या काही मित्रांकडून त्यांचे अलौकिकत्व मी थोडेसे जाणूनही घेतले होते. या पार्श्वभूमीवर त्यांची साधी वेषभूषा व राहणी हीच मला अधिक आकर्षक वाटली. लौकिक साधेपणा आणि अलौकिक साधुपणा यांचा मनोहर संगम म्हणजे गुळवणी महाराज असे समीकरण मी तेव्हाही मांडले होते. ' अलौकिक नोहावे। लोकांप्रति। ' या ओवीचे चालतेबोलते प्रतीक म्हणजे महाराज ! ' गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यस्तु छिन्नसंशयः। ' असा त्यांचा दिव्य वार्तालाप ! अंतर्बाह्य संशुद्धी, अद्वैत ज्ञानाची संबुद्धी, आणि शक्तिपातयोगाची संसिद्धी यांचा त्रिवेणीसंगम म्हणजेच सर्वांचे पावनतीर्थ महाराज ! हा त्रिवेणी संगम आजच्या श्राद्धपर्वणीस सर्वांना पावन करो व आमची श्रद्धाही, वर्षानुवर्षे अशीच गेली तरी अखंड टिको ही प्रार्थना !

* *

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# "यदृच्छालाभ तुष्टस्य तेजो विप्रस्य वर्धते"

( लेखक—**गुरुभक्तकेसरी बापूसाहेब कुबडे**, सोलापूर )

**'प्रास्ताविक'**

कोल्हापूरनिवासिनी शक्तिदेवी श्री महालक्ष्मी इचे परिसरात डोंगरकुशीमधील कौलव, तारळे, कुडुत्री, राशिवडे वगैरे काही गुण्यागोविंदाने नांदत असणाऱ्या व प्राचीन ऋषीमुनींच्या आश्रमासमान असणाऱ्या खेड्यांमधील नाथसांप्रदायिक महान् अधिकारी 'श्रीगहिनी नाथ' यांचे सुंदर स्थान असलेल्या 'कौलव' या गावी पूर्वी एक सदाचारसंपन्न वैदिक श्री नागेशभटजी गुळवणी म्हणून राहात असत. ते सहजासहजी होणाऱ्या प्राप्तीवर उदर निर्वाह करून अल्प संतुष्टतेने निरंतर भगवत् भजन करून आनंदी असत. परंतु त्यांना पोटी संतान नसलेमुळे उभयता पतिपत्नींना किंचित् उदासीनता वाटे. तरीही "जैशी स्थिती आहे. तैशापरी राहे, कौतुक तूं पाहे, संचिताचे." या न्यायाने समाधान मानन कालक्रमणा करीत असत.

पूर्वसुकृतानुसार पुढे लवकरच अनुकूल काळ येतो काय, कोल्हापूर नरसोबावाडीचे एक साक्षात्कारी महापुरुष श्रीनारायणस्वामी महाराज हे 'दुर्गमानवड' डोंगरावरील श्री विजयादेवींचे दर्शनाचे व तेथे नित्य रहिवास करणाऱ्या एका वाघोबाचे पायात काटा मोडला होता तो काढण्याचे निमित्त करून कौलव गावी येतात काय, नागेश भटजींची सेवा व अधिकार पाहून प्रसन्न होऊन वर माग असे म्हणतात काय, पोटी संतान नाही एवढीच उणीव आहे असे नागेशभटजी सांगतात काय, उभय कुळांचा उद्धार करणारे उत्तम असे 'पुत्र-पौत्र-प्रपौत्र' होतील 'चिंता नसावी' असा स्वामी अशीर्वाद देतात काय, स्वामीवरदानानुसार

'नारायण दत्तात्रेय वामन' नामक पुत्रपौत्रप्रपौत्र होतात काय? तेच हे 'प्रपौत्र' म्हणजे दत्तावतारी श्रीमन् प. प. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज यांचे उर्वरित कार्य पुढे चालविणारे प. पू. योगिराज श्री. वामनरावजी गुळवणी महाराज होत. सर्वच आश्चर्य.

**'एक श्लोकी चरित्र'**

वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू वै. ह. भ. प. श्री सोनोपंत मामा दांडेकर व केवळ पुण्याचे व महाराष्ट्राचेच भूषण नव्हे तर भारताचे अधिकृत पद्मभूषण म. म. श्री. दत्तोपंत पोतदार यांचे नेतृत्वाखाली व लोणावळा येथील कैवल्य-धामाचे संस्थापक, संगोपक व संवर्धक स्वामी श्रीकुवलयानंदजी यांचे अध्यक्षते-खाली सन १९५७ मध्ये पुणे येथे टिळक स्मारक मंदिरात श्री गुळवणी महाराज यांचा जो 'अमृतमहोत्सव' साजरा झाला. त्यावेळी सत्कार समितीने एक 'श्री गुरुदत्त योग' या नावाचा सुंदर ग्रंथ प्रकाशित केला आहे त्यामध्ये अनेक साधक भक्तांच्या सूचनेनुसार श्री. गुळवणी महाराजांचा एक सुंदर पूजनीय असा फोटो सोलापूर येथे मुद्दाम काढून त्या पुस्तकात प्रकाशित केला व स्वतंत्रही देण्यात आला. त्या फोटोखाली गुरु महाराजांचे 'एकश्लोकी सूत्रमय चरित्र' दिले असून या श्लोकाधारेच लिहिलेले गुरुमहाराजांचे एक 'सहज योगी सद्गुरु' नावाचे संक्षिप्त चरित्र सन १९७१ मध्ये पुणे येथील 'योगसेवा समितीचे संचालक' डॉ. दि. ब. केरूर व श्रीयुत नखाते यांनी प्रकाशित केले आहे. आज श्रीगुरु महाराजांच्या या प्रथम वार्षिक पुण्यतिथीनिमित्त प्रसिद्ध होणाऱ्या स्मरणिकेमध्ये या छोट्या लेखाद्वारा या सूत्रमय चरित्रात्मक श्लोका-संबंधी 'चरणवार' थोडक्यात विचार करण्याचे योजिले आहे. या श्लोकाचा प्रत्येक चरण हे एक सूत्रच असून गुरुमहाराजांची ही एक चतु:सूत्रीच आहे.

प्रथमचरण—'**यदृच्छालाभे जो परम सहजानंदभरिते**'

सद्गुरु श्री वामनरावजी गुळवणी महाराज यांचा जन्म कुडुत्री येथे मार्गशीर्ष वद्य १३ शके १८१८ गुरुवार दिनांक २३ डिसेंबर सन १८८६ रोजी झाला. खुद्द श्रीगुरुदत्तांचा अवतार 'मासानां मार्गशीर्षोऽहं' म्हणून मार्गशीर्ष पौर्णिमे-

सच झाला. मग आपल्या भक्ताकरिताही त्यांनी मार्गशीर्षच महिना व आपला आवडता वार गुरुवार जन्मदिन नियोजित करून त्याला भूतलावर पाठविले तर त्यात आश्चर्य कसले ! आणि गुरुमहाराजांचे प्रचंड अवतार कार्य पाहता ‘ मावळवीत विश्वाभासू । नवल उदयला चंडांशू । जो अद्वयाब्जिनी–विकासू । वन्दू आता ’ या श्री ज्ञानेश्वर माउलींच्या उक्तीनुसार अनेक मुमुक्षू साधकांना आपला विश्वाभास मावळविणारा अद्वयानंदाचा कंद असा वन्दनीय सद्गुरु सूर्यच उगवला–जन्मास आला असे वाटणे साहजिक आहे. असो.

आता आपण वरील प्रथम चरणाकडे वळू. गुरु महाराजांच्या एकंदर अवतारकालाचे विहंगमदृष्टया अवलोकन केले तर ‘ स्वेच्छा–प्रारब्ध, परेच्छा-प्रारब्ध, अनिच्छा–प्रारब्ध व यदृच्छा–प्रारब्ध ’ या चतुर्विध प्रारब्धांमधील सर्व-श्रेष्ठ अशा ‘ यदृच्छा ’ प्रारब्धावर त्यांचा फार भर असे. यदृच्छेने सहजासहजी होणाऱ्या लाभावर संतुष्ट राहून परमश्रेष्ठ अशा सहजानंदामध्ये निमग्न होऊन डुंबून राहणे हे मानवजन्माचे मुख्य सूत्र आहे अशी पणजोबा वे. नागेश भटजींपासून आलेल्या आनुवंशिक संस्कारानुसार गुरुमहाराजांची धारणा असे. स्वेच्छा–परेच्छा आदि प्रारब्धामध्ये दुःखदायक अशा आशा–आकांक्षेचे निष्कारण संवर्धन होते. जीवाने आपले मूळ ‘ सच्चिदानंद स्वरूप ’ ओळखून साधनाधीन असणाऱ्या क्षणभंगुर सुखाचा, कृत्रिम आनंदाचा त्याग करावा. सुख हे साधना-धीन कधीच नसते. ते स्वस्वरूपात साठविलेले आहे. बाहेरून मिळवावयाचे नाही. म्हणूनच त्याला ‘ सहजानंद ’ म्हटले आहे. आणि हे जाणूनच गुरुमहाराजांचे संक्षिप्त चरित्रास ‘ सहजयोगी सद्गुरु ’ असे जे नाव दिले आहे त्यात प्रकाश-कांनी चरित्रनायकाची यथार्थताच व्यक्त केली आहे.

वै. ह. भ. प. यशवंतराव वैद्य मास्तर यांनी आम्हा साधकांना नेहमी सुचवावयाचे की वामनरावांच्या प्रारब्धाचा अभ्यास करा म्हणजे तुम्हास ‘ प्रारब्धं पुष्यति वै वपुः ’ प्रारब्ध आपले सर्वतोपरी संरक्षण कसे करते या सिद्धांताची खात्री पटेल. आणि खरोखरच पुणे येथील नूतनमराठी प्रशालेमधून सेवानिवृत्त होण्याच्या वेळी इंग्रजांच्या राजवटीमधील जुन्या मुंबई इलाख्याचे अर्थमंत्री

गुरुभक्त श्रीमान् सर चुनिलाल मेहता शेटजी यांनी आपल्या सद्गुरूंची म्हणजे गुरुमहाराजांची तर हयात जशी इच्छा असेल ह्याप्रमाणे जीवनव्यवस्था करण्याचे ठरविले; परंतु ही योजना ' अन्नआच्छादन हे तो प्रारब्धाधीन ' या दृढ भावनेने व ' विधिवशात् प्राप्तेन संतुष्यताम् ' या सहजानन्ददायक निष्ठाधारे साभार नाकारली हे सर्वश्रुतच आहे. आणि केवळ या अपूर्व त्यागातच ' अनंत हस्ते-कमलावरानें देता किती घेशिल दो कराने ' हा प्रत्यक्ष भावी इतिहास साठविलेला होता हे आपणास दिसून आले आहे. असो.

द्वितीय चरण—' **सदा योगाभ्यासी हरिगुरुपदीं मानस रतें** '

गुरुमहाराजांकडे कोणी केव्हाही भेटीस आले तर त्यांना ते कधी कर्मयोगात तर कधी भक्तियोगात तर कधी राजयोगात, कोणत्या ना कोणत्या तरी योगात सदा–नित्य गुंगून गेलेले दिसावयाचे. 'काळ चोर घिरट्या बहु घाली, पामरा तुज कशी निज आली । जाग जाग स्वरूपी लवलाही–जातसे वय अमोलिक पाही ' हे ध्येय त्यांच्यासमोर नित्य असल्यामुळे सदासर्वदा योगमग्न असत. तसेच गुरुमहाराजांचे मन–चित्त ' माझें चित्त तुझे पायां–मिठी पडली पंढरीराया ' या तुकाराम महाराजांचे उक्तीनुसार ' हरि गुरुपदी ' अखंड जडलेले दिसे. आणि ' कृष्ण त्वदीय पदपंकजपंजरान्ते अद्यैव मे विशतु मानसराजहंसः । प्राण–प्रयाण समये कफवातपित्तैः कंठावरोधनविधौ स्मरणं कुतस्ते ' अशी पूर्वसुकृतानुसार बालपणापासून त्यांची धारणा असे. ' गुरुब्रह्म दोन्ही समान । हे तो वचन दिसे गौण । गुरुवाक्यें ब्रह्मा–ब्रह्मपण । तेथें भिन्नत्व कैचें ' या हंसराज स्वामींच्या सिद्धांतानुसार ईश्वर व सद्गुरु हे एकच असून तो स्मरणमात्र संतुष्ट असलेमुळे श्रेष्ठ अशा स्मरणभक्तीची उपासना करावी असे साधकांना नेहमी सांगत.

तृतीयचरण–' **मुखी चाले दत्तात्रयगुरु अशी नामलतिका** '

गुरुमहाराजांचे अंतःकरणात आबालवृद्ध स्त्री पुरुष–यावत् मानव समाजाचे उभयविध शाश्वत कल्याण व्हावे व त्यांना अखंड सुख लाभावे हीच सदिच्छा असल्यामुळे सर्वांना ते नवविधा भक्तीमधील सर्वसुलभ अशी ' नामस्मरण '

भक्ती हेच एकमेव साधन असून अखंड हरि हरि वदा बाप्पांनो अखंड हरि हरि वदा ’ असाच उपदेश करीत असत. व ‘ अजित नाम वदो भलत्या मिसे, सकळ पातक भस्म करीतसे ’ हे अजामिळाचे उदाहरण ते नेहमी सांगत असत.

“ नामसंकीर्तनं यस्य सर्वपापप्रणाशनम् । प्रणामो दुःखशमनस्तं नमामि हरिं परम् ’ या श्रीमत् भागवताचे संदेशानुसार व ‘ नामसंकीर्तन साधन पैं सोपे–जळतील पापें जन्मांतरींचीं । न लगती सायास जावें वनांतरा–सुखे येतो घरा नारायण ’ या तुकाराम महाराजांचे उक्तीनुसारच सर्व साधुसंतांचा नामस्मरणावर फार भर असे म्हणून गुरुमहाराजांनी स्वतः खुद्द त्याचा अंगीकार केला व ‘ आधीं केले मग सांगितलें ’ या न्यायाचा अंगिकार करून सर्वांना नित्य नामस्मरण करण्यास सांगितले.

चतुर्थ चरण–‘ **यथान्यायें कालक्रमण करणें भाव इतुका** ’–

गेल्या पौष वद्य अष्टमीस दि. १५ जानेवारी १९७४ मंगळवार रोजी श्रीगुरु महाराज लौकिक दृष्ट्या आपला स्थूल देह विसर्जन करून अदृश्य झाले व साधक भक्तांच्या हृदयांत कायमचें वास्तव्य करते झाले. सर्वांच्या कल्याणाकरिता यावज्जीव दिव्य–शक्तीचा प्रसार करून उत्तरायण लागताच अष्टमी मंगळवारीच आपल्या ‘ दिव्य मंगलशक्तीचा उपसंहार ’ गुरुमहाराजांनी केला. यापुढेही अव्यक्तरूपाने त्यांचें लोकोत्तर कार्य ते कोणाकडूनही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रूपाने चालूच ठेवतील असा आम्हास आत्मविश्वास वाटत आहे.

‘ ठेविलें अनंते तैसेंची राहावे । चित्ती असो द्यावे समाधान ’ गुरुमहाराजांनी आपल्या संपूर्ण आयुष्याची वाटचाल–कालक्रमणा–यथान्यायें म्हणजे पूर्व कर्मानसार कर्मफलदात्या परमात्म्याने जे जे नियुक्त केलेले आहे ते ते समाधान चित्ताने व आनंदी वृत्तीने स्वागतार्ह मानून, कधीही चित्ताचा आशा–आकांक्षेमुळे विक्षेप निर्माण होऊ दिला नाही. आणि हेच त्यांच्या तपश्चर्येचें फळ होय. आणि म्हणूनच ‘ देहबुद्ध्या तु दासोऽहं जीवबुद्ध्या त्वदंशकः । आत्मबुद्ध्या त्वमेवाऽहं इति मे निश्चिता मतिः ’ हे त्यांचे अखंड अनुसंधान कधीही व कोणत्याही कारणाने ढळले नाही. असो–

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

## ' ब्रह्मतेजोबलं बलम् '

' अर्जुनं निमित्तीकृत्य ' अर्जुनाला निमित्त करून भगवान् श्रीमत् भगवद्गीतेमध्ये सहाव्या अध्यायात योगभ्रष्टाच्या पुढील गतीविषयी सांगताना ज्या योगभ्रष्टाच्या वैराग्याची परिपक्वता झालेली नसून काही बलवत्तर वासना शिल्लक राहतात त्या वासना पूर्ण होण्याच्या दृष्टीने सर्वतोपरि अनुकूलता मिळावी म्हणून अशांना ' शुचीनां श्रीमतां गेहे ' असा जन्म त्यांना लाभतो व ज्यांच्या वासना नष्ट होऊन चांगल्या प्रकारचे प्रखर वैराग्य अंतःकरणात उदित झालेले असते अशांना ' अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ' दरिद्री पण आचारसंपन्न अधिकारी अशा महायोग्यांचे पोटी जन्म मिळतो. या दोन्ही जन्मांत हा दुसरा जन्म अत्यंत ' दुर्लभतर ' असा असून श्रेष्ठ आहे. या दृष्टीने गुरुमहाराजांना हा दुसरा श्रेष्ठ प्रकारचा जन्म लाभला होता हे त्यांच्या उपजत प्रखर वैराग्य व सत्त्वशील वृत्तीवरून सहज दिसून येते.

सारांश, वरीलप्रमाणे एका गरीब सत्त्वशील कुलातील एक साधक ऐन तारुण्यात सर्वसंगपरित्याग करून नैष्ठिक ब्रह्मचर्य व्रत धारण करतो काय, दोन पंचे व एक लोटा एवढ्या साहित्यानिशी घराबाहेर पडतो काय, खडतर तपश्चर्या करतो काय, श्री टेंबे स्वामीमहाराज व श्री लोकनाथतीर्थ स्वामीमहाराज या उभय साक्षात्कारी महापुरुषांची कृपा संपादन करतो काय, अयाचित वृत्ती धारण करून यदृच्छालाभावर संतुष्ट व आनंदी राहतो काय, अनंतहस्ताने जनताजनार्दनाकडून आलेली सेवा हजारोनी अन्नदान व लाखांनी द्रव्य दान देतो काय, वसिष्ठांची ' धिक् बलं क्षत्रियबलम् ब्रह्मतेजोबलं बलम् ' ही परंपरा संरक्षण करतो काय ? सर्वच आश्चर्य आणि म्हणूनच आम्ही ' विप्र तेजाचे संवर्धन यदृच्छालाभ तुष्टतेने होते ' ही भागवतकारांची वरील उक्ती या लेखास मथळा म्हणून दिली आहे. हीच आमची आजच्या प्रथम वार्षिक पुण्यस्मृतिदिनी श्रीचरणी श्रद्धांजली होय. इति शम्.

* *

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# स्मरणादेव साधवः ।

डॉ. दि. ब. केरूर, स. प. महाविद्यालय, पुणे.

सद्‌गुरुस्मरणं यस्य चित्ते पूज्यः स सर्वतः ।
गुरुनामसुधापानं यस्य सोऽप्यमरो भवेत् ॥

श्रीमद्‌भागवतामध्ये साधुपुरुषांच्या लक्षणाचे अनेक प्रसंगाने विवरण आहे. त्यात ' दर्शनादेव साधवः ' हे वचन सुपरिचित आहे. ज्यांच्या केवळ दर्शनाने परिवर्तन होते ते साधुपुरुष होत; असा श्रीभागवतकारांचा अभिप्राय आहे. श्रीगुरुचरणांच्या संदर्भात स्मरणादेव साधवः हे वर्णन यथार्थ ठरावे असे भाग्य अनेकांना लाभले. या भाग्याचा मलाही लाभ झाला; ही ईश्वराची कृपा होय. माझे पितृचरण ती. बलवंत यमाजी कुलकर्णी–केरुर यांना श्रीनृसिंहसरस्वती दीक्षित स्वामीमहाराजांच्या दर्शनानुग्रहाचा लाभ झाला होता. या अनुग्रहाचे फल म्हणूनच आम्हा मुलांमध्ये श्रीदत्तप्रेम अंकुरित झाले.

विद्याभ्यासासाठी पुण्यास यावे लागले. व्यवसायाच्या निमित्ताने पुण्यातच स्थायिक होण्याचा योग आला. आणि श्रीमहाराजांच्या प्रथम दर्शनाचा योगही पुण्यातच विशेषरूपाने आला. श्रीदत्तउपासनेत श्रीमद्‌वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या ईश्वरी वाङ्मयाचे महत्त्व स्वयंसिद्ध आहे. माझ्यापुरते, ' करुणा त्रिपदी ' श्रीगांडा महाराजांनी रचिलेले ' श्रीगुरुमूर्ती चरित्र ' यापलीकडे काही साहित्य उपलब्ध नव्हते. पुण्यातच श्रीस्वामी महाराजांची वाङ्मयसंपदा प्रकाशित झाल्याचे कळले. हे वर्ष १९५६ साल होते. नेर्लेकर बुकसेलर्स यांच्याकडे ' शिक्षात्रयम ' हा ग्रंथ मिळाला. दुकानातच अधीरतेने या ग्रंथातील अवघ्या दोन पानांचे प्रकाशकांचे निवेदन वाचले. आणि त्या क्षणापासून चित्ताला एक अनामिक हुरहुर लागून राहिली. श्रीवासुदेवानंद ग्रंथमालेचे ते प्रथम पुष्प

होते. प्रकाशक श्रीमहाराज होते. त्यांच्या निवेदनात श्रीदत्तसंप्रदायाविषयी सूचक स्पष्टीकरण होते. जे हवे होते; ते आता सन्निध येऊ पाहात होते. श्री महाराजांच्या दर्शनाची उत्कंठा वाढत राहिली. आणि वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर प्रातःकाळीं २० नारायण येथे गेलो. मनात काही प्रश्नांचे संकलन केले होते. श्रीमहाराज शुभ्र वस्त्रे परिधान करून आन्हिकामध्ये निमग्न होते. श्रीगुरु-चरणांचे हे प्रथम दर्शन होते.

साष्टांग प्रणिपात करून उभा राहिलो. बसण्याची आज्ञा झाली; आणि खाली बसलो. श्रीमहाराजांच्या या प्रसन्नदर्शनाने मनातील प्रश्न विचारण्याचे भानही राहिले नाही. जे हवे ते मिळाले होते. अन्तःकरण भरलेले जाणवत होते. मन शून्य होत असल्याचेही जाणवत होते. अशा एका प्रसादलब्ध अवस्थेत सारा दिवस गेला. श्रीगुरुचरणांची ओढ प्रत्यही वाढत गेली. दर्शनादेव साधवः या श्रीभागवतवचनाचा हा प्रत्यय होता.

## दुर्लभ महापुरुषसंश्रय :

भगवत् पूज्यपाद श्रीमत् शंकराचार्यांनी विवेकचूडामणीमध्ये सृष्टीतील तीन दुर्लभ वस्तूंचा उल्लेख केला आहे. मनुष्यत्व, मुमुक्षुत्व आणि महापुरुषसंश्रय या त्या तीन दुर्लभ वस्तू होत. पुनर्जन्म न मानणाऱ्यांच्या दृष्टीने मनुष्य जन्म हा पुनः प्राप्त न होणारा; अतएव दुर्मिळ ठरतो. पुनर्जन्म मानला तरीही पुढचा जन्म कोणता राहील याची अनिश्चितता. या दोनही दृष्टींनी मनुष्यजन्म हा दुर्लभ होय यात शंका नाही. विवेक, विचार, व्यवस्था, संघटन या गुण-समुच्चयामुळे अन्य प्राण्यांहून मनुष्यप्राणी हा काही विशेष आहे; यातही शंका नाही.

मुमुक्षुत्व ही दुसरी दुर्लभ गोष्ट होय. आपल्या प्रवृत्ती या सामान्यतः बहि-र्मुख राहतात. डोळे उघडावे तर बाहेरची सृष्टी चटकन दिसते. आपण स्तिमित होतो. आपले मन तिकडे ओढ घेऊ लागते. अशा स्थितीत दृष्टी अंतर्मुख होऊन मनाला स्वरूपदर्शनाची ओढ लागावी, असे मुमुक्षुत्व दुर्लभ ठरते.

मुमुक्षु हा साधक असतो. आता त्याला वाटचालीत श्रीगुरूंचे—महापुरुषांचे—

मार्गदर्शन हवे असते. सामान्य व्यवहारातही पदोपदी मार्गदर्शकाची, गुरूची आवश्यकता भासते. मोक्षमार्गात स्वरूपज्ञानासाठी श्रीगुरू हवेत हे सिद्ध करण्याचे काही कारण नाही. ज्यांनी स्वरूप जाणले आहे, जे नित्य स्वरूपस्थितीत आहेत, असे श्रीगुरुच साधकांना पैलतीरावर नेऊ शकतात; हे स्वयं स्पष्ट आहे. अशा महापुरुषांचा संश्रय ही जीवनातील सर्वांत दुर्लभ गोष्ट होय. श्रीमत्‌शंकराचार्यांनी विवेकचूडामणीमध्येच श्रीगुरूची लक्षणे सांगितली आहेत. जो श्रोत्रिय आहे; निष्पाप आहे; शून्यकाम आहे; ब्रह्मवेत्त्यामध्ये श्रेष्ठ आहे; ब्रह्मनिष्ठ आहे; इंधनरहित अग्नीसारखा शांत आहे; अकारण दयासिंधू असून प्रणत सज्जनांचा हितैषी आहे– अशा गुरूंची साधकाने सेवापूर्वक विनम्रभावाने आराधना करावी असा श्रीमत् शंकराचार्यांचा हितोपदेश आहे.

वेदोपनिषदांनी वर्णिलेला, भगवत्पूज्यपाद श्रीमत् शंकराचार्यांचा दुर्लभ महापुरुष – श्रीमहाराजांच्या रूपाने आम्हा सामान्यजनांना सुलभ आणि साक्षात्कृत व्हावा; यास केवळ ईश्वरकृपा कारण होय; अन्य स्पष्टीकरण संभवत नाही.

दर्शनाच्या क्षणापासून भौतिक देह विसर्जनानंतरही श्रीमहाराजांचे मार्गदर्शन सतत राहावे; जे प्रत्यक्ष दर्शनाने मिळाले ते आता केवळ स्मरणानेही लाभावे यांत श्रीमहाराजांच्या अहेतुदयासिंधुत्वाशिवाय अन्य काय आहे? माझे पितृतुल्य गुरुबंधू आणि थोर साधक श्री. नलाते यांनी श्रीमहाराजांच्या मार्गदर्शनाविषयी लिहिताना.... "अध्यात्म मार्गावर श्रीगुरुमहाराज आपल्याला बोट धरून चालवितात. पण ते तसे सांगत नाहीत. आपणासही तसे वाटत नाही. अद्वैत भक्तीचा प्रवास आपण आणि श्रीगुरु दोघे एकरूपाने करीत आहोत असा क्षणोक्षणी साधकास प्रत्यय आल्याशिवाय राहात नाही." असे यथार्थ लिहिले आहे. कोणत्याही साधकाचा अनुभव याविना वेगळा नाही.

## स्मृति–चित्रांजली

आज श्रीमहाराज पार्थिव रूपात अंतर्धान होऊन वर्ष संपले. मनात स्मृतिचित्रांचा कल्लोळ उडाला आहे. पुण्यस्मरणांच्या प्रसंगाने व्यक्तिगत जीवनातील काही स्मृतिपुष्पांजली श्रीगुरुचरणीं अर्पिण्याचा संकल्प आहे. गुरुकृपेचा

त्यातूनही अन्यथा ' चमत्कार ' म्हणून वाटणाऱ्या घटनांचा प्रकट उल्लेख करू नये असे शास्त्र आहे. श्रीसरस्वती गंगाधरांनी श्रीगुरुचरित्रामध्ये गंगानुजाला झालेले कृष्णाप्रवाहान्तर्गत श्रीगुरुदर्शन, अमरापुरच्या ब्राह्मणास मिळालेला धन-कुंभ या व अशा अनेक कथा आहेत. या घटना प्रकट करू नये असे श्रीगुरूंनी त्या त्या भक्तांना सांगितल्याचे श्रीसरस्वती गंगाधराने लिहिले आहे. तथापि श्रीगुरु लौकिक दृष्ट्या गुप्त झाल्यानंतर श्रीगुरुचरित्रामध्येच या सर्व कथा प्रकट रूपाने उपलब्ध आहेत. यामधील अभिप्राय ध्यानी घेऊन ही स्मरणांजली सादर करीत आहे.

१९५६ मधील वर्षप्रतिप्रदेस श्रीमहाराजांचे प्रथमदर्शन झाले. १९५८ मध्ये अक्षय्य तृतीयेस रोहिणी नक्षत्रावर आमच्या घरी स्वयं येऊन श्रीमहाराजांनी आम्हा पतिपत्नींना प्रत्यक्ष अनुग्रह दिला; आणि आमचे जीवन कृतार्थ झाले. याच काळात अर्थशास्त्रातील पीएच्. डी. या पदवीसाठी माझे प्रबंधलेखनाचे काम चालू होते. उपासनेमुळे वा साधनेमुळे व्यवहारात किंवा व्यवसायात यत्किंचितही व्यत्यय नव्हता. किंबहुना प्राप्त कर्तव्य एकचित्ताने निरलसपणे करण्याची बुद्धी प्रतिक्षणी वाढत गेली. यथाकाल प्रबंधाचे काम पुरे झाले आणि डिसेंबर १९५८ मध्ये तो विद्यापीठाकडे सादर केला. विद्यापीठाने प्रबंध परीक्षकांची नियुक्ती केली. पुढे मार्च १९५९ मध्ये एके दिवशी साधन चालू असताना दृश्य दिसू लागले. मुंबईमधील एक शासकीय कार्यालय. तेथे माझ्या प्रबंधाचे एक परीक्षक बसलेले. त्यांनी माझ्या हाती प्रबंधाचे परीक्षण ठेविले. निर्णय अनुकूल होता. अर्थातच मला आनंद झाला. प्रत्यक्षात मात्र " कामाच्या व्यापामुळे प्रबंध अद्याप वाचावयास घेतलेला नाही. मेमध्ये शक्य होईल. " असे त्या परीक्षकांचे पत्र होते.

## साधन हें मुख्य

साधन संपल्यावर साधनात दिसलेला मजकूर स्मरणाने लिहून काढला. देवदर्शन घेऊन श्रीमहाराजांकडे जाऊन दृश्याचा अनुभव सांगितला. श्रीमहाराजांनी केवळ स्मित केलें. " ' मनी वसे ते स्वप्नीं दिसे ' या

अर्थाने हा अनुभव घ्यावा किंवा कसे ? का प्रत्यक्षात असे घडणार आहे ? ” असा मी प्रश्न केला. त्यावर “ अनुभव खरा किंवा खोटा असे काहीच मानू नये. सर्व जबाबदारी ईश्वरावर टाकावी. ” असे श्रीमहाराजांनी उत्तर दिले. हे उत्तर सूचक आणि विशेषत्वाने मार्गदर्शक होते. पुढे जूनमध्ये परीक्षकांचा प्रत्यक्ष अभिप्राय व निर्णय आला. मार्चमध्ये साधनेमध्ये दिसलेला अभिप्राय आणि पुढे तीन महिन्यानंतर आलेला प्रत्यक्ष अभिप्राय यांत शब्द, वाक्य, परिच्छेद, अर्धविराम, पूर्णविराम अशा सर्व तपशीलात एकरूप असल्याचा चमत्कार–हा साक्षात् अनुभव होता. मनुष्यस्वभाव या दृष्टीने परीक्षकांचा अनुकूल निर्णय पाहून आनंद वाटणे स्वाभाविक होते. तथापि साधनाचे सामर्थ्य या निमित्ताने इतक्या अल्पावधीत प्रत्ययास यावे; हे विशेष होते. धावतच श्रीमहाराजांच्या दर्शनास गेलो आणि सर्व वृत्तान्त निवेदन केला. श्रीमहाराजांनी पुनः यथापूर्व केवळ स्मित केले. यशाबद्दल अभिनंदन करून प्रसाद दिला. साधनेतील दृश्य अनुभवाविषयी श्रीमहाराजांचा अभिप्राय जाणण्यास मी उत्सुक होतो. श्री महाराज म्हणाले :

“ साधनेत दृश्ये दिसतात, अनुभव येतो. ही गोष्ट युक्तच आहे. तथापि अनुभवाकडे लक्ष देऊ नये. साधन चालू ठेवावे. जे जे दिसेल ते साक्षित्वाने पाहावे. जे जे अनुभवास येईल ते ते अलिप्तपणे अनुभवावे. आणि वाटचाल चालू ठेवावी, साधन हे मुख्य आहे. हे ध्यानात ठेवावे. ”

साधनाच्या प्रारंभकालातच साधनाच्या सामर्थ्याचा आलेला अनुभव जेवढा विशेष तेवढाच–किंबहुना अधिक–श्रीमहाराजांचा अभिप्राय हा विशेष. ‘ साधनेची फलश्रुती निश्चित असली तरी मार्ग दीर्घकालचा आहे. ’ असे सांगून श्री महाराजांनी–“ स तु दीर्घकाल–नैरन्तर्यसत्काराऽऽसेवितो दृढभूमिः। ” या योगसूत्राचे स्मरण दिले. यमनियमपूर्वक निष्ठेने साधन चालू ठेवावे म्हणजे भगवत् कृपेने यथा काल ‘ तूष्णीमवस्था परमोपशान्तिः ’ हे श्रीमच्छंकराचार्यांनी वर्णिलेले फल अनुभवास येईल.–असे अत्यंत उत्साहवर्धक आश्वासन दिले.

**तत्त्वविचारांचा मनोहर संगम :**

श्रीमहाराजांच्या सान्निध्यात अनेक नव्या जुन्या विषयांची चर्चा चाले. या

चर्चेमध्ये क्षणोक्षणी उपनिषदांचे स्मरण होई. श्रीमहाराजांच्या प्रतिपादनात अति प्राचीन आणि अत्याधुनिक अशा तत्त्वविचारांचा आणि मनोहर संगम प्रत्ययास येई. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने श्रीमहाराज श्रीमत् शंकराचार्यांच्या अद्वैत ज्ञान परंपरेमधले. तथापि मार्क्सच्या साम्यवादाचेही ते सहानुभूतीने परिशीलन करीत. महाराज आणि विख्यात साम्यवादी विष्णुपंत चितळे यांचे ऋणानुबंध सर्वश्रुत आहेत. आहेत. प्रसंगाने श्रीमहाराज आणि श्री. चितळे तासतास एकान्तात असत. त्या एकान्तामधील चर्चा उपलब्ध झाली तर तत्त्वविचारांच्या अभ्यासकांना ती चर्चा निःसंशय उपकारक ठरेल. भारतीयांनी साम्यवादाचे भय बाळगण्याचे कारण नाही. असे श्रीमहाराजांचे प्रतिपादन असे. जेथे आम्ही देहबुद्ध वर्ज्य मानली तेथे आम्हाला भौतिक संपत्तीचे महत्त्व ते काय ? आमचा देह हाही आमचा नाही. मग या देहाने ज्या वास्तूमध्ये राहावयाचे, ज्या संपत्तीचा उपभोग घ्याव-याचा त्या भौतिक गोष्टी आमच्या मालकीच्या असल्या पाहिजेत असा आग्रह कसा राहील ? किंबहुना परिग्रह हा मोक्षमार्गातील मोठा व्यत्यय ठरतो अशी भारतीय धारणा आहे. अशा स्थितीस खाजगी मालमत्ता नाहीशी करणारा साम्यवाद भयप्रद वाटण्याचे कारण नाही. " "साम्यवादाचा धर्म विरोध मात्र आम्हाला संमत नाही." असे श्रीमहाराज स्पष्टपणे सांगत; "साम्यवादाचा विरोध शोषणाला आहे. आणि तो युक्तच आहे. धर्म जर शोषणाचे साधन ठरू लागला तर तर आम्हीही अशा दाम्भिक धर्मवाद्यांचा निषेधच ठरू ! भोंदुगिरीची श्रीसमर्थांनी, श्रीतुकाराम महाराजांनी कठोर शब्दात निर्भर्त्सना केलीच आहे. '

धर्म आणि भौतिक समाज व्यवहारातील समता यात श्रीमहाराजांच्या दृष्टीने अंतर्विरोध नव्हता. किंबहुना धर्माचरणाने ईशप्रसाद झाला म्हणजेच वृत्तीत समता येते. ईश्वरभक्तच समदर्शी असतो. अशा समदर्शी ईश्वरभक्तांची मान्दियाळी निरामय ठरते आधार ठरते. साम्यवादी व्यवस्थेतही असा आधार उपकारक ठरेल." श्रीमहाराजांचे हे प्रतिपादन मूलगामी आणि विलक्षण

[ पुढील मजकूर पान १४९ वर पहा ]

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# " धर्मनिष्ठेने कालाचा पराभव करणारा " ' महायोगी '

लेखक—**प्रवचनकेसरी पं. भालचंद्रशास्त्री मुळे**, त्र्यंबकेश्वर

## धर्मरक्षणार्थ युगावतार

' धर्म ही ईश्वराची जगद्धारक दिव्य शक्ति आहे. ' या धारक तत्त्वसूर्यावर अर्थकामांचे ढग येऊन त्याची प्रभा मलिन करण्याचे काम जेव्हा करू लागतात तेव्हा त्या ढगांना पांगविण्याचे काम वाऱ्याला करावे लागते. त्या पवन दूताच्या कार्यालाच ' कालविजय ' म्हणतात. अशा कालविजयी संतांनाच भारतात धर्म टिकवता आला.

धर्मरूप रामाचे मागेच अर्थ-काम या लक्ष्मण-भरतांनी जावे व सलोख्याने नांदावे व मोक्षविद्येच्या मूर्तरूप वसिष्ठांनी या त्रिवर्गाला ( धर्म-अर्थ काम ) एका समन्वयाच्या धाग्यात बांधून अयोध्येच्या सामाजिक समृद्धीचा शिलान्यास करावा व अयोध्येवर येणाऱ्या मंथरेच्या कलिमालिन्याचे सावट दूर करावे हा ' कालप्रभावच ' होय.

कैकेयी व मंथरेच्या हाताने जर कालपुरुष रामराज्याच्या आनंदात माती कालवीत असेल तर रामाने या काळपुरुषाशी झुंज घेऊन धर्म वाचविला पाहिजे. लोक म्हणतात काळ विपरीत आहे आता धर्म कसा टिकणार. काल पुरुषाचे बल धर्मपुरुषापेक्षा अधिक असते तर धर्म सनातन ठरताच ना ? मग प्रबल कोण ? धर्म की काळ ? धर्म जर प्रबल मानावा तर सध्याच्या काळाचे चाळे त्याला वाकुल्या दाखवून मागे रेटीत आहेत व समाजाला कालप्रवाह ओढक्या-

प्रमाणे वाहून नेत आहे. समाजही प्रेतवत् त्या लाटांवर तरंगत आहे.

बरे, धर्माला जर आपण दुर्बल मानले तर याच विपरीत कालाशी झुंज देऊन अनेक युयुत्सु महापुरुष साधुसंत महात्मे, याच भारतात प्रकट झालेले आहेत. कालाचे सामर्थ्य नाकारता येत नाही, पण धर्मही ईश्वररक्षित व शाश्वत आहे. तोही जर एवढा लेचापेचा असता तर शेकडो युगचक्रांच्या दात्यांखाली तो भरडला गेला असता. युगानुयुगे धर्मरक्षणार्थ अवतार घेणाऱ्या सर्वसमर्थ दयाघन प्रभूने त्याला आपल्या कृपेचे कवच घालून त्याचे रक्षण करण्याची काय जरूर होती ?

## धर्माचे वार्धक्य व तारुण्य

कलि हे धर्माचे वार्धक्य आहे व कृतयुग हे तारुण्य आहे. धर्माला धक्के देण्याचे काम युगक्रमाने होते, पण ते धक्के बसूनही धर्माचे रक्षण अवतारांच्या माध्यमाने होत आले आहे व धर्माचे 'तारुण्य' टिकविले गेले, हेही तितकेच खरे. अर्थकामासक्त भोगप्रधान समाज जेव्हा सत्तेचे पाठबळ घेऊन धर्माविरुद्ध उभा राहतो तेव्हा सत्तेचे ताकदीने सरसावलेला काळपुरुष धर्मावर प्रहार करीत आहे असे वाटते. वारयोषितेप्रमाणे सत्ताही काळाला आपल्या बोटावर नाचवून धर्मपुरुषावर दुराचाराच्या जखमा करते व त्याला घायाळ बनवून टाकते.

सत्ता जेव्हा कालामागे उभी राहते तेव्हा समाज दुःखी होतो व सत्ता जेव्हा धर्माच्या मागे ठामपणाने आपली ताकद उभी करते तेव्हा समाजात त्रिवर्गसमृद्धि होऊन समाज सुखी बनतो. आज सत्ता काळाच्या मागे उभी आहे. प्रवाहपतित आहे. काळाच्या भोगलाटांवर हेलकावे खाऊन, सदाचाराला—सद्विचाराला संख्योन्मादाने दूर लोटीत आहे. हा सत्तेचा प्रभाव की कालप्रभाव ? काला-मुळे सत्ता शिरजोर की सत्तेमुळे काल शूर ? सत्तेशी झालेले हे कालाचे मेतकूट आजच्या सर्व अनर्थाला कारण आहे. ही कोंडी फोडण्याचे काम ईश्वराला व संतांना करावे लागते.

## भित्रा, शूर व काळ

'धर्माच्या मागे सत्तेची ताकत उभी करण्यासाठीच ईश्वराचा अवतार असतो.'

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

धर्म जेव्हा सत्तेला पाठीशी घालून काळाशी युद्ध खेळतो तेव्हा काळाचा पराभव अटळ असतो. त्या धर्माला काळाशी उत्तम लढता यावे यासाठी संतांची धडपड असते. संत आपल्या साधनाने, तपाने, उपासनेने, सिद्धींनी काळाशी झुंज घेतात व ईश्वराचे कार्यांस मदत करतात. ' काल कर्म स्वभावांच्या भिंतीत कैद झालेल्या प्रमादशील समाजाला धर्माचे धडे देऊन मुक्त करण्याचे कार्य संत करतात. '

संचित, प्रारब्ध व क्रियमाणादि कर्मे, सत्त्व रज तम आदि गुणांवर बनलेले पूर्वजन्मजन्य स्वभावही काळाचीच अपत्ये आहेत. " कालकर्मगुणाधीनो देहोयं पांचभौतिकः " ( भागवत ) अशा काळाचा पराभव हा मोठा पुरुषार्थ आहे. " स्वभावविजयः शौर्यम् " " राजा कृतयुगस्रष्टा " असेही मानले जाते. ' सत्तासंपन्न राजा व ज्ञानसंपन्न, तपःसंपन्न आचार्य युगचक्राला वळण देतात. '

आम्ही तरी कालाप्रमाणे वागतो का ? उन्हाळा वाटला की उष्मा कमी व्हावा म्हणून पंखे, थंड पाणी, कूलर, फ्रीज यांचा उपयोग करून आम्ही ' उष्ण काळाचा पराभव " करतोच. थंडीत स्वेटर, गरम कपडे, शेकोटी वगैरे साधनांनी थंडीचा व पावसाळ्यात छत्री, ओव्हरकोट, घालून पावसाळ्याचा पराभवच करतो ना ! मग धर्माचारांचे बाबतीत " काळ बदलला काय करावे ? " असा मित्रा पुकारा कशासाठी ?

## परमार्थाची गंगोत्री

ज्या महापुरुषांनी आपल्या साधनेने, तपाने व भक्तीने कालाला वाकविले त्या महापुरुषांच्या मालिकेत पूज्य श्रीगुळवणी महाराजांचे स्थान आहे. ' गुरुकृपेने प्राप्त झालेल्या योगबलाने हा महापुरुष ' हजारो मानवांच्या हृदयांतील अज्ञानाचा काळोख घालविणारा ' ज्ञानसूर्य 'बनला. योगीराजांची धर्मनिष्ठा, कडक तपश्चर्या, अपार करुणा व प्राच्यविद्येवरील व विद्वानांबद्दलचीही प्रेमादरभावना उत्कृष्ट होती.

" श्रीवासुदेवाश्रम " ही पुण्यातील एक ' परमार्थाची गंगोत्री ' ठरली. वैदिक धर्मातील तत्त्वज्ञानाचे आचारातील अवतरण या आश्रमात दिसू लागले.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

'कलिमालिन्याचे प्रक्षालन करणारी एक नवी भावमंदाकिनी' आश्रमात वाहू लागली. नास्तिक्याच्या मेघांना हृदयाकाशातून हद्दपार करणारी 'योगविद्येची विद्युल्लता' आश्रमात चमकू लागली. पाश्चात्य विद्येच्या प्रणयाराधनात धन्यता मानणारा नवशिक्षित वर्ग या योगपुरुषाकडून आपल्या जीवनाची आध्यात्मिक उभारणी करून घेऊ लागला. आध्यात्मिक आनंदाच्या नव्या भावलहरींनी भौतिक वादाचे रजस्वल वातावरण धुतले जाऊ लागले. साधना-क्षेत्रात एका नव्या चैतन्याचा तेजोगोल आपली प्रभाकिरणे फेकू लागला.

कलीचा कालधर्म भयकंपित झाला, कृतयुगाच्या कारुण्याने ओथंबलेला नवा मेघ जनतेवर आनंदाची वृष्टि करू लागला. वासुदेवाश्रमाच्या सावलीला अनेकांचे परमार्थ फुलले. भावनेचे वसंत बहरले. नव्या युगाला एक सिद्ध कोटीचा "पतंजली" लाभला. त्यांचा पार्थिव देह जरी नसला तरी त्यांच्या अपार्थिव यशःशरीराची छाया आजही आश्रमावर आहे. त्यांचे 'प्रसन्न हास्य' आजही आश्रमाच्या 'मंगल भवितव्याचा संकेत' देत आहे.

## वारसा चालविणे हीच श्रद्धांजली

'उत्तराधिकारी म्हणून पूज्य दत्तमहाराज कवीश्वर यांची योजना हाही त्यांच्या दूरदृष्टीचाच पुरावा आहे.' या आश्रमाचा उत्तराधिकार हा अपार्थिव वारसा आहे. पूज्य महाराजांनी लावलेल्या परंपरावृक्षाला येणाऱ्या फळांची जोपासना ही मोठी जबाबदारी आहे. 'प्राच्य विद्येतील प्रभविष्णु पांडित्य' 'परमार्थातील दैवी संपत्तीचा लाभलेला अजोड लाभ', 'विलोभनीय सौजन्य' व 'विनयाने ओथंबलेली विशुद्ध विद्येची आराधना' आणि 'योगदीक्षाधिकार' या व इतर सद्गुणांनी 'पूज्य श्री दत्तमहाराज कवीश्वर हे थोर सत्पुरुष आहेत' 'आश्रमाच्या मंगल व भव्य भवितव्यासाठी नियतीने दिलेला हा इसाराच मानावा लागेल.'

परमपूज्य श्री योगिवर्य गुळवणी महाराजांच्या या कलिकालांशी झुंज घेणाऱ्या महान् कार्याचा वारसा जबाबदारीने पुढे चालविणे हाच त्यांच्या वर्षश्राद्धदिनी त्यांना खरी श्रद्धांजली आहे.

* *

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# " म्हणोनि साधकां तूं माऊली "

लेखक—प्रा. डॉ. ज. वा. जोशी. M. A., Ph. D. सांगली

**ज्ञानभक्ति जे तत्त्वता । ते जाण सर्वथा गुरुभक्ति ।**

श्रीगुरुमहाराज समाधिस्थ झाले. परंतु ' देहातीतवस्तु ' असणाऱ्या परमेश्वर-स्वरूप, आत्मस्वरूप श्रीगुरूंना जन्महो नसतो आणि मृत्यूही नसतो. निर्द्वन्द्व, समत्वयोगसंपन्न महापुरुषांकडे कोणत्या भूमिकेने पाहावे याचे प्रबोधन ही आध्यात्मिक ज्ञानदृष्टीच्या विकासाच्या दृष्टीने गरज ठरते.

श्रीगुरुमहाराजांनी जी मोक्षसाधना सांगितली, जो आचारधर्म सांगितला, दैवीसंपत्तीची जी उपासना स्वतःच्या उदाहरणाने समूर्त केली, आणि संप्रदाय-विकासाचे जे महाकार्य केले, ते संस्मरणीय ठरते. अशा महापुरुषांचे जीवन ही त्यांची ' यशःकाया' असते. ती मृत्युंजयी असते. अशा महापुरुषांचे श्रद्धाभक्तिमय साक्षात्कारी जीवन आणि धर्मकार्य, लोककल्याण हे त्यांचे खरे स्मारक ठरते. अन्य लौकिक स्मारके मनाच्या समजुतीसाठी असतात.

प्रत्येकाचे शरीर आणि मन सद्गुरुसेवेचे साधन ठरायला हवे. प्रत्येकाचे घर सद्गुरुंचा आश्रम व्हायला हवा. प्रत्येकाचे कुटुंब हे ' गुरुकुल ' बनायला हवे. बहिर्मुख आणि संस्थात्मक धर्माऐवजी आंतरिक जीवनविकासावर आधारलेली जीवनदृष्टी ही सद्गुरूंना अपेक्षित ठरते. जे असे जीवन जगतात, त्यांना

" जेथे जातो तेथें तू माझा सांगाति । चालविशी हातीं धरोनिया । '

हा अनुभव येत राहतो.

' यान्यस्माकं सुचरितानि तानि त्वयोपास्यानि ' ( तैत्तिरीय ३५. १.११.२ ).

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

हे संतांचे, सद्गुरूंचे अनुशासन असते. म्हणून सद्गुरूंच्या सुचरिताचे, अनुशीलन अनुसरण ही गुरुसेवा ठरते. गुरुभक्ति ठरते.

श्रीगुरुमहाराज मोजकेच शब्द बोलत; पण त्यांचा शब्द मंत्र असे. त्यांच्या दृष्टीत श्रुतिरहस्य दडलेले असे. त्यांचे स्मितहास्य आणि आशीर्वादहस्त यामधून ईश्वरी मार्गदर्शन घडत राही. त्यांचे सान्निध्य आणि स्मरण आंतरिक दिव्यता उमलविणारे असे. देवकृपा आणि गुरुकृपा एक होत. देवदर्शन आणि गुरुदर्शन एक होत. अशा अभेदबुद्धीवर आधारलेली अभेदभक्ति ही साक्षात्कारी जीवनाची अंतःश्रद्धा असते. चित्तशुद्धी आणि चैतन्यप्रचीती यांना ती पायाभूत ठरते. 'सहजस्थिती' आणि 'सकलकर्मि समाधी' असा त्यांचा ज्ञानोत्तर लोक-व्यवहार ही मार्गदर्शक धर्मसाधना ठरते. संत स्वतः जगतात. त्यांचे जीवन इतरांना धर्मजीवनाची मर्मदृष्टी देते.

## स्वकर्मकुसुमांची पूजा

सद्गुरूंची सेवा घडावी असे सर्वांना वाटते. या संदर्भात 'आचार्योपासन' हे परमार्थमार्गातील श्रेष्ठ धर्मसाधन ठरते. श्रीमद्भगवद्गीतेने त्याचा गौरव केला आहे. ( गी. अ. १३ ). ज्ञानेश्वरांची दिव्यवाणी ही गुरुसेवेचे स्वरूप आणि महत्त्व विशद करताना स्तब्ध होते. ( ज्ञा. अ. १३. ३६८–४५८ ).

गुरु संप्रदाय धर्म । हे जयाचे वर्णाश्रम । गुरुपरिचर्या नित्यकर्म । जयाचे गा ॥
तो तत्त्वज्ञानाचा ठावो । ज्ञाना तेणेचि आवो । हे असो तो देवो । ज्ञानभक्तु ॥

हा ज्ञानदेवांचा अभिप्राय गुरुसेवेचे, गुरुभक्तीचे पथदर्शन घडविणारा आहे. श्रीगुरुमहाराजांचे जीवन म्हणजे सद्गुरुसेचे सजीव प्रतीक होते. श्रीगुरुमहाराजांच्या 'अखेरच्या इच्छा' काय होत्या ?

त्यांच्यासारखे महापुरुष व्यक्तिगत इच्छा ठेवून जीवन व्यतीत करीत नाहीत. त्यांना जे म्हणावयाचे असते, सांगावयाचे असते, त्यात स्वार्थ नसतो. सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा यांचा लोभ संतांना नसतो. प्रज्ञा आणि करुणा हे त्यांचे स्थायी भाव असतात. त्यांचा व्यवहार 'लोकसंग्रही' भूमिकेवरून घडतो. ते जीवन म्हणजे ज्ञानभक्तिप्रधान कर्मयोग असतो.

अशा कर्मयोगी योगिराज गुरुमहाराजांनी आपल्या इच्छा, संकल्प, अपेक्षा

नमूद करून ठवल्या आहेत. लौकिक अर्थाचे हे 'मृत्युपत्र' नव्हे. आपल्या संप्रदायाचे स्वरूप कोणते आहे? या संप्रदायाचा विकास कसा करण्यात यावा? साधकांनी, अनुयायांनी कसे वागावे? काय करावे? याबद्दल स्पष्ट मार्गदर्शन त्यांनी करून ठेवले आहे.

## साधक कसा असावा?

प्रत्येक साधकाला श्रीगुरु हे परमप्रेमाचे, परमभक्तीचे विषय असतात. परमेश्वर, परमार्थ आणि सद्‌गुरु यांविषयी अनेकविध मनोवृत्ती संभवतात. साधकांच्या मनोभूमिकांसंबंधी श्रीगुरुमहाराज म्हणतात,

"आर्त, अर्थार्थी, जिज्ञासू व ज्ञानी असे चार वर्ग प्रत्येक संप्रदायात (प्राचीन वा नवीन) असतातच. यांपैकी आर्त व अर्थार्थी यांची संख्या केव्हाही अधिक असणार. पण केवळ असल्या संख्येकडे पाहूनच त्या संप्रदायाचे बलाबल ठरविता येणार नाही. जिज्ञासू व ज्ञानी हेच त्या त्या संप्रदायाचे खरे संवर्धक व संरक्षक असतात. आज या शाळेत तर उद्या त्या शाळेत असे नुसते बहिरंग पाहून जाणाऱ्या–येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त झाली किंवा घटली यावर त्या संस्थेचे महत्त्व अवलंबून नाही. तर त्या संस्थेत खरे जिज्ञासू, विद्यार्थी किती आहेत, त्या संस्थेचे सर्वमान्य असे आजीव सभासद किती आहेत, हे पाहूनच संस्थेची मान्यता ठरविणे योग्य होईल." (श्रीवासुदेवानंद सरस्वती ग्रंथमाला : द्वादश पुष्पम्, १९५४ प्रस्तावना, पृ. ४) श्रीगुरूंच्या कुलामध्ये आपले स्थान कोणते? ते ज्याचे त्यालाच समजू शकेल.

## संप्रदाय-प्रसार व संप्रदाय-संघटन

आपले सद्‌गुरु प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती यांच्या विचारांचे, आचाराचे, जीवनदृष्टीचे सम्यक्‌दर्शन श्रीगुरुमहाराजांनी बारा खंडांत 'समग्र ग्रंथ' प्रकाशित करून घडविले आहे. दत्त संप्रदायाच्या इतिहासात हे 'युगप्रवर्तक' कार्य ठरते. आपण हे कार्य कशासाठी केले ते विशद करताना श्रीगुरुमहाराज म्हणतात,

"आज फक्त श्रीमहाराजांचे उपलब्ध वाङ्मय एकत्र आले. त्या वाङ्मया-

तील मंतव्य आणि निदिध्यासितव्य विभाग कोणता ते पाहून तशी त्या भागाच्या मनन, निदिध्यासनाची योग्यता निर्माण होण्याकरता प्रत्यक्ष आचार कसा ठेवला पाहिजे, यासंबंधी श्रीमहाराजांनी आपल्या ग्रंथातून काय सांगून ठेवले आहे, ते जनतेच्या पुढे येऊन, त्या आदेशाप्रमाणे जनतेचे आचरण घडावे. याबद्दल विशेष प्रयत्न होणे आवश्यक आहे....या दृष्टीने हा संकल्प आम्ही जनतेपुढे मांडला आहे. आणि तो केवळ स्वार्थमूलक नसून सर्वजनहितसंबंधी असल्याने विशुद्ध आहे, यात शंका नाही. ," ( पूर्वोक्त पृ. ३ ).

## वाङ्मयतपाचे स्वरूप

ग्रंथप्रकाशन हेच केवळ श्रीगुरुमहाराजांचे उद्दिष्ट नाही. प्रत्येक साधकाने आपल्या जीवनात प. प. टेंबेस्वामी महाराजांच्या ग्रंथातील साक्षात्कारनिष्ठ जीवनदृष्टीची आपापल्या परीने उपासना, जोपासना केली पाहिजे. अशी श्रीगुरुमहाराजांची अपेक्षा आहे. ते म्हणतात,

" सर्वसंकल्पसंन्यासी महानुभवांची अधिकाराप्रमाणे प्रत्येकाला निश्चित सन्मार्ग दर्शविणारी दिव्य ग्रंथसंपत्ती आज आपल्या दृष्टीसमोर आहे...इतकी सर्व साधनसामग्री आपल्याजवळ तयार असून आपण उदासीन किंवा निराश होणे अनुचित ठरेल....असेच अनेक गुरुभक्तांचे विशुद्ध संकल्प एकत्र झाल्यास श्रीमहाराजांच्या संप्रदायातील अनेक साधकांना व तत्संबंधी इतरांनाही आपली पारमार्थिक भूमिका दृढ करता येऊन पुढच्याही उच्च भूमिकेवर अनायासाने आरूढ होता येईल. यात शंका नाही .... या सर्व ग्रंथांचा अभ्यास श्रीमहाराजांचे संप्रदायात सर्वत्र सुरू झाला पाहिजे. " ( पूर्वोक्त पृ. ४–५ ).

## ग्रंथप्रसाराबरोबर अखिल भारतीय धर्मसंघटन आवश्यक

प्रत्येकाच्या वैयक्तिक जीवनात श्रीटेंबेस्वामी महाराजांच्या ग्रंथांचे अनुशीलन व अनुसरण हे जसे श्रीगुरुमहाराजांना अभिप्रेत आहे, त्याचप्रमाणे अखिल भारतीय पातळीवर धार्मिक प्रबोधन घडावे याची सूत्ररूपाने रूपरेखा त्यांनी सांगितलेली आहे, ते म्हणतात, " ज्यांना ग्रंथार्थ समजणार नाही. त्यांच्याकरता तत्तत्प्रांतीय भाषांतून या ग्रंथांचे शब्दशः भाषांतर, तात्पर्यविवरण, सिद्धान्त–

प्रतिपादक निबंध इ. रूपाने वाङ्मय निर्माण होऊन त्याचा प्रचार सदाचारपर्यवसायी असा झाला पाहिजे. याकरिताच श्रीमहाराजांनी यावज्जीव तसे आचरण करून हे ग्रंथ लिहून ठेवले आहेत. यांचा उपयोग कृतिपर्यवसायी झाला, तरच श्रीमहाराजांच्या ऋणातून अंशतः तरी आपण मुक्त होणे शक्य आहे. ”

“ म्हणून हे कार्य अविच्छिन्न चालू राहण्याकरता श्रीमहाराजांच्या संप्रदायातील जी जी स्थाने आहेत, त्या त्या स्थानांतील कार्यकारी व इतरही सांप्रदायिक योग्य सद्‌भक्त यांना विनंती करून त्या सर्वांचे एक स्वतंत्र मंडळ तयार व्हावे अशी आमची इच्छा आहे, व त्याप्रमाणे आम्ही त्या त्या स्थानाशी संबंध असणाऱ्या तत्तत्प्रांतीय सज्जनांना विनंती करून तसे एक सर्वप्रांतीय प्रातिनिधिक मंडळ स्थापण्याचा प्रयत्न करणार आहोत ... नवीन मंडळानेच यापुढे विविध भाषाद्वारा प्रकाशनकार्य चालू ठेवून श्रीमहाराजांच्या संप्रदायातील सर्वस्थानातून कर्म, उपासना व ज्ञान या तीनही योगांची जोपासना त्या त्या साधकांचे द्वारा चालू राहावी याबद्दल प्रयत्न करणे आवश्यक आहे. ” ( पूर्वोक्त पृ. ६ ).

श्रीगुरुमहाराजांचे मते “ श्रीमहाराजांचे विस्तृत चरित्र, त्यांच्या सर्व लहान-मोठ्या ग्रंथांचे समालोचन हे कार्य फार महत्वाचे, असे अद्यापि शिल्लक आहे. त्याकरता माहिती मिळविण्याचे दृष्टीने आसेतुहिमाचल प्रवास करावा लागेल. श्रीमहाराजांचा संचार सर्व प्रांतांतून झालेला आहे. ती सर्व माहिती मिळवून. नंतर चरित्रविभाग सर्व भाषातून प्रसिद्ध व्हावा. म्हणजे या संप्रदायाचे महत्त्व सर्वांच्याच लक्षात येऊ शकेल. परंतु श्रीगुरु महाराज पुढे म्हणतात.

“ प्रत्येकाने काही पैसे जमवून काही ग्रंथ छापावे, असा व्यक्तीच्या स्वार्थाकरता यापुढे प्रयत्न न होता नवीन स्थापन होणाऱ्या मंडळासच सर्वांनी सहाय्य करून त्याचे द्वाराच सर्व कार्य करवून घ्यावे. सामुदायिक शक्तीने घडून आलेले कार्य केव्हाही सर्वोपकारक व स्थिर असे होऊ शकेल. ”( पूर्वोक्त ) नृसिंहवाडीचे मंदिरशिल्प हे श्रीगुरूंचे या संदर्भातील प्रेरक व संस्मरणीय कार्य ठरते.

## सांप्रदायिक अभिनिवेश नको

श्रीगुरुमहाराजांना संप्रदायसंवर्धन अपेक्षित आहे. पण सांप्रदायिक संकुचितवृत्ति त्यांना मान्य नाही. ते म्हणतात,

" अभेदभावना ज्यांच्या ठिकाणी पूर्णपणे बाणली आहे, असे संत कोणत्याही काळात झाले असले, तरी ते एकरूपच आहेत...अशा संतांची ही समतेची खूण सर्वसाधारण जनांच्या लक्षात एकाएकी येत नाही- त्यामुळे सांप्रदायिक अभिनिवेश व तन्मूलक कलह निर्माण होण्याचे प्रसंग उद्भवलेले दिसतात. याला कारण, 'ईश्वरस्वरूपाची अनेकता' हे नसून 'अशुद्ध बुद्धीचे वैचित्र्य' हेच मानले पाहिजे." ( स्तोत्रादि संग्रह : प्रस्तावना १९५२, पृ. ४ ).

प. प. टेंबेस्वामी महाराजांचे अलौकिक, दिव्य विभूतिमत्त्व, लोकोत्तर कार्य याविषयी विनम्रभावाने श्रीगुरुमहाज लिहिताना म्हणतात,

" माझ्यासारख्या मितबुद्धीने श्रीमहाराजांसारख्या महापुरुषांच्या कार्याविषयी काय लिहावे ?" ( पूर्वोक्त पृ. ६ ). आपली शुभेच्छा व्यक्त करताना ते लिहितात,

" हंसक्षीर न्यायाने समालोचन करून श्रीमहाराजांच्या ग्रंथार्थाचे परिशीलन म्हणजेच श्रीमहाराजांची वैचारिक संगती सर्वांनी करावी व ईशप्रसादाने अखंड शांतिसुखाचे अधिकारी व्हावे, हीच सर्वांना प्रेमपूर्वक आग्रहाची विनंती आहे."

## धर्मकार्य ही गुरुसेवा

श्रीगुरुमहाराजांना केवळ प. पू. टेंबेस्वामीमहाराज व त्यांचे वाङ्मय यांच्या संवर्धनाची, विकासाची तळमळ नाही. केवळ दत्तसंप्रदायाच्या जीर्णोद्धारासाठी ते लिहीत नाहीत. त्यांची जीवनदृष्टी विशुद्ध धर्मसुधारकाची आहे. त्यात व्यापक राष्ट्रीय भूमिका आहे, ते लिहितात;

" संतांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत त्यांच्या असामान्य व्यक्तिमत्त्वामुळे पुष्कळ लोक स्वधर्माचरणाकडे प्रवृत्त होणे शक्य आहे. पण त्यांच्या पाठीमागे औदासीन्य, बुद्धिभेद इ. अनेक कारणांनी समाजातील धर्माचरणात पुष्कळ शैथिल्य उत्पन्न होते. ते दूर करण्याचाही यावच्छक्य प्रयत्न करणे हीही एक गुरुसेवा व्यवहारी माणसांना करता येण्यासारखी आहे."

" संतांनी ज्या ठिकाणी आपली दिव्यशक्ति ठेवली आहे, त्या स्थानातील ती दिव्यशक्ति नित्य जागृत ठेवण्याकरता....प्रयत्न करणे, हे कृतज्ञता व्यक्त करणारे कर्तव्य नाही काय ? याप्रमाणे त्या त्या स्थानांचा उत्कर्ष, श्रीमहाराजांनी

ग्रंथातून प्रतिपादन केलेल्या शास्त्रोक्त साधनांचा प्रचार, आणि त्याबरोबरच आपल्या भारतीय विशुद्ध संस्कृतीच्या रक्षणार्थ वेदशास्त्रांच्या अध्ययनाध्यापनाची परंपराही अबाधित चालविण्याकरता प्रयत्न करणे, असे फार मोठेमंडळाचे उद्देश आज अमूर्तावस्थेत आहेत." (तृतीय पुष्पम १९५२ प्रस्तावना पृ. ८-९ ).

## स्वराज्य आणि सुराज्य यांना संस्कृतीचे अधिष्ठान हवे

श्रीगुरुमहाराजांच्या व्यापक सामाजिक भूमिकेचे आणि सांस्कृतिक निष्ठेचे स्वरूप मर्मग्राही आहे. संत हे परलोकनिष्ठ नसतात. निष्क्रियतावादी, देहदंडवादी, निराशावादी नसतात. अभ्युदय आणि निःश्रेयस अशा उभय उद्दिष्टांची पूर्ति करणारा जीवनधर्म त्यांना अभिप्रेत असतो. अशा जीवनप्रेरक संतधर्माचे राष्ट्रीय संस्कृतीमधील महत्त्व विशद करताना श्रीगुरुमहाराज म्हणतात,

"स्वराज्य मिळाले असले. तरी जोपर्यंत स्वतःच्या लोकोत्तर संस्कृतीचे पूर्ण अज्ञान व त्यामुळे परकीय संस्कृतीकडे असणारी अनिर्बंध प्रवृत्ति समाजामध्ये चालू राहील तोपर्यंत ते स्वराज्य नसून परराज्यच आहे. रामराज्य तर याहून फार पुढे आहे. आदर्श नागरिक निर्माण कसा होईल, हा मुख्य विचार स्वराज्यात होणे उचित आहे. याकरता योग्य धार्मिक शिक्षणाने प्रत्येक व्यक्तीचे मन सुसंस्कृत बनविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. शिक्षणखात्याचे वास्तविक हे काम, पण या खात्यातील विद्यार्थ्यांना केवळ भारवाही बनविणाऱ्या शिक्षणक्रमात धार्मिक शिक्षणाचा गंधही नाही...आपण सर्व व्यक्तिरूप जीव संलग्न आहोत.... अशा समष्टीची कल्पना संतांच्या ग्रंथावरूनच पूर्णपणे येऊ शकेल. आणि अशा अभंग ग्रंथांचे नियमित शिक्षण समाजात रूढ झाले तरच स्वराज्य, सुराज्य, रामराज्य सर्व काही मिळू शकेल." ( पंचमपुष्पम् १९५३, प्रस्तावना, पृ.४ ).

## श्रीगुरू शरणम् ।

दिव्यशक्तिसंक्रमणाने योगिराज सद्गुरु श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज यांच्यासारखे महापुरुष व्यक्तीला दिव्य जीवनाचा मार्ग दाखवितात. साधकाची दिव्य जीवनयात्रा सुरू होते. ही यात्रा सुरू असताना गुरुभक्ति, गुरुकार्य

याविषयी अंधश्रद्ध मनोवृत्तीऐवजी डोळस श्रद्धा जागृत राहणे हे पारमार्थिक विकासाच्या दृष्टीने आवश्यक व इष्ट ठरते. श्रीगुरूंचा पार्थिव देह हा 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्।' वचनाप्रमाणे अंतर्धान पावत असला, तरी संतांची मृत्युं-जयी जीवननिष्ठा साधकाला अमरत्वाचे 'पाथेय' देत असते. हे पाथेय जाणणे आणि जगणे हीच खरी श्रद्धांजली!

'ईश्वर' म्हणजे 'पाषाण प्रतिमा' आणि 'गुरु' म्हणजे 'देहधारी जीव' एवढीच ज्यांच्या बुद्धीची आणि कल्पनेची मजल असते, ते 'खरा देव' न समजता धार्मिक कलह करू लागतात आणि खरे 'गुरुस्वरूप' न समजता गुरुद्रोह, गुरुनिंदा यांना प्रवृत्त होतात. अशांना वाचविणे ईश्वरालाही शक्य नसते.

प. पू. सद्गुरु गुळवणीमहाराज यांचे साधकावस्थेतील आणि सिद्धावस्थेतील आत्मचरित्र म्हणजे गुरुमार्गाचे, सद्गुरुउपासनेचे, दत्तभक्तीचे आदर्श उदाहरण आहे. सद्गुरूंच्या नावाने पुनीत केलेल्या 'श्रीवासुदेवाश्रमात' त्यांचे सद्गुरु-चरणी समर्पित जीवन आपल्या शांत, स्वप्रकाशी तेजाने सर्वांच्या अंतःकरणातील मलिनता दूर करीत होते. सर्वांच्या अंतर्यामीची चैतन्यज्योत जागवीत होते. लोकसंग्रही वृत्तीने लोककल्याण साधीत होते. त्यांचे जीवन, विचार, आचार म्हणजे साक्षात्कारातील सदगुरुनिष्ठा, सेवा, भक्ति या मूल्यांचे मूर्त प्रतीक होते.

आत्मा, ईश्वर आणि सद्गुरु एकरूप असल्याने सर्व मुमुक्षूंनी पाळावयाचे कर्तव्य प्रत्येकाला ज्ञात हवे. प. पू. टेंबे स्वामीमहाराज यांनी 'दत्तपुराणम्' ग्रंथात म्हटले आहे,

"आजीवितं त्रयः सेव्या वेदान्तो गुरुरीश्वरः।
पूर्वं ज्ञानाप्तये पश्चात्कृतघ्नत्वनिवृत्तये ॥"

ज्ञानप्राप्तीसाठी प्रारंभी आणि कृतज्ञता म्हणून आमरण ईश्वर, सद्गुरु आणि आत्मविद्या यांची उपासना आवश्यक ठरते. हीच त्रिमूर्तिस्वरूप भगवान दत्तात्रेयांची आराधना होय. अशी सद्गुरुसेवा, अशी सद्गुरुभक्ति केवळ 'शब्द पूजेने' होणार नाही. ती 'स्वकर्मकुसुमांची पूजा' घडायला हवी. त्यात आपले

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

कल्याण आहे आणि सद्गुरूंना कृतार्थता आहे. सद्गुरूंचे संकल्प, अपेक्षा व इच्छा पूर्ण करण्याच्या कार्यात आणि सद्गुरुप्रणीत साक्षात्कारी जीवनसाधनेत त्यांची करुणा आणि कृपा, आशीर्वाद आणि आत्मबल निरंतर लाभावे हीच श्रीगुरुचरणी अभ्यर्थना ! !

* *

## " तुमच्या केवळ स्मृतीच उरल्या मंदिरात या आता "

सद्गुरुराया या वास्तूचे वैभव तुम्ही होता ॥
तुमच्या केवळ स्मृतीच उरल्या मंदिरात या आता ॥ धृ. ॥

दिसे रिकामा संध्येसाठी मांडियलेला पाट ॥
रिता दिसतसे लाल मखमली दिव्यासन थाट ॥
हृदय भरोनी येथे येतो हृदय दाटते जाता ॥
तुमच्या केवळ स्मृतीच उरल्या मंदिरात या आता ॥ १ ॥ धृ. ॥

वेदान्तीजन वदती सारे आत्म्याला नच नाश ।
परी भक्तासी सगुण रूप ते हवे वाटतसे खास ।
सर्वसाधकां प्रेमें धरूनी कोण बुझाविल आता ।
तुमच्या केवळ स्मृतीच उरल्या मंदिरात या आता ॥ २ ॥ धृ. ॥

साचरूप श्रीदत्तगुरूंचे धरुनि तुम्ही आला ।
दर्शन देऊनि मार्गदर्शना करूनि तुम्ही गेला ।
कालाचे पट ओलांडुनि गेला निज कर्तव्यचि सरता ।
तुमच्या केवळ स्मृतीच उरल्या मंदिरात या आता ॥ ३ ॥ धृ. ॥

कवि – **नादब्रह्म उपासक, पुणे.**

* *

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

"श्री शक्तिपाताचा महामेरू"

# पू. योगीराज श्री वामनरावजी गुळवणी महाराज

श्री. र. वि. अलाट, बार्शी.

## संतच समाजाचे आत्मा

मानवी शरीरात "**आत्मा**" असल्याने स्थूल शरीराचे ठिकाणी कार्यक्षमता प्राप्त होते. तद्वत्च समाजामध्ये साधु, संत, आचार्य, योगी आणि त्यांचे अजोड कार्य म्हणजेच आत्मा होय.

"साधु संत सद्गुरु हेच भूमिवर ।
चालते बोलते परमेश्वर ।।
वैराग्याचे सागर दाते मोक्षपदाचे ।।"

सर्व मासात मार्गशीर्ष मास सर्वश्रेष्ठ असे सद्ग्रंथात आवर्जून मार्गशीर्ष महिन्याचे महत्त्व प्रतिपादिले आहे. अशा या महिन्यात पू. संतयोगीराज श्री वामनरावजी गुळवणी महाराज दि. २३–१२–१८८६ ला जन्मले. पू. महाराजांचे समाधानकारक दर्शन झाल्यावर साधक, भाविक "**धन्य आज दिन । झाले संताचे दर्शन**"। असे म्हणत असत. पू. गुरुमहाराज कमालीचे मितभाषी, हसतमुख, शांत, चिंतनात, नामस्मरणात मग्न असे होते. नित्य योगासने, स्नानसंध्या, पूजा, जप, प्राणायाम, श्रीशक्तिउपासना, सद्ग्रंथ-वाचन, सद्गुरुस्मरण असे शुद्ध आचरण म्हणजेच पू. गुरुदेव होते. सदाचरण आणि पू. संत गुळवणी महाराज यात द्वैत नव्हते, अद्वैतच दिसून येते. श्रीदत्त

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

संप्रदायाचे आचार्यत्व आणि योगदीक्षेचे सद्गुरु असे सद्गुरुप्रसादाने पू. गुरुमहाराज जगाच्या कल्याणासाठी लाभले होते. दारी येईल त्याला पू. गुरु-महाराजांनी संतुष्ट केले, त्यांच्या हृदयी भेदभाव नव्हता. “ **जगाच्या कल्याणा संतांची विभूति** ” याची प्रचीती येते. साधुसंत म्हणजेच परमेश्वर याची साक्ष पटते. अवतारांची जन्मभूमी, शूरांची कर्मभूमी आणि संतांची मृत्युभूमी ही सदैव परम पवित्रच असते.

## दुःख मुक्तीची कृपा व नोंद

संसारी दुःखितांचे दुःख एकाग्र चित्ताने ऐकून त्यावर उपाय सुचवून, मस्तकावर वरदहस्त ठेवून कृपाप्रसादाने शांत करीत. हे करीत असताना तो कोण हे न पाहता त्याचे दुःख जाणून दुःखमुक्त करण्यात पू. गुरुमहाराजांनी आपले उभे आयुष्य खर्च केले.

कलियुगात धकाधकीच्या काळात पू. गुरुदेवांनी आसेतु-हिमाचल नव्हे तर परदेशात सुद्धा योगदीक्षेचा महाप्रसाद मुक्त हस्ते देऊन अद्वितीय, अमोल, अपूर्व, महान, बिनतोड सत्कार्य केले. भूतमात्रांबद्दल प्रेम, सर्वांबद्दल समभावना, कमालीचे सौजन्य अशा साक्षात्कारी सिद्ध संतांस “ **योगीराज** ” ही बिरुदावली यथार्थ होय. फलटणचे संत पू. उपळेकर महाराजांनी पू. गुरुदेवांना “**श्रीशंकर**” असे म्हटले ते योग्यच होय. एप्रिल ६७ मध्ये पुण्यात सहस्र चंद्र दर्शन शांती महोत्सव अपूर्व थाटात झाला. त्या शुभ प्रसंगी पू. शंकराचार्यांनी प. गुरुमहा-राजांना “ **योगचूडामणी** ” ही मानाची बिरुदावली देऊन अमोल सत्कार्याची जणू पावती दिली होती.

पू. श्रीधर स्वामींचे आदेशानुसार श्री शक्तिदेवीची तीन रात्र तीन दिवस श्रीक्षेत्र तुळजापूर येथे राहून यथासांग महापूजा, अन्नदान करण्यात कधीही खंड पडला नव्हता. वाडीचे काम पूर्ण करून हातावेगळे केले. पू. गुरुमहाराजांनी आपले सद्गुरूंची स्मृती राहावी म्हणून आश्रमाला त्यांचे नाव दिले. एवढयाने पू. गुरुमहाराजांचे समाधान झाले नाही, म्हणूनच की काय आपल्या सद्गुरूंचे श्री गुरुचरित्र, श्री दत्तलीलामृताब्धिसार, सप्तशती गुरुचरित्र, श्री दत्तमहात्म्य, श्री दत्त पुराण इ. पंचविसाहून अधिक ग्रंथ त्यांनी बारा खंडांत प्रसिद्ध केले.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

अशा तऱ्हेने पू. गुरुमहाराजांनी आपले सद्गुरु पू. टेंबे स्वामींचे नाव चिरस्मरणीय केले. कलियुगात असे सद्गुरु-गुरुशिष्य नव्हे सर्वश्रेष्ठ महान् संत होय. अलिकडच्या काळात श्री दत्त संप्रदायामध्ये योगदीक्षा पत्राने, स्पर्शाने पाहून कुंडलिनी जागृत करणारे पू. गुरुदेव आचार्य होते. पू. महाराज उत्तम चित्रकार पण होते, त्यांनी पू. टेंबे स्वामी, एकमुखी श्री दत्तात्रय यांची कलात्मक अशी अति सुंदर चित्रे काढली, ती आजही साधकांच्या जवळ आहेत.

## ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या

श्रीमत् शंकराचार्यांनी " **ब्रह्म सत्यं जगत् मिथ्या** " हा सिद्धांत प्रतिपादन केला. तो सिद्धांत खऱ्या अर्थाने पू. गुळवणी महाराजांनी आचरणात आणला होता. पानशेतमध्ये सर्व गेल्यावर " **कुलस्वामिनी, प्रसाद-पादुका आणि देवांची निर्वेधस्थळी सोय झाली तर ठीक होईल** " असे पू. महाराज सहज म्हणाले. ती गुरु आज्ञा मानून साधकांनी पुण्यातील " **श्री वासुदेव आश्रम** " हा वास्तू १९६६ मध्ये पुरा केला. आश्रमात प्रवेश करते वेळी त्याचा ट्रस्ट केला, त्यात स्वतःचा कसलाही संबंध राखला नाही...अशा वेळी " **सोने रुपे आम्हां मृत्तिके समान** " याची प्रचीती येते. जून १९७० मध्ये श्री भगवंत मंदिर, बार्शी येथे श्री दत्तमूर्तीची प्राणप्रतिष्ठा पू. गुरुदेवांचे हस्ते झाली. त्यावेळी साधकांनी, तत्त्वज्ञान मंडळाने बार्शीच्या नागरिकांचे वतीने अतिशय मोठ्या प्रमाणात दिव्य, भव्य असा सत्कार केला होता. श्री गीत-दत्तात्रयाचा कार्यक्रम झाला. संयोजकांनी पू. गुळवणी महाराज व पू. दत्त महाराज कवीश्वर यांना भारी शाल महावस्त्र अर्पून कृतज्ञता व्यक्तविली होती. त्यावेळी क्षणाचाही विलंब न लावता गायकाचा सत्कार पू. गुरुदेवांनी आपली भारी शाल पांघरून घालून केला. किमती शालीबद्दल आसक्ती नव्हती. सहज कृती घडली पण पाहणारांचे हृदयात ही घटना कायम आहे. " **संतांच्या सहज गोठी । त्याची उपदेशाच्या कोटी ॥** " याची साक्ष पटते.

## नित्य साधन ठेवा

कुंडलिनी जागृत करण्याची असाध्य विद्या, श्रीसद्गुरुकृपेने ही दिव्य

परंपरा प्राप्तःस्मरणीय योगीराज श्री. वामनरावजी गुळवणी महाराज यांनी कलियुगात सामान्यांप्रत देऊन कळस चढविला आहे. श्रीसंत अक्कलकोट स्वामी महाराज, अमळनेरकर महाराज, बाबामहाराज आर्वीकर, साखरे महाराज, नानामहाराज फणसे या मान्यवरांनी महानिर्वाण मंगळवारी केले त्याचप्रमाणे प्रातःस्मरणीय योगीराज श्री वामनरावजी गुळवणी महाराज यांनी पण संत परंपरेच्या मंगळवारी आपला जड देह ठेवन सूक्ष्मात प्रवेश केला.

आदरणीय संत पुरुषांकडून लाभलेला साधनरूपी ठेवा सदैव नित्य राहावा, त्याचा ध्यास धरावा तेच खरे अलौकिक पुण्यस्मरण होय. श्रीसंत प्रातःस्मरणीय योगीराज श्री वामनरावजी गुळवणी महाराज की जय ! अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ! ! श्री गुरुः शरणम् !!! दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा !!!!

* *

## " नावाडी "

करुणा येऊ दे वामना ।
भवसागर हा दुस्तर तरण्या तारी मज दीना ॥ ध्रु० ॥

जगी चहुकडे उदास वाटे । आप्तस्वकीय ते सारे खोटे ॥
मीपणाचे ओझे दाटे । तोडी भवबंधना ॥ १ ॥

मांगल्याची मूर्ति साजिरी । ठसली माझ्या हृदयमंदिरी ॥
अन्तर्यामी साक्षात्कारी । सुख देई मन्मना ॥ २ ॥

नावाडी मज सद्गुरु आई । पैलतिरासी मजला नेई ॥
कृपादृष्टिने प्रेमे पाही । चरणी दे ठाव ना ॥ ३ ॥

कवि :—सौ. **मीराताई पां. लेले,** दादर.

* *

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# मायबापें त्यागिलें तेंव्हा ऐसे संकट आले नाही

लेखकः- स. के. कुलकर्णी, डोंबिवली

'कल्याण' मासिकात योगीराज गुळवणी महाराजांवर "शक्तिपात रहस्याचे अधिकारी पुरुषोत्तम" म्हणून जेंव्हा वाचण्यात आले, तेंव्हापासून खूप दिवस ह्याही संताचे दर्शन घ्यावे, मनात घाटत होते; आणि तो एक दिवस योगा-योगानं जुळून आला.

१९६१ च्या जुलैमध्ये पुण्यातील पानशेत धरण फुटून मुळा-मुठेने उग्र स्वरूप धारण केले होते, एकच हाहा:कार झाला होता. नदीकाठचे जीवन उद्ध्वस्त झालेले; अत्यंत दुःखदायक व पराकोटीच्या दारुण निराशेचे जणू साम्राज्यच पसरलेले, तेंव्हा नातेवाईकांची देखभाल करण्यासाठी मी मुद्दाम मुंबईहून पुण्यास गेलो, अन् समाचार घेतला.

नारायण पेठेतल्या महाराजांच्या मठाचे काय झाले असेल? अन् मनात त्यांच्या पुण्य दर्शनाचा महान् संकल्प ठायी आठवून तपासास लागलो, तेंव्हा समजले गुळवणी बुधवारात एका 'मंगल कार्यालयात' तात्पुरते राहण्यास गेले आहेत.

मीही त्या मार्गावरच. हार, गुच्छ, पेढे घेऊन त्या कार्यालयात गेलो. वरच्या मजल्यावर महाराज आहेत, समजले. प्रथमच दर्शन. फार औत्सुक्य दाटलं होतं. जिना चढून दालनात प्रवेश केला. एक धीरगंभीर शांत मूर्ति आपल्या नादात रंगलेली दिसली. नमस्कार, प्रतिनमस्कार झाले. या बसा म्हणाले, वगैरे. गरजेपुरतीच देखभाल केली, आपण काय बोलावं हेच समजेना. आणलेला

हार त्यांना अर्पण करीत असता ते म्हणाले, मला नको, आमच्या गुरूंना ‘ श्री वासुदेवानंद सरस्वतींना ’ घाला. पेढे घेतले, मलाच प्रसाद दिला.

चिखलाने व धुळीने मळलेली, पाण्याने खराब झालेली ग्रंथसंपत्ती, माउलीच्या प्रमानं महाराज व्यवस्थित, एकेक पान व्यवस्थित पुसून काढीत, अस्ताव्यस्त झालेले ग्रंथ केवढया दक्षतेने, सावधानतेने हाताळीत होते. सरस्वतीच्या अलंकारांची ही जपणूक पाहून आश्चर्य वाटले. बाहेर हा कोलाहल, अन् येथे ही संयमी वर्तणूक व कर्तव्यनिष्ठता, तेव्हा मला श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील स्थितप्रज्ञ आठवला—

दु:खेष्वनुद्विग्नमना: सुखेषु विगतस्पृह: ।
वीतरागभयक्रोध: स्थितधीर्मुनिरुच्यते ॥

अनासक्त योगधारणा साध्य करून स्थिर व समतोल बुद्धीचा वापर करणारा हा कर्मयोगी समजावा. त्यांनी विचारलं, ‘ देवाचं काही करता का ? ’ मी उत्तरलो, ‘ हो थोडेफार करतो, शेगावचे श्रीगजानन महाराज धरलेत. त्यांचं वाचन सदैव करतो.’ निर्व्याज प्रेमळ कटाक्ष टाकून स्वामी म्हणाले, “ तुम्ही नामात सदैव दंग रहा, कारण नामाचा उपयोग छत्रीसारखा होतो, पावसाळयात उपयोगी पडते, उन्हाच्या तीव्र तापात ती साउली देते ” मनस्वी, फार आनंद झाला, मी मोठया आनंदानं परतलो, नामजपाची खूप पुस्तकें वाचली, त्याबद्दलचे वाङ्मय वाचले. इतकी सोपी सुटसुटीत व्याख्या आम्हा सामान्यांच्यासाठी. मनी पक्की बिंबली,–कर्मकांडात अहोरात्र अति दक्षतेने मग्न असणारा, दत्तावतारी श्री वासुदेवानंद सरस्वतींचा आध्यात्मिक कृपाप्रसाद लाभलेला व योगाचार्य श्री लोकनाथतीर्थ ह्यांच्या योगदीक्षेचा अलभ्य लाभ मिळालेला महान योगी-यांचा राणा पाहावयास मिळाला, हेच सर्वसुख. कैवल्यधामाचं–शक्तिपात, हे असिधाराव्रत महाराजांनी मिळवलं, जोपासलं अन् मुक्तहस्ते साधकांना वाटलं.

त्यानंतर वारंवार गाठीभेटी घेऊ लागलो, मुंबईस डॉ. निगुडकरांकडे, भागवतांकडे, डोंबिवलीस श्री. स. कृ. जोशींकडे – संतदर्शन घडायला भाग्य लागतं.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

योगीयांची सर्व लक्षणे कशी तंतोतंत लागू पडतात. हे महाराजांचं स्वरूप नीट न्याहाळावं.

संत हेच भूमीवर । चालते बोलते परमेश्वर
संत वैराग्याचे सागर । दाते मोक्षपदाचे
संत हेच सन्नीतीची । मूर्ति आहे पुण्य साची
संत कल्याणाची । पेठ आहे विबुध हो ॥

साधकांच्या सोयीसाठी व अध्यात्मचिंतनासाठी 'श्रीवासुदेव निवास' कर्वे पथ मोठा वास्तू उभारण्यात आला. तेथेच त्यांचे वास्तव्य, रौद्रीशांती व रौप्य-तुला अति भव्य सोहळे झाले. केवढा आगळा आनंद व उत्साह, जणू चैतन्यमय झाला होता परिसर. पंडित सातवळेकर हे महाराजांना गुरु मानीत, एका भेटीत फलटणचे ज्ञानयोगी डॉ. उपळेकरांना महाराज साक्षात शंकर दिसले. आमच्या अति सामान्य ज्ञानचक्षूंना, वैचारिक पात्रतेला काय समजणार? कुंडलिनी जगदंबेचे महान व्रतधारी, आत्मोद्धारक व शक्तिपातरहस्य गूढविद्येचे महान प्रणेते, ( Transmission of Super Natural Power ) व साधकांचे सच्चे पंथराज म्हणून गुळवणींचे क्षेत्र विशाल व कल्पनातीत आहे, महाराज फार कमी बोलत, गरजेपुरतं बोलत. मला वाटतं, त्यांना निरर्थक बडबडी ( Unproductive Talks ) आवडत नसाव्यात. केवळ त्यांच्या प्रेममय कृपाकटाक्षानेच साधकांचे, जिज्ञासूंचे संभ्रम नष्ट पावत; अन् त्या ध्यान-धारणेतल्या एकाही सूक्ष्म कणाचा बिंदू लाभला तर जीवन कृतार्थ होतं, मंगलमय होतं.

"ठायींच बैसोन करा एकचित्त
सुखे येतो घरा नारायण"—

शांतपणे मन एकाग्र करून स्वस्थ बसा, अनुभव येतील, परमानंदाच्या जगात वावरायला लागाल. सेवा करताना भाव ठेवा की, सारे जग उपास्य असून आपण एकटेच उपासक आहोत हीच भगवंतांची सर्वश्रेष्ठ महापूजा होय-ते म्हणत.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

जानेवारी १९७४ च्या १५ तारखेस प. पू. गुळवणींच्या ब्रह्मलोकगमनाची बातमी आकाशवाणीवरून देण्यात आली, पराकोटीचं दुःख झालं; ज्ञानेश्वरांच्या समाधीसोहळ्याचं वर्णन करताना संत नामदेव म्हणतात–" निवृत्तिदेव म्हणे करिता समाधान। काही केल्या मन रहात नाही ॥ बांधल्या तळ्याचा फुटलासा पाट। ओघ बारा वाट मुरडताती। बांधल्या पेंडीचा सुटलासे माळा। तृण रानोमाळ पांगलेले ॥ हरिणीविण खोपी पडीयेली ओस। दशदिशा पाडस भ्रमताती ॥ मायबापे आम्हा त्यागियेलें जेव्हां। ऐसे संकट तेव्हा आले नाहीं ॥"

–परवाच भाऊबीजेला पुण्यास गेलो, नेहमीप्रमाणे 'श्रीवासुदेव निवासा'चं दर्शन घ्यायचा शिरस्ता, पण जाणवलं; अतिशय जाणवलं, लकडीपुलापर्यंत आलो, म्हटलं, स्वामींच्या आसनापाशी डोकं टेकवून यावं. पण पाय पुढे रेटीनात; क्षणभर अश्रूंनी डोळे डबडबले, पंचप्राण कंठाशी आले; शब्द उमटेना तरी त्या सुप्रभाती तेथूनच नादब्रह्माचा झणत्कार कानी आला.

" दिगंबरा, दिगंबरा, श्रीपादवल्लभ दिगंबरा " अन स्वामींची तेजोमय मूर्ती नयनचक्षूंसमोर सामोरी आली, मन विसावलं.

* *

## 'गाईन मुक्तकंठे तयाचे गुणगान'

आता सद्‌गुरूविण नाही दुजे कोण।
ठेवुनी चरणी माझे मीपण।
झालो मुक्त मी संसारातून।
सेवुनी सद्‌गुरु–कृपेचे ज्ञान॥

कवि :—प्रा. **एम्. टी. चव्हाण**, पुणे.

* *

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# " श्रीगुरु गौरवाची गाथा "

लेखक : ह. भ. प. श्री. दा. का. थावरे, सोलापूर

## दत्तावतारास अन्त नाही

गुरुदेव दत्ता, अनंत ब्रह्मांडीं तुझी सत्ता ॥ धृ ॥
विश्वव्यापका, विश्वंभरिता, विश्वाधीशा विश्वातीता ।
प्रमेय-प्रमाता-प्रमाणरहिता, जगद्गुरु अवधूता ॥ १ ॥
नित्य निरंतर अगमागोचर, परात्परतर सुखदाता ।
दीन दयाकर दत्तदिगंबर, सत्यज्ञानानंता ॥ २ ॥
निःसंगा निजरंगा सत्वर, धांवे पावे आतां ।
निजात्मदर्शन देऊनि निरसीं, दुर्जय ममता चिंता ॥ ३ ॥

—श्रीरंगनाथस्वामी

श्रीमत् दत्तप्रभूंची उदारधी, अवतारकीर्ती आणि स्वरूपस्थिती वरील पदात श्रीरंगनाथ स्वामींनी चितारलेली आहे. दत्त अवतार हा सकल अवतारांपेक्षा स्व-तंत्र आहे. " अवतार उदंडही होती-सवेची मागुती विलया जाती " अशी या अवताराची अवस्था नाही. या अवतारांस कल्पांतीही नाश नाही. श्रीगुरुतत्त्वाची निशाणी एथूनच प्रकटली आहे. सकल भारतवर्षात असा एकही सांप्रदाय नाही की ज्याची अधिष्ठात्री गुरुदेवता नाही. गुरुनामाचे नामोद्घाटन प्रकर्षाने घडले ते दत्तगुरूपासूनच.

सर्व ' संप्रदायांत श्रीदत्ताची उपासना आणि साधना पुरातनकालापासून चालू आहे. वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, " ज्ञानदेव

हृदयीं दत्तात्रेय योगीया " ही नाथ-संप्रदायाची निशाणी एथेही प्रगटली आहे. समर्थ संप्रदायातही श्रीदत्तांना गुरुरूप मानतात आणि त्यांच्या निःस्पृहतेबाबत गौरवोद्गार काढतात.

दत्त गोरक्ष आदि करूनी । सिद्ध भिक्षा मागती जनीं ।
निःस्पृहता भीक्षेपासूनी । प्रगट होये ।।

—श्रीरामदास

आनंद संप्रदायाचे श्रीधरस्वामींना तर दत्तप्रभूंसंबंधी परमादर आहे. रामविजयात श्रीराम अत्रिमहर्षींच्या आश्रमात जातात या प्रसंगाची संधी घेऊन श्रीधरस्वामींचा दत्तप्रेमा उचंबळून आला आहे—

मग अत्रिचिया आश्रमाप्रती । येता झाला जनकजापती ।
तो देखिली दत्तत्रेयमूर्ति । अविनाशस्थिती जयाची ॥

गुरुपरंपरेने चैतन्य संप्रदायात मोडणारे श्रीतुकाराममहाराज तर श्रीदत्तांना विश्रांतिस्थान मानतात—

नमन माझें गुरुराया । महाराजा दत्तात्रेया ।। १ ।।
तुझी अवधूत मूर्ति ! माझ्या जीवीची विश्रांति ।। २ ।।
जीवींचे सांकडें । कोण उगवील कोडें ।। ३ ।।
अनुसया सुता । तुका म्हणे पाव आता ।। ४ ।।

महानुभाव संप्रदायाचे दैवतच केवळ 'श्रीगुरुदत्त' आहेत. त्यांच्या मान्य ग्रंथांत श्रीदत्तांना प्रारंभीच नमन करण्याची प्रथा आहे.

सैह्याचळाचिये चुळुके । जयाचें प्रभामंडळ फांके ।
तो श्रीदत्तु लल्लाट फळके । नमस्कारितु असे ।।

श्रीदत्तगुरूंचीच परंपरा जोपासणारे श्रीएकनाथ तर श्रीगरूंचा गौरव करताना म्हणतात—

आतां नमूं दत्तात्रेया । जो आचार्यांचा आचार्या ।

## सर्वसमन्वयक संप्रदाय

समन्वय, सामंजस्य आणि सर्व संप्रदायांबद्दलची परमसहिष्णुता हे दत्तावतारातील विशेष होत. संघर्ष आणि वाद यांच्यापलीकडे जाऊन अखिल

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

मानवसमूहाला कल्याणप्रद अशी जीवनमूल्याची उपासना प्रदान करणारी ही देवता आहे. शैव, वैष्णव, सनातनी, हिंदू आणि मुसलमान या सर्वांना आपलीशी वाटणारी दत्त ही प्रिय देवता आहे. तिची उदारता, उदात्तता, आणि उत्तमता सर्वकाली मान्यता पावली आहे. हृदयी गोविंद असलेले श्रीगोंद्याचे अविंध शेखमहंमद हे जनार्दन स्वामींचे गुरुबंधू होते; याचाच अर्थ त्यांची गुरुपरंपरा श्रीदत्तापासून आहे आपल्या गुरूंच्या धन्यत्वाची आणि पुढील परंपरेची निशाणी दर्शविताना महंमद बाबा म्हणतात–

धन्य चांद बोधले। त्यांनीं जानोपंता लोधलें।
त्यांच्या शेशे घाले। एको जनार्दन॥
केली भागवत टीका। उद्धार विश्वलोका।
तेच दिसे सायेका। स्वामीपाशी॥

अशी सर्वसमन्वयता आणि अपरंपार उदारता अन्यत्र दृष्टीस पडत नाही.

**श्रीगुळवणी दत्तस्वरूपीच**

अशा या सर्वकल्याणकारी श्रीदत्तसंप्रदायाचे उद्धारक आणि प्रवर्तक दत्तस्वरूपी श्रीगुळवणी महाराज हे आपले कार्य संपवून कालाआड झाले. सामान्य माणसांच्या गमनास कालपुरुष विस्मृत करीत असतो परंतु महाराजांच्या सारख्या महामानवाची कृती, उक्ती आणि पद्धती याचा विलक्षण ठसा जन-मानसावर बसलेला असतो. कालपुरुषाच्या प्रगमनाने तो विस्मृत होत नाही. कारण तो ठसा विमल, विशुद्ध आणि विकाररहित असतो. त्यांच्या प्रेरणा आणि धारणांची विजयी पताका सतत फडकतच राहाते. आपल्या गुरुदेवांच्या कडून म्हणजेच श्रीमन्महा वासुदेवानंद सरस्वती यांचेकडून मिळालेल्या आणि अखंड देहदंड सोसून मिळविलेल्या दत्त–भक्तीची कथा त्यांनी भ्रमांड भेदून पल्याड नेली. अखंडपणे पुरस्कार करून त्यांनीं प्रचंड अनुयायी जमविले. योग आणि भक्ती यांचा अपूर्व संगम गुळवणी महाराजांच्या जीवनात दिसतो तेवढा अन्यत्र दिसत नाही. "नाडीते सोडवी–गात्राते बिघडवी–साधकाते भेडसावी" असा योगमार्ग त्यांनी अनंत साधकांच्या जीवनात "परि बिहावेना" या ज्ञानदेवांच्या संदेशाने अभय देऊन स्थिर केला. शक्तिपाताच्या मार्गाने "ती कुंडलिनी

जगदंबा " साधकांच्या जीवनी जागृत केली. " चैतन्य चक्रवर्तींची शोभा " पाहण्याचे सद्भाग्य साधकांना प्राप्त झाले. गुरुकृपे लाधलेले योग–धन त्यांनी असंख्य जीवांच्या पदरी बांधले. स्वामी लोकनाथतीर्थांच्या कडून प्राप्त झालेल्या शक्तिपातविद्येचे त्यांनी उदार अंतःकरणाने वितरण केले. आणि साधकांना अंतःकरणाने योगी होण्याची प्रेरणा प्रस्थापित केली. एका अर्थाने " योगी होई अंतःकरणे–पंडुकुमारा " हा भगवंतांचा संदेश त्यांनी आचरला.

## दुर्गम मार्गाचे वाटाडे

योगमार्गात " मरणेंसी झुंज–नीचनवे " असते. त्यात सातत्य आणि श्रद्धा, गुरूपदिष्टता आणि कृपा नसेल तर त्यांच्या वाट्यास दुःख येते.

म्हणोनि योगाचिया वाटा । जे निगाले गा सुभटा ।
तयां दुःखाचिया वाटा । भागा आला ॥ —श्री ज्ञानेश्वर

अशा कठीण–दुर्गम मार्गाचे श्रीगुळवणी महाराज वाटाडे बनले. आपल्या योग-भक्ती मार्गाचा प्रचार आणि प्रसार अविरतपणे केला. प्रसिद्धीपासून दूर–सुदूर राहून साधकांचा परमार्थ मार्ग निष्कंटकपणे त्यांना अवलंबिता येईल असे पथ-प्रदर्शन केले.

महाराजांनी ऐहिकाचा तिरस्कार केला नाही. आपल्या पत्र–बोधामृतातून साधकांना हळुवारपणे समजावून सांगितले. " बाळ जैं जेवविजे–तैं घांसु विसा ठाई कीजे " या न्यायाने त्यांनी साधकांना सांभाळले, सावरले आणि सावध केले. " कोण्याही जीवाचा न घडो मत्सर " हे सूत्र जन्मभर सांभाळले. त्यांच्या दरबारी सकलांना सारखा मान असे. चमत्काराचे वलय त्यांनी स्वतःभोवती कधीही निर्माण केले नाही. त्यांच्या वाचेने अवगुण संन्यसिले होते. ते अकलंक ब्रह्मचारी आणि मूर्तिमंत योगी होते. जीवनात योगभक्तीचा समन्वय घडवून त्यांनी अनंतांना दिशा दाखविली " तुम्ही चला याची वाटे " असा संदेश देऊन " भंरवशाने भेटे पांडुरंग " असा कृतकृत्यतेचा आशीर्वादही दिला.

## उद्धरलो गुरुकृपे

" आता उद्धरलो गुरुकृपे " असा भाव त्यांच्या हृदयी नित्य स्थिर होता.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

यामुळे "कुळींचा कुळधर्म अवश्य पाळावा सर्वथा न करावा अनाचार" हा संतधर्मांचा संदेश त्यांनी महाराष्ट्रात पुनः एकदा प्रस्थापित केला. अनाचाराचा पुरस्कार करणाऱ्या या कालात अनाचाराचा कंठरवाने धिक्कार करणारे आणि सदाचाराचा पुरस्कार प्रथमतः स्वजीवनात करून अन्यांना "आधी केले मग सांगितले" या न्यायाने सांगणारे महाराज महात्मे होते, संत होते, साधू होते ऋषीमहर्षींचे स्मरण करून देणारे महर्षी होते. आपल्या श्रीगुरुदेवांचा दत्त-धर्म त्यांनी बाहो उभारून सांगितला. आर्जवून आणि आवर्जून आपला गुरुमार्ग त्यांनी प्रशस्त केला. प्रसन्न आणि संपन्न जीवनाची उभारणी केली. त्यांचे गुरुत्व आकाराने विसर्जित झाले असले तरी अनंत शिष्यांच्या आकाराने ते मंडित झाले आहे आणि उत्तरोत्तर ते वर्धिष्णूच होत जाईल यात शंका नाही.

या साधनेबाबत ब्रह्मलीन आर्वीकर महाराज यांनी अत्यंत समर्पक शब्दांत या गुरुमार्गाचा गौरव केला आहे "भारत वर्षातील सर्व संप्रदाय दत्तप्रणीत आहेत. दत्तावाचून कुठल्याही संप्रदायाला गुरू नाही.युगपुरुषांना संचरित करणारी ती महाशक्ती आहे.म्हणून दत्तसंप्रदाय संप्रदाय ठरत नाही तर दत्त ही उपासना-साधना आहे. गुरूंनी दिलेली—गुरूकडून आलेली—ती दत्तोपासना ! स्मरताच जे उपस्थित होतात ते दत्त एकच त्यांच्या सम आहेत ! ते भक्तीचे पुरस्कर्ते आहेत. तेव्हा सर्व संप्रदायांतून भक्तीचा जो शंखनिनाद फिरविला गेला तो भगवान् दत्तांनी फिरविला. साधनांना भक्तीचे वेष्टन चढविले, जे भक्तीचे माधुर्य निर्माण केले ते दत्तांनी ! तपस्या, जप, जाप्य काही असो. भगवान दत्त त्याचे मूल अधिष्ठान आहे. भक्तीचा स्पर्श करून गेलेली ती महावेदना आहे."

अशा या मार्गाचा गौरव म्हणजे ज्ञानप्राप्तीच ! "कां गुरुगौरव वर्णिता— उन्मेषु असे" असे ज्ञानेशवचन प्रसिद्धच आहे. गुरुराज गुळवणी महाराजांचा गौरव वाणी-लेखणीने जेवढा करावा तेवढा थोडाच. म्हणून त्यांना अष्टांगाने नमस्कार करून थांबावे. ......

। यालागी आतां । स्तुती सांडोनि निवांता ।
। चरणीं ठेविजे माथा । हेचि भलें ॥ — श्रीज्ञानेश्वर

... जय गुरुदेव की जय ...

* *

॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥

# " साधकाची दशा "

लेखक : **श्री. प्र. वा. पटवर्धन**, ठाणे

### श्रीमहाराजांचा साधकास दिव्य संदेश

साधकाची दशा उदास असावी ।
उपाधी नसावी अंतर्बाही ॥ १ ॥
लोलुपता काय निद्रेसी जिंकावे ।
भोजन करावे परिमित ॥ २ ॥
एकांती लोकांती स्त्रियांशी भाषण ।
प्राण गेला जाण करू नये ॥ ३ ॥
संग सज्जनांचा उच्चार नामाचा ।
घोष कीर्तनाचा अहर्निशी ॥ ४ ॥
तुका म्हणे ऐशा साधनी जो राहे ।
तोचि ज्ञान लाहे गुरुकृपा ॥ ५ ॥

श्रीतुकोबामहाराजांचा वरील अभंग उपदेशपर आहे. प. पू. योगीराज गुळवणी महाराजांचे पवित्र स्मरणी वरील अभंग माझे हृदयाकाशात घुमतो आहे. त्यांच्या मंगलदायक जीवनाचे सर्व सार या अभंगात आहे. सर्व साधकबंधूंना परम उपकारक असा उपदेश या अभंगात साठविलेला आहे.

प. पू. महाराजांनी स्वतः आचरण करून मग वरील धडा गिरविण्यास सर्व साधकांना सांगितला आहे. जो जो या अभंगाच्या चरणाच्या चिंतनात तल्लीन व्हावे तो तो एक एक दिव्य संदेश आपणास घडोघडी मिळतात.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

उपाधी दोन प्रकारची. एक अंतर्मनातील व दुसरी बाहेरची. या उभयविध उपाधीतून अलिप्तता प्राप्त करून मनाची दशा उदास ठेवणे हे साधकाचे आद्य कर्तव्य आहे. उपाधी गळल्याशिवाय मनाचे व्यापार खुंटत नाहीत. मनाचे व्यापार जितक्या प्रमाणात कमी होतील तेवढे मनास शांतिकारक व शरीरास आरोग्य-दायक. हृदयरोगाचे प्रमाण आज सर्वत्र वाढले आहे. तो रोग एक नंबरचा मानवाचा शत्रू बनत आहे. हृदयरोगतज्ञ औषधाव्यतिरिक्त मनास विश्रांती देण्याकरिता योगासनाचा अवलंब करा म्हणून उच्चरवाने सांगत आहेत.

उपाधीची आटणी केवळ गुरुकृपेने साफल्यास येते. याचे तंतोतंत उदाहरण प. पू. महाराजांचे आहे. त्यांनी जीवनभर कष्ट करून आपले आयुष्य मानव-सेवेत घालविले व त्यांनी प्रत्येक क्षणास मनाची शांती ढळू दिली नाही. अखंड शांती म्हणजेच प. पू. महाराज. त्यांचे भोजन परिमित होते. फक्त एकदाच सकाळी आहार घेत असत. आहारात समतोलपणा व रात्रौ मामुली फलाहार ते घेत असत. सुसंस्कारित आहाराचा परिणाम मनावर उत्तम होतो. स्वामी विवेकानंदांनी या गोष्टीला फार महत्त्व देण्यास सांगितले आहे. विचारांचे मूळ अन्नात असते.

सदैव हरिचिंतन व नामस्मरण यामध्ये प. पू. महाराज निमग्न असत. त्यांचा प्रगट उच्चार आलेल्या मंडळींना आशीर्वाद देत असताना "श्रीगुरुदेवदत्त" अथवा "नारायण" या शब्दांनी होत असे.

सर्व भगवत्प्रेमी मंडळींचे स्वागत ते स्वतः जातीने करीत. भगवत्प्रेमी मंडळी भेटली की त्यांना आनंदाचे भरते येत असे व त्यांचे मुखमंडलावर दिव्य तेजाची प्रभा विराजमान होत असे. प. पू. लोकनाथतीर्थांनी दिलेल्या दिव्य शक्तिपात दीक्षेचे साधन त्यांनी जन्मभर केले. तसेच प. पू. वासुदेवानंद सरस्वतींनी दिलेले नामसाधन त्यांनी अहर्निश पाळले. श्रीतुकोबा महाराजांच्या वरील अभंगात जे निवेदन केले आहे ते तंतोतंत प. पू. महाराजांनी आपले आचरणात बाणवले होते याचा प्रत्यय सर्व साधकबंधूंना व सर्व मुमुक्षूंना जरूर आलेला आहे. तोच धडा सर्वांनी गिरवावा.

प. पू. महाराजांच्या प्रथम वर्षश्राद्धदिनी त्यांचे पुण्यस्मरण करून माझी

अल्प वाङ्मयसेवा त्यांचे पवित्र चरणी सादर करतो.

श्रीगुरुकृपेने जे साधन मिळाले ते जन्मभर नियमाने करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अखंड वाटचाल व ती एकटयानेच करावयाची आहे. सामूहिक वाटचाल नाही. एकाचाही अंत जेथे शेवटी होतो तेथे सामूहिक वाटचाल नाही. साधन स्वतंत्रपणे करावे, यावर प. पू. महाराजांचा भर होता. साधना सोडून जर इतर उपाधीत पडलो तर शांतीपासून दूर जातो हे प्रत्ययास येते. वरीलप्रमाणे श्रीगुरुकृपेने युक्त साधन जो करील त्यालाच ज्ञान मिळेल असे प. पू. महाराजांनी सांगितले आहे.

पांडित्याने युक्त असे बहुत लोक या जगतात अध्यात्माचा विक्रम करण्यास बसलेले सापडतात. ते स्वतः जाळयात अडकतात व दुसऱ्यास घेऊन खोल गर्तेत जातात. यापासून साधकांनी जरूर लांब राहावे असा त्यांचा कळकळीचा उपदेश आहे.

केवल ज्ञानप्राप्ती श्रीगुरुकृपेनेच होते हे सर्व साधकबंधूंनी विसरू नये. असाच श्रीगुरुमहाराजांचा दिव्य संदेश या पवित्र क्षणी ग्रहण करावा ही विनंती. इति अलम्.

* *

## अंतरीचे ब्रह्म परब्रह्मी गेले

सद्गुरु स्वरूप आकारासी आले ।
ते म्या देखिले धणी वसे ।। धृ० ।।
उग्र तपश्चर्या परि शांत मूर्ती ।
सुखासि विश्रांति, होय तेथे ।। १ ।।
साधकासि झाला, वटवृक्ष मोठा ।
निजानंद साठा, होय तेथे ।। २ ।।
दत्त प्रभू आले, मानव रूपाने ।
धरा कृपादाने, धन्य केली ।। ३ ।।
त्यांचि कृपादृष्टी, करि सौख्यवृष्टी ।
समाधान स्थिती, साधका त्या ।। ४ ।।
अंतरीचे ब्रह्म, परब्रह्मी गेले ।
स्मृती बोल उरले, मागे आता ।। ५ ।।
हृदय संपुटात ठेवू या जपूनी ।
गुरु चरण ध्यानी, नित्य आणू ।। ६ ।।
हेचि हेचि माझी, पूजा गुरुराजा ।
सेवा भाव माझा, स्वीकारावा ।। ७ ।।

—**नादब्रह्म उपासक**

*।। दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ।।*

# "आदर्श मुहूर्तनिष्ठा"

लेखक : **पं. धुंडिराजशास्त्री दाते**, पंचांगकर्ते, सोलापूर

## योगिराजांची मुहूर्तनिष्ठा

परमपूज्य योगिराज श्री गुळवणी महाराज यांची 'मुहूर्तनिष्ठा' अत्यंत आदर्शवत् असे, वैदिक, ऋषितुल्य सदाचारसंपन्न व भगवद्‌भक्त कुलात जन्म घेऊन, दत्तावतारी श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांसारख्या सर्वज्ञ साक्षात्कारी महापुरुषांची कृपा संपादन केली व आयुष्यभर शास्त्रैकनिष्ठ राहणे आजच्या कालात कठीण असूनही श्री गुळवणी महाराजांनी कटाक्षाने शास्त्र-परिपालन केले, इतकेच नव्हे तर त्यांची सर्व प्रकारची हालचाल व सत्कर्मे 'मुहूर्त' पाहिल्याशिवाय होत नसत. इतका त्यांचा मुहूर्ताबाबत कटाक्ष होता, याचे कारण ते मुहूर्तांचे महत्त्व चांगले जाणून होते. आणि म्हणूनच आम्ही आज या लेखद्वारा मुहूर्तासंबंधी थोडक्यात विशेषत्वाने विचार मांडण्याचे योजिले आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये मुहूर्ताला फार महत्त्व आहे. अखिल धर्माचे मूळ असे जे वेद ते यज्ञाकरिता प्रवृत्त झाले. अकाली दिलेल्या कोटी आहुती व योग्यकाली दिलेली एक आहुती ही सारखी आहे असे वचन आहे. यज्ञ म्हणजे धर्म व धर्म म्हणजे संपूर्ण मानवी जीवन होय. कारण धर्माने माणसाची कर्तव्ये सांगितली आहेत.

मुंज-विवाहादि महत्त्वाचे संस्कार, तसेच विद्यारंभ, अर्थार्जनारंभ इत्यादी अनेक महत्त्वाच्या गोष्टी या योग्य वेळी, योग्य काळी होणे हे महत्त्वाचे आहे. अन्यथा जीवनात बिघाड निर्माण होतो. सिद्धांतशिरोमणी ग्रंथाचे कर्ते

पं. भास्कराचार्य यांची मुलगी लीलावती हिचा विवाहमुहूर्त १।२ पळांनी चुकला त्यामुळे तिला वैधव्य आले अशी कथा आहे.

मुहूर्तशास्त्र हे ज्योतिषशास्त्राच्या संहित स्कंधाचा एक भाग आहे. म्हणून ज्योतिःशास्त्राने वेद व ऋषिवचनांच्या आधारे संपूर्णपणे विज्ञानावर आधारित असा मुहूर्त विषय फारच छान सांगितला आहे.

## सूर्य हे विश्वाचे केंद्र

ही पृथ्वी सूर्यापासून निर्माण झाली आहे. आपले शरीरच नव्हे रोम रोम देखील सूर्यापासून झाला आहे. सूर्य हे विश्वाचे केंद्र आहे. त्यांच्या आकर्षणामुळे सर्व तेजोगोल अंतरिक्षात अधांतरी आहेत. पृथ्वीसह सर्व ग्रह त्याच्या भोवती फिरतात. सूर्य हा जगताचा आत्मा आहे. 'सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च' असे श्रुतींने म्हटले आहे. सूर्य हा जसा आत्मा आहे तसा चंद्र हा मन आहे. परमेश्वराच्या मनापासून चंद्र निर्माण झाला असे 'पुरुषसूक्तात' सांगितले आहे.

आपल्या शरीरात अवयवरूपाने नसलेल्या व न दिसणाऱ्या अशा आत्मा व मन यांवरच सर्व शास्त्र आधारित आहे. म्हणून ज्योतिःशास्त्राने सूर्य व चंद्र हे प्रधान मानून त्यावरच सर्व विचार केला आहे. हे केवळ विज्ञानच ( सायन्स ) आहे असे नसून ऋषींच्या प्रज्ञानातून तयार झालेले शास्त्र आहे म्हणून ते अतिशय महत्त्वाचे आहे.

आपली सर्व कालगणना सूर्यचंद्रावरच आधारित आहे. वेदांमध्ये संवत्सर, अयने, ऋतु, महिने, पक्ष, तिथी, नक्षत्र या सर्वांचे वर्णन आहे. नक्षत्रांचे विस्तृत वर्णन तैत्तिरीय संहिता व ब्राह्मण ग्रंथात आहे, तितके अन्य कोठेही दिसत नाही. विशिष्ट नक्षत्रांवर विशिष्ट कर्मे केली असता ती करणारास स्वर्गति प्राप्त होते. 'नक्ष' हा गतिवाचक धातु असल्यामुळे 'नक्षत' या व्युत्पत्तीने विशिष्ट तारकांना 'नक्षत्र' असे म्हणतात.

## निरयनच प्रमाण

सर्व वैदिक कर्मे मास, तिथी व नक्षत्रप्रधान आहेत. तिथी हे कर्माचे शरीर व कारण आहे. 'तिथिः शरीरं तिथिरेव कारणम्' नक्षत्रे म्हणजे देवांची घरे

आहेत व ती दीप प्रकाशवत् आहेत. पाश्चात्य लोकही नक्षत्रे मानतात पण ती तारकात्मक नसून संपातापासून विभागात्मक मानतात. यालाच 'सायन' पद्धती म्हणतात. या विभागात्मक नक्षत्रात एकही तारकात्मक नक्षत्र आकाशात दिसत नाही तरी देखील हीच पद्धती बरोबर आहे असे साहेब म्हणत होते. म्हणून भारतातील काही विद्वान्ही तसेच म्हणू लागले. परंतु आता पाश्चात्य राष्ट्रांत नवीन बरीच साधने निर्माण झाली आहेत. संशोधनही खूप झाले आहे. त्यात तारकात्मक नक्षत्रे मानणे हेच बरोबर आहे असे त्यांना दिसून आल्यामुळे आता 'निरयन' मानणेच बरोबर आहे असे पाश्चात्य म्हणू लागले आहेत. परंतु हेच वेदाने हजारो वर्षांपूर्वी सांगून ठेवले आहे व ते आजच्या विज्ञान शास्त्राच्या कसोटीवर पूर्णतया बरोबर ठरले आहे.

ही सृष्टी निर्माण करताना परमेश्वराने प्रथम आकाश निर्माण केले. 'तस्मात् वा एतस्मादात्मनः आकाशः संभूतः' असे उपनिषदांनी म्हटले आहे. म्हणजे या सृष्टीचे घटक द्रव्य आकाश हे आहे. आपल्या चर्मचक्षूंना जे निळे दिसते ते आकाश नव्हे. तो तर दृष्टिभ्रम आहे. आकाशाचे विशुद्ध स्वरूप काय ? या विशुद्ध स्वरूपाला तन्मात्रा असे म्हणतात. आकाशाची तन्मात्रा अथवा गुण शब्द किंवा नाद हाच आहे. याचाच अर्थ नादापासून सर्व सृष्टी निर्माण झाली. म्हणून या संपूर्ण विश्वामध्ये व पंचमहाभूतांत नाद भरून राहिला आहे. संपूर्ण विश्व हे संगीतबद्ध ( ऑरजेनिक् युनिटी ) व नादमय आहे. जगातील प्रत्येक वस्तूला नाद आहे. जेथे जेथे गती आहे तेथे तेथे तर नाद (शब्द) आहेच. आपले शरीर पांचभौतिक असल्याने नादमय आहे. नक्षत्रांना व ग्रहांना ध्वनी आहे. नक्षत्रगति व ग्रहगति एक विशेष ध्वनी निर्माण करते.

## सर्व नादांचे सुसंवादित्व

सृष्टीचे आदि घटक द्रव्य जो नाद तो सर्व विश्वात भरून राहिलेला असल्या-मुळ भूगोल, भ (नक्षत्र) गोल, खगोल व मानवी शरीर या सर्वांच्या नादाच्या सुसंवादित्वाचा काल ( अनुकूल वेळ) म्हणजे 'मुहूर्त' होय. असा अत्यंत मूल-गामी विचार करून नैसर्गिक तत्त्वावर मुहूर्त शास्त्राची रचना असल्याने ते पूर्ण-तया वैज्ञानिक आहे.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

नक्षत्र म्हणजे काय हे थोडक्यात वर सांगितलेच आहे. तैत्तिरीय ब्राह्मणाच्या पहिल्या कांडात पाचव्या अध्यायात विशेष वर्णन आहे. जिज्ञासूंनी ते पाहावे.

नक्षत्रे ही देवतागृह सदृश आहेत. ( 'देव गृहा वै नक्षत्राणि' ) ज्याप्रमाणे दिव्याच्या प्रकाशात माणसे आपला व्यवहार करतात त्याप्रमाणे देव नक्षत्रप्रकाशात व्यवहार करतात. म्हणून नक्षत्रे प्रशस्त आहेत. कृत्तिकापासून विशाखा नक्षत्रापर्यंत देवनक्षत्रे व अनुराधापासून भरणीपर्यंत यमनक्षत्रे असे नक्षत्रांचे दोन विभाग देवांनी सांगितले आहेत. देवलोकाच्या समीप दक्षिणभागी कृत्तिकादि देवनक्षत्रे परिभ्रमण करतात. अनुराधादि यम नक्षत्रे यम लोकाच्या समीप उत्तरभागी परिभ्रमण करतात. 'यानि देवनक्षत्राणि । तानि दक्षिणेन परियंति । यानि यम नक्षत्राणि । तानि उत्तरेण' असे दोन विभाग आकाशातही प्रत्यक्ष दिसतात. प्रत्येक नक्षत्राच्या किती तारका आहेत हे सांगून नक्षत्राची देवता सांगितली आहे. ( तै. सं. ४–४–१०; तै. ब्रा. १–५–१ ). त्या देवतेचा स्वभाव व गुणवैशिष्टय जाणून कोणते नक्षत्र कोणत्या कर्मास घ्यावे हे सांगितले आहे. स्वाती नक्षत्रावर कन्यादान केले असता ती कन्या सासरी अत्यंत प्रिय होते व तेथे ती इतकी रमते की माहेरी जाण्याची तिला इच्छाही होत नाही. अशी काही नक्षत्रांची वैशिष्टये सांगितली आहेत. "यां कामयेत दुहितरं प्रियास्यादिति । तां तिष्ठया यां दधात् । प्रियैव भवति । नेवतु पुनरागच्छति ।" ( तै. ब्रा. १–५)

उषःकाली पूर्व क्षितिजावर जे नक्षत्र उदित असते ते आपल्या कार्यास योग्य असेल तर ते नक्षत्र ख मध्यावर येईपर्यंतच्या काळात ते कर्म करावे म्हणजे सत्वर फलदायी व प्रभावी होते. कारण ते नक्षत्र उन्नत होत असल्याने ते कर्म श्रेष्ठ होऊन कर्त्याची उन्नति होते. असा मूलगामी विचार करून निरनिराळया कामांस योग्य मास, ऋतु, तिथी, नक्षत्रे शास्त्रांनी सांगितली आहेत.

'गर्भाधान' हा संस्कार अलीकडे लुप्तप्राय झाला आहे. पण तोच सर्वाधिक महत्त्वाचा संस्कार आहे. कुलदीपक, बुद्धिमान्, आज्ञांकित इत्यादि गुणयुक्त प्रजा होण्याकरिता क्षेत्रशुद्धिरूप हा संस्कार आहे. गर्भाचा आधान (गर्भधारणा) करण्याचा काल सुयोग्य असेल तरच प्रजा चांगली होईल. गर्भधारणेपासून नऊ

महिने नऊ दिवसांनी प्रसूती होते असा निसर्ग आहे. यास अनुसरून गर्भाधान नक्षत्रापासून दहाव्या नक्षत्रावर प्रसूती होते. म्हणून संस्कारास मूळ, मघा, रेवती व आश्लेषा ही नक्षत्रे वर्ज्य सांगितली आहेत. मूळ नक्षत्रापासून दहावे नक्षत्र अश्विनी, मघापासून दहावे मूळ, रेवतीपासून दहावे आश्लेषा, आश्लेषापासून दहावे ज्येष्ठा. मूळ, आश्लेषा, ज्येष्ठा ही नक्षत्रे जन्म व विवाह-संबंधी दूषित आहेत. अष्टमी, चतुर्दशी, पौर्णिमा व अमावास्या या तिथी वर्ज्य सांगितल्या आहेत. कारण या तिथींना समागम केल्यास 'नपुंसकत्व' येते. "नामावास्या यांच पौर्णिमास्यां च स्त्रियमुपेयाद्यदुपेयान्निरिंद्रियः स्यात्" (तै. सं.) जन्मणारे मूल हे तिथी-नक्षत्रांच्या म्हणजे सूर्य-चंद्रांच्या स्थितिनुसार प्रभावित होत असते. ज्यांचा जन्म दिवसा झाला आहे ते लोक भाग्यवान्, कर्तृत्ववान् व बुद्धिमान असतात, असा अनुभव आहे.७० ते ८० प्रतिशत जन्म रात्रींच होतात. असे प्रसूतिगृहातील जन्म नोंदीवरून दिसते. त्यामुळे त्यांचे जीवन बरेचसे अंधारमय असते.

## उपनयन व विवाह

उपनयन ( मुंज ) उदगयने आपूर्यमाणपक्षे पुण्ये नक्षत्रे, वसंते ब्राह्मण-मुपनयति ग्रीष्मे राजन्यं शरदि वैश्यम्।" असा सूत्रकारांनी काल सांगितला आहे. १।४।७।८।९।१३।१४।१५।३० या तिथी, भरणी, कृत्तिका, मघा, विशाखा, ज्येष्ठा ही नक्षत्रे व शनिवार मंगळवार हे वर्ज्य सांगितले आहेत. उपनयन हा आचार्यपैतृक सावित्रीमातृक संस्काररूप दुसरा जन्म असल्याने मुंजीच्या वेळच्या लग्नापासून अष्टमात म्हणजे मृत्युस्थानी कोणताही ग्रह नसावा असे सांगितले आहे व ते युक्तच आहे.

विवाह :—सर्व ऋषींच्या मते ११ व हरदत्त मताची ४ अशी १५ नक्षत्रे ग्राह्य सांगितली आहेत. रोहिणी, मृग, मघा, उत्तरा, हस्त चित्रा, स्वाती, अनुराधा, मूळ, उत्तराषाढा, श्रवण, धनिष्ठा, उत्तराभाद्रपदा, रेवती, अश्विनी ही नक्षत्रे क्रूरग्रहयुक्त व विद्ध नसावीत. ग्रहांचा वेध कसा पाहावा याची पंचशलाका व सप्तशलाका पद्धती ग्रंथात सांगितली आहे. ती फारच उत्तम व उपपत्तिशुद्ध आहे. कुंडलीतील सप्तमस्थान हे जाया-पतिस्थान असल्याने विवाहकालीन

लग्नापासून सप्तमात कोणताही ग्रह नसावा असे सांगितले आहे. प्रपंचात पति-पत्नींची मने बिघडू नयेत म्हणून त्यावेळचा चन्द्र शत्रु व मृत्युस्थानीं नसावा चरलग्न शक्यतो नसावे, ( अगदीच त्याज्य नाही), इत्यादि बराच विचार शास्त्रकारांनी केला आहे. तो सर्व योग्य आहे. सूर्योदयापेक्षा सूर्य आकाशमध्यावर असतो त्यावेळी अत्यंत प्रभावी असतो. म्हणून सर्व दोषांचा नाश होतो. याकरिता अभिजित लग्न घेण्यास सांगितले आहे. दिवसाचे पंधरा भाग करून प्रत्येक भागास मुहूर्त असे म्हटले असून त्याची दिवसाची पंधरा व रात्रीची पंधरा नावे दिली आहेत. त्यांत दिवसाचा आठवा मुहूर्त हा कुतुप संज्ञक आहे व तो श्रेष्ठ आहे, असे भविष्य पुराणात आहे. अभिजित् लग्न म्हणजे हा आठवा मुहूर्तच होय.

**मुहूर्तशास्त्राचे वैशिष्टय :**—एक नियम सर्वत्र लागू नाही. प्रत्येक कृत्यास वेगवेगळा ग्राह्याग्राह्य विचार आहे. साडेतीन मुहूर्त उत्तम म्हणून सांगितले. परंतु विवाह, उपनयन, वास्तु इत्यादिकांस ग्राह्य नाहीत. लग्नाचा मुहूर्त आहे त्या दिवशी नूतन गृहप्रवेशास काय हरकत आहे असे वाटते पण ते योग्य नाही. विवाहाचे मुहूर्त वेगळे व वास्तुशांतीचे मुहूर्त वेगळे. प्रत्येक ग्रंथात सामान्य नियम म्हणून सांगितलेले असतात; परंतु त्या त्या प्रकरणातील विशेष वचनांनी काही सामान्य नियम बाधित होत असतात.

मुहूर्त शास्त्राच्या प्रसिद्ध ग्रंथांची यादी—मुहूर्ततत्त्व, मुहूर्तमार्तंड, मुहूर्तचिंतामणि, मुहूर्तगणपति, मुहूर्तसिंधू, ज्योतिर्निबंध व अग्निपुराण हे प्रचारात असलेले ग्रंथ आहेत. इतर अनेक ग्रंथांची व त्यांच्या लेखकांची माहिती भारतीय ज्योतिःशास्त्राचा इतिहास या ज्यो. शं बा. दीक्षित यांच्या पुस्तकात पाहावी.

मुहूर्तग्रंथांचे सामान्यतः विषय :– १ संस्कार ( निषेकादि स्मशानान्त ) २ आचार, ३ यज्ञ, ४ दान, ५ तप, अनुष्ठान, ६ इष्ट-पूर्तकर्म, ७ देवताप्रतिष्ठा, ८ जनन व अरिष्टनिरसन शांति, ९ व्रते, १० वास्तु, ११ यात्रा व प्रवास, १२ श्राद्ध, १३ प्रायश्चित्त, १४ शेती, १५ व्यापार, इत्यादिकांस योग्य काल सांगणे.

सामान्यतः ग्राह्याग्राह्य विचार :–१ पंचांगशुद्धी, २ वर्ज्यकाळ, ३ दिशाशुद्धी,

४ कुंडलीतील भाव व ग्रहशुद्धी, ५ कालशुद्धी.

पंचांग शुद्धी :–तिथी, वार, नक्षत्र, योग व करण.

वर्ज्यकाल :–गुरुशुक्रास्त, क्षयादिमास, क्षयपक्ष, महापात, चातुर्मास्य.

दिशाशुद्धी :–कोणते कर्म कोणत्या दिशेस मुख करून करावे.

भावशुद्धी :–विवाहात सप्तम, मुंजीस अष्टम, वास्तूस चतुर्थ व दशम शुद्ध असावे.

कालशुद्धी :–मुंजीस दिवसाचा दोन तृतीयांश भाग, वास्तूस सूर्यास्तापर्यंत, नित्यकर्मास उषःकाल व रात्रीचा प्रथम प्रहर.

याखेरीज शिवालिखित महेन्द्र मुहूर्त, आनंदादि योग यांचाही उपयोग प्रचलित आहे व त्यांचा अनुभवही चांगला आहे. परंतु विस्तारभयास्तव तो देता येत नाही.

गुरुमहाराजांचा व आमचा घनिष्ट ऋणानुबंध होता. आमचे पिताजी प. पू. नाना यांचाही गुरुमहाराजांशी चांगला परिचय होता. गुरुमहाराज सोलापूर येथे नेहमी येत त्यावेळीही भेट होत असे व आम्हीही पुण्यास जाणे होई तेव्हा त्यांचे दर्शन-भेट होत असे. आमचे ‘दाते पंचांगच’ त्यांचे नित्य आचरणात असे.

गुरुमहाराजांचे जसे आमचेवर आत्मीय प्रेम असे तसेच त्यांचे उत्तराधिकारी विद्यावाचस्पती राष्ट्रीय पंडित ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वरशास्त्री यांचेही आमचेवर प्रेम आहे. आज गुरुमहाराजांच्या या प्रथम वार्षिक पुण्यस्मृतीनिमित्त आम्ही ही त्यांची ‘आदर्श मुहूर्तनिष्ठा’ व्यक्त केली हीच आमची श्रद्धांजली होय.

* *

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# एक विनम्र श्रद्धांजली

लेखक : वाचस्पति **श्री. विष्णुजी क्षीरसागर**
अध्यक्ष, वेदान्त ज्ञानवर्धिनी सभा नाशिक,
सत्कार्योत्तेजक सभा – श्री समर्थ वाग्देवतामंदिर, धुळे.

## पुण्यतिथी का ?

परमपूजनीय श्रीगुळवणी महाराजांना ब्रह्मलीन होऊन एक संवत्सर होत आले आहे. त्यांच्या महाप्रयाणाच्या आधी एक दिवस आकस्मित मी सौभाग्यवती व चिरंजीवांसह त्यांच्या दर्शनार्थ पुण्यास गेलो होतो. तेच त्यांचे पार्थिव स्वरूपातील अखेरचे दर्शन ठरले. विभूतिवर्गा-संबंधात असा एक विचार सांगितला जातो की, ते विद्यमान असताना आपले दैवी कार्य करीत असतातच, परंतु त्यांचे शरीर अनंतात लीन झाल्यावर खऱ्या अर्थाने त्यांचे कार्य सुरू होत असते. म्हणूनच त्यांच्या जन्मतिथीऐवजी पुण्यतिथीस त्यांचे स्मरण करण्याचा आपला परिपाठ आहे. पंचभौतिक जड देहाची बंधने तुटल्यावर त्यांच्या अपार्थिव देहाची कार्यक्षमता अधिक प्रबल असते असेही सांगितले जाते.

हिन्दुस्थानच्या विशेषतः महाराष्ट्राच्या इतिहासाचे सूक्ष्म अवलोकन केले असता पराधीनतेच्या घनांधकारी वायुमंडलात केवळ श्रीदत्तावतारी सत्पुरुषांनी ह्या देशाची अस्मिता संजीवित करून ठेविली आहे. आत्मविस्मृतीच्या खोल गर्तेत रुतलेल्या धर्मबान्धवांना यथायोग्य आचारधर्म शिकवून, त्यानुसार निष्ठेने वर्तावयास लावून सुयोग्य धर्ममार्गावर आणले आहे. अपार कर्मनिष्ठा शिकविली आहे. पूज्यपाद श्री नरसिंहसरस्वती स्वामीमहाराज, श्री जनार्दनस्वामी, श्री

एकनाथ महाराज, श्री दासोपंत यांच्यापासून तो श्रीवासुदेवानंदस्वामी महाराजां-पर्यन्त ही परंपरा अक्षुण्ण अशीच दिसते.

## मानसिक पराधीनता

वर्तमानकालीन पराधीनता ही सर्वस्वी मानसिक आहे. प्रत्यक्ष परकीयांच्या राजकीय दासतेपेक्षाही ती अधिक दुःसह आहे. अशा महत्त्वाच्या कालखंडात प. पू. श्री गुळवणी महाराजांचे इहलोकी वास्तव्य झाल्याने तथाकथित बुद्धिवादी वर्गात पुनश्च प्राचीन भारतीय आचारनिष्ठा संक्रमित करून, त्यांना कर्मनिष्ठ बनवून, त्यांनी योगमार्गाचा पाठ दिला हे विशेष होय.

दीड तपापेक्षाही अधिक काल त्यांचा माझ्यावर अकृत्रिम कृपालोभ होता हे मी महद्‌भाग्य मानतो. महापुरुषांबद्दल असे सांगितले आहे की, त्यांनी मानव देह धारण केला तरी, बाह्य मानवी व्यवहार करीत असताना, ते अंतरी सदैव जागृत असतात. आपल्या ईश्वरी भावाची अनुभूती ते हृदयातच साठवून ठेवीत असतात. तिच्या ऊर्मी कोठेही व्यक्त होणार नाहीत ह्याची सतत सावधानता बाळगून आपल्या दैनंदिन आचारनिष्ठ जीवनात सामान्यांप्रमाणे वागून ते इतरेजनांना जीवन जगण्याचा एक आदर्श पाठ देत असतात. तरीही अंतरंगा-तील ईश्वरीभाव सदैव जागृत व कार्यप्रवण असल्याने त्याकडे त्यांचे चिरंतन लक्ष असते. आपला ईश्वरीभाव अन्यात संक्रमित करून, इतरेजनांचे उद्धरण करण्याचे त्यांचे कार्य सदैव चालू असते. ह्याची पूर्ण प्रचीती प. पू. श्री महा-राजांच्या ईश्वरी जीवनात पदोपदी भासत असे.

त्यांच्या पावनस्मृतीस अनंत दंडवत प्रणिपात ! ! !

चाळीसगाव<br>श्रीगीताजयन्ती<br>१८९६

**वि. न. क्षीरसागर**

* *

॥ *दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा* ॥

ॐ

# " तोचि साधु ओळखावा "

लेखक : **प्रा. डॉ. रा. ल. जोशी,** एम्. ए., पीएच्. डी. सोलापूर

पूजनीय गुळवणी महाराजांच्या स्मृतीला अभिवादन करण्याचा प्रसंग इतक्या लवकर येईल असे कधीच वाटले नव्हते. किंबहुना महाराज आपल्यातून निघून गेले ही कल्पनाच स्वीकारण्यास मन अद्यापि धजत नाही. 'अशुभस्य कालहरणम्' या न्यायाने हा विचार टाळण्याचाच प्रयत्न मन करते. परंतु अप्रिय कटु सत्याला केव्हा ना केव्हा तरी सामोरे जाणे भागच आहे. म्हणूनच त्यांच्या स्मृतीला अभिवादन करून भावपुष्प अर्पण करण्याचा हा एक विनम्र प्रयत्न.

## आचाराचा दीपस्तंभ

पूजनीय महाराजांचा वियोग इतका असह्य वाटण्याचे कारण आजच्या अत्यंत विचित्र जीवनकलह असलेल्या, केवल अर्थ-काम-प्रधान समाजरचना असलेल्या, आदर्श नीतिमूल्यांचे आचरण दिसून येत नसलेल्या कालात महाराजांसारखी व्यक्ती दीपस्तंभाप्रमाणे आपल्यासारख्यांची जीवननौका अनर्थपरंपरेच्या खडकावर आदळू न देता सन्मार्गाला लावण्याचे महत् कार्य करीत असते. अर्थ, काम हे धर्ममूलक असावेत व ते मोक्षप्राप्तीला उपकारक व्हावेत अशा प्रकारचे जीवन व्यतीत करण्याचा उपदेश महाराज करीत असत. हे करीत असता, महाराजांचे वैशिष्ट्य असे की, उपदेशकाची भूमिका न घेता केवळ साध्या संभाषणातून हा उपदेश घडत असे. उपदेश करणारे थोडे नाहीत. परंतु ज्यांच्या आचरणाने नतमस्तक व्हावे असे वाटते अशाच व्यक्तींचा उपदेश

परिणामकारक होत असतो.

## सान्निध्यानेही लाभ

सोलापूरला महाराजांचा मुक्काम असताना त्यांच्या सान्निध्यात काही काल घालवण्यास मिळे. त्यावेळी होत असलेल्या संभाषणातून वरील विधानाची प्रचीती येत असे. 'यास्तेषां स्वैरकथास्तान्येव भवन्ति शास्त्राणि' या भागवतातील उक्तीप्रमाणे महाराजांचे सहज उद्गाररूप शास्त्रतात्पर्य ऐकताना अतिशय समाधान मिळत असे. व्यवहार व शास्त्र यांची सांगड घालताना महाराजांच्या सारख्या व्यक्तीकडून खरे मार्गदर्शन होत असे. शास्त्रमर्मवित् असूनही व्यवहारवादी असल्यामुळे महाराजांचे मार्गदर्शन कोणत्याही बाबतीत उपयोगीच पडे. 'ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति' (महापुरुष जसे बोलतात तसे घडते.) या भवभूतीच्या उक्तीप्रमाणे त्यांच्या मुखावाटे बाहेर पडलेल्या शब्दांमध्ये सामर्थ्य असे हेही खरेच.

महाराजांच्या केवळ सान्निध्याने मोठा लाभ होत असे. सत्पुरुषांच्या संगतीत अन्तःकरण प्रसन्न होते. कुविचार नाहीसे होतात; काही तरी अनिर्वचनीय सुख मिळते. 'गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यास्तु च्छिन्नसंशयाः' असे आचार्यांच्या बाबतीत केलेले वर्णन पूजनीय गुळवणी महाराजांच्या बाबतीतही अनुभवास येत असे.

## विकारांचा विलय

व्यक्तीचे किंवा एखाद्या स्थानाचे पावित्र्य ठरवण्याचा मार्ग हाच की, त्याच्या सांनिध्यात अन्तःकरण शुद्ध बनू लागते; विकार मावळतात; सद्भावनेच्या सूर्याची मंगल प्रभात होते. काय होते ते सांगता येत नाही. तेथून निघावे असे वाटत नाही. तेथेच जाणावे पावित्र्य तेथेच समजावे चारित्र्य.

महाराजांच्या व्यक्तिमत्त्वातील अकृत्रिम, बालसुलभ, वैशिष्ट्यपूर्ण सुहास्य कधीच विसरणे शक्य नाही. अकारण मुग्ध स्मित जेव्हा त्यांच्या मुखावर विलसत असे त्यावेळी अंतरीच्या चिदाकाशात ओसंडून जाणारा आत्मानंदाचा पूरच हा आहे असे वाटत असे. 'पाण्डित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत्' या

उपनिषदुक्तीप्रमाणे स्वीकारलेला किंबहुना सहज असलेला बालभाव महाराजांच्या ठिकाणी कोणालाही दिसून येण्यासारखा होता. इतक्या असामान्य स्थितीला पोहोचलेले महाराज हे आमच्यासारख्या सामान्यांनीही आदर्श ठेवण्यासारखे आहेत. कारण ते सामान्यातून असामान्य झाले होते. भगवंताचे अधिष्ठान असल्यावर केलेल्या प्रयत्नांच्या पराकाष्ठेने नराचा नारायण होऊ शकतो हे महाराजांनी स्वतःच्या उदाहरणाने आपल्याला दाखवून दिले आहे. आपण त्या दृष्टीने अंशतः जरी यशस्वी झालो–निदान तसा प्रयत्न केला तरी महाराजांचे पुण्यस्मरण सार्थ होईल. ते तसे सार्थ होवो हीच महाराजांच्या चरणी प्रार्थना.

* *

## — भावसुमनाञ्जली —

जशी स्फुरावी निबिड तमातुन बिजली तेजस्विनी
तसे जन्मले वामनरूपे योगिराज गुळवणी ॥
नाव गुरूचे होते त्यांच्या लोकनाथतीर्थ
शक्तिपात ही दीक्षा दिधली गुळवणीस पूर्ण ॥
यमनियमांचे पालन करुनी खडतर तप केले
दीक्षा घेउन अपुल्या गुरुचे चित्त तृप्त केले ॥
कुंडलिनीला जागृत करुनी अपुल्या शिष्यास
मोक्षपदाचा मार्ग दाविला देउन दीक्षेस ॥
स्थितप्रज्ञ हे खरेच झाले योगिराज गुळवणी
कर्मयोग तो स्वये करूनि झाले ख्यात जनी ॥
पदाब्जकोशी सदा रंगले भक्तभ्रमर ज्यांच्या
प्रथम स्मृतीला वंदन करितो सद्भावे त्यांच्या ॥
भावसुमांची सुंदर केली काव्यसुमनमाला
अर्पण करितो चरणावरती भक्तीने त्यांच्या ॥

कवि — श्री. **बा. शि. शिंत्रे,** डोंबिवली.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# ‘ महन् मंगल क्षण ’

लेखक : **श्री. कृ. ह. जोशी**, बी.ए., स्वामीसमर्थ नगर, मुंबई

प. पू. महाराज,

★ आपण हा इहलोक सोडून गेल्याला वर्ष होत आले. आपल्या अनंत आठवणी, अनंत हृदयांत उचंबळून येत असतील. आठवणींची पौर्णिमा नित्यच असेल. ओहोटी त्या आठवणींना कधीच लागणार नाही. व्यक्ती तितक्या प्रकृती ह्या उक्तीप्रमाणे त्यांत भिन्नताही खूपच असेल. धागा मात्र एकच व तो म्हणजे लहानापासून थोरापर्यंत वाटणारी आपणाविषयीची ‘ भक्ती ’ ही ‘ ज्योत ’ अशीच अखंड तेवत राहो एवढीच आपले चरणी प्रार्थना.

★ जीवनाचे सारे मांगल्य, जीवनाचा आधार, जीवनाचे सार्थक किंबहुना सारा परमार्थच आपल्या स्मृतीत आहे; ह्याबद्दल पूर्ण खात्री आहे. ह्या पूजेला खरोखर कुठल्याही लौकिक बाह्य उपचाराची सुद्धा जरूरी नाही. अगदी आपल्या निकट, आपल्या सान्निध्यात राहण्याचा तोच एक अलौकिक मार्ग आहे व हा मार्ग सुद्धा साऱ्या शास्त्रांनी वाखाणलेलाच.

★ श्री समर्थांनी आपल्या अभंगात स्पष्टच नाही का म्हटलं,

“ श्री गुरुचे चरणकंज हृदयी धरावे ।
इतर योग याग विषम पथी का श्रमावे ॥ ”

असे आपले स्मरण हृदयात जोपर्यंत आहे तेच खरं जगणं होय.

★ महाराज परंतु सामान्य माणसाच्या मनाला अशी भीती वाटते. सगुण मूर्तीची गोडी मनाला लागली होती. नेहमी आपल्या सहवासात येऊन राहण्याची,

आपले तोंडून चार शब्द ऐकण्याची सवय झालेली होती, ही सगुणावरील भक्ती आपल्या अव्यक्त रूपावरही राहू दे. कारण आता आपण देहातीत झाल्यामुळे व्यापक झालात. परंतु तेही सामर्थ्य आपणच देणारे आहा. आपल्या आठवणी किती मागे जाऊन कराव्या.

★ गोवईकरांची चाळ. आपण राहात असलेल्या त्या पवित्र व अत्यंत नीट-नेटक्या दोन खोल्या. त्या ठिकाणी आपली झालेली भेट. तीच प्रथम भेट होय.

★ आपण स्वतः एका छोटया बैठकीवर तक्याला टेकून पत्रे लिहीत होता. श्रीदत्तमाहात्म्याची आपण दिलेली पोथी. रोज रात्री एक अध्याय वाचीत जा असे आपण सांगितलेत. ती पवित्र पोथी व त्याबरोबरच आपली स्मृती ही अमरच.

★ श्रीगुरुमहाराजांची पुण्यतिथी. दोन खोल्यांतही अपूर्व होणारा तो समारंभ. आपण स्वतः जाऊन बोलावणी करीत होतात. केवढे पुण्यतिथीबद्दल अगत्य व त्याबरोबरच विनम्र भाव. हे स्मरण म्हणजे उत्सव कसे करावे याची आदर्श शिकवणच आहे.

★ आपलं जीवन म्हणजे एक स्वतः आचरून दाखविलेली 'आचारसंहिता' आहे. आपल्या जीवनात कर्म होते, भक्ती होती, ज्ञान होते. सारेच योग एक-वटले होते आपल्या ठिकाणी.

★ काशीक्षेत्री आपणाबरोबर राहण्याचा योग आम्हाला आला. संतसहवास व तीर्थयात्रा असा योग आपणच आणून दिलात. त्यावेळी अगदी गंगेच्या काठीच आपण सारी राहात होतो. गंगेच्या काठावर आपण केलेली सायंसंध्या, सारीजणं शांत बसलो होतो. काठाकडे गंगेच्या पाण्याचा होणारा थोडा खळखळ आवाज तेवढा ऐकू येत होता. गंगामैय्या आपल्या पायाच्या स्पर्शासाठी आतुर झाली होती. जणू काही ती आपले जीवन आपले चरणी अर्पण करीत होती. ती रम्य, पवित्र, सायंकाळ कधीतरी विसरणं शक्य आहे काय?

★ नरसोबावाडीच्या आठवणी तर अनंत आहेत. आपणाबरोबर राहण्याचा योग तेथेही लाभला. देवाच्या कट्टयावर आपण अगदी भारावून गेलेले दिसत असा. त्या पादुकांच्या दर्शनासाठी पहाटे ५ वाजता आपण "**बारीत**" उभे

राहात असा. पादुकांवरील छाटी काढताक्षणीच आपण "गुरुदेवदत्त" असे म्हणून किती चटकन नमस्कार घालीत असा, कितीही थंडी असूदे आपला हा क्रम चुकला नाही.

★ आयुष्यात एखादी गोष्ट किती निष्ठेने केली पाहिजे याची शिकवणच आपण देत होतात. आपला उपदेश म्हणजे पसाभर शब्द नसून प्रत्यक्ष कृती होती. त्याचे अनुकरण जाणून करणाऱ्याने वाटले तर करावे. आपण कधीच तसं सांगितलं नाही.

★ तुळजापूर भवानीमातेची पूजा आपला भावावेश, सांग कर्म करण्याची आपली पद्धत. सारं कसं स्वच्छ नि पवित्र. कुणीही यावं, कुणीही पाहावं व कुणीही शिकावं.

★ आमच्येकडे आपण प्रथम आलांत तो तर अविस्मरणीय प्रसंग.

चार जिन्यांचा विचार आपण केला नाहीत; चाळीच्या वस्तीची अडचण आपल्याला भासली नाही व जागेचे लहानपण मनात आणलं नाहीत. आपलं अंतःकरण विशाल होतं म्हणूनच तब्येत बरी नसतानाही आपण आलात. येथे राहिलात, स्नानसंध्या केलीत, जेवण गोड मानलंत व साऱ्या घरभर का परिसरात मोदाचे साम्राज्य पसरून टाकलंत.

★ गुरुपौर्णिमेचा आमच्येकडील उत्सव मोठ्या हौसेनें सुरू करून दिलात. आपला जयंती उत्सवही सुरू झाला. हे सारं आपणच करून घेत होतात. सत्कर्म करून घेण्याची आपली शक्ती अमोघ आहे.

★ किती सांगाव्या बरं अशा आठवणी! असेच अचानक बोरीवलीला येतो म्हणालात व त्या नव्या वास्तूतही आपण भोजन करून सत्कार्याची मुहूर्तमेढ रोवलीत. आपला गतवर्षीचा एक जयंतीउत्सवही तेथे झाला. त्याच वेळी श्रीमद् भागवत सप्ताहाचा थोडासा संकल्प झाला. त्यावेळी कल्पना नव्हती की आपली ती शेवटची भेट असेल.

★ श्री वासुदेव–निवासात एक पाणपोईच घातलेली होती. आकंठ पान सारेजण करीत होते. परंतु एक दिवस काही वेगळाच उगवला! हे आमचं भाग्य, हे आमचं ऐश्वर्य, हे आमचं विश्रामधाम एकदम अव्यक्तात विलीन झालं. व्यक्त

रूपाच्या विरहाने साऱ्यांचा जीव कळवळला, निराधारपणा भासू लागला. अश्रुधारा थांबेनात; पण आपणच विवेक जागृत केलात. मनाला कळून आलं की आपण दिसत नसलात तरी आपण आहा. श्रद्धेला प्रचीती आली.

★ प. पू. श्री. दत्तमहाराजांच्या रूपाने आपण प्रत्यक्षही आहातच. आपण आहातच याची परवा आपण असतानाच झालेला भागवत सप्ताहाचा संकल्प आपणच नुकता पुरता करून घेतलात त्यावेळी प्रचीती अगदी पुरेपूर आली. महागाई आड आली नाही. टंचाई भासली नाही; दुधाची चणचण जाणवली नाही. इतका पाऊस पडत होता; पण सप्ताहाला त्याने पूर्ण विश्रांती व वरुणराजानेसुद्धा कृपेचे छत्र धरिले.

मोठ्या मांडवात निसर्गसांनिध्यात ज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग, योगानंद साऱ्यांनी साथ दिली. मनामनातून प्रेम निर्माण करण्याची शक्ती महाराज आपलीच.

★ प. पू. दत्तमहाराजांची अमृतवाणी वर्षत होती. लोक त्या भक्तिभावनेत न्हाऊन निघत होते. सारी म्हणत, असा सप्ताह आम्ही कुठे बघितलाच नाही. "पवित्र ती वाणी देह पुण्यवंत" अशा पूजनीय दत्तमहाराजांची वाणी जरा इकडेतिकडे न वळता, सरळ मार्गानं, शास्त्रशुद्ध पद्धतीनं आपल्या पदरचे शब्द काहीही न घालता व्यासलिखित भगवत्प्रेम भागवत सप्ताहाच्या मिषाने जनता जनार्दनापुढे ठेवीत होती. वाणीचे तपही, मोठे व त्याचा परिणामही मोठा. शेवटचा दिवस पालखी. अपूर्व सोहळा झाला. भक्तीची गंगा दुथडी वाहिली. भागवतग्रंथाची पालखी जनता जनार्दनानी काढली. खांदी वाहिली. अभंगानी निनादली झांजा पखवाजांनी दुमदुमून गेली. असा तो पालखीचा अपूर्व थाट श्रीगजानन मंदिरात थोडा विसावला. पुन्हा परत भक्तीच्या वाटा, मज दावाव्या सुभटा असे म्हणणाऱ्या श्री हनुमानमंदिरात जाऊन स्वस्थळी परतली, व नंतर आरत्यांनी सारा मंडप निनादून गेला. महाराज आणखी कोणती हवी आपल्या अस्तित्वाची खूण. आपण अव्यक्त व व्यापकरूपाने केलेला हा वर्षाव सर्वांना केवढं समाधान देऊन गेला. हेच जीवनातील मांगल्य होय.

★ आम्हीसुद्धा आश्रमाला विसरता नये. देवघरात आपण आहात असं आजही

वाटतं. सर्वांनी जसं जमेल तसं वासुदेव निवासात आलं पाहिजे व आपल्या चरणी नतमस्तक झालं पाहिजे. कारण आपली सुद्धा तशीच निष्ठा होती.

★ विश्वस्तांनीसुद्धा तीच दृष्टी ठेवून उत्सव व आश्रमातील दिनक्रम केला पाहिजे. आपले औदार्य त्यांनीही लक्षात ठेवलं पाहिजे व महाराज काही कमी पडू देणार नाहींत अशी भावना व खात्री ठेवूनच सारे व्यवहार झाले पाहिजेत. तरच आश्रम पुन्हा पूर्वीच्या वैभवात डोलू लागेल. ह्याबद्दल शंकाच वाटत नाही. आपल्या पादपद्मी पुन:पुन्हा वंदन करून ही स्मरणांजली तूर्त येथेच संपवितो.

* *

## " श्रद्धांजली "

श्रद्धा हेच ज्याचे स्वरूप,
विश्वास हीच ज्याची पदवी,
समर्पण हाच जिथे भाव,
करुणा हेच जिथले दान.
त्याला श्रद्धांजलि वाहायची ? ?
समत्वभाव जिथं ध्यान होतो,
ज्ञान हेच स्वये भान होतं.
अखंड जागृति ही एकच–
ज्याची स्थिति असते.
त्या गुरुपदाला श्रद्धांजलि ?
–म्हणजे ... ज्योतीनं तेजाला
काजव्यानं सूर्यालाच
ओवाळण्यासारखं हे !!
पऽऽण ... रात्र सरते ती–
याच विनीत भावाच्या काकडारती
बरोबर.
नि-मग–अमंगलाचं सावट सरतं.
भीरुतेचं काजळ हटतं.
पुण्याच्या पवित्र किरणांनी
तेजोगर्भाची द्वारं खुलतात.
आणि....चैतन्यमय होऊन जातं !!
सारंच, सारंच ।
त्या लाख लाख चैतन्यामध्ये
स्वत:ला सर्वस्वी झोकून देणं
यापरती भाषाच नाही उरत.
आणि ती संपूर्ण शरणागतीच
बनून जाते
त्याला अभिवादन नि श्रद्धांजलि !!

— **दत्तात्रेय त्रिविक्रम बोंद्रे**, पुणे

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# ‘ प. पू. गुरुमहाराजांचे ऋण ’

लेखक : **श्री. भाऊसाहेब क्षीरसागर**, एम्. ए., औरंगाबाद

## स्मृतींचा गहिवर

प. पू. गुळवणी महाराज यांचा प्रथम पुण्यतिथी–दिन दिनांक ३ फेब्रुवारी १९७५ रोजी आहे. प. पू. महाराज हा पार्थिव देह टाकून स्वस्वरूपी विलीन झाल्याला एक वर्ष होत आहे हे ध्यानी येऊन आश्चर्य वाटले. महाराजांचे देहावसान झाल्यानंतर ज्या ज्या वेळी आम्ही आश्रमात गेलो त्या त्या वेळी जे प्रत्यक्ष प्रसंग आम्ही अनुभविले त्यावरून महाराज आश्रमात अदृश्य स्वरूपात आहेत व आश्रमातील एकूण एक कार्यक्रम त्यांच्या आदेशानुसारच पार पडत आहेत असा प्रत्यय येत गेला आहे व म्हणून प. पू. महाराजांना अनंतात विलीन होऊन एक वर्ष होत आहे हे वाचून सर्व जुन्या आठवणी दृष्टीसमोर उभ्या राहिल्या. महाराजांचे पहिले दर्शन आम्हाला कधी झाले, त्यांच्याशी आमची जवळीक कशी वाढत गेली, त्यांच्या दृष्टीच्या टप्प्यात आमचा समावेश आम्हास न कळत कसा होत गेला या सर्व जुन्या घटना व आठवणी उजळून निघाल्या व मन गहिवरून आले.

## जुन्या काळाचा चित्रपट

महाराजांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त एक “स्मरणांजली अंक” प्रकाशित होणार आहे व त्यात देण्याकरता मी एक छोटासा लेख पाठवावा अशी वंद्य बापूसाहेब कुबडे यांची आज्ञा झाली व अशा रीतीने प. पू. महाराजांना

श्रद्धांजली अर्पण करून त्यांची सेवा करण्याचा योग आल्यामुळे फार आनंद व समाधान होत आहे.

महाराजांची सेवा लेखरूपाने करावयाची म्हणजे त्यांनी आम्हा बालकांवर जे अमाप व अवर्णनीय असे ऋण करून ठेवले आहे त्याचा आदरयुक्त निर्देश करणे औचित्यपूर्ण होईल अशी भावना असल्यामुळे ही सेवा त्यांच्या चरणी सादर करीत आहे.

प. पू. महाराजांचे आपणावरील ऋण म्हटले की सर्व जुना काळ दृष्टीसमोर उभा राहतो. आज त्या घटनेला ४०-४५ वर्षे लोटली आहेत. कै. शंकरराव अजेगावकर यांच्या कन्येशी माझा विवाह झाला व महाराजांच्या सन्निध येण्याचे एक नवे व भाग्यशाली दालन माझ्याकरता उघडले गेले. कै.शंकरराव अजेगावकर हे प. पू. महाराजांचे गुरुबन्धू; माझा विवाह झाल्यानंतर दुसऱ्याच वर्षी व शंकरकाकांचा जावई म्हणून माझा महाराजांशी परिचय करून देण्यात आला. महाराजाच्या पहिल्या भेटीतच मी त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झालो व जसजसा मला त्यांच्या जवळ जाण्याचा योग येत गेला, तसतसे त्यांच्यातील व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूंचे मला दर्शन झाले.

त्यांची प्रसन्न व हास्यमुख मुद्रा, कोणाचेही मन न दुखवता लोकांना आपले म्हणणे पटवून देण्याची त्यांची हातोटी, सर्वांना समभावाने पाहण्याची त्यांची वृत्ती व वागणुकीतील त्यांचा साधेपणा यातून त्यांचा मोठेपणा प्रकर्षाने जाणवत होता. हैद्राबादच्या माझ्या वास्तव्यामधे महाराजांचे आमच्याकडे येणे-जाणे सतत होत असे. मार्गशीर्ष शु॥ १४ स दत्तजयंती व आषाढ शु॥ प्रतिपदेस प. प. टेम्बे स्वामी महाराजांची जयंती हे दोन उत्सव महाराज आमचेकडे व अजेगावकरांकडे करीत असत. ही प्रथा जवळजवळ १४।१५ वर्षे सतत चालू होती. १९५४ मधे श्री टेम्बे स्वामी महाराजांचा जन्मशताब्दी महोत्सव हैद्राबाद शहरात आमच्या ‘ सदाचार ’ या बंगल्यात साजरा झाला. प. प. टेम्बे स्वामी महाराजांचे समग्र वाङ्मय बारा खण्डांत त्यावेळी प्रकाशित करण्यात आले. या महोत्सवाच्या निमित्ताने प. पू. महाराजांची जी सेवा करण्याचे भाग्य आम्हाला लाभले त्यामुळे आम्ही धन्य झालो.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

१९५६ मध्ये भाषावार प्रांतरचना झाली व माझी बदली मुंबई प्रांतात होऊन मला हैद्राबाद सोडावे लागले व महाराजांच्या सान्निध्याचा जो लाभ दरवर्षी वर्षातून दोन वेळेस मिळत होता त्यात खंड पडला. पण महाराजांच्या तीव्र इच्छाशक्तीच्या प्रभावानेच दोन अडीच वर्षांच्या अवधीतच माझी बदली अनपेक्षितपणे पुण्यास झाली व महाराजांची सेवा करण्याची संधी पुनः आम्हाला मिळू लागली.

## दीक्षेत विलंब

ह्या सर्व घटना घडताना व माझ्या हैद्राबाद येथील वास्तव्यात महाराजांकडून कित्येक साधकांना दीक्षा झाल्या. प्रत्यक्ष आमच्या घरात माझे वडील कै. बापूसाहेब, माझी पत्नी सौ. माई व माझा मुलगा चि. दाजीसाहेब यांनाही दीक्षा झाल्या. पण महाराजांचा तो वरदहस्त माझ्या मस्तकावर ठेवून घेण्याचा योग माझ्या बाबतीत मात्र लांबणीवरच पडला गेला. माझ्या पत्नीने महाराजांना त्याबद्दल बऱ्याच वेळा विचारले. पण महाराजांनी हसून " पाहू पुढे " असे उत्तर दिले. त्यामुळे मन बेचैन होत होते. स्वतःवरील आत्मविश्वास ढळत चालला होता. आपल्या भोवतालच्या सर्व साधकांवर महाराजांची कृपा झाली व होत आहे, पण आपणच त्यापासूनच वंचित राहात आहोत याची तीव्र जाणीव मनास होऊ लागली होती. महाराजांच्या कृपेस पात्र होण्यास आपण योग्य झालेलो नाहीत व म्हणूनच त्यांची कृपा आपणावर होत नाही, असाही एक विचार मनात येत होता. अशा मनाच्या अस्थिर अवस्थेत असतानाच माझी बदली पुण्यास झाली व महाराजांचे सान्निध्य व त्यांचे मार्गदर्शन याचा मला लाभ मिळण्याची संधी पुनः प्राप्त झाली. तरीपण अद्याप आपणास दीक्षा दिली गेली नाही याची खंत मनास होतीच.

## सोन्याचा दिवस उगवला

पुण्यात बदली होऊन दोन वर्षे झाली. या दोन वर्षांच्या अवधीतही बऱ्याच लोकांना दीक्षा झाल्या. मीही भीतभीतच एक दोन वेळा मला दीक्षा देण्याबद्दल महाराजांजवळ बोललो. पण " आता तुम्ही पुण्यातच आहात; केव्हाही दीक्षा

देता येईल " असे संदिग्ध उत्तर मिळाले. आणि अखेर तो सोन्याचा दिवस उगवला. एके दिवशी सायंकाळी बरेचजण महाराजांजवळ बोलत बसलो होतो. महाराजांनी पंचांग बोलावले व पुढील शनिवारी स्नान करून सकाळी ५॥ ला या असे मला सांगितले. शनिवारचा तो दिवस म्हणजे माझ्या आयुष्यातील फार मोठा भाग्याचा क्षण होता. शनिवारी सकाळी ६ वाजता महाराजांच्या हस्तस्पर्शाने माझे शरीर पुलकित झाले. यक्षिणीची कांडी फिरली गेली. दोन अडीच तास मला माझे भान नव्हते. महाराजांचा हस्तस्पर्श पुनः झाला. मी भानावर आलो. जास्तीत जास्त १०-१५ मिनिटेच मी त्या नेत्रोन्मीलित अवस्थेत असेन अशी माझी कल्पना होती. महाराजांनी घड्याळ पाहावयास सांगितले. अडीच तास होऊन गेले होते. मी आश्चर्यचकित झालो. या दोन अडीच तासांच्या अवधीत मी स्वर्गीय आनंदात पोहत होतो. सर्व शरीरात एक प्रकारचा वीजप्रवाह सुरू झाला आहे असा भास होत होता. वास्तविक त्या वेळी मला काय झाले, काय वाटले वगैरेचे वर्णन शब्दातीत आहे. एवढे मात्र निश्चित की, मी आतून आणि बाहेरून बदलून गेलो आहे अशी मला प्रचीती येऊ लागली. आतापर्यंत महाराजांशी वडीलकीचेच नाते होते. माझ्या श्वशुराचे गुरुबन्धू या नात्याने आतापर्यंत पितृवत् भावाने मी त्यांच्याकडे पाहात होतो. त्यांच्याकडूनही मला त्याच प्रकारचे वडिलकीचे मार्गदर्शन मिळत गेले होते. परंतु त्या दिवसापासून आमच्यामध्ये गुरुशिष्याचे नाते निर्माण झाले. आश्रमाबद्दलची एक आत्यंतिक ओढ मनात निर्माण झाली. नौकरीच्या वेळाव्यतिरिक्त बाकीचा वेळ आश्रमात महाराजांच्या सान्निध्यातच काढावा असे वाटू लागले.

### आमूलाग्र बदल

एक गोष्ट मात्र प्रांजळपणाने येथे नमूद करावीशी वाटते की, दीक्षा मिळण्यापूर्वी बसण्या-उठण्या व वागण्याची जी माझी पद्धत होती, तीत दीक्षा मिळाल्यानंतर आमूलाग्र बदल झाला. महाराज हे आपले आध्यात्मिक गुरु आहेत, त्यांच्याशी अतिशय आदरानेच वागले पाहिजे अशी भावना मनात येऊ लागली. महाराजांशी जास्त संवाद न करता फक्त त्यांच्यासमोर बसून त्यांच्याकडेच पाहात राहावे, त्यांची मोहक मूर्ती हृदयात स्थिर करण्याचा प्रयत्न करावा

व त्यांच्या मुखातून निघालेले अमृतमय बोल ऐकत राहावे असे वाटू लागले. कित्येक वेळेस तर मी तासन् तास त्यांच्या खोलीत समोरच्या कोपऱ्यात बसून येणाऱ्या साधकांबरोबर महाराजांची जी प्रश्नोत्तरे होत होती ती एकाग्र चित्ताने ऐकत असे. "सहज बोलणे हाचि उपदेश" या उक्तीप्रमाणे महाराजांच्या साधकांबरोबरच्या संवादातून कितीतरी उपदेशाचे धडे मी घेऊ शकलो.

महाराजांकड येणाऱ्या लोकांत सर्व प्रकारच्या व्यक्ती असत. काही नास्तिक चिकित्सक बुद्धीने त्यांच्याकडे येत असत. पण महाराजांशी थोडीशीच प्रश्नोत्तरे केल्यानंतर त्यांच्यातील नास्तिकतेचा लोप होऊन ते त्यांच्या चरणी लीन होऊन परत जात असल्याची कित्येक उदाहरणे मी पाहिली आहेत. कित्येक शिष्य आपल्या सांसारिक अडीअडचणी महाराजांसमोर निवेदन करण्याकरता त्यांच्यासमोर येत असत. कोणास संतती हवी, कोणास पैसा हवा, कोणास आरोग्य हवे अशा नानाविध अडचणींचे निवेदन महाराजांपुढे होत असे. महाराज हास्यमुखाने सर्वांचे म्हणणे श्रवण करून घेऊन त्यांच्या संकटावर मात करण्याकरता काही ना काही उपाय सुचवीत असत व पुढील भेटीच्या वेळी तीच साधक मंडळी "महाराज आपण सांगितलेल्या उपायामुळे माझे काम झाले" असे सांगून महाराजांच्या चरणी लीन झाल्याचीही कित्येक उदाहरणे मी पाहिली आहेत.

१९५७ मधील अमृतमहोत्सव, १९६७ मधील सहस्रचंद्रदर्शन शांतिमहोत्सव व त्यानंतर १९७२ साली झालेला रौद्रीशांती महोत्सव या सर्व उत्सवांत सहभागी होऊन महाराजांची सेवा करण्याचे भाग्य मला लाभले आहे.

**श्री महाराजांची समान दृष्टी**

महाराजांची सर्व साधकांवर समानदृष्टी होती, पण त्यांच्या वागण्यामधे अशी काही गोडी होती की, प्रत्येक शिष्याला असे वाटावयाचे की, महाराजांची सर्वांपेक्षा जास्त त्याच्यावरच कृपा आहे. महाराजांकडे आश्रमात राहून आलेले कित्येक साधक असे मोठ्या अभिमानाने सांगत सुटत की, आश्रमांतील त्यांच्या वास्तव्यात महाराजांचे त्यांच्याकडे खास लक्ष होते व महाराज त्यांना इतरांपेक्षा जास्त जवळचे समजत असत. सत्पुरुषाच्या वागण्यात असे काही विशेष गुण असतात की, ज्यामुळे सर्व साधकांची त्यांच्यावरील श्रद्धा दृढच होत जाते.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

महाराजांची दीक्षा झाल्यानंतर माझा सर्व दृष्टीने उत्कर्षच होत गेला आहे. आध्यात्मिक प्रगती काही झाली का, व झाली असल्यास ती किती प्रमाणात झाली हे मी सांगू शकणार नाही. कारण त्याची मला कल्पना किंवा जाणीव नाही. पण इतके मात्र निश्चित की महाराजांसमोर अभ्यासाला बसलो की एका विशिष्ट प्रकारच्या वातावरणात मी गेलो आहे असे वाटत असे. महाराजांना जेव्हा मी हे सांगितले तेव्हा ते नुसते हसले. पण काहीच बोलले नाहीत.

व्यावहारिक क्षेत्रात मात्र माझी सारखी प्रगतीच होत गेली आहे. शासकीय नौकरीत उच्च व मानाचे स्थान, राहावयास पुण्यासारख्या शहरात पाच खोल्यांचा हवेशीर व प्रशस्त फ्लॅट, समाजामध्ये प्रतिष्ठा व मान अशा समाधानकारक घटनेने माझे जीवन समृद्ध झाले आहे. सेवानिवृत्त झाल्यानंतरसुद्धा सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मी स्वतःला गुंतवून घेतल्यामुळे मन सदैव समाधानी व सुखीच राहात आले आहे.

महाराजांची प्रत्यक्ष उपस्थिती असताना त्यांचा आशीर्वाद व कृपा याची आम्हा दोघांवर वृष्टीच होत गेली होती. महाराज स्वस्वरूपात विलीन झाल्यानंतरही ते आमच्या पाठीशी आहेत याची प्रत्यक्ष प्रचीती अनेक वेळा अनुभवाने आली आहे.

### श्रीमहाराजांचा आदेश

महाराजांनी आपल्या कृपेने व आशीर्वादाने जे अतुलनीय असे ऋण आम्हा उभयतांवर करून ठेवले आहे त्याची फेड आम्ही कशी करणार? ते शक्यही नाही. ज्या ज्या वेळी असा कूट प्रश्न माझ्यापुढे उभा राहतो त्या त्या वेळी मी महाराजांच्या फोटोपुढे ध्यानस्थ बसून त्या प्रश्नाचे उत्तर मिळावे म्हणून प्रार्थना करतो. यावेळीही या प्रश्नाचे उत्तर मला मिळाले आहे. महाराजांचा आदेश आहे की,

१. मी आखून दिलेल्या नियमावलीनुसार सन्मार्गाने व सदाचरणाने वागा.

२. शक्तिपाताची जी दीक्षा तुला दिली गेली आहे त्यात प्रगती होत आहे की नाही याचा विचार न करता सतत व श्रद्धेने अभ्यास चालू ठेव, म्हणजे प्रगतीचा मार्ग आपोआप मोकळा होईल.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

३. प. प. टेम्बेस्वामी महाराजांच्या प्रेरणेने निर्माण केला गेलेला "वासुदेव निवास" माझ्या अनुपस्थितीतही यथापूर्व धार्मिक कार्यक्रमाने गजबजलेला राहावा, तेथे येणाऱ्या भाविक व श्रद्धावान साधकांना कोणतीही गैरसोय न होऊ देता योग्य ते मार्गदर्शन मिळावे व आश्रमाची प्रतिष्ठा नुसती कायम राहावी इतकेच नव्हे तर ती वाढीस लागावी म्हणून तू सदैव व सतत प्रयत्नशील राहा.

४. कोणाचाही द्वेष करू नकोस, कोणाच्याही मनास किंवा आत्म्यास क्लेश होईल अशी वागणूक करू नकोस व सर्वांचे कल्याण व्हावे म्हणून परमेश्वराची प्रार्थना कर.

प. पू. महाराजांकडून मिळालेल्या या आदेशवजा सूचना माझ्या शक्तीनुसार काटेकोरपणे पाळण्याचा प्रयत्न करून महाराजांच्या ऋणातून अंशतः मुक्त होण्याची माझी इच्छा आहे. सध्याचे वासुदेव-निवास प्रमुख प. पू. गुरुवर्य दत्तमहाराज यांचा आशीर्वाद व कृपा माझ्या पाठीशी राहावी व दत्तमहाराजांनीच माझी वरील इच्छा पूर्ण करून घ्यावी अशी त्यांच्या चरणी प्रार्थना करून ही सेवा पूर्ण करतो.

* *

## रुसवा

रुसवा का धरिला गुरुराया ॥ धृ. ॥
अपराधाची जाण ना मला ।
हृदय खोलुनी दावु कुणाला ॥
तळमळते मन चैन ना मला ।
सहन न होई श्रीगुरुराया ॥ १ ॥
मन विकारी तनहि विकारी ।
पोटासाठी मीहि भिकारी ॥
नाम तुझे रे नाहि अंतरी ।
विसरुनि गेलो तुज गुरुराया ॥ २ ॥
वासनामय जीवन सारे ।
अहंपणाचे भरले वारे ॥
श्वासोच्छ्वासे आयुष्य सरे ।
तिमिर हरण करी श्रीगुरुराया ॥ ३ ॥
उपासनेला वंचित झालो ।
चित्तशुद्धिला आम्ही मुकलो ॥
आज्ञा केवळ तुझी विसरलो ।
म्हणुनी रुसला का गुरुराया ॥ ४ ॥
वामन वामन नामहि पावन ।
वामनदासाचे ते जीवन ॥
अपराध्यासी अभय देउन ।
रुसवा सोडुनि दे गुरुराया ॥ ५ ॥

कवि—**पां. रा. लेले,** दादर

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# " संतवाङ्मय–सेवेचा भाग्ययोग "

लेखक : **कल्याण श्रीपाद तथा अण्णासाहेब कुलकर्णी**, इचलकरंजी

प. प. गुळवणी महाराजांचा लोभ माझ्यावर अनेक वर्षे होता, हे मी माझे भाग्य समजतो. म्हणूनच त्यांनी ' श्री वासुदेवानंद सरस्वती ग्रंथमालेच्या तृतीय पुष्पास प्रस्तावना लिहिण्याचे कार्य माझी योग्यता नसताही माझ्यावर सोपविले होते. ही घटनासुद्धा माझ्या आयुष्यातील ' संतवाङ्मयसेवेचा भाग्ययोग ' समजतो. या कार्यात राष्ट्रपण्डित दत्तात्रयशास्त्री कवीश्वर महाराज यांचीही आज्ञा मी शिरसावंद्य मानली. ६ व ७ व्या भागात स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेत पू. गुळवणी महाराजांनी प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज यांच्या हस्ताक्षरातील सर्व ग्रंथसंग्रह गुळवणी महाराजांच्या प्रकाशन मंडळाचे स्वाधीन केल्याबद्दल माझ्याबद्दल स्वतंत्र व अमरापूर येथील सर्व विश्वस्तांबद्दल धन्योद्गार काढले आहेत. मागील वर्षी मी पुण्यास आल्यावेळी स्वतः गुळवणी महाराजांनी आपली स्वाक्षरी करून दि. ३–१–७४ गुरुवार रोजी पंथराजचा अंक मोठ्या प्रेमाने आपल्या सन्निध बसवून मला दिला. याच वेळी श्री टेंबेस्वामी महाराज यांचे छायाचित्रही दिले. तसेच माझी कन्या, नात व मला चहाही देऊन प्रेमळ निरोप दिला. आणि पुण्यास असणाऱ्या स्वरूपानंद सेवा मंडळात योगिराजांना मी जे श्रीदत्तस्तोत्र म्हणून दाखविले होते, त्या स्तोत्राची टेप योगिराजांचे भाचे व आमचे व्याही श्री. श्रीपादराव जोशी यांनी घेतली होती. तीच टेप योगिराजांच्या अस्थी प्रयागला निघण्यापूर्वी श्री वासुदेव निवासात माझ्या नातीने लावल्याबद्दलचा उल्लेख राष्ट्रपण्डित दत्तात्रय-

शास्त्री कवीश्वर यांनी मला पत्राने कळविला होता. आणि याच स्तोत्रावर दिनांक १५ रोजी स्वरूपानंद सेवा मंडळात श्री. बाळासाहेब वाकडे यांचे घरी झालेल्या श्रद्धांजली सभेत श्रद्धांजली वाहण्याचा योग यावा याबद्दल विषादही वाटला. परंतु 'सकल करणे जगदीशाचे। कवित्वचि काय मनुष्याचे। ऐशा अप्रमाण बोलण्याचे काय घ्यावे ?

ही श्री समर्थ रामदासांची दासबोधातील उक्ती प्रत्ययाला आली. भगवान गोपालकृष्णही भगवत्गीतेत अर्जुनासारख्या धनुर्धरास 'निमित्त मात्रं भव सव्य साचिन्' असा सावधगिरीचा इषारा देतात. अशा ठिकाणी निमित्तमात्र अशा माझ्याकडून योगिराजांच्या मजवरील प्रेमाबद्दल दोन शब्द लिहिले आहेत.

* *

## चिरंजीवी

अरे मना का ना मानिसी।
श्रीगुरु गेले निजधामासी ।। धृ. ।।

सगुण रूप ना पाहिल कोणी।
मधुर हास्यहि गेले लोपुनी ।।
पडे न कानी अमृतवाणी।
तरी मना का ना मानिसी ।। १ ।।

हात फिरवील पाठीवरती।
कोण तुम्हाविण श्रीगुरुमूर्ती।
स्मरण होता लोचन भरती।
बा मना का ना मानिसी ।। २ ।।

कोणासाठी जाऊ धावुनी।
पदस्पर्श मज मिळ कोठुनी ।।
गेले सारे सारे हरपुनी।
मग मना का ना मानिसी ।। ३ ।।

देहरूपि जरी नाहि राहिले।
चराचरातुनी सद्गुरु भरले ।।
चिरंजीवि ते नाही गेले।
तरिच का तू ना मानिसी ।। ४ ।।

वामनदासा सारे पटले।
विकल्प मनिचे विरुनी गेले ।।
साधनरूपे जवळि राहिले।
म्हणुनी बा तू ना मानिसी ।। ५ ।।

कवि—**पां. रा. लेले,** दादर

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# " घेणार किति घेशिल दो कराने "

लेखक : **श्री. नाना पटवर्धन, ठाणे.**

जीवनाच्या घसरगुंडीवरून कोसळत असता पू. महाराजांच्या पुण्य चरणांचा आधार मिळाला. २० एप्रिल १९६८. अनेक भिषग्वर्यांनी माझ्या व्यथेपुढे हात जोडले असता महाराजांच्या एकाच दयाळू कृपाकटाक्षाने सर्व व्याधी नाश पावल्या. त्यानंतर गेली सात वर्षे जे अमृतानुभव आयुष्यात उपभोगीत आहे. त्यांचा उल्लेख आज महाराजांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनी करून, 'श्रीगुरुचरणी संपूर्ण शरणागति' पत्करल्यानंतर श्रीगुरुकृपेचा अखंड ओघ शिष्यांवर कसा राहातो, ध्यानीमनी स्वप्नी श्रीगुरूंचे आपल्यावर पूर्ण लक्ष आहे याची पदोपदी कशी प्रचीती येत असते याचा सद्गुरुप्रेमी बांधवांकरता आढावा घेत आहे. यामागील स्फूर्तिदेवताही माझे परमप्राण श्रीसद्गुरूच आहेत. माझे काहीही नाही.

## वरदहाताने सर्व स्वस्थळी

वरील दिनी त्यांचा परमपवित्र वरदहस्त डोक्यावर ठेवला गेल्यानंतर प्रकृती, मनःस्वास्थ्य, संसार एकूण सर्व हळूहळू जाग्यावर येऊ लागली. त्यांच्याच अंतः-प्रेरणेने श्रीदीपलक्ष्मीच्या जानेवारी १९६९ च्या श्रींच्या विशेषांकात माझ्या व्यथेच्या कर्मकहाणीचा लेख लिहिला. त्या लेखाचा खूपच बोलवा झाला. आणि शेकडो अभागी व्यथित लोक त्यांच्याकडे कृपेकरता वळले. मार्च १९६९ मधे डोंबिवलीला श्री. स. कृ. जोशी यांजकडे ८-१० दिवस ते मुक्कामाला यावयाचे होते. आम्ही यथामती यथाशक्ती व्यवस्था करून होतो. श्री आले. मी पायांवर डोके ठेवले. आणि उभा राहिलो. मला म्हणाले, " काय नाना, तुम्ही हे काय

लिहून ठेवले आहे ? जो जो यतो तो म्हणतो मला पटवर्धनांसारखे होत आहे. ” मी त्यांना विनम्रपणे म्हटले, “ मी कोठे लिहिले आहे ? तुम्हीच तर लिहून घेतले आहे. ‘ माझ्या ’सारख्या आणखी कितीतरी अभाग्यांचा उद्धार आपल्या हाताने व्हावयाचा आहे, म्हणूनच तुम्ही मला ते लिहिण्याची स्फूर्ती दिली असावी. ” ते जरासे संकोचले; कारण त्या लिखाणाचे उत्तरदायित्व मी त्यांच्यावरच टाकीन, याची बहुधा त्यांना कल्पना नसावी. पण मी म्हटले ते खरे होते आणि नंतर जसजसा माझा ऋणानुबंध वाढत गेला तसतशी माझ्या भावनेबद्दल माझी खात्रीही झाली, की एखादी गोष्ट हातून घडली गेली तरी त्याची सत्यपूर्वक कबुली देण्याने त्यांना आनंदच होत असे. आणि खरे आहे. रोगाचे निदान होण्याकरता डॉक्टरांजवळ ज्याप्रमाणे सत्य बोलणे आणि मिथ्या लज्जा सोडणे अत्यावश्यक असते त्याचप्रमाणे आपल्या सद्‌गुरूंजवळही संकोच न करता सत्यच बोलणे हिताचे असते. आणि सद्‌गुरू म्हणजे जर आपला पंचप्राणच तर त्याच्याजवळ एखादी गोष्ट लपवून कसे चालेल ?

मी ऑगस्ट १९६८ मध्ये पुण्याला दर्शनाला गेलो होतो. मी तंबाखू खातो ही गोष्ट त्यांच्या कानावर गेली होती. पण आदल्या दिवशी आश्रमात गेल्यापासून दुसऱ्या दिवशी सकाळी थोडा बाहेर जाईपर्यंत मी तंबाखू खाल्ली नव्हती. परत आलो तो आश्रमात ‘ व्यसनां ’ बद्दल गप्पा चालल्या होत्या. माझ्या तंबाखूचा उल्लेख निघाल्यावर मला त्यांनी विचारले, “ मग काल संध्याकाळपासून तुम्ही काय केलेत ?” मी खरे सांगितले. “आता बाहेर गेलो होतो, तेव्हा खाऊन आलो. ” मग हसून त्यांनी एका दारुड्याची गोष्ट सांगितली. एका माणसाला दारूचे खूप व्यसन जडले आणि काही केल्या कमी होईना. त्याच्या बायको-मुलांना काहीजणांनी एक उपाय सांगितला. दर वेळी त्याला पेल्यात दारू देताना एक खडा टाकावा. दर वेळी एकेक खडा वाढवीत जावा. शेवटी वेळ अशी आली की, पेल्यात फक्त खडेच होते, दारूचा थेंबही नव्हता.

## कामनापूर्ति

डोंबिवलीला श्रींना मुक्कामाला आणण्याचा कार्यक्रम नक्की करण्याकरता

जोशीबुवा पुण्याला गेले. तत्पूर्वी मी त्यांना सांगितले होते की काही झाले तरी महाराज एक दिवस तरी माझ्याकडे राहावेत. जोशीबुवा 'हो' म्हणाले होते. परंतु पुण्याहून परत आल्यावर ते मला म्हणाले, "नाना, मी हो म्हणालो होतो, परंतु महाराज ज्या गावी ज्याच्याकडे मुक्काम करतात त्याव्यतिरिक्त कोठे पाणीही घेत नाहीत." मी म्हणालो, "ठीक आहे. त्यांचा तसा नियम आहे, तर माझे काहीच म्हणणे नाही." पण मनातून मात्र खूप इच्छा होती की, महाराजांनी एक वेळ तरी आपल्याकडे भोजन करावे. ३–४ दिवस डोंबिवलीत वास्तव्य झाल्यावर आम्ही कुलाबा ते अंबरनाथ रोज काही गुरुबंधूंकडे जाऊ लागलो. सकाळी त्यांचे आन्हिक आटोपल्यावर आम्ही डोंबिवली सोडायचे ते रात्री ८–८॥ ला परत यावयाचे. एक दिवस एकादशी होती. महाराज नाहीत, पण निदान ति. बापूसाहेब, वे. शा. सं. गुरुजी, रा. केशवराव यांनी तरी माझ्याकडे संध्याकाळी फराळ करावा, म्हणून मी त्यांना विचारायचे ठरविले. आम्ही घाटकोपरला एका घरी गेलो होतो. महाराज दुसऱ्या एका खोलीत असताना मी बापूसाहेबांजवळ हळूच विषय काढला. आमची चाललेली कुजबूज श्रींच्या कानावर गेली असावी. त्यांनी बापूसाहेबांना हाक मारली व काय बोलणे चालले आहे ते विचारले. बापूसाहेब म्हणाले, "आम्ही संध्याकाळी त्यांच्याकडे फराळाला यावे असे नानासाहेब म्हणत आहेत. आपणही येणार का?" महाराज लगेच "हो" म्हणाले. बापूसाहेब पटकन आम्ही होतो त्या खोलीत आले व मला म्हणाले, "नाना, महाराजही फराळाला येत आहेत, व्यवस्था करा." ट्रेनने परत येत असताना माझी बहीण स्टेशनवर भेटली. तिला ही गोष्ट सांगितली. तिचा विश्वासच बसेना. बापूसाहेब तिला म्हणाले, "अग खरेच आम्ही सर्वजण येत आहो. तू पुढे घरी जाऊन सांग. येणार खरे, पण जोशीबुवांच्या घरून आमच्याकडे येऊन ते परत जाणार कसे? मी डॉ. जोश्यांच्या दवाखान्यात गेलो. त्यांना सांगितले, 'महाराज माझ्याकडे रात्री फराळाला येणार आहेत. तुमची गाडी हवी आहे.' ते म्हणाले, 'या किल्ल्या घ्या आणि अमूक ठिकाणी ड्रायव्हर आहे त्याला घेऊन जा. त्याच्याकडे गेलो तो घरी नव्हता. दवाखान्यात परत आलो. डॉक्टरना सांगितले. ते म्हणाले, 'थांबा, दोन तीन

पेशंटचीच औषधे द्यायची आहेत. ती लिहून देतो आणि मीच गाडी घेऊन येतो. त्याप्रमाणे आम्ही दोघे निघालो. डॉक्टर मला विचारतात, 'महाराज माझ्या बंगल्यावर येतील का हो ?' मी म्हणालो, 'तुमची एवढी इच्छा आहे ना ? महाराज नक्की पुरवतील.' महाराज गाडीत बसल्यावर मी त्यांना विचारले. डॉक्टर स्वतः गाडी घेऊन आलेत, आणि तुमचे पाय त्यांच्या घराला लागावे अशी त्यांची इच्छा आहे. 'जाऊ या की' महाराज म्हणाले, डॉक्टरांनाही खूप आनंद झाला. त्यांच्या सौ. ही पंचारतीची तयारी करून उभ्याच होत्या.

काही गुरुबंधूंचा चुकीचा समज होता, की महाराज गरीबांच्या घरी कसे येतील ? एके दिवशी महाराजांनी डोंबिवलीत एका शिष्याला एक सुखद धक्का दिला. आम्ही एका घरातून बाहेर पडत होतो. मी अगोदर मोटारीजवळ पुढे जात होतो. ते सद्‌गृहस्थ डोळ्यांत अक्षरशः पाणी आणून माझ्याजवळ आले. मला म्हणाले, 'नाना मी येथेच राहातो. महाराजांनी पाय ठेवावा या योग्यतेची सुद्धा माझी जागा नाही. पण त्यांनी यावे, अशी खूप इच्छा आहे.' मी म्हणालो, 'तुम्ही आधी डोळे पुसा; मी महाराजांना सांगतो, ते नक्की येतील, अशी खात्री ठेवा.' महाराज मोटारीजवळ आल्यावर त्यांना विचारले. ते म्हणाले, 'चला ना.'

## आधीच योजना होती !

असेच आम्ही एकदा अंबरनाथला गेलो होतो. मी महाराजांना म्हटले, 'दिवसभर आपण मोटारीतून फिरत असून त्रास झाला नसला तरी अंबरनाथ ते डोंबिवली रस्ता खराब असल्याने आपल्याला त्रास होईल, आपण ट्रेनने जाऊ या.' ते म्हणाले, 'असं ? काढा तिकिटे' मी तिकिटे काढली आणि डोंबिवलीला फोन करून जोशीबुवांना निरोप पाठविला की आम्ही अंबरनाथहून ट्रेनने येत आहो. रात्री तेथे वाहन मिळणार नाही, तेव्हा एखादा टांगा रात्री १० चे सुमारास स्टेशनवर आणून ठेवा. पण डोंबिवलीला स्टेशनवर उतरतो, तो कशाचाच पत्ता नव्हता, कारण निरोप पोहोचला नव्हता. मग मला काळजी पडली की, श्रींना आता जोशीबुवांच्या घरापर्यंत चालतच जायला लागणार. पण त्यांची व्यवस्था अगोदरच झालेली असावी. मी धावत प्लॅटफॉर्मवरून मुंबईच्या

बाजूकडील लेव्हल क्रॉसिंगच्या बाहेर आलो; तो एक कोरी करकरीत अँबॅसॅडर उभी. मी तसाच पुढे आलो. शेजारी गाडीचा ड्रायव्हर उभा होता. त्याला विचारले. ही गाडी कोणाची आहे ? त्याने कल्याणच्या कोण्या एका शेठजींचे नाव सांगितले. मी विचारले, 'ते कोठे आहेत व कसे आहेत ! ' त्याने त्यांचे वर्णन केले व दोन नंबरच्या प्लॅटफॉर्मवर ते आहेत असे सांगितले. मी परत फिरून दोन नंबरवर आलो व वर्णनाप्रमाणे दिसलेल्या सद्गृहस्थांना विचारले. बाहेर तुमची गाडी उभी आहे ना ? माझ्या महाराजांना घरी पोहोचवण्याकरता दोन मिनिटे द्याल का ? " त्यांनी विचारले, 'कोण महाराज ? ' मी त्यांना श्रींचे नाव सांगितले. ते म्हणाले न्या गाडी, पण एक विनंती आहे. तुमच्या महाराजांच्या पायावर मला डोके ठेवू द्या. त्यानंतर आजपर्यंत ते शेठजी अगर त्यांची गाडी मला दिसलेली नाही.

आजारपणाचा बराचसा भाग डोंबिवलीत काढल्याने त्या घराला कंटाळलो होतो आणि त्या कटू स्मृतींना उजाळा येऊ नये म्हणून ती जागा लवकरात लवकर बदलावी अशी इच्छा होती. महाराजांच्या डोंबिवलीतल्या मुक्कामाचे वेळीच ठाण्यात एका सोसायटीमध्ये काही ब्लॉक्स शिल्लक आहेत असे आमचे एक गुरुबंधू श्री. हेरंबराव पटवर्धन यांनी सांगितले. आम्ही लगेच येऊन पाहून ब्लॉक पसंत करून बुक करून टाकला. श्रींचे पाय नवीन घराला लागावेत अशी इच्छा व्यक्त करताच, बांधकाम सुरू असतानाच ते येऊन जागा पावन करून गेले. इतरांना जागेकरता वर्षानुवर्षे थांबावे लागते. श्रींच्या कृपेने आम्ही तीन महिने पूर्ण होण्याआधीच या नवीन ब्लॉकमधे राहायला आलो देखील. २२ जून १९६९. श्रींच्या पायाचे सानिध्य नेहमीच हवेसे वाटे. अचानक ते ठाण्याला यावयाचे ठरले. बेळगावचे पू. काणे महाराज यांचे येथील एक भक्त श्री. गोखले यांच्या जागेत श्रीगजानन मंदिराच्या भूमिपूजनाकरता पू. गुळवणी महाराजांनीच यावे अशी त्यांची इच्छा होती. श्री सांगतील तो दिवस आणि म्हणतील तो मुहूर्त. त्यानिमित्ताने श्री यावयाचे होते. हे कळल्यावर मी पुण्याला पत्र लिहिले. आपल्या पुण्यहस्ते दिलेल्या पादुका घरात पूजेत राहाव्यात अशी इच्छा व्यक्त केली. श्री आले. १९ जुलै १९६९. सकाळी श्री. गोखल्यांकडील कार्यक्रम

आटोपल्यावर दुपारी घरी आले. श्री. जगन्नाथशास्त्री पुजाऱ्यांनी पूजा सांगितल्या-प्रमाणे श्रींनी षोडषोपचारे पादुकांचे पूजन करून त्या आमच्या सौभाग्यवतींच्या पदरात घातल्या. श्रींच्या कृपेचा योगायोग इतका की, आमच्या सुताराने नवीन देवघरही त्याच दिवशी पूर्ण करून आणून दिले; म्हणजे त्याचेही उद्घाटन श्रींच्याच हस्ते.

महाराजरूपधारी परमेश्वरानेच असा योग आणल्याने मी सर्वांना सांगतो त्याप्रमाणे हे नवीन घर महाराजांचेच आहे. माझे काहीही नाही.

## कुटुंबियांवरही पूर्ण लक्ष

श्रींचे फक्त त्यांच्या शिष्यांवरच नाही तर शिष्यांच्या कुटुंबियांवरही पूर्ण लक्ष असे. काही प्रश्न उभा राहिल्यास त्याचे आपोआप उत्तर मिळे. मी व सौ. ने अनुग्रह घेतल्यावर आमची सुधारणा पाहून आमच्या भगिनीलाही वाटले की, आपल्यावर श्रींची कृपा व्हावी. पण तिचे लग्न व्हायचे. सासरच्या माण-सांना आपला मार्ग कसा चालेल वगैरे प्रश्न तिच्या मनात आले. तिने माझ्या-जवळ हा विषय काढला तेव्हा आम्ही दोघे बाजारहाट करून घरी परतत होतो. तेवढ्यात तिच्या एका मैत्रिणीने हाक मारली व घरी बोलावले. आम्ही जाऊन १०-१५ मिनिटे गप्पा मारून निघण्याआधी आमच्या बहिणीने तिला विचारले, ' काय ग तुझे यजमान घरात दिसत नाहीत ? ' ती म्हणाली, ' अग आज रविवार आहे आणि त्यांच्या ' रविवारच्या ' कार्यक्रमाला ते मुलुंडला गेले आहेत. मला ते काही चालत नाही, म्हणून मी जात नाही.' मी बाहेर पडल्यावर बहिणीला विचारले, 'मिळाले तुझ्या प्रश्नाचे उत्तर ? तुझी इच्छा आहे, तर मार्ग काढणारे व तो निर्विघ्न करणारे तेच आहेत, कारण ती इच्छा उत्पन्न करणारेही तेच आहेत.' तिलाही अनुग्रह मिळाला.

ठाण्याला राहायला आल्यावर श्रींच्या तसबिरीकरता एक मोठी बॉक्स फ्रेम करून घेतली. एक दिवस सहज मनात कल्पना आली की, या फ्रेमला घाला-वयास चंदनाचा हार हवा, पण तो श्रींकडून प्रसाद म्हणून मिळाला पाहिजे. पण तो कसा मिळणार ? आम्ही ठरविले की, पुन्हा ते घरी येतील तेव्हा त्यांनाच चंदनाचा हार घालावा म्हणजे तोच प्रसाद म्हणून मिळेल. की नाही ?

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

पण तोवर कुठला श्रींना धीर निघालाय? पुढील खेपी मुंबईला आले. तेव्हा सायनला श्री. अण्णासाहेब निगुडकरांकडे मुक्काम होता. महाशिवरात्रीचा दिवस होता म्हणून ऑफिसमधून परस्पर दर्शनाला गेलो. तास सव्वा तास तेथे थांबून निरोप घ्यायला म्हणून पायावर डोके ठेवले. डोके वर करणार तोच महाराजांनी एका पोलिस अधिकाऱ्याने दुपारी चंदनाचा हार त्यांना दिला होता तो उशी-जवळून उचलून माझ्या हातात दिला. अलभ्य, अतर्क्य, पण सत्य. कागदाच्या मोठ्या पिशवीत हार भरून खाली उतरतो तो ठाण्याचे एक गुरुबंधू श्री. सोहनी भेटले. त्यांनी विचारले, 'एवढे मोठे काय घेऊन चाललात?' म्हणालो, 'श्रींचा प्रसाद. चंदनाचा हार' तोच आज घरातील श्रींच्या तसबिरीला घातलेला आहे.

लहानसहान गोष्टींवरूनही आपण जगात इतरांजवळ कसे वागावे, त्यांच्या बद्दल कसे आदराने बोलावे वगैरे धडेही महाराज सहजपणे त्यांच्या बोलण्यातूनच शिकवीत. आम्ही श्रींचा श्रीक्षेत्र गणपतीपुळ्याच्या दौऱ्याचा कार्यक्रम ठरविण्या-करता पुण्याला गेलो होतो. मी सहज सुचवावे म्हणून म्हणालो, की त्याबाजूला आपण जाणारच आहो, तो पावसला स्वामी स्वरूपानंदांकडेही जाऊन त्यांनाही भेटू. महाराज लगेच म्हणाले, 'हो, त्यांचेही 'दर्शन घेऊ.'

## आधी अर्थ मग शब्द

प्रभू रामकृष्णांना त्यांचे शिष्य विचारीत, 'तुमच्या हाकेला आई 'ओ' देते, आम्हाला का देत नाही?' ते म्हणत, 'तुमच्या हाकेमधे तेवढी आर्तता असली तर तुम्हालाही देईल.' १९७१ जून मला फिशर झाला. २३ जून ते ३० जून. खूप यमयातना व्हायच्या. डॉक्टरांचेही काही चालेना. एकेक दिवस मागे पडू लागला, तशी तळमळ वाढू लागली. वेदना असह्य होऊ लागल्या. मी श्रींच्या तसबिरीपुढे उभा राहून कळवळे. त्यांच्या पायांवर डोके आपटून घेऊ लागे. म्हणे, माझा शारीरिक भोग मलाच भोगायला हवा. माझी भोगण्याची तयारी आहे. मला तुमच्याकडून हवी आहे फक्त तो सहन करण्याची शक्ती. ३० जून दुपारी ११–५० ला एक गृहस्थ चिठ्ठी घेऊन आले. श्री मुंबईत आले आहेत. डॉ. आनंदराव जोश्यांच्या विवाहाला उपस्थित राहून दुपारपर्यंत सायनला

मुक्काम आहे. १२ वाजता दुसरी चिठ्ठी. आमच्या बहिणीने निगुडकरांकडे फोन केला. रा. केशवरावांनी घेतला. त्यांना सांगितले, ' नानाची अशी अशी परिस्थिती आहे; दर्शनाला कसा येणार ? ' ते म्हणाले, ' थांबा श्रींना विचारतो. ' श्री म्हणाले, ' आता पुण्याला परतताना नानांकडे जाऊ या. ' मला अंथरुणावर झोपवतही नव्हते, तर उठून त्यांच्या पायावर डोके तरी कसे ठेवणार ? त्यांच्याकरता घातलेले आसन त्यांनीच सरकवून माझ्या बिछान्याजवळ घेतले, आणि आजाराची सर्व चवकशी केली. मी म्हटले, ' येथील डॉक्टरी उपाय झाले आहेत. उद्या जुहू हॉस्पिटलमधे डॉ. नेरूरकरांची अपॉइंटमेंट घेतली आहे.' ते म्हणाले, ' जा, बरे व्हाल. काही काळजी करू नका ' पण मी जाणार कसा ? ट्रेनने जाणे अशक्य होते. ते म्हणाले, ' बाबा कोर्तिकरमहाराजांच्या गाडीतून जा; त्यांना माझा निरोप सांगा. ' श्रींचा निरोप घेऊन श्री. परांजपे त्यांच्याकडे गेले. त्यांनीही महाराजांचा निरोप एकून तात्काळ गाडी घेऊन जायला सांगितले. हॉस्पिटलमधे गेल्यावर तपासणी केल्यावर डॉ. नेरूरकर म्हणाले, ' ऑपरेशनची मला जरूरी वाटत नाही. बहुधा एका इंजेक्शननेच बरे वाटेल, पण हे इंजेक्शन घेणे ऑपरेशनपेक्षाही असह्य असते; कारण ते Anus Region मधे घ्यावयाचे असते. ती तीन-चार मिनिटे केवळ श्रींच्या नामाचा मनातल्या मनात धावा करूनच मी काढली व सहन केले. डॉक्टरांनी इंजेक्शनची सुई काढली मात्र, क्षणार्धात ठणका थांबला व सर्व व्याधी दूर झाली. शारीरिक व्यथेकरता वैद्यकीय किंवा डॉक्टरी इलाजच अवश्य करायला हवे. हयगय करू नये असे ते नेहमी म्हणत.

## मुलाचा ताप पळाला

१९७० च्या मे महिन्यात आमच्या ज्येष्ठ चिरंजिवांचा व्रतबंध करण्याचे ठरविले. तत्पूर्वी सुमारे २-२॥ महिने पशुपतीच्या दौऱ्याच्या निमित्ताने श्री पुण्याबाहेरच होते. व्रतबंध रत्नागिरीकडील आडगावात आमच्या मूळ घरी करणार होतो. व्रतबंधनाचा दिवस दीक्षेकरता श्री प्राधान्याने मानीत. मी पत्र लिहून ठेवले होते. 'एवढ्या २-२॥ महिने जमलेल्या पत्रांतून तुम्हाला वेळेवर उत्तर कसे मिळेल ? ' असा एखाद्याने प्रश्न विचारला असता, तर त्यात काही गैर

नव्हते. पण माझी खात्री होती की, माझी इच्छा पूर्ण होईलच. मुंजीच्या अगोदर ३–४ दिवस असताना मुलाला खूप ताप भरला. सर्वजण काळजी करू लागली. डॉक्टरांना बोलाविले. मी मात्र निश्चिंत होतो. कारण चिंता करणारा मी कोण आणि मला काय कारण ? फक्त माझी श्रद्धा किती अढळ आहे, याचीच ती परीक्षा होती. मी सर्वांना सांगे, माझ्या सर्व माणसांवर श्रींची पूर्ण कृपादृष्टी आहे, तुम्ही काहीही काळजी करू नका. त्याला वाटेल बरे. रविवार दि. १९ मेचा मुहूर्त होता. शनिवारी सकाळीच मुलाचा ताप उतरला; आणि एवढ्या आडगावात दुपारी १२–३० च्या सुमारास पुण्याचे पत्र हातात पडले. बटूला शुभाशीर्वाद आणि अनुग्रह. माझ्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले, आणि इतरांचीही मी म्हटल्याप्रमाणे खात्री झाली की याच्या श्रद्धेपोटीच याला असे कृपानुभव येत आहेत. रविवारी दिवसभरात मुलाला तीन वेळा आंघोळी करावयाला लागल्या. दीक्षेपूर्वी एक आणि मुंजीच्या दोन. ताप कोठल्या कोठे पळाला होता.

माझ्या धाकट्या मुलाची मुंज व्हायची आहे. आमची घरात पंचाईत व्हायची. आम्ही बाकी सर्व साधनेला बसलो की, तो विचारायचा मीही बसू का ? पण श्रींच्या परवानगीशिवाय त्याला हो तरी कसे म्हणणार ? पण एक दिवस मी श्रींजवळ ही गोष्ट काढली. म्हटले काय करावे ? ते म्हणाले, "तुम्ही सर्वजण बसता, तर त्यालाही बसायला हरकत नाही. केशव त्याला दिवस सांगून पत्र दे." यातही योगायोग असा की ज्या दिवशी याला ठाण्याला अनुग्रह मिळाला, त्याच दिवशी आमच्या तीर्थरूपांनाही रत्नागिरीला मिळाला.

## जन्मोजन्मी पुरेसा ठेवा

श्रींना एकादशीच्या उपवासाचे खूप माहात्म्य वाटे. आमच्या मंडळींच्याही खूप दिवस मनात होते की, एकादशीचे उपवास करावे. पण प्रत्येक गोष्ट त्यांना विचारून करावयाची ना ? ते अंबरनाथला आले होते आणि आमची मंडळी दर्शनाला गेली असताना तिने त्यांना विचारले. ते म्हणाले, 'छान आहे करा सुरवात' चैत्र महिन्याची पहिली एकादशी लवकरच यायची होती. पण

श्रींची योजना निराळी होती. अंबरनाथनंतर त्यांचा मुक्काम भागवत–सप्ताहाकरिता डोंबिवलीला जोशीबुवांकडे व्हायचा होता. आम्ही ठाण्याला आल्यानंतर श्री मुंबईकडे आले म्हणजे दरवेळी येताना किंवा जाताना जरी त्यांची पायधूळ घराला पवित्र करीत असली तरी एक रात्र तरी त्यांचे वास्तव्य घरामध्ये व्हावे अशी आमची खूप इच्छा होती; म्हणून त्यांना विचारायला डोंबिवलीला गेलो. रा. केशवरावांना त्यांचेजवळ विषय काढायला सांगितला. ते म्हणाले, ' तुम्हीच विचारा; तुमचा वशिला जास्त आहे ' मी म्हणालो, ' असे कसे ? तुम्ही तर चोवीस तास त्यांच्या सावलीप्रमाणे वावरणारे. ' ते म्हणाले, ' ते काहीही असो, ' तुम्हीच विचारा. ' मी त्यांच्या खोलीत गेलो, आणि विचारले. तेही चटकन हो म्हणाले. पण म्हणाले, ' आम्ही सायनला निगुडकरांकडे येतो असे कबूल केले आहे.' मी म्हणालो, ' काही हरकत नाही, तुम्ही संध्याकाळी ठाण्याला या आणि सकाळीच उठून पुढे सायनला गेलात तरी चालेल. एक रात्र आपले वास्तव्य घरात झाले तरी पुरे; म्हणजे तुम्हाला सायनला जाऊन परत ठाण्याला यावयाचा त्रास नको.' ते म्हणाले, 'त्यांना येऊ असे सांगितले आहे, तेव्हा तिकडे जाऊनच आम्ही येऊं. मोटारीने जायचे-यायचे त्रास कसला ?' आणि ठरला तो दिवस म्हणजे तीच येणारी चैत्रशुद्ध एकादशी. म्हणजे आमच्या मंडळींची आणि बहिणीची श्रींच्या अनुमतीने एकादशीच्या उपवासास सुरवात आणि त्याच दिवशी महाराजांचे घरात वास्तव्य. शिवाय दुसऱ्या दिवशी द्वादशीचे पहिले वहिले पारणेही त्यांच्याच पवित्र उपस्थितीत. महाराज येतील त्यावेळी घरात सामुदायिक बैठक वगैरे घ्यावयाचा व त्यांना आणखी त्रास द्यायचा माझा हेतू नव्हता. पण ते संध्याकाळी आल्यावर काही गुरुबंधू दर्शनाला आले होते, त्यांनी विचारले, 'उद्या पहाटे बैठकीचे काय ?' मी म्हणालो, घर श्रींचे आहे, ते आलेले आहेत, त्यांना विचारा. ते हो म्हणाले तर त्याप्रमाणे व्यवस्था करणे एवढेच माझे कर्तव्य. त्यांनी त्याप्रमाणे विचारले, आणि तेही ' हो ' म्हणाले. म्हणजे नुसते वास्तव्य तर राहोच, त्यांच्या शक्तिसंचाराचा प्रसादही घराला मिळाला. ते दोन दिवस म्हणजे जन्मोजन्मी पुरेल असा ठेवा.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

एकदा ठाण्यात आले असताना एका मोठ्या इंजिनियरांकडे जावयाचे होते. त्यांना आफ्रिकेमध्ये मोठा अपघात होऊन ते परस्वाधीन झाले होते. आम्ही सर्वजण थोडे अचानकच त्यांच्या घरी गेलो त्यामुळे त्यांच्या घरातील माणसांची थोडीशी धावपळ झाली. ते म्हणाले, 'अपघातानंतर १५ दिवसांनी जेव्हा प्रथम शुद्धीवर आलो, तेव्हा फक्त तुमची आठवण झाली.' त्यांच्या मातोश्री म्हणाल्या, 'महाराज, हा त्याच्या पायाने पुण्याला तुमच्या दर्शनाला येऊ शकेल एवढा तरी सुधारू दे.' महाराज नेहमीप्रमाणे म्हणाले, 'श्री सर्व उत्तम करतील.' महाराज त्यांची इतर हकीकत विचारीत असताना घरातील मंडळी थोडे मसाल्याचे दूध करीत होत्या. पण आम्ही निघेपर्यंत ते काही तयार झाले नव्हते. आम्ही निघालो होतो आणि श्रींचे परमपवित्र पाय त्यांच्या बुटात चढवायला म्हणून मी हातात बूट धरून त्यांचा पाय हातात घेऊन होतो. त्यांनी उभे राहावयाला माझ्या डोक्याचा आधार घेतला होता. त्या घरातील बाई म्हणाल्या, 'महाराज! तुमच्याकरता दूध ठेवले होते. तेवढे तरी घ्या.' महाराज म्हणाले, 'आता नको, उशीर झाला. हां, आमच्या नानांना द्या.' महाराजांचे हे शब्द कानी पडले मात्र. खळ्कन् माझ्या डोळयांत अश्रू उभे राहिले. महाराजांनी मला 'आमचे नाना' म्हणावे, यापरत्या आणखी कोणत्या भाग्याची उभ्या आयुष्यात आशा करावी!

**म्हणूनच जमते**

ते आमच्याकडे राहावयाला आले. तेव्हा द्वादशीचे पारणे करून दुपारी विश्रांती घेत होते. ती. अण्णा निगुडकर व मी त्यांचे पाय चेपीत होतो. मी त्यांना विचारले, 'महाराज, माझ्या एका ज्योतिषी मित्राने सांगितले आहे की, पुढील काही दिवस तुला वाईट आहेत, तेव्हा तुझ्या महाराजांना विचारून आणखी काही उपासना करायला हवी आहे का विचारा' महाराज म्हणाले, 'काही नको. तुमचे चालले आहे तेवढे नियमित करा म्हणजे पुरे.' 'बरं पण तुमची रास कोणती?' त्यांनी विचारले. मी म्हणालो, 'वृश्चिक.' ते म्हणाले, 'हां बरोबर, म्हणूनच तुमचे आणि आमचे जमते.'

होणाऱ्या शारीरिक क्रिया जोपर्यंत तुमच्या आटोक्यात येत नाहीत तोपर्यंत

कोणत्याही जागृत देवस्थानी वगैरे जाऊन त्या आणखी वाढवू नको असे त्यांनी सांगितले होते. पण आमच्या सौ.ना श्रींच्याबरोबर २–३ वेळा तीर्थयात्रेला जावयाला मिळाल्याने आपणालाही तो लाभ एकदा व्हावा म्हणून एका वर्षी गुरुद्वादशीला नरसोबाच्या वाडीला त्यांच्याकडे जाऊन पुढे गाणगापूरपर्यंत जावे असे ठरवून निघालो. त्यांनी विचारले, 'झेपत नाही तर एवढा खटाटोप कशाला करता ?' मी म्हटले, 'तुमचा आशीर्वाद असला, म्हणजे काही जड जाणार नाही.' ते म्हणाले, 'आता ठरवलेत तर जा, पण कोठेही गेल्यावर डोळे मिटून ध्यायचे टाळा.' आणि खरोखर त्यांच्या कृपेने सर्व दौरा उत्तम पार पडला. द्वादशीच्या दिवशी आम्ही सर्व गुरुबंधू वाडीला औदुंबरावर पूजन करून परतल्यावर मला विचारतात, 'आज नाही ना काही झाले ?' म्हटले तुम्ही साक्षात येथे असताना काय होणार ?'

## देह दूर मन येऊरला

येऊरला श्री. भगवानराव पटवर्धनांच्या घरी श्रींची खूप सेवा करण्याचे भाग्य लाभले. पण एक दिवस पंचाईत आली. आमच्या नवपरिणीत मेहुणीकडे त्यावेळी वास्तुशांती आणि सत्यनारायण त्यांच्या नवीन घरात होता. तिच्या घरचे पहिलेच कार्य, म्हणून जाणेही अगत्याचे होते. पण श्रींचे पाय दोनतीन तास तरी दुरावतील म्हणून खूप वाईट वाटले. नाइलाजाने तेवढी परवानगी घेतली. देह दूर आणि मन येऊरला. ते २–३ तास कसे काढले असतील, माझे मला ठाऊक. दुसऱ्या दिवशी एकादशी होती म्हणून परत येताना थोडी रताळी मिळाली तर घेऊन या असे सौ. ताराबाई म्हणाल्या होत्या. त्यामुळे परतताना ठाण्याच्या मंडईतून फिरलो. कोठेही रताळी दिसली नाहीत. पण मन सांगे, असे कसे होईल ? उद्या श्रींचा उपवास आणि रताळी मिळत नाहीत ? अशक्य. पण ती वस्तुस्थिती होती. तीनही मंडईत निराशा झाल्याने मोटार येऊरच्या मार्गाला लागली. रताळी मिळण्याच्या सर्व आशा मावळल्या, आणि आम्ही येऊर गावात शिरण्याआधी मोटार भरधाव असताना, सर्व बाजार व दुकाने मागे पडलेली असताना एका हातगाडीवर कंदांसारखे काहीतरी मला दिसले. मी श्री. यादवांना

सांगितले, गाडी मागे घ्या. पाहिले तर खरोखरीच ती रताळी होती. या प्रसंगाने मी मोटारीतच ओक्साबोक्शी रडू लागलो. मोटार वर घरी गेल्याबरोबर मी धावत जाऊन हात पाय धुतले, आणि महाराजांचे पायांवर लोटांगण घातले. कोणाच्याही लक्षात येईना. की हा काय प्रकार आहे? जाताना हा माणूस चांगला होता, आता हा असे काय करतो? आणि झालेला प्रकार जेव्हा आमच्या सौ.ने त्यांना सांगितला तेव्हा त्यांची सर्वांचीही माझ्यासारखीच अवस्था झाली. थोडया वेळाने महाराजांना रडण्याचे कारण सांगितले, तेव्हा ते नेहमीप्रमाणे प्रसन्न हसले आणि आपण त्या गावचेच नाहीत असे दर्शविले, म्हणे होते असे योगायोगाने कधी कधी.

## स्तुतिसरिता घोंघावू लागे

नवीन दीक्षा घेतलेले अगर दीक्षेचे पत्र मिळालेले गुरुबंधू या मार्गाची चर्चा करण्यासाठी येत. अर्थातच आमच्या सद्गुरुस्तुतीची सरिता तुडुंब भरून घोंघावू लागे. मी त्या मंडळींना नेहमी म्हणे, 'नुसती महाराजांकडून दीक्षा मिळाल्याने तुम्हाला त्यांच्या अमर्याद कृपेची प्रचीती यावयाची नाही. नियमितपणे त्यांनी घालून दिलेल्या मार्गाचे अनुसरण करावे व रोजरोज त्यांच्याच परमकृपेने आपले जीवन घडविले जात आहे अशा श्रद्धेची जोपासना करावी. तुम्ही एक गोष्ट कायम लक्षात ठेवा, की ज्या क्षणी सद्गुरूंनी तुमच्यावर अनुग्रह करून कृपादृष्टी ठेविली त्याच क्षणी तुम्ही तुमचे राहिला नाही. एवढेच नाही, तर तुमचा श्वासोच्छ्वासही तुम्ही करीत नाही, तोही त्यांच्याच कृपेने करविला जातो, एवढी ज्यावेळी तुमची श्रद्धा दृढ होईल, त्याच वेळी तुम्हाला सद्गुरूंची पूर्ण कृपादृष्टी म्हणजे काय याचा अमृतानुभव येईल.' मी सांगे 'ब्राह्मणाला द्विज' दोनदा जन्म घेणारा म्हणतात. पहिला शारीरिक जन्म व दुसरा धार्मिक संस्कारांचा-व्रतबंधाचे दिवशीचा. पण मी आहे मात्र त्रिज–द्विज–एक, ज्या क्षणी श्रींनी त्यांचा वरदहस्त डोक्यावर ठेवला त्या वेळचा. कारण त्यांनी हा तिसरा जन्म दिल्यानेच आज मी या जगात दिसत आहे, त्यांच्या परमकृपेने त्यांनी घालून दिलेल्या परममंगल मार्गावरील एक भाग्यवान वाटसरू.

येऊरला महाराजांच्या पहिल्या वास्तव्यात जेव्हा ठाण्यातील गुरुबंधूंचे शिबीर

भरले होते, तेव्हाही मी सर्वांना हीच गोष्ट सांगे. मी माझे प्रत्यक्ष उदाहरण त्यांना देई. की मी हा जो गेले ७-८ दिवस पायांवर नक्षत्र पडल्याप्रमाणे २४ तास अविश्रांत धावतो आहे, ते काय माझे सामर्थ्य ? पण आता श्री येथे प्रत्यक्ष वास्तव्यास आहेत. माझी तहान, भक, झोप, विश्रांती, साधन सर्व काही तेच आहेत. त्यामुळे मला यातील काहीच भावना राहिली नाही. मी एकदा महाराजांना विचारले, 'की तुम्ही येथे असूनसुद्धा येणाऱ्याजाणाऱ्यांची सेवा व ऊठबस करण्यात सर्व वेळ जातो, तुमच्यासमोर बसून साधन करता येत नाही.' ते म्हणाले, 'जे तुमचे आता चालले आहे, तेच तूर्त तुमचे साधन.'

कोणतीही गोष्ट-चूक अगर बरोबर असली तरी-स्पष्टपणे त्यांना विचारायला मला कधीच भीती वाटली नाही. वर लिहिलेले फिशरवरील इंजेक्शन ( Proctocaine ) घेऊन सुमारे वर्षभर झाल्यावर मला Allergy होऊ लागली. येऊरला असताना सर्वांनी शक्यतो धोतरच नेसावे असा आम्ही अलिखित नियम केला होता. पण माझ्या ह्या Allergy मुळे मला स्वतःलाच ते शक्य नव्हते. महाराज आल्यावर मी त्यांना ही माझी व्यथा सांगितली आणि म्हणालो, 'धोतर नेसणे अशक्य असल्याने मी पायजमा घालीत आहे. तुम्ही रागावू नका. चालेल ना ?' ते म्हणाले, "चालेल. व्याधीच आहे त्याला काय करणार ? मलाही काही वर्षांपूर्वी असाच त्रास होत होता. धोतर अगर सोवळे नेसतानाही घाण वाटायची. केशव, आपल्याला कुठल्या त्या हैद्राबादच्या वैद्याने औषध सांगितले होते, त्यांचा पत्ता काय ? तो नानांना दे."

**उत्तम प्रश्न**

मी इतर गुरुबंधूंचीही अशी भीती नाहीशी करण्याचा प्रयत्न करीत असे. का की त्यांनी मनातील विचार स्पष्टपणे महाराजांजवळ बोलून दाखविले, तरच त्यातून त्यांना मार्गदर्शन मिळू शकेल. येऊरच्या शिबिरात आम्ही एक तास प्रश्नोत्तरांकरता ठेवला होता. या मार्गाबद्दल कोणताही प्रश्न साधकाने विचारावा. एका साधकाने विचारले, 'महाराज मी पूर्वी मांसाहार करीत असे, त्याने माझ्या साधनेला बाध येणार नाही ना ?' मी महाराजांसमोर उत्स्फूर्तपणे जवळजवळ ओरडलोच Excellent Question ! महाराजांनीही मोकळेपणाने

त्याला समर्पक उत्तर दिले.

आश्रमात होणाऱ्या सार्वजनिक उत्सवांना खूप गर्दी होत असे. आपला आणखी तेथे त्रास नको, म्हणून मी शेवटपर्यंत अशा कोणत्याही उत्सवाला गेलो नव्हतो. पण डिसेंबर ७३ मधे नाशिक–त्र्यंबकेश्वर–शिरडी अशी तीर्थयात्रा करून शेवटी महाराजांच्या वाढदिवसाच्या दिवशी प्रसादाला पुण्याला जावे असा बेत केला. नियतीने तो त्यांचा ऐहिक जीवनातील शेवटचाच वाढदिवस ठरविला. आदल्या दिवशी पुण्यात पोहोचल्यावर त्यांच्या दर्शनाला गेलो. पण त्यांची तब्वेत खूपच बिघडली होती. मी पाया पडलो. 'नाना' म्हटल्यावर मलाच त्यांच्या त्याही अवस्थेत त्यांनी विचारले, "कशी काय आहे तुमची तब्वेत? सुधाताई, बेबी कशा आहेत?" पण उत्तर द्यायला मी तेथे होतोच कोठे? माझ्यावर आकाश कोसळल्यासारखे वाटले. मला एक क्षणही तेथे बसवेना. झटकन् खाली आलो, आणि मनसोक्त रडलो. तेथे प्रा. कु. शकुंतलाताई केळकर आल्या होत्या. त्यांनी विचारले, 'काय झाले?' मी म्हणालो, 'ताई, त्यांची अशी अवस्था, आणि आमचे कुशल विचारताहेत.' आम्ही निर्णय घेतला. त्यांच्या अशा परिस्थितीत आपण जरी वाढदिवसाकरता आलो असलो तरी उद्या येथे प्रसादाला येऊन त्यांना त्रास द्यायचा नाही. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी म्हणजे वाढदिवसाला फक्त दर्शनाकरता गेलो. तरी त्यांनी विचारलेच, 'काल आलेत मग आज प्रसादाला का नाही आलेत?' मी म्हणालो, 'महाराज तेवढाच आपल्याला त्रास कमी.' ते म्हणाले, 'यायचे, मला कसला आला आहे त्रास?' मनात परमेश्वराला आळविले, 'यांना बरे वाटू दे, म्हणजे असे कितीतरी प्रसाद मिळतील.'

## पादुका देव्हाऱ्यात पडल्या

मंगळवार, १९ जानेवारी १९७४ ची पहाट. नको ती गोष्ट स्वप्नात दिसली. स्वप्न पडले की, श्रींनी दिलेल्या पादुका त्यांना केलेल्या खास आसनावरून खाली देव्हाऱ्यात पडल्या आहेत. मी उठावयाच्या आधी सौ. व बेबी उठल्या होत्या. तोंड धुऊन त्या देवांना नमस्कार करायला वाकल्या तो त्यांनी पादुका खरोखरीच खाली पडलेल्या पाहिल्या होत्या. मी त्यांच्यानंतर उठलो. मला

कल्पनाही नव्हती. मी उठल्यावर तोंड धुतले, आणि त्या दोघींना म्हणालो, 'अग आज अगदी थाईट स्वप्न पडले. महाराजांनी दिलेल्या पादुका खाली पडलेल्या पाहिल्या.' त्या म्हणाल्या, 'स्वप्न नाही, खरोखरच पादुका खाली पडलेल्या होत्या.' आणि दुपारी २ वाजून ५ मिनिटांनी ऑफिसमधे फोन खणखणला— महाराज गेले!

कसे जातील? कोण म्हणतो गेले? अशक्य. उलट आता देहबंधनातीत झाले. मला अक्कलकोटच्या श्रीस्वामी समर्थांच्या आरतीतील एक कडवे आठवले.

"निर्गुण निर्विकार विश्वव्यापक, स्थिरचर व्यापुनि उरला अवघाचि एक।
अनंतरूप धरिसी करणें मायीक, तुझे गुण वर्णाया थकले विधिलेख ॥

तेथे मी काय लिहिणार?

विश्वामध्ये कोठेही कोणत्याही क्षणी अवतीर्ण–अट फक्त एक–हाक तशी आर्ततेची हवी!

* *

**प. प. योगिराज श्री गुळवणी महाराज यांची**

## 'आरती'

गुरुवरा ओवाळू आरती।
नयनी अश्रुजल प्रेमे भरती ॥ धृ. ॥
करि मन साधन स्थीर निरांजन।
एकविधा घृत भक्तित भिजवून।
पंचप्राण ज्योति ओवाळून।
कष्टदशा सरती ॥ १ ॥ धृ. ॥
अहंभावना जळते ज्वाला।
कर्मानुतापा धूर चालला।
उजेडात श्रीगुरु पाहिला।
दयादृष्टि भगवती ॥ २ ॥ धृ. ॥
सदैव उन्मनी मम गुरु वामन।
श्रवणि घुमतसे ध्वनि नारायण।
वासुदेव यति भरवी लोचन।
तनमन करि विस्मृती ॥ ३ ॥ धृ. ॥
वामन शक्ती दिव्य रसायन।
जन्ममृत्युचे करी विखंडन।
ध्यास कवीचा हरि रात्रंदिन।
साधक अनुभवती ॥ ४ ॥ धृ. ॥
पळती साऱ्या वृत्ति अमंगल।
वामन दृष्टी दया सुमंगल।
रामकवीची वृत्ती धांदल।
भीती थरथरती ॥ ५ ॥ धृ. ॥

—**रामकवी**, सोलापूर

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# " उघडी नेत्र हे गुरु वामना "

कवि—सौ. कुसुमताई जोशी, डोंबिवली.

श्रीगुरु गुणराशी उठी बा देइ दर्शनासी
वामना नेई तुजपाशी
तेजोरूप तू नित्य निरंतर अनंत झालासी ॥ धृ० ॥
निर्गुण ब्रह्म निराकार तू निरंजनी वससी
विराट रूपी विष्णु आज तू सांग बघू तुज कशी
भस्मांकित तनू तुझी शोभली छाटी पांघरसी
रुद्राक्षांची माळ घालुनी शांत सदा अससी ॥ ॥
त्र्यमूर्ती तू दत्त दिगंबर दिगंतरी फिरसी
अणुरेणुतूनी व्यापुनी अससी मला का न दिससी
भक्तमंडळी द्वारि तिष्ठली बाहती बहु तुजसी
चिमणि बालके गाई वासरे आले देवऋषि ॥ २ ॥
वामनमूर्ती तुझी " वामना " दावि लोचनासी
पंचप्राण ओवाळीन आरती पाहीन स्वरूपासी
भक्तिघृताने भिजल्या वाती तेवत दिवसनिशी
उघडि नेत्र हे गुरू " वामना " रवि ये उदयासी ॥ ३ ॥
कूर्म दृष्टि ही तुझी अम्हावर आज कसा रुससी
मायेवीण ही तुझी लेकरे तळमळती बघ कशी
तोडुनी अंतर दावि निरंतर सगुण रूप मजसी
माय पिता अन् सखा सोयरा तूच अम्हा अससी ॥ ४ ॥
प्रभात झाली उठी " वामना " करिते नमनासी
या ज्योतीला दीप दिसेना ओवाळू तुज कशी
फडफडते ही ज्योती देवा शोधित तुज दशदिशी
करित वंदना " गुरू वामना " दासी चरणासी ॥ ५ ॥

* *

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# " मानव देही वामन अवतरला "

लेखक : डॉ. दि. जी. लिमये

## पहिली–वहिली भेट

" १९२० साली मी पुण्याच्या " न्यू इंग्लिश स्कूल "मध्ये मॅट्रिकच्या वर्गात होतो. त्या वेळची गोष्ट. आमच्याच वाड्यात माझा बालमित्र गोपाळ भट राहात असे. आमच्या शाळेला एक दिवस सुट्टी होती. गोपाळ हा मात्र शाळेत गेला होता, कारण " नूतन मराठी शाळे "चा विद्यार्थी होता. त्या दिवशी ती शाळा चालू होती. गोपाळची आई माझ्याकडे आली आणि मला म्हणाली, " ही चिठ्ठी वर्गशिक्षकांना दाखव आणि गोपाळला घरी जरूरीचे काम आहे असे सांगून त्याला घेऊन ये. " त्याप्रमाणे मी शाळेत गेलो. गोपाळच्या वर्गात तेव्हा चित्रकलेचा ( ड्रॉइंग ) तास चालू होता. चित्रकलेचे शिक्षक श्री. गुळवणी होते, असे मला गोपाळकडून कळले. मी गुळवणींना चिठ्ठी दाखवली. त्यांनी जरूर ती परवानगी देऊन गोपाळला घरी पाठविले. त्यावेळेला मला गुळवणी एक साधा शिक्षक–तोही चित्रकलेचा–म्हणून फारसा आदरणीय वाटला नाही. आम्हा विद्यार्थ्यांना त्यावेळी चित्रकलेच्या शिक्षकाबद्दल फारसा आदर वाटत नसे. चित्रकलेचा तास, एक गारुड्याचा खेळ अशीच आमची समजूत होती. त्या तासात, मुलांच्या इतर विषयांच्या तासात होणारा मानसिक त्रास मुळीच नसे. मुले अशावेळी बऱ्याच खोड्याही करीत. तेव्हा मला गुळवणी सर फारसे आदरणीय वाटले नाहीत यात विशेष नवल नाही. अशी होती माझी गुळवणी सरांशी पहिलीवहिली भेट ! !

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

## गुळवणी महाराजच अधिकारी

पुढे B. A. होऊन मी मुंबईत स्थाईक झालो. १९५६–५७ साली मी मुंबईच्या "बालमोहन विद्यामंदिरात" मुख्याध्यापक होतो त्यावेळी श्रीसद्गुरु गुळवणी महाराज यांच्या भेटीचा, ध्यानी मनी नसता, सुयोग घडून आला. तो प्रसंग असा : मी त्यावेळी Indian Psychology (भारतीय मानसशास्त्र) या विषयावर एक पुस्तक लिहावयास हाती घेतले होते. अर्थात भारतीय मानसशास्त्राचा मेरुमणी पतंजली. तेव्हा–पातंजल योगदर्शनाच्या सूत्रांचा अभ्यास करावा लागला हे सांगणे न लगे. लेखकाला हाती घेतलेल्या विषयावर प्रत्यक्ष अनुभवाच्या अभावी संदर्भ ग्रंथांवरून पुस्तक लिहिता येते. पण विषयाचा स्वानुभव असेल तरच स्वतंत्र लेखन होऊ शकते व असे लेखनच खरेखुरे लेखन–असा निर्णय व निश्चय करून योगसूत्रांच्या अभ्यासाबरोबर–यम, नियम–आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा-ध्यान-समाधी–अशा अष्टांग योगाचा कृतिरूपाने अनुभव घ्यावा असे ठरवून सुरवात केली. यावेळी मला "कैवल्य-धाम" या संस्थेचे त्यावेळचे चालक–कुवलयानंद–स्वामी यांची मदत झाली. पण या सर्व गोष्टींचा मला स्वानुभव माझ्या फुरसतीत येणे अशक्य होते. यम, नियम, आसने, प्राणायाम यांचा कृतिद्वारा अनुभव आला. पण त्यापुढच्या गोष्टी जमतील असे त्यावेळी वाटले नाही. तेव्हा प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी या गोष्टींचा ज्यांना प्रत्यक्ष अनुभव आहे,–अशा सत्पुरुषांशी चर्चा करून पुस्तकाकरिता माहिती गोळा करण्याचे ठरविले. 'समाधी' सोडून इतर गोष्टींबद्दल स्वानुभव सांगून काही सत्पुरुषांनी हा विषय किती गहन व महत्त्वाचा आहे याची खात्री पटवून दिली. माझे कुतूहल व जिज्ञासू वृत्ती साहजिकच वाढीस लागली. पण स्वानुभवाने समाधीचे ज्ञान असलेला व समाधीचे स्पष्टीकरण करू शकणारा सत्पुरुष मला भेटेना. म्हणून निराशा झाली. शेवटी, पुण्याचे श्री. सोनोपंत दांडेकर मुंबईस आल्याचे कळले. माझी त्यांची ओळख होती. म्हणून त्यांना जाऊन भेटलो. माझी अडचण सांगितली. तेव्हा त्यांनी पुण्यात योगविद्यापारंगत असलेले गुळवणी महाराज आहेत. ते अधिकारी पुरुष आहेत. त्यांना जाऊन भेटा

म्हणजे तुमचे काम होईल असे सांगून त्यांचा पत्ता मला दिला.

## दोन्ही कर जुळले

मी तडक पुण्यास गेलो. शनवार पेठेतील गुळवणी महाराजांच्या निवासस्थानी गेलो. वाड्यात शिरताच डाव्या बाजूला पडवीवजा दोन खोल्यांत त्यांचे बिऱ्हाड होते. ड्राइंग सर गुळवणी व गुळवणी महाराज यांच्या चेहऱ्यात फरक जाणवला. पण खूण पटण्याइतके साम्य नक्की होते. ड्रॉइंग सरांच्या बद्दलची ३५ वर्षांपूर्वीची अनादरभावना आठवली आणि स्वतःची स्वतःला खंत वाटून मनात शरमलो, आणि माझे दोन्ही कर विनम्रतेने जुळले. त्यांना मी माझ्या भेटीचे प्रयोजन सांगितले. श्री. सोनोपंत दांडेकर यांचा संदर्भ देऊन माझ्या पुस्तकाचे हस्तलिखित त्यांना दाखविले. 'समाधी' या विषयावर सविस्तर माहिती मिळावी अशी विनंती केली. त्यावर महाराज म्हणाले, 'हे पाहा तुमचे पुस्तक इंग्रजीत लिहिले आहे. मला इंग्रजी येत नाही.' त्यावर मी म्हणालो, 'इंग्रजीमुळे अडत नाही. मला समाधी-अनुभव मातृभाषेतून स्पष्ट करावा. मी आपला ऋणी होईन. –मी आजच रात्रीच्या गाडीने मुंबईस जावे म्हणतो.' यावर महाराज म्हणाले, 'तुम्ही आजच्या रात्रीच्या गाडीने मुंबईस जाणार असाल तर तुमचे काम यशस्वी होईल असे मला वाटत नाही. पण तुम्ही आजच्या ऐवजी उद्या रात्रीच्या गाडीने जाण्याचे ठरविले तर, उद्या दुपारी मजकडे दुपारी २–० किंवा २–३० पर्यंत येऊन चान्स घ्या. योगायोग असल्यास तुमचा प्रश्न सुटेल. यापेक्षा अधिक मी काहीच सांगू शकत नाही.' माझ्या मनात एक विचार तरळून गेला– 'अडला मुमुक्षू गुरूचे पाय धरी!!' लागलीच दुसरा विचार आला– 'कदाचित् महाराज माझी समाधीबद्दलची कळकळ किती तीव्र आहे याची कसोटीच घेत आहेत–' मी थोडा वेळ घेऊन दुसरे दिवशी निश्चित येईन असे सांगून त्यांना नमस्कार करून घरी परतलो. दुसरे दिवशी ठरल्याप्रमाणे त्यांच्याकडे गेलो.

## समाधीचे दर्शन

महाराजांनी, मला हाताने खूण करून आत येण्याचे सूचित केले. त्यांच्या

पडवीत माझ्या अगोदरच येऊन दोन साधक बसले होते. महाराजांनी मला त्या साधकांच्या मागे बसण्याची सूचना दिली. त्या दोन साधकांपैकी एक माझ्या ओळखीचे श्री. केळकर नावाचे गृहस्थ होते. माझे विशेष लक्ष केळकरांकडे होते. त्यांच्या मांडीवर त्यांचा चष्मा होता. जवळच एक वृत्तपत्र पडले होते. ते झोपी गेले होते. जागृत नव्हते. पण कशाचाही आधार नसता ते झोपी गेल्याचे पाहून मी आश्चर्यचकित झालो. दुसरे साधकही त्याच अवस्थेत दिसले. मी घड्याळात पाहिले. ३–३० वाजले होते. महाराजांनी मला जवळ बोलावले व हलक्या आवाजात म्हणाले, "तुम्ही त्या दोघांना गद्गदा हलवून जागे करा." मला जरा संकोच वाटला. पण महाराजांनी सांगितल्यामुळे धीर आला, व मी त्या दोघांनाही क्रमाक्रमाने हलवून जागे करण्याचा प्रयत्न करू लागलो. ते जागे होईनात. म्हणून जोराने धक्के दिले. तरी त्यांना जाग कशी ती येईना. मी अक्षरशः दिङ्मूढ झालो, तो काय प्रकार आहे हे माझ्या जाणीवेच्या क्षितिजापलीकडे होते. एव्हाना ४–३० वाजले होते. ते गृहस्थ त्या अवस्थेत दुपारी १ वाजल्यापासून आहेत असे मला महाराजांकडून कळले. असाच आणखी एक तास पुढे सरकला. ५–३० वाजता श्री. केळकर यांनी हालचाल केली, आणि त्यांनी डोळे उघडून मला ओळखल्याची साक्ष दिली. पुढे १५–२० मिनिटांनी दुसरे गृहस्थही जागे झाले. त्या दोघांनी महाराजांना नमस्कार केला आणि ते दोघे घरी परत जाण्यास निघाले. माझी त्या दोघांची ओळख नाम-निर्देश करून महाराजांनी करून दिली. श्री. केळकरांनी माझी ओळख असल्याचे महाराजांना सांगितले. महाराज मला म्हणाले, 'अहो, हा सुयोग आहे. तुमचे कार्य यशस्वी झाले आहे. आता स्पष्टीकरणाची जरुरीच उरली नाही. तुम्ही आता तुमचे पुस्तक लिहून पुरे करा.' यावर काही प्रश्न विचारण्याकरिता मी तोंड उघडणार हे जणू जाणूनच महाराज मला म्हणाले, 'तुम्हाला काही प्रश्न विचारावयाचे असतील, व काही जास्त स्पष्टीकरण हवे असेल, तर तुमचे स्नेही श्री. केळकर यांना विचारा.' मी महाराजांच्या पाया पडलो व त्यांचा शुभाशीर्वाद घेऊन थेट श्री. केळकरांबरोबर त्यांच्या घरी गेलो. त्यांच्या घरी चहापान झाले. त्यांनी आपल्या अवस्थेचे वर्णन असे केले– त्यांनी 'समाधी'

असा शब्द वापरला नाही. ते म्हणाले, 'मी ज्या अवस्थेत होतो त्याचे मला शब्दात वर्णन करता येत नाही. पण मी तेव्हा माझ्या सभोवती असलेल्या वातावरणापासून अलग होतो. पण मी पूर्ण जागृत असून स्वतःची मला पूर्ण जाणीव होती. गाढ झोपेतून उठल्यावर जे समाधान वा आनंद मिळतो त्याहीपेक्षा अत्यानंदाचा तो क्षण होता.' माझे समाधान झाले. मला स्वतःला जरी समाधीचा अनुभव आला नाही तरी समाधीचा मनसोक्त अनुभव चाखणाऱ्या व्यक्तीचे प्रात्यक्षिक याचि देही याचि डोळा पाहून मी सुखावलो. मुंडकोपनिषद्मध्ये वर्णिल्याप्रमाणे 'तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्।' याप्रमाणे मी गुरूकडे गेलो होतो, व स्वतःला श्रेय न घेता, परस्पर दुसऱ्यांवर समाधीचे प्रक्षेपण करून महाराजांनी मला समाधीचे दर्शन घडवून दिले. हा समाधि-योग म्हणजे याच उपनिषदात सांगितल्याप्रमाणे—

'आत्मक्रीड आत्मरतिः क्रियावान् एष ब्रह्मविदां वरिष्ठः।'

(आत्मस्वरूपात क्रीडा करणारा, आत्मस्वरूपी प्रेम करणारा हा खरा श्रेष्ठ ब्रह्मज्ञानी होय.) —

असो. माझ्या पहिल्या भेटीत गुळवणी महाराजांनी मला साध्या मानवाचे दर्शन – ड्रॉइंगचे शिक्षक या रूपाने प्रकट केले. तर दुसऱ्या भेटीत ते मला वामन अवतार धारण करणारे प्रत्यक्ष योगेश्वर आहेत याची साक्ष पटली. या भेटींची स्मृती माझ्या मनात सदैव तळपत राहील, व ती राहो, अशी प्रार्थना करून गुरुमहाराजांच्या पुण्यतिथीच्या शुभ दिनी मी श्रद्धापूर्वक वाहिलेली ही पुष्पांजली गुरुमहाराज गोड मानून घेतील याची खात्री वाटते.

* *

# श्रीवामन स्तुतिदशक

ॐ नमो ॐकारस्वरूपा। विश्व विद्या। सर्वारंभ पूज्या। स्वयंप्रकाशका।
विघ्नहर श्रीगणेशा। जयोस्तु, जयोस्तु, सर्वत्र शुभं भवतु ॥

आदौ अत्रिऋषी अनुसुया, श्री अवतार दत्तात्रय।
श्रीपाद नरसिंह वासुदेव, श्री अंशावतारत्रय।
उमादत्त प्रसाद वामन गुरु, परंपरा अक्षय।
शक्तिपात सुतीर्थ संक्रमणी, जडजीव भाग्योदय ॥ १ ॥

सुज्ञजनक उमादत्तात्रय। अत्रि अनसुया समद्वय।
प्रसादे श्रीदत्त प्रसवय। नमो वामन श्रीगुरु ॥ १ ॥

वद्य त्रयोदशी मास मार्गशीर्ष। शक सहस्त्र अष्टशत अष्टवर्ष।
बृहस्पत्‌दिनी उदयी मित्र सहर्ष। नमो वामन श्रीगुरु ॥ २ ॥

धन्य वासुदेवानंदतनया। लोकनाथानुग्रहित सदया।
श्री वामनदत्त गुळवणीराया। नमो वामन श्रीगुरु ॥ ३ ॥

अवधूत मार्ग असे चोखंदळ। आत्मसाक्षात्कार निर्मळ।
'शक्तीपातेन' लभे सु–फळ। नमो वामन श्रीगुरु ॥ ४ ॥

प्रथम दर्शने पुनीत मी। पादस्पर्शने उत्साहित मी।
निरहंकारी निश्चित मी। नमो वामन श्रीगुरु ॥ ५ ॥

पूर्वग्रह मी दूषित मानव। स्थित जन्माची नाही जाणिव।
शरणागत मी उद्धरी पदि तव। नमो वामन श्रीगुरु ॥ ६ ॥

कल्प–विकल्प उठता मनी। दुष्ट तमांध मज ध्यानी।
तव स्मरणे मी समाधानी। नमो वामन श्रीगुरु ॥ ७ ॥

या जन्मी जो प्राप्तसोहळा। पूर्वजन्मिचा असे उजाळा।
तधि प्रसादित मी निर्मळा। नमो वामन श्रीगुरु ॥ ८ ॥

धन्य आम्ही भाग्यवंत। वरदहस्त गुरुप्रसादित।
सद्‌गुरुराया तुम्ही मातृवत। नमो वामन श्रीगुरु ॥ ९ ॥

गुरुदेवा कूर्मदृष्टी असावी। सात्त्विक बुद्धि नित्य वसावी।
सुदर्शनी तव अभयता मिळावी। नमो वामन श्रीगुरु ॥ १० ॥

**॥ श्री गुरुदेवदत्त ॥** कवि : सुदर्शन **म. वि. मंठाळकर,** सोलापूर १.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

— गुरवे नमः —

# श्री योगीराज गुळवणी महाराज यांचे पुण्यस्मरण

लेखक : **का. नी. तथा अण्णा जोशी**, वाराणसी

मी महाराजांच्या प्रेरणेने काशीक्षेत्री साधनेचा अभ्यास करण्यास गेलो होतो. महाराजांना उचकीचा त्रास होत आहे आणि ते आपल्या साधनेसंबंधाने विशेष चौकशी मजजवळ करत आहेत असे पत्र परमपूज्य दादासाहेब नखाते यांच्याकडून मला आलेले होते. त्यावरून महाराज इतक्या लवकर जातील अशी कल्पनाही मनाला शिवली नव्हती. मी त्यांना सविस्तर कळवण्याकरता मजकूर लिहीत आहे तोच वैद्यराज बाळकृष्ण शास्त्री जोशी यांचे चिरंजीव विजयकुमार याने एका दैनिकात आलेली श्री गुळवणी महाराज पंचत्वात विलीन झाल्याची वार्ता वाचून दाखवली; ते वाचून खरेही वाटेना आणि लक्षही लागेना. म्हणून मी व बाळकृष्णशास्त्री जोशी असे आम्ही दोघे जठार मंदिरातील महाराजांच्या निवासस्थानी जाऊन महाराज ज्या ठिकाणी ध्यानाला बसत होते त्या ठिकाणी त्यांची तसबीर ठेवून ध्यानाला बसलो. काही वेळाने महाराज ध्यानात आले आणि माझ्या दुःखद अंतःकरणाला विचारू लागले, ‘ अरे, श्री वासुदेवानंद सरस्वती जाऊन किती वर्षे झाली ? ’ मी म्हणालो ‘६०’. मग महाराज म्हणाले, ‘ ते येऊन अजूनही तुला मार्गदर्शन करतात ना ? मग मी कुठे गेलो ! मी आहेच. ’

याच वेळी बाळशास्त्रींनाही दृष्टांत झाला की, “ अरे आता मला तुजकडे

यावयास पंचभूतात्मक बंधन राहिले नाही. आता तू स्मरण करशील त्यावेळी तुजजवळ आहे. "

यानंतर अर्ध्या पाऊण तासाने आम्ही काशीतील महाराजांच्या अनुयायांना ही गोष्ट कळवून, वेदशास्त्रसंपन्न विश्वनाथशास्त्री दातार यांच्या अध्यक्षतेखाली दुखवट्याची सभा घेतली. सभेत श्री. देवबंधू, श्री. काळे आणि तद्देशीय दोन, चार साधकांची भाषणे होऊन दुखवट्याचा ठराव झाला. विद्वत चूडामणी श्री. राजराजेश्वरशास्त्री द्रवीड यांचाही दुःखद संदेश आला होता. दुखवट्याचा ठराव घेऊन नंतर आम्ही पुण्यास आलो.

येथे आल्यावर तिलांजलीच्या दिवशी ओंकारेश्वरी एक महिला आत्मकथन मोठया आपुलकीने करीत होत्या की, "त्या सोमवारी मी पहाटे ध्यानाला बसले आणि महाराज माझ्या ध्यानात आले आणि म्हणाले, 'आणखी दोन दिवसांनी मी तुम्हाला दीक्षा देईन. तुम्ही पहाटे ५ वाजता सर्व तयारी करून ध्यानाला बसा, त्याप्रमाणे मी बसले आणि गेल्या गुरुवारी मला महाराजांनी ध्यानात दीक्षा दिली. नंतर मी पुन्हा दर्शनाची अपेक्षा करताच ते म्हणाले, 'पुढच्या गुरुवारी पुण्यास या तेथे दर्शन होईल' आणि तो गुरुवार म्हणजे महाराजांना तिलांजली देण्याचा १० वा दिवस. प्रत्यक्ष दर्शन नसले तरी महाराजांना तिलांजली द्यायला मिळाली या आनंदात बाई मग्न होत्या.

यानंतर मला जेव्हा जेव्हा श्री वासुदेवानंदांचा साक्षात्कार होतो तेव्हा तेव्हा त्यांच्याच आगेमागे श्री गुळवणी महाराजांचेही दर्शन अथवा साक्षात्कार घडतोच.

* *

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

॥ श्री ॥

# योगीराज व नामयोगी

लेखक : द. अ. किर्लोस्कर

सबजज व ज्यु. मॅजिस्ट्रेट सोलापूर

योगीराज वामन-दत्त  येती अनंत-सदनात
चला करूया स्वागत  घालुनिया दंडवत
शुद्धभाव तिलक लावू  सुमनहार कंठी वाहू
नारिकेल मनोवृत्ती  चला देऊ त्यांचे हस्ती
विडा देऊ गतकर्माचा  मल झाडू अंतरीचा
पंचप्राणांची आरती  ओवाळुया धरुनी भक्ती
चला करूया स्वागत  घालुनिया दंडवत

नोव्हेंबर १९६९; पूज्य महाराज श्रीक्षेत्र करवीरी होते. आणि पाच सुवासिनी महाराजांचे स्वागत ब्र. मू. दादामहाराज ( माझे परमपूज्य पिताजी अ. भा. किर्लोस्कर ) यांच्या सदनात वरील पद सुरम्य सुरात म्हणून करत होत्या. श्रीदत्तसेवेला जीवन वाहिलेल्या दादांची योगीराजांना भेटावे ही इच्छा होतीच. २१ ऑगस्ट १९६९ रोजी तुळजापूर येथे पू. गुळवणी महाराजांचा सत्कार झाला. त्याप्रसंगी भाषण करण्यास सत्कार समितीने मला मुद्दाम कळंबहून बोलावून घेतले होते. महाराजांच्या पंगतीचा, दर्शनाचा व सेवेचा लाभ सद्गुरूकृपेने मला अनाहूतपणे झाला. त्यावेळी महाराजांनी विचारले, 'कोल्हापुरला दत्तभक्त किर्लोस्कर महाराज आहेत ते तुमचे कोण ?' मी अर्थातच अभिमानाने

त्यांचा ज्येष्ठ पुत्र असल्याचे सांगितले. त्याच वेळी महाराजांनी आपण त्यांनी लौकरच भेटू असे सांगितले आणि तसे झालेही. ती भेट उभयतांना अविस्मरणीयच होती.

आधुनिक दत्तावतार प. प. श्रीमत वासुदेवानंद सरस्वती महाराजांचे सच्छिष्य योगीराज गुळवणी महाराज एक थोर संत ! दादांचे तर मुख्य ब्रीद ते नेहेमी म्हणत,

‘ गुरुसंतसेवा हेच माझे ध्येय
तेच एक कार्य जीवनाचे ॥ ’

आणि वर नमूद केलेल्या भेटींत उभयतांची मने एकरूप झाली. ‘श्रीदत्तभक्तिनिवासा’त महाराजांचे स्वगत वरील गीताने झाले. श्रीदत्तगुरूंचे दोघेही निष्ठावंत निःसीम भक्त. मग या प्रथम भेटीत त्या देवतेचा नामघोष न झाला तरच आश्चर्य ब्र. भू. दादांनी महाराजांचे पायी नमन केले. इतरांनी त्यांचे अनुकरण केले. आणि श्रीदत्तगुरूंचे ध्यान म्हणण्यात आले. लगेच जप सुरू झाला

‘ श्रीदत्तगुरु श्रीदत्तगुरु श्रीदत्तगुरु........ ’

## नाम हे अमोघ अस्त्र

नामजप हे महान शस्त्र ! परमेश्वर आपलासा करून देणारे अमोघ शस्त्र आणि जीवन जगण्याचे एक शास्त्रही ते शस्त्र आणि शास्त्र दादांना करतलामलकवत्. जप सुरू झाला की त्या गजरांत देहभान विसरून जावे असे नादब्रह्म निर्माण झाले. उभयता संत आनंदित झाले. देहभाव विरले; वृत्ती लोपल्या नामजप थांबला ’ महाराज गहिवरले आणि ब्र. भू. दादांच्या पायी मस्तक ठेव लागले. दादांना अवघडल्यासारखे झाले. ‘ महाराज, हे काय करता ? आपण ज्येष्ठ थोर वंद्य संत ! ’ दादांच्या या विनंतीला धुडकावून महाराज म्हणाले, येथील वातावरण, कण न कण दत्तमय करून सोडणाऱ्या दत्ताला नमस्कार करू नको का ? ’

ब्र. भू. दादामहाराज व पू. योगीराज यांची ‘ श्रीदत्तभक्तिनिवास ’मध्ये प्रथम भेट ही अशी झाली. ती समजण्यास तसेच भाविक मन हवे.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

ते समर्थांची वृत्ती । तें ती एक नाथचि जाणती
की जे गुरुपुत्रचि असती । ते जाणती ही दशा

यानंतर काही अल्पकाळ उभयतांचा सुखसंवाद झाला व अल्प उपहारानन्त महाराजांनी श्रीदत्तभक्तिनिवासामधून गमन केले.

## परा वाचा मौन धरत

पुनः उभयतांची भेट ९-२-१९७० मध्ये गुरुभक्त श्री पुरुषोत्तमराव माशाळकर यांचे घरी येरमाळा येथे अचानकपणे झाली. महाराजांची तेथे पाद्यपूजा व्हावयाची होती. मी तेव्हा कळंबला होतो. ७-२-७० रोजीच माझे पिताजी माझ्याकडे आल्याचे माशाळकरांना कळले आणि त्यांनी केलेल्या अत्याग्रहामुळे दादा त्यांच्या घरी गेले. पुनः दोन माहात्म्यांची भेट झाली पू. गुळवणीमहाराज, ब्र. भू दादामहाराज, पं. दत्तमहाराज कवीश्वर यांच्या भेटीत दत्तअवताराचे स्वरूप व तत्संबंधी चर्चा झाली. ती ऐकण्याचे सौभाग्य गुरुभक्तकेसरी श्री. बापूसो कुबडे यांना लाभले. भोजनाची पंगत झाली. थोडया वेळाने दादा सोलापुराकडे व महाराज आणि शिष्यवद कळंबकडे रवाना झाला.

४-४-१९७० रोजी पू. दादांनी देहत्याग केला. महाराज तेव्हा उत्तर हिंदुस्थानात होते. श्री. बापूसाहेबांचे करवी त्यांनी आपणास झालेले दुःख व्यक्त केले. ४-४-७१ रोजी आम्ही शिष्यांनी ब्र. भू. दादा महाराजांची प्रथम पुण्यतिथी साजरी केली. त्याप्रसंगी पू. गुळवणी महाराज अध्यक्षस्थानी होते. त्यांच्या शुभहस्ते दादांच्या भव्य प्रतिमेचे उद्‌घाटन झाले. गुरुमहती या विषयावर पं. दत्तमहाराजांचे रसाळ व्याख्यान झाले. आम्ही आनंदमग्न झालो. ३ दिवस त्यांचा मुक्काम ब्र. भू. दादांचे शिष्य कै. वैद्यराज आण्णासाहेब गुणे यांचेकडे होता.

दोन महात्म्यांच्या भेटीतील लौकिक बाबींचे वर्णन करतानाही जेथे लेखणी धजत नाही, तेथे त्यांनी परस्परांच्या संगती अनुभविलेल्या आनंदाचे वर्णन म्या पामरे तरी काय करावे ?

तेथील सांगावया वृत्तांत

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

परा वाचा मौन धरित
तेथे वैखरी उच्चार करित
कैसी त्वरित निघेल ?

१९७१ मधील ब्र. भू. दादांच्या पुण्यतिथीउत्सवाला येण्यास पुरेसा वेळ महाराजांना नव्हता. मी त्यावेळी म्हणालो, " महाराज, तुम्ही नाही म्हणालात तर मी कोठे जावे ? दुसरे थोर वंद्य संत पू. स्वामी स्वरूपानंद अत्यंत अशक्त आहेत. तुम्ही सांगा. मी काय करावे ? " महाराजांना हे माझे कोडे सुटेना. आणि प्रेमबुद्धीने त्यांनी या कार्यास येण्याचे मान्य केले. ब्र. भू. दादामहाराज व पू. गुळवणी महाराज यांचे संबंध हे असे होते. उभयतांचे चरणकमली माझे नम्र अभिवादन.

* *

## " हितगुज "

केला गुरुराये उपदेश ।
तोचि भक्तजना आदेश ॥ धृ ॥
प्रेम राहुदे आश्रमावरी ।
येत रहावे नित्य निरंतरी ॥
श्रद्धा ठेवा गुरुचरणावरी ।
हाची भक्तजना आदेश ॥ १ ॥
एक शक्ति जरि अनेक व्यक्ति ।
द्वेषाची ती पडो आहुती ॥
जाण साधना निज संपत्ती ।
दिधला भक्तगणां आदेश ॥ २ ॥
कधी कुणाला नच दुखवावे ।
उदासीन वृत्तिने रहावे ॥
" हरी " चिंतनी सदा रमावे ।
असा हा भक्तगणा आदेश ॥ ३ ॥
दुजा भाव कधि मनी नसावा ।
सर्वांभूती देव पहावा ॥
जाणा तोची अमोल ठेवा ।
ऐसा भक्त गणा आदेश ॥ ४ ॥
गुरुरायांनी हितगुज केले ।
वामनदासा पावन केले ॥
तेची गुह्य मी स्वल्प उकलिले ।
तोची शेवटचा संदेश ॥ ५ ॥

कवि – **पां. रा. लेले**, मुंबई

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# स्फुट विचारदर्शन व आठवणी

लेखक : **पू. वैद्यराज बाबामहाराज मानवतकर**

सद्गुरुवाचोनी सांपडेना सोय
धरावे ते पाय आधी आधी

**— श्री तुकाराम महाराज**

## सद्गुरूची आवश्यकता

श्री. संत तुकोबारायांनी वरील अभंगाचे दोन पंक्तीत श्रीसद्गुरुवाचून तरणोपाय नाही व अगोदर त्यांनाच आपले कल्याणार्थ शरण जावे असा सर्वांस उपदेश केला आहे.

श्री सद्गुरु व गुरुत्वाचा महिमा कोणत्याही कालात कमी होऊ शकत नाही. विज्ञानयुगात वैज्ञानिक विचार करणाऱ्या लोकांनाही गुरुत्वाचे महत्त्व नाकारता येणार नाही. आजचे ज्ञान पूर्वीचे ज्ञानावरच अधिष्ठित झाले आहे. ज्ञान सांगणारा कुणीतरी मार्गदर्शक, ज्ञाता असावा लागतो. ते ज्ञान सांगणारा गुरू व ज्ञान सांगणाऱ्याच्या परंपरेस गुरुपरंपरा असे म्हणतात.

पृथ्वीची गती मंदावली आणि एक सेकंद घड्याळे मागे घेण्यात आली हे कळले कसे ? गणित, गणितज्ञ, यंत्रे हे सारे गुरूच म्हणता येतील. श्री भगवान दत्तप्रभूने ज्यांचे गुण घेतले **त्या सर्व चोवीस** वस्तूंस **गुरूच** मानले आहे.

योगशास्त्रात योगाचे प्रामुख्याने चार प्रकार सांगितले आहेत. **मंत्रयोग, हठयोग, लययोग, राजयोग** असे ते चार प्रकार मानले आहेत. आतापर्यंत योगाचे जेवढे म्हणून निरनिराळे आविष्कार सांगितले आहेत ते बहुतेक वरील

चार प्रकारांतीलच अंगे आहेत असे म्हणता येईल.

योगाचे **पिपीलिका** व **विहंगम** असे दोन तऱ्हेचे मार्ग सांगितलेले आहेत.

आणखी सिद्धांचा **शक्तिपात योगाचा** एक सिद्धमार्ग सांगितलेला आहे. सिद्धगुरू आपल्या सिद्धशक्तिद्वारा शिष्यावर दीक्षाकृपेचा शक्तिपातरूपी संस्कार करतात व शिष्याचे शक्तिसंचलन घडवून आणतात. ज्या प्रमाणात सिद्धगुरु प्रबल सामर्थ्यवान असेल त्या प्रमाणात प्रबल समर्थ असा शक्तिपात होत असतो, व शिष्यही जेवढ्या प्रमाणात तो शक्तिपात स्वीकारण्यास पात्र असेल तेवढ्या प्रमाणातच तो ग्रहण करीत असतो.

## शक्तिपाताचे प्रकार

शक्तिपात योगात शक्तिपात करणारा सद्गुरू, अनुभवी, सिद्ध, सामर्थ्य-संपन्न, ज्ञाता, श्रोत्रिय, ब्रह्मनिष्ठ, इहपरनिष्णात, कडकडीत वैराग्यवान, निःस्पृह, सर्व प्राणिमात्रांविषयी कल्याणभावना असलेला, अंतःकरण करुणा-वात्सल्याने भरलेला असा असावा लागतो.

तसेच शिष्यही साधनचतुष्टय संपन्न अधिकारी, आचार, विचार, उच्चार शुद्ध, पवित्र, निर्मल असलेला, सद्गुरूला सर्वस्व समर्पण करून संपूर्ण शरणागती पत्करणारा तपस्वी, पुण्यशील, अनुग्रह घेण्यास तयार असलेला असावा लागतो.

उपरोक्त प्रमाणे गुरुशिष्याचा मंगल संगम झाल्यावर परमानंदाची प्राप्ती निश्चितच होईल यात शंका नाही.

सर्वसाधारण शक्तिपात दीक्षेचे तीन प्रकार सांगतात. **स्पर्शदीक्षा, दृग्दीक्षा, मनोदीक्षा** असे ते तीन प्रकार आहेत.

याविषयी काही उदाहरणे पाहाता येतील.

स्पर्शदीक्षेचे सर्वप्रसिद्ध उदाहरण म्हणजे श्रीगहिनीनाथ व श्रीनिवृत्तिनाथ यांचे सांगता येईल. त्र्यंबकेश्वरी ब्रह्मगिरी पर्वतावर ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा करताना श्रीनिवृत्तिनाथ, श्री गहिनीनाथांचे गुहेत त्यांचेजवळ अचानकपणे गेले व त्यांनी नुकतेच समाधी उत्थानानंतर आसनस्थ असलेल्या श्री गहिनीनाथांचे चरणावर साष्टांग प्रणिपात केला आणि श्रीमत् गहिनीनाथांनी आपल्या प्रबल सामर्थ्याने

भरलेला हात श्रीनिवृत्तिनाथांचे मस्तकावर ठेवून आशीर्वाद दिला. शक्तिपात झाला, सत्पात्र असलेल्या श्रीनिवृत्तिनाथांवर तत्काल परिणाम होऊन ते कृतार्थ झाले.

त्याप्रमाणेच श्रीनिवृत्तिनाथांनी त्या शक्तीने भरलेल्या आपल्या हाताने श्री ज्ञानेश्वर महाराज, श्रीसोपानकाका, श्रीमुक्ताई यांचेवर शक्तिपात केला होता, त्यांचेही झालेले अतिशीघ्र सुफल परिणाम सर्व जगाला दिसून आलेले आहेत.

दृग्दीक्षेचे सर्वपरिचित उदाहरण म्हणजे महान् मुनिवर श्रीरमण महर्षी यांचे सांगता येईल.

दर्शनार्थ त्यांचेकडे आलेले लोक त्यांचेबरोबर त्यांच्यासमोर भोजनास बसत असत. भोजनाची अरुणाचलम् आश्रमात अशीच व्यवस्था होती. श्रीरमणमहर्षी जेवतानाच त्यांच्याकडे पाहात. विशेष तऱ्हेने दृष्टिपात करीत असत, ज्याच्यावर त्यांची कृपादृष्टी होईल त्याच्यावर शक्तिपात होत असे व तो कृतकृत्य होत असे; भानरहित होत असे असा अनुभव आहे.

तसेच गिरिकंदरी, अज्ञात जागी, जनसंपर्काचे पैलतीरी आजही अशा अनेक महान विभूती, सत्पुरुष तपसाधना, ईश्वरी आराधना करीत बसलेले आहेत. त्यांचे भक्तांवर ते अतींद्रिय शक्तिद्वारा मनोमन शक्तिपात करून आनंदविभोर करीत आहेत अशीही फार प्रचिती येते.

## सव्यसाची श्रीगुळवणी महाराज

आमचे पूजनीय श्री गुळवणी महाराज तर स्पर्शदीक्षा व मनोदीक्षा दोन्हीही देत होते. दीक्षा घेण्यास प्रत्यक्ष समोर आलेल्या भक्त साधकांस स्पर्शदीक्षा देत होते व बाहेरगावी दूर असलेल्या अप्रत्यक्ष भक्त साधकांस दिवस व वेळ देऊन आसनावर बसण्यास सांगून मनोदीक्षाही देत होते.

शक्तिपाताचे असे विलक्षण अनुभव कसे येतात ? असे विचारल्यावर अनुभवावाचून काय समजून सांगणार ? असेच म्हणावे लागते.

पुढे पुढे काही दिवसांपासून पूजनीय श्री गुळवणी महाराज हे त्यांचेकडे येऊन

दीक्षा मागणाऱ्या प्रत्येक साधकास दीक्षा देत होते, त्यात हेतू हा होता की कोणाचीही अडवणूक होऊ नये, प्रत्येकाच्या कल्याणाचा मार्ग त्याला मोकळा व्हावा.

पूजनीय श्री गुळवणी महाराजांकडे दीक्षा घेणाऱ्या प्रत्येक साधकास अनुभव मात्र वेगवेगळे येत होते. पू. महाराजांना याविषयी विचारल्यास त्यांनी सांगितले की पूर्वकर्मानुसार ज्याला त्याला अनुभवाचे प्रकार होतात व पूर्वकर्मानुसारच त्याची प्रगतीही होत असते. तसे नसते तर दीक्षा झाल्याबरोबर सर्वच श्री ज्ञानेश्वर महाराज झाले असते. सत्कर्म, सदाचार, तपश्चर्या, अनुष्ठान इत्यादि पुण्यकर्माला काही महत्त्वच उरले नसते.

गंगेचा प्रचंड प्रवाह वाहत असतो पण त्यातून पाणी घेणारा आपलेजवळ असलेल्या भांड्यांत मावेल एवढेच पाणी घेणार ! या न्यायाने ज्याच्या त्याच्या पात्रतेनुसार ज्याच्या त्याच्या पदरात माप पडत असते. सर्वच लोक दीक्षा झाल्याबरोबर पूर्णत्वास प्राप्त होत नाहीत, त्यांना साधना करावीच लागते.

शक्तिपात दीक्षाप्रकार वरच्या पातळीवरील योगी लोकांत बंदिस्त होता तो प्रकार पूजनीय श्री गुळवणी महाराजांनी बृहनमहाराष्ट्रात तरी, लहानथोर, रावरंक, स्त्रीपुरुष, जातिधर्म यांचा भेदभाव न करिता विशेषापासून सामान्यांपर्यंत सर्वांना सवंगपणे प्रसादरूपाने वाटला आणि हे त्यांचे आपल्या समाजावर फार मोठे उपकार आहेत. फार ऋण झालेले आहे. आपण त्यांचे उतराई कुठल्याही प्रकारे होऊ शकत नाही. त्यांची परंपरा जिवंत व जागृत ठेवणे एवढेच आपले कर्तव्य आहे. ते कर्तव्य सर्वांनी अधिकारपरत्वे करीत जावे यात त्यांचा आशीर्वाद अखंड राहील.

* *

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# " पूज्य महाराजांना अनावृत पत्र "

लेखक : **प्रा. सु. ग. शेवडेशास्त्री**, चेंबूर

परमपूज्य गुरुमाउलीस,
साष्टांग नमस्कार,

आपण मन निष्ठुर करून एक वर्षापूर्वी आम्हाला सोडून गेलात. चर्मचक्षूंना सहज दिसणारा देह सोडून गेलात. चैतन्य स्वरूपाने आपण विश्वाकार झालात. 'विश्वीं विश्वंभर' पाहायला शिकवून गेलात. आपण आमच्या जवळपास आहात असा पदोपदी प्रत्यय यावा अशा विविध लीला आपण गेल्या वर्षाभरात केल्यात. तरीही गुरुदेव, आपण आम्हाला दिसत नाही. आम्ही शोधतो आहोत. आपण 'द्रष्टव्य...श्रोतव्य...निदिध्यासितव्य' झालात. आपण दृश्य, श्राव्य होतात, सगुण होतात, ते निर्गुण झालात. सहज लभ्य होतात, आता दुर्लभ झालात. आणि आम्ही गोंधळून गेलो. आपण गेल्याचे वृत्तपत्रात वाचून बेचैन झालो आणि पिसाट वेगाने स्कूटरवरून सरळ पुण्याला आलो. नानासाहेब सरनोबतांना बरोबर घेऊन पावणेतीन तासांत पुणे गाठले. आपले अंत्यदर्शन झाले. आम्ही व्याकुळ झालो. वेडावलो. जणू आपण कायमचेच गेलात. पण महाराज, खरेच, सगुणाचा आनंद निर्गुणात नाही. भक्तीचा ओलावा मुक्तीत कुठे आहे ? संतसमागमाचा गोडवा ईश्वरसान्निध्यातही नसेल. संतमाता, ईश्वरपिता. म्हणून तर आचार्यांनी 'भवार्णव तरणे नौका' अशी संतसंगतीची स्तुती केली आहे. आपल्या सगुणसाकार व्यक्तिमत्त्वाच्या दर्शनाला, सान्निध्याला मुकण्याने येणारी विफलता स्वाभाविक आहे.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

पण आपण असे अनेक अनुभव भक्तांना देत आहात की जेणे करून आपल्या निर्गुण निराकार अस्तित्वाचा, ‘ कृपाळुपणे अल्प धारिष्ट ’ पाहात असण्याचा साक्षात्कार व्हावा. आपण देहाने असतानाचा माझ्यासारख्या सामान्य ‘ बालमती ’कडून श्रीमद्‌भागवत ग्रंथ सांगून घेतलात. श्री. पांडुरंगराव लेले यांच्या खोलीवर दादरला ! ‘ तरी त्या विश्वंभरे बोलविले ’ याचाच तो अनुभव नव्हे का ? ज्या ग्रंथावर मी एकदाही प्रवचन केले नव्हते त्याचा सारांश सतरा प्रवचनात सांगितला गेला. त्याच कालखंडात आपल्या कृपेची शाल माझ्या अंगा-वर आपण पांघरल्याचा स्वप्न-साक्षात्कारही घडला. आणि श्रीमद्–भागवत कथानकात भगवंतांनी देह ठेवल्याचा विषय आला त्याच सुमारास आपणही देह ठेवलात.

श्री. कृ. ह. जोशी यांनी अलिकडेच बोरिवलीस श्रीमद् भागवत सप्ताह करविला. परमपूजनीय दत्तमहाराज कवीश्वरांचे तोंडून भागवत ऐकण्याचे, त्यांच्या सान्निध्यात १० दिवस राहण्याचे, रात्री आपल्या अल्पमतीनुसार ‘ हिंदु धर्म समजून घ्या ’ या विषयावर प्रवचने करण्याचे भाग्य लाभले. ही प्रवचने ऐकायला पूज्य दत्तमहाराज स्वतः बसत असत. ’ बालक बापाचिये ताटी रिगे । रिगोनी बापातेंच जेववूं लागे ॥ ’ तसा प्रकार झाला. पू. दत्तमहाराजांनी खूप कौतुक केले. त्याने मूठभर मांस चढले. इतर हजार एका पारड्यात अन् मर्यादापुरुषोत्तम दत्तमहाराज दुसऱ्यात, असा ज्यांचा अधिकार, नव्हे...नव्हे, आपण ज्यांना उत्तराधिकार द्यावेत ते पू. दत्तमहाराज ! हीच त्यांची सर्वात मोठी पदवी, त्यांची सप्ताहानिमित्त जवळीक लाभली, ही आपलीच लीला नव्हे तर काय ?

आपल्याच प्रेरणेने सध्या श्री. जोशी यांचेकडे ‘ गुरुगीता ’ सांगण्याचा योग येत आहे. दर महिन्याच्या पंधरा दिनांकाला !

लौकिक जीवनातही अपघात, आपत्ती, हितशत्रूंचा विरोध इत्यादि संकटे येतात, पण त्या साऱ्यांचा आमच्या कल्पनेतही येणार नाही अशा प्रकारे निकाल लागतो. असे सर्वांचे व्यक्तिगत अनुभव जमा करायचे तर कागद पुरायचा नाही. येवढी आपली लीला अगाध आहे.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

आपण उभारलेली धर्मध्वजा उंचावत ठेवणे हे धर्मनिष्ठ गुरुभक्तांचे कार्य आहे. ते करण्यास आपणच आम्हास बळ देणारे आहात, आणि त्याचा मार्ग निष्कंटक करण्यासही आपणच प्रेरणा देणारे आहात. हीच आमची शक्ती व हाच आमचा आधार.

* *

## भूपाळी

उठी उठी श्री गुरुवरा। पहाट झाली। भक्त मंडळी। उभी तुझ्या द्वारा ॥ धृ ॥
परम दयाघन। पतीत पावन। उठि बा वामन। चित्त–चकोरा ॥ १ ॥
वाट पाहे चंद्र गगनी। तारा मंडळ सवे घेऊनी ॥
दर्शन व्हावे तयासि म्हणुनी। रवि न उगवे श्रीवरा ॥ २ ॥
मधुर स्वरांनी खग आळविती। तरूलता आनंदे डुलती ॥
सुमनांचाही सडा शिंपिती। उठी उठी श्रीकृपावरा ॥ ३ ॥
मंद सुगंधित वारा शीतल। चरण स्पर्शुनी देई चाहुल ॥
वाट पाहते भक्तमंडळ। दर्शन दे करुणावरा ॥ ४ ॥
बाळ का ना उठला म्हणुनी। माय उमा ती श्रीभवानी।
उभी ठाकली सन्मुख येउनी। त्वरे उठा योगेश्वरा ॥ ५ ॥
तुझीच सत्ता चराचरावरि। वश्य तुजला विरंचि हरहरि ॥
म्हणुनि भक्तगण तुझे चरण धरी। सांभाळी श्री प्रभुवरा ॥ ६ ॥
संतदर्शन घेण्यासाठी। नारद सुरवर ये भूवरति ॥
कावडि वाहे तो जगजेठी। दर्शन दे श्रीगुरुवरा ॥ ७ ॥
मायेची रे वात करूनी। भक्ति घृताने तयासि भिजवुनी ॥
मम प्राणांची ज्योत उजळुनी। ओवाळी तुज सुखकरा ॥ ८ ॥
मंगलमय तव चरण पाहुनी। तिमिर जाई सत्वर पळुनी ॥
वामनदास प्रार्थि विनवुनी। उघडी नयन श्री गुरुवरा ॥ ९ ॥

कवि — **पां. रा. लेले**, दादर.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# दुर्लभ दान देणारा दाता

ले : कुमारी सुशीला मोडक

‘ दिनाचा दयाळू मनाचा मवाळू ।
स्नेहाळू कृपाळू जगीं दासपाळू ।
तया अंतरीं क्रोध संताप कैंचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ’

श्रीसमर्थांनी वरील मनाच्या श्लोकामध्ये भगवंताच्या खऱ्या दासाचे लक्षण सांगितले आहे ते आमच्या श्रीसद्गुरूंचे यथार्थ वर्णन आहे.

दीनदुबळ्यांचे कैवारी, अंतःकरणाने कनवाळू, प्रेमळ स्वभावाचे कृपाशील आणि निराश्रितांचा, शरणागतांचा आधार असलेल्या श्रीगुरुमहाराजांच्या अंतःकरणात क्रोधाला, संतापाला कोठून वाव मिळणार ?

वासुदेव-निवास आश्रम हे श्रीगुरुदेवांचे निवासस्थान जेथे गेल्यानंतर श्रम नाहीसे होतात तो आश्रम. आश्रमामध्ये श्रीगुरुमहाराजांच्या दर्शनाला गेले असताना सर्व तऱ्हेची दुःखं विसरून जाऊन, मनातील संकल्प–विकल्प नष्ट होऊन, एवढेच नव्हे तर मनाचे ‘ मन ’ पण नष्ट होऊन केवळ एक ‘ आनंद ’च शिल्लक उरत असे. श्रीसद्गुरु समर्थांनी दासबोधात असे सांगितले आहे “ संत आनंदाचे स्थळ । संत सुखचि केवळ । नाना संतोषाचे मूळ । ते हे संत ॥ ”

अनेक प्रकारच्या समाधानाचे, संतोषाचे मूळ स्वरूप असलेले असे परम योगिराज सद्गुरु महाराज आश्रमात राहात होते. येथे येणाऱ्या प्रत्येक मुमुक्षूला ‘ मायातीत असलेला जो अनंत ’ त्याच्या स्वरूपाची सोयीसोयीने

ओळख करून देणारे ते मंगलमय महेश्वर होते. ब्रह्मात्मबोधात सतत निमग्न असलेले आणि कृपाळू म्हणजे शिष्यास कळकळीने, हळुवारपणे उपदेश करत असल्यामुळे प्रत्येक मनुष्य आश्रमातून मोठ्या उत्साहाने, आनंदित मनाने बाहेर पडत असे. साक्षात् परब्रह्मस्वरूप असलेले श्रीगुरुमहाराज फारसे काही बोलत नसत. 'गुरोऽस्तु मौनं व्याख्यानं, शिष्यास्तु छिन्नसंशयाः।' ही उक्ती त्यांच्या बाबतीत अगदी सार्थ आहे.

या अफाट अशा विश्वाच्या पसाऱ्यात अज्ञ जीव संसारात भरडले जातात. त्यांचा उद्धार व्हावा म्हणून महान अशा दिव्य शक्तीचे प्रदान श्रीगुरुमहाराज करीत असत. योगदीक्षा देत असताना सुद्धा मी काही विशेष करतोय असे नाही तर "मोटके गुरुमुखे उदैजत असे। जे हृदयी स्वयंभचि असे।" ही अलिप्ततेची भावना दृढ असे.

वयाच्या ८५ व्या वर्षी 'रौद्रीशांती' समारंभ झाला. रौद्रीशांती झाल्यानंतर श्रीगुरुमहाराजांनी प्रभु दत्तात्रेयांच्या प्रेरणेने श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथील सभामंडप बांधण्याचा संकल्प केला. ३ ते ३॥ वर्षांत लाखोने पैसे जमा झाले. उत्कृष्ट सभामंडप बांधला. नृसिंहवाडी येथील विश्वस्तांच्या स्वाधीन महाराजांनी सभामंडप केला व आपले अवतारकार्य संपवले. त्याला आज वर्ष झाले.

गुरुगीतेत असे म्हटले आहे, "गुकार तो अज्ञान अंधकार। रुकार वर्ण दिनकर। स्वयंप्रकाश तेजासमोर। न राहे तिमिर क्षणभरी।" म्हणजेच 'गुरु' हे तत्त्व आहे. ते कधीही नाश पावत नाही. परंतु खरं सांगू का––अलर्काला जसे प्रभू दत्तात्रेयाच्या सगुण स्वरूपाच्या दर्शनाची ओढ होती, त्याप्रमाणे ते प्रेमळ, निरागस हास्य असलेले श्रीसद्गुरूंचे सगुण स्वरूप आता कुठे बघावयास मिळणार ???

त्रैलोक्यात ज्याचे दान मिळत नाही अशा परमतत्त्व असलेल्या योगदीक्षेचे दान सतत ज्यांनी केले व मोक्षरूपी संपत्तीला अलंकृत केले अशा श्रीगुरु महाराजांच्या चरणांशी मी पूर्ण शरण आहे. श्रीसद्गुरुकृपेने लिहिलेले हे वाङ्मयरूपी तुलशीदल श्रीगुरुमहाराजांच्या चरणी अर्पण करून एवढेच मागणे मागते–की हे श्रीगुरुदेवा, "मी भक्त तू देव ऐसे करी॥" ✱ ✱

॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥

॥ श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः ॥

# आश्रमवृत्त

● ● ● ● ● ● ● ● ● ● ● ● ● ● ●

लेखक : **गुरुभक्त केसरी श्री. बापूसाहेब कुबडे**, सोलापूर

**'अधिष्ठात्री देवता'**

प. पू. योगिराज श्री गुळवणी महाराज यांनी आपले सद्गुरु श्री. प. प. वासुदेवानन्द सरस्वती टेंबे स्वामी महाराज व श्री. प. प. लोकनाथतीर्थ स्वामी महाराज या उभय साक्षात्कारी महापुरुषांचे स्मारक म्हणून पुणे येथे 'श्रीवासुदेव निवास' या वास्तुद्वारा एक 'ट्रस्ट' सुमारे दहा वर्षांपूर्वी निर्माण केला व या वास्तूमध्ये स्वतः वास्तव्य करून आज दहा वर्षे विविध प्रकारची लोकोद्धारक कार्ये केली व विश्वस्तांचे हस्ते करविली. त्यासंबंधी आज स्थूल मानाने या ट्रस्टद्वारा काय काय होत असते व पुढील संकल्पित कार्ये कोणकोणती आहेत याबाबत थोडक्यात वृत्त सादर करीत आहोत.

आश्रमात श्रीगुरुमहाराजांची 'कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी' व मातोश्रींना नृसिंहवाडीस साक्षात् प्राप्त झालेल्या 'श्री प्रसाद पादुका' या प्रधान देवता असून वरील 'उभय सद्गुरूंचे प्रतिमा रूपाने नित्य वास्तव्य' आहे व यांचेच पूजन, अर्चन, विविध उपासना वगैरे अखंड सतत चालू आहे.

**'सध्याची नित्य दैनंदिनी' –**

विश्वस्तांपैकी एक विश्वस्त श्री. भुजंग बलवंत तथा नाना भालेराव हे या आश्रमात श्रीगुरुमहाराजांचे बरोबरच वीस नारायण पेठमधून सहकुटुंब वास्त-

व्यास आले आहेत. त्यांचे या आश्रमात नित्याचे वास्तव्य असलेमुळे आश्रमांतील 'पूजा-अर्चा आतिथ्य' आदि सर्व प्रकारची व्यवस्था, देखरेख वगैरे सर्व काही तेच करून आहेत. इतकेच नव्हे तर श्री. नाना व त्यांच्या सहधर्मचारिणी सौ. गोदूताई या दांपत्याचा हे वरील व्रत आजन्म चालवावे असा संकल्प आहे.

दररोज पहाटे श्री. नाना भालेराव, सौ. गोदूताई, सौ. कोचकप्रभृति काही महिला भक्तांच्या उपस्थितीत काकडा, भूपाळी, प्रातःस्मरण, प्रार्थना वगैरे काही साधारणतः होते; नंतर उपस्थित महिलाभक्त काही गाणी वगैरे म्हणतात व नंतर सडासंमार्जन करून स्वगृही जातात.

## निरलस सेवा

यानंतर थोडयाच वेळाने गुरुमहाराजांचे एक सुविद्य निष्ठावान् भक्त प्रा. अरुणराव नगरकर हे आश्रमात येतात व प्रवेशद्वारापासून वरपर्यंतच्या सर्व पायऱ्या, मंदीर, वरील गुरुमहाराजांचे निवासस्थान व वरचा हॉल झाडून ओल्या फडक्याने सर्व फरशी व पायऱ्या पुसून स्वच्छ करणे हे कार्य करतात. व देवांचे सर्व निर्माल्य गोळा करून नदीमध्ये समर्पण करतात. त्यांची ही नित्याची सेवा पाहून सर्वांना त्यांच्या गुरुभक्तियुक्त निगर्वी स्वभावाचे कौतुक वाटते व प्रतिमासी चार आकडयांमध्ये प्राप्ती मिळविणारा हा तरुण, सुशिक्षित गुरुभक्त इतकी साधी कष्टमय सेवा निरलसपणे नित्य करीत आहे तेव्हा गुरुमहाराजांचे कृपेने भगवत्गीतेमधील 'अमानित्वादि' लक्षणांचा अंशतः काही तरी या ठिकाणी परिपाक झालेला असावा असे वाटणे साहजिक आहे.

यानंतर थोडयाच वेळात श्री. रघुनाथराव कुलकर्णी हे दररोज सकाळी आश्रमात लागणारी सर्व प्रकारची मंडई भाजीपाला आणून देतात. ही दररोज मंडई व लहान मोठे मधून मधून होणाऱ्या उत्सवाकरिता लागणारी मंडईही हेच आणून देतात. ही त्यांची नित्याची गुरुसेवा चालू आहे.

थोडयाच वेळात सकाळी श्री. नाना भालेराव हे स्नान करून मंदिरात येतात. ते आल्यावर मंदिराचा जाळीचा दरवाजा वर चढविला जातो व संध्या-

पूजन कार्य सुरू होते. दररोज देवास रुद्र-पवमानादि अभिषेक होत असतो व ते तीर्थ अखंड सर्व दर्शनास येणाऱ्यांना मिळण्याची व्यवस्था केली जाते. अभिषेकाचे वेळी श्री. नानांना साथ देण्यास श्री. अण्णा लोहोकरे, श्री. पानसे प्रभृती स्थानिक भक्त व परगावचे कोणी वे. दत्तभटजी, वे. प्रभाकर कोडणीकर, श्री. पंडितराव गडहिंग्लजकर प्रभृती मधून मधून येतात तेव्हा तेही साथ देतात.

साधारणतः श्री. नानांचे हे पूजन-अर्चन कार्य अकरा-साडेअकरापर्यंत चालते. नानांनी केलेली ही पूजा पाहून 'पूजुनि देव पाहिजे' या श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या उक्तीची आठवण होऊन गुरुमहाराजांना व दर्शनास येणाऱ्या मंडळींना फार समाधान वाटते.

## नित्य उपासना अनुष्ठान

गुरुमहाराजांचे उपाध्याय वे. जगन्नाथशास्त्री पुजारी गुरुजी हे दररोज सकाळी आश्रमात येऊन 'सप्तशती पाठ' करीत असतात. ते वैदिक असून अनेक यजमानांची त्यांचेकडे कामे असतात तेव्हा व परगावी गेले तर तेथे त्यांनी घरी व असतील तेथे पाठ करावा अशीच त्यांना गुरुमहाराजांची सूचना असे. तसेच पं. दत्तमहाराज हे घरचे देवतापूजन वगैरे उरकून सकाळी नऊचे सुमारास आश्रमात येत असतात व आश्रमात आल्यावर त्यांचे नित्याचे 'गुरुचरित्र वाचन' चालू असते. प्रवासातही ते जिथे मुक्काम असेल तेथेही त्यांचे हे गुरुचरित्र वाचन कार्य सतत चालूच आहे.

सुमारे बारा वाजण्याच्या सुमारास देवास नैवेद्य वैश्वदेव वगैरे होऊन कोणी अतिथी आणि पाहुणे भक्तमंडळी आली असल्यास त्यांचेसह भोजन होत असते. सहसा कोणी ना कोणी तरी येत असतात तेव्हा 'नित्य श्री नित्य मंगल' सतत चालू आहेच.

तिसरे प्रहरी कोणी परगावचे प्रवचनकार, कीर्तनकार आले असतील तेव्हा मधूनमधून त्यांचे कार्यक्रम होत असतात. तसेच खुद्द पं. दत्तमहाराज यांचेही प्रवचन कधी कधी होत असते.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

## आरती व स्तोत्रे

गुरुमहाराज दररोज सायंकाळी सायंसंध्या वगैरे झाल्यानंतर देवांची आरती करीत असत. नारायण पेठेमध्ये राहात असतानाही ही आरती होत असे व आरतीस तेव्हाही बरीच मंडळी येण्याची प्रथा असे. तीच प्रथा आश्रमात आले-नंतरही चालू ठेवली असून, उपस्थितांची संख्या वाढलेली आहे. विशेषतः गुरुवारची उपस्थिती नेहमीच जास्त असते.

सुरवातीस प्रथम मंगलमूर्तींची 'सुखकर्ता दुःखहर्ता' ही, नंतर जगदंबेची 'दुर्गे दुर्घट भारी' ही नंतर श्री टेंबे स्वामीमहाराज यांनी केलेल्या श्रीदत्त आरती पैकी रविवारी 'जयजय श्रीमत् गुरुवर देवाधिदेवा', सोमवारी 'जय मायामय कायत्रयपरयतिवर्या', मंगळवारी 'करितो प्रेमे तुज नीरांजन', बुधवारी 'दिगंबरा दिगंबरा', गुरुवारी 'अत्रिऋषिपत्नी पतिव्रताख्याती', शुक्रवारी 'जयजय श्रीमत् गुरुवर', शनिवारी 'जयतत्त्वज्ञान निधान', याप्रमाणे वारा-नुसार श्रीदत्त आरती होते व शेवटी श्री टेंबे स्वामी महाराजांची श्रीदीक्षित स्वामी महाराजांनी केलेली 'जयजय श्रीमत् गुरुवर परमात्मन् हंसा' ही आरती होते.

आरती संपताच 'नमः श्रीगुरो' 'श्रीपाद श्रीवल्लभं' 'क्षमस्वापराधं' आणि 'ऋतकृत' अशी चार स्तोत्रे झाल्यावर मंत्रपुष्प होते व नंतर 'करुणात्रिपदी' व 'सांगावे कवण्या ठाया जावे' हे होऊन 'दिगंबरा दिगंबरा' हे भजन थोडा वेळ होते. हे भजन होत असताच उपस्थितांना प्रसाद वाटला जातो व ह्या आरतीच्या एकंदर कार्यक्रमाची समाप्ती होते.

प्रत्येक मंगळवारी तिसरे प्रहरी आश्रमात काही महिलांचे भजन असते व रात्री ९ ते १० सौ. डॉ. स्नेहलताताई कुलकर्णी यांचे भजन असते. या भजनास श्री. भाऊसाहेब शिंगणे, त्यांच्या पत्नी, प्रा. चव्हाण, श्री. पटवर्धन, श्री. बाळासाहेब कुलकर्णी मोटारवाले श्री. व सौ. पीलखाने, श्री. शरद जोशी प्रभृती मंडळी उपस्थित असतात.

मनुष्यप्राणी हा जात्याच उत्सवप्रिय आहे. आणि त्याला अनुसरूनच आपल्या

भारतीय संस्कृतीमध्ये प्राचीन ऋषि–मुनींच्या कालापासून प्रतिवर्षी निरनिराळे उत्सव व सण साजरे करण्याची पद्धत अंगीकारलेली आहे व त्या सर्वांची नोंद प्रतिवर्षी पंचांगामध्ये दिलेली असते. त्यास अनुसरूनच आश्रमातही प्रतिवर्षी विविध उत्सव साजरे केले जातात.

**' जयंती–उत्सव '**

( १ ) श्री दत्तजयंती, ( २ ) श्री गोकुळअष्टमी, ( ३ ) श्रीपाद श्रीवल्लभ जयंती, ( ४ ) श्री नृसिंहसरस्वती जयंती ( ५ ) श्री टेंबेस्वामी महाराज जयंती. यांपैकी श्रावण वद्य अष्टमी म्हणजे गोकुळ अष्टमी, गणेशचतुर्थीस सूर्योदयी श्रीपाद श्रीवल्लभाचा जन्म व पौष शुद्ध द्वितीयेस श्रीनृसिंह सरस्वतींचा जन्म हे तीन उत्सव अगदी साधे व एक एक दिवसांचेच केले जातात. श्रावण वद्य पंचमीस श्री टेंबेस्वामी महाराजांची जयंती पाच दिवस साजरी केली जाते व श्रीदत्तजयंती उत्सव सात दिवस साजरे केले जात असतात. अलिकडे आश्रम सुरू झाल्यापासून परगावी होणारे सर्व उत्सव या आश्रमात करण्यात येतात. पूर्वी हे दोन उत्सव हैदराबाद येथ श्रीमान् शंकरकाका आजेगावकर देशमुख व त्यांचे व्याही श्रीमान् बापूसाहेब मोहरीकर जहागीरदार या उभयतांकडे सदाचार वास्तूमध्ये साजरे केले जात होते. या दोन्ही उत्सवांत कथा, कीर्तन, प्रवचन भजन आदि कार्यक्रम होत असतात.

**' गुरुमहाराजांचे वर्धापनदिन '**

गुरुमहाराजांचा जन्म मार्गशीर्ष वद्य त्रयोदशी शके १८०८ दिनाक २३ डिसेंबर १८८६ गुरुवार रोजी झाला. त्यांच्या मातोश्री आपल्या सर्व मुलांचा प्रतिवर्षी सर्वसामान्य घरगुती पद्धतीने वाढदिवस जन-रूढीनुसार अगदी साधेपणे करीत असत. त्याला त्यावेळीं विशेष असे किंवा सार्वजनिक असे काहीच स्वरूप नसे. जेव्हा श्रीगुरुमहाराज बार्शीस आले तेव्हा त्यांचे वय अवघे ३० वर्षांचे होते. सन १९१६ ची गुरुद्वादशी झालेवर गुरुमहाराज बार्शीत ड्रॉईंग मास्तर म्हणून नोकरीस आले. नंतर काही लोकसंग्रह होऊ लागला; परंतु बार्शीस असेपर्यंतच पुढे १९२६ साली पुणे येथे आल्यावर वयाची ५० वर्षे पुरी होईपर्यंत त्यांच्या

वर्धापन दिनाने काही विशेष स्वरूप धारण केलेले नव्हते. जेव्हा गुरुमहाराजांची वयाची पन्नास वर्षे पूर्ण झाली व एकावन्नावे वर्ष लागले तेव्हा मात्र सोलापूर येथे यांचा श्री. वैद्यमास्तर यांचे वाड्यात श्री. बापूसाहेब कुबडे हे राहात होते, त्यांचेकडे श्री. वैद्यमास्तरांचे व श्री. बापू कुबडे यांच्या मातुश्रींचे इच्छेनुसार किंबहुना आग्रहानुसार गुरुमहाराजांचा 'सुवर्णमहोत्सव' थोडक्यात पण 'इष्ट–परिचित–भक्तांसह' सोलापूर येथे साजरा झाला व तेव्हापासून या वर्धापन दिनाने चांगलेच मूळ धरले व त्याची परिणती पुढे मोठमोठे महोत्सव होण्यात झाली.

गुरुमहाराजांची षष्ट्यब्दिपूर्ती श्रीक्षेत्र नरसोबावाडी येथे मध्यम स्वरूपात केवळ धार्मिक 'शांति विधी' सह साजरी झाली. विशेष प्रमाणात झाली नाही. प्रथमपासून गुरुमहाराजांची वृत्ती प्रसिद्धिपराङ्मुख असे. त्यांना प्रसिद्धी सहसा आवडत नसे. परंतु प्रसिद्धीला स्वस्थ बसवेना. तिला महाराज आवडले होते म्हणून ती हात धुऊन सारखी महाराजांचे पाठीमागे लागली. शेवटी महाराज हरले व प्रसिद्धी यशस्वी झाली व तिने पुढील इतिहास बनविला तो असा :

## 'श्रीटेंबे स्वामीमहाराज जन्मशताब्दि महोत्सव, भाग्यनगर'

कस्तुरीमृगाचे नाभिकमलामधून निघणाऱ्या कस्तुरीने आपली प्रसिद्धी होऊ नये म्हणून कितीही जरी प्रयत्न केला तरी तिचा तो सुगंध तिला थोडाच स्वस्थ बसू देणार ? तद्वत महाराजांची अवस्था झाली. प्रथम नागपूरचे माजी मुख्यमंत्री डॉ. ना. भा. खरे यांचे बंधू पंडित त्र्यंबकशास्त्री खरे या नावे पूर्वाश्रमी परिचित असलेले व पुढे ते श्रीशंकराचार्य या नावे प्रसिद्ध झालेले यांनी पूर्वाश्रमीच गुरुमहाराजांची योगशास्त्रामधील प्रगती व अधिकार पाहून व महाराष्ट्रात शक्तिपात-दीक्षेचा संप्रदाय प्रचार करीत असल्याचे समजून गोरखपूर येथील कल्याण मासिकाच्या 'योगांक' या विशेष अंकामध्ये गुरुमहाराजांची प्रसिद्धी दिली व ही अधिकृत प्रसिद्धी झाल्यापासूनच गुरुमहाराजांकडे साधकांची रीघ लागली.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

त्यानंतर जशी साधकांची ये-जा सुरू झाली तशीच श्री टेंबे स्वामीमहाराजां-सारख्या दत्तावतारी सत्पुरुषाचे अमोल अमृतमय वाङ्मय कल्याणकारक असल्यामुळे ते समग्र वाङ्मय गुरुमहाराजांनी जरूर प्रकाशित करावे अशी अनेकांकडून विचारणाही सुरू झाली व ही ईशइच्छेनुसार झालेली प्रेरणाच अत्यंत क्रांतिकारक ठरली ती अशी :

## ' प. पू. योगीराज श्री गुळवणी महाराज '

येथपर्यंत महाराज हे अद्याप ' महाराज या संज्ञेस ' पात्र झालेले नव्हते व फक्त ' योगाभ्यासी सदाचारसंपन्न श्री वामनरावजी गुळवणी ' एवढीच ओळख होती. परंतु ईश्वरी संकेत वेगळा होता. श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे श्री टेंबे स्वामी महाराजांचे समकालीन ब्रह्मश्री वक्रतुंड महाराज कवीश्वर म्हणून एक अधिकारी गाणपत्य व दत्तभक्त महापुरुष होते. श्री स्वामीमहाराज यांचा सकाळी भाष्य पाठ चालत असे त्यावेळी स्वामी महाराज श्री वक्रतुंड महाराज आले का ? अशी चौकशी करीत व शास्त्रीबुवा ' मी आलो आहे ' पाठ सुरू व्हावा अशी उभे राहून प्रार्थना करीत व सायंकाळी श्री वक्रतुंड महाराजांचे प्रवचन चालू असताना खुद्द श्री टेंबे स्वामीमहाराज प्रवचनास उपस्थित राहात असत. श्री वक्रतुंड महाराजांचे चिरंजीव ब्रह्मश्री धुंडिराज महाराज हे हल्ली ९० वर्षांचे असून त्यांचा निवास सध्या देऊळगावराजा येथे असतो. त्यांचेच चिरंजीव म्हणजे विद्या वाचस्पती राष्ट्रीय पंडित ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर हे होत.

श्री टेंबे स्वामीमहाराजांचे समग्र वाङ्मय गुरुमहाराजांनी प्रकाशित करावे अशी मागणी होण्यास व पं. दत्तमहाराज गुरुमहाराजांचे नजरेत येण्यात काही तरी ' ईश्वरी संकेत ' असावा. सन १९४५ ते १९५४ आपला सर्व उद्योग संभाळून दररोज दहा दहा, बारा बारा तास खपून श्री टेंबे स्वामीमहाराजांचे समग्र वाङ्मय एकत्र करून अक्षर नि अक्षर तपासून ते बारा खंडांमध्ये प्रकाशित करण्यासंबंधीची सर्व योजना गुरुमहाराजांनी पं. दत्तमहाराजांचेद्वारा हाताळली. व सन १९५४ साली हैदराबाद–' भाग्यनगर ' येथे ' श्री टेंबे स्वामीमहाराजांचा जन्मशताब्दि महोत्सव ' मोठ्या प्रमाणात साजरा करून ते द्वादश खंड

श्रीचरणी पं. आत्मारामशास्त्री डोळे यांचे हस्ते समर्पित केले गेले. या महोत्सवापासून मात्र गुरुमहाराज हे महाराज या संज्ञेनें मोठ्या प्रमाणात सर्वांना विदित झाले. अशा या निमित्ताने महाराज हे केवळ महाराष्ट्रापुरतेच न राहता त्यांची कीर्ती अखिल भारतीय स्तरावर चमकू लागली.

## 'अमृत महोत्सव'

पुढे सन १९५७ साली पुणे येथे गुरुमहाराजांना सत्तर वर्षे पूर्ण होऊन ७१ वे वर्ष लागले तेव्हा त्यांचा 'भीमरथी शांति' कार्यक्रम वाडी येथे जन्मतिथीस धार्मिक विधीने झाला. त्यावेळी बार्शी येथील वैदिकांनी त्यामध्ये प्रामुख्याने भाग घेतला होता व पुढे पुणे येथे सात दिवस खुन्यामुरलीधर मंदिरात ऋक्संहिता स्वाहाकारादि धार्मिक अनुष्ठान झाले. शिवाजी मंदिरात कीर्तन प्रवचनादि कार्यक्रम झाले. यावेळी हा समारंभ अगोदर सोलापुरी करावा असे ठरले होते परंतु पं. दत्तमहाराज कवीश्वर व वे. शा. सं. जगन्नाथशास्त्री पुजारी गुरुजी यांनी ह. भ. प. सोनोपंत मामा दाण्डेकर व म. म. दत्तोपंत पोतदार यांचे विचारे व नेतृत्वाखाली पुणे येथे करण्याचे ठरविले व शेवटचे दिवशी लोणावळा येथील कैवल्यधामचे संस्थापक. संवर्धक व संगोपक 'श्री. कुवलयानंद स्वामीजी' यांचे अध्यक्षतेखाली टिळक स्मारक मंदिरात गुरुमहाराजांचा मोठा सत्कार केला व त्यावेळी एक 'श्रीगुरुदत्त योग' नावाचा ग्रंथही प्रकाशित केला गेला. या महत्सवाने मात्र पुण्य नगरीने शिक्का मोर्तब केल्यामुळे महाराज हे 'रजिस्टर्ड महाराज' बनले. तेव्हापासून त्यांना कोणी राजयोगी, कोणी दत्तयोगी, कोणी योगीराज वगैरे विविध नामाभिधानाने गौरवू लागले.

## 'सहस्र-चंद्रदर्शन शांती'

त्यानंतर दहा वर्षांनी महाराजांची 'सहस्र चंद्रदर्शन शांति' नावाचा वयाची ८० वर्षे पूर्ण होऊन ८१ वे वर्ष लागलेवर करावा लागणारा महोत्सव श्री लोकनार्थतीर्थ संप्रदायाचे अधिकारी श्री. प. प. विष्णुतीर्थ स्वमी महाराज यांचे अध्यक्षतेखाली मोठ्या थाटाने साजरा झाला. या मधल्या मुदतीत पानशेत झालेमुळे गुरुमहाराजांचे या नव्या सद्गुरुस्मारकात, श्रीवासुदेव निवासात

आगमन होऊन वास्तव्य सुरू झाले होते. तेथेच तो महोत्सव झाला. यावेळी आश्रमाचे एक हौशी विश्वस्त व गुरुभक्त मुंबईचे श्रीमान् नानासाहेब भागवत हे जातीनें स्वतः हजर राहून गुरुमहाराजांची हत्तीवरून श्री प. प. विष्णु तीर्थ स्वामी महाराजांसह मिरवणूक काढली होती. ती सर्वविदित आहेच. त्यावेळी त्या मिरवणुकीची फिल्मही घेतली गेली.

योगायोग असा की हा सत्कार-समारंभ ज्या तारखेस होता त्याच तारखेस पुणेकरांनी पं. सातवळेकरकरजी यांचा जन्मशताब्दि सत्कार समारंभ गावात आयोजित केला होता व गुरुमहाराजांचा सत्कार समारंभ पूर्वीचे एम्. ई. एस व हल्लीचे गरवारे कॉलेज या कॉलेजच्या असेंब्ली हॉलमध्ये झाला. त्यावेळी मुंबईचे उद्योगपती गुरुभक्त श्रीमान् मधुकर गोविंद भट इंजिनियर हे स्वागताध्यक्ष होते. या दिवशी पं. सातवळेकरजी हे उभाउभी मुद्दाम येऊन महाराजांशी गौरवात्मक दोन शब्द बोलले.

## रौद्रीशांती महोत्सव

त्यानंतर जेव्हा महाराजांचे वयास पंच्याऐंशी वर्षे पुरी झाली व शहाऐंशी वर्षे लागले तेव्हा गुरुमहाराजांचा 'रौद्रीशांति' नावाचा महोत्सवही मोठ्या दरबारी थाटात झाला व या उत्सवामधील विशेष म्हणजे—गुरुमहाराजांची 'रौप्यतुला' झाली व त्या तुलेमधील चांदीची त्या दिवसाचे बाजार भावाप्रमाणे अंदाजे किंमत ३१ हजार रुपये झाली; त्यामध्ये गुरुमहाराजांनी आपले 'तुळसी-पत्र' दोन हजार रुपये घालून ती सर्व रक्कम, वैदिक, शास्त्री, प्रवचनकार, कीर्तनकार, देवस्थान, शंकराचार्य, साधू, सत्पुरुष, सुवासिनी, कुमारिका, आप्त स्वजन भक्त वगैरेंना मुक्त हस्ताने 'त्वरितदान' गुरुमहाराजांनी ताबडतोब केले. हा सर्व इतिहास ताजाच असून सर्वविदित आहे.

## 'वाडीमंडप जीर्णोद्धार'

त्यानंतर गुरुमहाराजांचा सर्वात शेवटचा व मोठा संकल्प म्हणजे श्रीक्षेत्र नरसोबावाडी येथील घाटावरील मंदिराच्या मंडपाचा फार मोठ्या भव्य व खंबीर प्रमाणात जीर्णोद्धाराचे कार्य गुरुमहाराज यांनी अवघ्या तीन साडे तीन

वर्षांत पुरे करून ही श्रीसेवा श्रीचरणी सादर केली हीच त्यांच्या देखत पुरी झालेली मोठी व अपूर्व श्रीसेवा होय. या कामी आश्रमाचे एक कार्यकारी विश्वस्त गुरुभक्त श्री. वि. मो. वैद्य इंजिनियर यांनी स्वतः खुद्द वाडीस जाऊन, राहून एकनिष्ठेने कार्य सेवारूपाने केले व ते धन्यवादास पात्र झाले.

## संकल्पित कार्ये

तसेच कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी इचे सान्निध्यात श्रीक्षेत्र तुळजापूर येथे गुरुमहाराजांचे प्रेरणेने मराठवाड्यामधील श्री. पुरुषोत्तमराव माशालकर, श्री. तडवलकर वकील, श्री. मुरुमकर सब्. जज्ज, श्री. बियाणीशेटजी प्रभृती गुरु-भक्तांनी एका 'सिद्धयोग साधकाश्रम' वास्तूचे कार्य सुरू केले असून हळूहळू ते पूर्ण होईल. तसेच श्रीक्षेत्र गाणगापूर येथेही जशी चिदानंद धर्मशाळा आहे तशीच 'श्री वासुदेवानंद धर्मशाळा' असावी असा गुरुमहाराज यांनी संकल्प केला असून त्याकरिता जागाही दाखविली तिथेही लवकरच 'श्री वासुदेवानन्द धर्मशाळा' होईल. या कामी गुरुभक्त श्रीमान गोविंदशेट साबळेशेटजी प्रभृती प्रयत्न करून आहेत. जागाही घेतली असून लवकरच पं. दत्तमहाराजांचे हस्ते तेथे भूमिपूजन होऊन ते कार्य सुरू होईल.

## 'श्रीवामन निवास'

गुरुमहाराजांनी जसे आपल्या सद्गुरूंचे नावे श्री वासुदेव-निवास हे स्मारक उभे केले त्याचप्रमाणे गुरुमहाराजांचे नावचेही एखादे स्मारक असावे असा विचार गुरुमहाराज असतानाच पुढे आला. त्याला गुरुमहाराज यांचा आशीर्वादही मिळाला असून त्यांचे 'उत्तराधिकारी ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर' यांचे हस्ते तेही कार्य लवकरच मार्गी लागेल.

आश्रमाचे जवळच कर्वे रोडवरील 'श्री दशभुजा गणपती' नजीक या स्मारकाकरिता एक चांगला प्लॉट मिळाला असून तेथे थोड्याच दिवसात तेथील स्मारकाचे, श्रीवामन निवासचे कार्य सुरू होईल त्या संबंधीची 'विशेष योजना' लवकरच ठरेल व सर्व भक्तांना कळविण्यात येईल. त्यामध्ये 'दातुरिच्छा बलीयसी' या न्यायाने त्यात ज्यांना कोणाला आपले नावे काही सेवा करण्याची इच्छा

असेल त्यांना त्यांचे इच्छेनुरूप व सेवेनुरूप त्या वास्तूमधील हॉलला नाव देणे, खोलीस नाव देणे, फरशी करून देणे वगैरे काही सशर्त दानांचे प्रकार अंगिकारावेत असा मानस असून, हे कार्य श्री वासुदेवनिवास या सद्गुरु स्मारकाचेच मालकी वहिवाटीचे व त्यांचेच नेतृत्वाखाली असणारे हे कार्य आहे. व ते अंगीकृत कार्य त्यांचेच द्वारा लवकरच मार्गी लागेल.

## 'गुरुमहाराजांची जयंती'

रौद्रीशांतीनंतर गतवर्षीपर्यंत प्रतिवर्षी गुरुमहाराजांचा वर्धापन दिन साजरा झाला. त्यामधील गतवर्षी झालेला गुरुमहाराजांचा वर्धापन दिन हा शेवटचा ठरला. यंदा परवा दि. १० जानेवारी १९७५ रोजी मार्गशीर्ष वद्य १३ होती. त्या दिवशी मात्र सध्या गुरुमहाराज लौकिक दृष्टया दृष्टिआड झाल्यामुळे वर्धापन दिन न करिता 'जयंती' म्हणून साजरी झाली. या दिवशी सर्वांची अंतःकरणे भरून आली. कंठ दाटले व नेत्रांत अश्रू उभे राहिले. गुरुमहाराजांचा जन्म ज्येष्ठा नक्षत्रावर झाला असल्यामुळे गुरुमहाराज असतानाच अलीकडे बरीच वर्षे प्रतिज्येष्ठा नक्षत्रदिवशी 'नक्षत्रशांती' करण्याची प्रथा सुरू झालेली आहे ती प्रथा पुढेही गुरुमहाराजांचे उपाध्याय वे. शा. सं. पुजारी गुरुजी यांचे द्वारा नित्य चालविण्याचा समग्र विश्वस्तांचा मानस आहे व तसे चालू आहे.

## 'श्रीगुरुपौर्णिमा'

श्रीगुरुमहाराजांचा गुरुपौर्णिमा हा उत्सव प्रथम सोलापूर येथे श्री. बापूसाहेब कुबडे यांचेकडे सुरू झाला. त्या उत्सवास विशेषतः बार्शी, मराठवाडा, हैदराबादकडील मंडळीच प्रामुख्याने उपस्थित असत. आश्रम सुरू झाल्यानंतर हा गुरुपौर्णिमा उत्सव सोलापूरऐवजी पुण्यासच करण्यात येई व प्रतिवर्षी अखिल भारतामधून गुरुमहाराजांचे दर्शन-पूजनास शेकडो भक्त येत असत. हे सर्वविदित आहेच.

श्रीगणेश चतुर्थी, अनंत चतुदर्शी, महालक्ष्मी आदि उत्सवही सामान्यपणे साजरे होत असत.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

**‘ श्रीमान् भागवत सप्ताह ’**

श्री वासुदेव निवास आश्रम सुरू झाल्यापासून अलीकडे दहा वर्षे झाली प्रतिवर्षी भाद्रपद महिन्यात प्रौष्ठपदीनिमित्त श्रीमत् भागवत सप्ताह महोत्सव साजरा होत आहे. याबाबत पहिले वर्षी पं. आत्मारामशास्त्री जेरे महोदय व दुसरे वर्षी पं. दत्तमहाराज कवीश्वरशास्त्री असा क्रम गुरुमहाराजांनी उभयतांचे विचारे सुरू केला. परवा पं. आत्मारामशास्त्री कैलासवासी झाले. नंतर प्रतिवर्षी पं. दत्तमहाराज कवीश्वर यांचाच सप्ताह व्हावा अशी गुरुमहाराजांची आज्ञा असलेमुळे त्याप्रमाणे प्रतिवर्षी हा पं. दत्तमहाराजांचा भागवत सप्ताह पुढेही प्रतिवर्षी चालू राहील.

**‘ नवरात्र महोत्सव ’**

पूर्वीपासून गुरुमहाराजांची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी इथे नवरात्र प्रतिवर्षी होत असे. आश्रम सुरू झालेपासून व गुरुमहाराजांचा परिवारही वाढत असलेमुळें हा महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. यावेळी ‘ सुवासिनी–कुमारिका पूजन ’ हा कार्यक्रम चांगला मोठा होतो. ही प्रथा पुढेही अखंड चालू राहील.

**‘ वार्षिक महा पूजा ’**

पूर्वी ज्या ज्या वेळी गुरुमहाराज श्रीक्षेत्र तुळजापूर, श्रीक्षेत्र नरसोबावाडी, श्रीक्षेत्र गाणगापूर, श्रीक्षेत्र औदुंबर, श्रीक्षेत्र कुरवपूर येथे जास्त त्या त्या वेळी तेथे महापूजा करीत असत. अलीकडे काही वर्षे मात्र वरील सर्व महापूजा प्रतिवर्षी करण्याची प्रथा गुरुमहाराजांनी सुरवात केली आहे. त्यामधील श्रीक्षेत्र तुळजापूर येथील महापूजा मात्र श्री. प. प. श्रीधरस्वामी महाराज यांचे आज्ञेनुसार एक दिवस धाकटी देवी व एक दिवस थोरली देवी अशी मोठ्या थाटात भरजरीच्या महावस्त्रानिशी या पूजा साजऱ्या होत असत. त्या तशा पुढेही साजऱ्या होत राहणार आहेत. यावेळी तुळजापूर येथे मराठवाड्यामधील व बार्शी, सोलापूर कडील बरीच भक्तमंडळी उपस्थित राहतात. तेथील सेवेमधील बराच अन्नदानाचा भाग मराठवाड्यामधील भक्तमंडळी सादर उचलत असतात.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

## श्री औदुंबरनिवासी पादुकांची अखंड महापूजा

श्रीक्षेत्र औदुंबर येथे कऱ्हाडचे सुप्रसिद्ध वकील व दत्तभक्त श्री. गोगटे यांनी एक योजना करून गुरुमहाराजांचे कानावर घातली. त्यामध्ये एकहाती ज्यांची १५१ रुपयांची 'कायम निधी' म्हणून देणगी सेवा येईल त्याची त्या रकमेच्या वार्षिक व्याजामधून देणगीदार सुचवितील त्या तिथीस श्री पादुकांस 'अकरा रुपयांची महापूजा' व्हावी असा हेतू आहे. तेव्हा या योजनेचा शुभारंभ गुरुमहाराजांचे हस्ते व्हावा अशी श्री. गोगटे वकील यांची सदिच्छा होती. त्यास अनुसरून गुरुमहाराजांनी आपल्या मातोश्रींची कार्तिक शुद्ध पंचमी, वडिलांची श्रावण शुद्ध दशमी व सद्गुरु श्री. टेंबेस्वामी महाराज यांची आषाढ शुद्ध प्रतिपदा या तिथी सांगून व संकल्पाकरिता गोत्र सांगून प्रत्येकी १५१ रुपयांप्रमाणे ४५३ रुपये एकंदर देणगी देऊन या योजनेचा शुभारंभ केला त्याप्रमाणे ही महापूजा आता अखंड चालू झालेली आहे.

## पुण्यतिथी महोत्सव

आश्विन वद्य द्वादशीस–गुरुद्वादशीस श्रीपाद श्रीवल्लभांनी आपले अवतारकार्य संपवून ते निजानंदी आरूढ झाले व माघ वद्य प्रतिपदेस श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी आपले अवतारकार्य समाप्त करून पुष्पासनी आरूढ होऊन श्री शैल्यक्षेत्री पाताळ गंगेद्वारा गमन केले. हे दोन्ही दिवस आश्रमात साधारणरीत्या साजरे होत असतात. गुरुद्वादशी हा उत्सव नरसोबावाडी येथे मोठ्या प्रमाणात साजरा होतो व गुरुप्रतिपदा हा उत्सव गाणगापुरी मोठ्या प्रमाणात होत असतो. गुरुद्वादशीस या वेळी वाडीस जाण्याचा गुरुमहाराजांचा फार जुना प्रघात आहे. वाडीच्या परिसरातच त्यांचे गाव असल्यामुळे त्यांचे पूर्वज व बंधु –भगिनी या उत्सवास वाडीस जात असत.

आषाढ शुद्ध प्रतिपदेस श्री. प. प. टेंबेस्वामी महाराजांची पुण्यतिथी असते. श्रीक्षेत्र गरुडेश्वर येथे नर्मदाकिनारी गुजराथमध्ये त्यांची समाधी आहे. ही पुण्यतिथी गरुडेश्वरी व इतरही अनेक ठिकाणी चांगल्या मोठ्या प्रमाणात साजरी केली जात असते.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

सन १९१४ मध्ये श्री टेंबे स्वामीमहाराज समाधिस्थ झाले. त्यानंतर दोन वर्षांनी १९१६ साली बार्शीस आल्यावर सन १९१७ सालापासून वडील बंधूंच्या आज्ञेनुसार गुरुमहाराज आपले घरीच आषाढ शुद्ध प्रतिपदेस ही पुण्यतिथी करू लागले व त्याप्रमाणे पहिली पुण्यतिथी बार्शी येथे साजरी झाली. त्या दिवशी सान्निध्यात मातोश्री व भगिनी गोदुताई या होत्या आणि ह. भ. प. यशवंतराव वैद्य मास्तर व बापू कुबडे, व्यंकू कुलकर्णी, भास्कर भागवत प्रभृती विद्यार्थी उपस्थित होते आणि या दिवशी तीर्थराजांची पूजा झाल्यावर तो कलश मस्तकी धारण करताच गुरुमहाराजांची उपनिषदामधील आनंद वर्णन चालू असताना कशी अवस्था झाली हे वरील सर्वांनी प्रत्यक्ष अवलोकन केले आहे. हा इतिहास त्यांच्या 'सहजयोगी सद्‌गुरु' चरित्रात नमूद केला आहे. असो.

हल्ली आश्रमात हा उत्सव चांगल्या मोठ्या प्रमाणात साजरा होत असतो तसाच तो पुढेही होत राहील.

महाराजांचे दुसरे सद्‌गुरु श्री. प. प. लोकनाथतीर्थस्वामी महाराज यांची पुण्यतिथी माघ वद्य तृतीयेस असते. हाही महोत्सव मोठ्या प्रमाणात चांगला साजरा होतो तो तसाच पुढेही होत राहील.

तसेच वाडीचे श्री नारायण स्वामीमहाराज यांची अलीकडे काही वर्षे झाली पहिली पुण्यतिथी गुरुमहाराज काशी येथे मुक्काम असताना तेथे केली. दुसरी पुण्यतिथी सोलापूर येथे मुक्काम असताना तेथे झाली व तिसऱ्या पुण्यतिथीपासून ही पुणे येथेच होत असते. ती तशीच पुढेही चालू राहील. ही पुण्यतिथी चैत्र वद्य अमावास्येला असते.

## 'सायंकाळचा धूप'

दररोज सायंकाळी गुरुमहाराजांचे वरील निवासस्थान व पं. दत्तमहाराज कवीश्वर यांचे बैठकीचे स्थान झाकून स्वच्छ करून पुन्हा व्यवस्थित बैठक घालून धूप-उदबत्ती लावून ठेवून नमन करून जाण्याची सेवा श्री. निजामपूरकर हे करीत असतात.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

**' पत्रव्यवहार '**

आश्रमात हल्ली दररोज येणारे टपाल श्री. नाना व श्री. शुक्ल हे घेतात व ते सॉर्ट करून पं. दत्तमहाराज आल्यानंतर त्यांना दिले जाते व त्यावर कोणास काय उत्तर लिहावयाचे ते पं. दत्तमहाराज सांगतात, त्याप्रमाणे श्री. शुक्ल हे ती उत्तरे लिहितात. काही महत्त्वाची उत्तरे पं. दत्तमहाराज स्वतःच देत असतात. त्याचप्रमाणे ज्या काही श्री सेवारूप मनिऑर्डरी येत असतात त्या स्वीकारण्याचे कार्यही श्री. नाना भालेराव यांचे नेतृत्वाखाली श्री. कृष्णराव शुक्ल अत्यंत व्यवस्थित रीतीने करून त्यांच्या पावत्या तयार करून त्या पाठविणे व ही स्वीकृत सेवा विश्वस्तांकडे सुपूर्त करणे वगैरे सर्व करितात. श्री. शुक्ल पूर्वीचे सर्व माहितगार सेवक असल्यामुळे गुरुमहाराज यांचे त्यांच्यावर चांगले आत्मीय प्रेम असे व ते गुरुमहाराजांचे वेळी करीत असलेली ही सेवा आजही पं. दत्त-महाराजांचे कारकीर्दीमध्येही त्याच तत्परतेने करीत आहेत हे त्यांचे सद्भाग्यच होय. इतकेच नव्हे तर त्यांच्या पत्नी सौ. बाई याही आश्रमात जरूर असेल तेव्हा सौ. काकू भालेराव यांचे मदतीस येत असतात.

**' प्रश्नावली वाङ्मय व फोटो उपलब्धी '**

श्री गुरुमहाराजांकडे येणारे भक्तांमध्ये 'आर्त व अर्थार्थी' भक्तांचीच बहुसंख्या असे. गुरुमहाराज ज्यांचे त्यांचे विचार व अडचणी समजून घेत व उपाय म्हणून श्री टेंबे स्वामी महाराजांनी जी काही 'कामना सिद्ध्यार्थ प्रश्नावली' करून ठेवली आहे. त्या प्रश्नावलीवरून ज्याला त्याला त्याचे हस्तेच त्या प्रश्नावलीवर आपले समोर एका अक्षरावर बोट ठेवण्यास सांगत व त्यावरून येणारा जो आदेश असेल त्याची उपासना करण्यास सांगत. त्यामुळे अनेकांना त्याचा अनुकूल अनुभव आला व येत आहे. असे हे सिद्ध वाङ्मय श्री टेंबे स्वामी महाराजांचे कृपेने प्राप्त झाले असल्यामुळे ते सर्व वाङ्मय या आर्त व अर्थार्थी भक्तांना आश्रमद्वारा उपलब्ध करून दिले. ते वाङ्मय श्री. शुक्ल यांचे द्वाराच भक्तांना आश्रमात मिळण्याची व्यवस्था सध्या विश्वस्तांनी केलेली आहे. हे वाङ्मय सध्या संपले असल्यामुळे नवीन छापून घेण्याची व ते

आश्रमात मिळवून देण्याची व्यवस्था होत आहे व काही झाली आहे.

**' दातुरिच्छा बलीयसी '**

तसेच गुरुमहाराज स्वतः आर्टिस्ट असलेमुळे त्यांनी स्वतः श्रीदत्त देवतेची चार प्रतिमाचित्रे तयार केली. ( १ ) सिद्धासनस्थ श्रीदत्त, ( २ ) उभे विष्णुरूप श्रीदत्त, ( ३ ) उभे गोमातेसह श्रीदत्त व ( ४ ) व्याघ्रांबरधारी उभे श्रीदत्त, त्याचप्रमाणे श्री टेंबेस्वामीमहाराजांचे कमंडलु दंडधारी बैठे चित्रही स्वतःच तयार केले आहे. हल्ली आश्रमात देवघरात समोर तेच असते. ते व उभे फोटो, श्री. प. प. लोकनाथतीर्थांचे तीन फोटो व खुद्द गुरुमहाराजांचे अनेक फोटो, श्री. भास्करपंत भागवत फोटोग्राफर दौंडकर यांचेकडे आहेत. ते लहानमोठया साईजचे आश्रमात आणून देत असतात; तेही भक्तांना मिळत असते.

त्याचप्रमाणे आता श्रीदत्तांचे, श्री टेंबे स्वामी महाराजांचे श्री लोकनाथतीर्थ स्वामींचे, श्री गुरुमहाराजांचे व उत्तराधिकारी पं. दत्तमहाराज असे काही नवीन फोटो गुरुमहाराजांचे भक्त श्री. के. जोशी ब्लॉकमेकर यांनी तयार केलेले आश्रमात मिळण्याची व्यवस्था होत आहे.

गुरुमहाराज असताना भक्तांनी सुपूत केलेली श्रीसेवा त्यांच्याच इच्छेनुसार त्याचा विनियोग व्हावा हा त्यांचा गुरुमहाराजांचा दंडक असलेमुळे ज्या निमित्ताने जे येते ते त्याच कारणी लावावयाचे ही प्रथा गुरुमहाराजांनंतरही त्यांचे उत्तराधिकारी पं. दत्तमहाराज यांनी उत्तम तऱ्हेने चालविलेली आहे. किंबहुना गुरुमहाराज असताना या आलेल्या नित्यदानादि विविध सेवेचा कसकसा विनियोग करावयाचा हे गुरुमहाराजांचे विचारे पं. दत्तमहाराजच ठरवीत असत हे पूर्वी काढलेल्या नित्यदानाचे पत्रकावरून सर्व विदित आहे.

**' श्री गुरुमहाराजांची प्रथम वार्षिक पुण्यतिथी '**

आज तिथीनुसार पौष वद्य ८ स गुरुमहाराज आपला पार्थिव देह विसर्जन करून स्वस्वरूपी विलीन झाल्यास एक वर्ष पूर्ण झाले. काल हा महापुरुष असून तो कोणाकरिताही एक क्षणभर थांबण्यास तयार नाही. हां हां म्हणता एक वर्ष झाले. आज सर्वांची अंतःकरणे भरून आलेली आहेत. कंठही दाटला असून

नेत्र अश्रूंनी डबडबले आहेत. प्रत्येकाला गुरुमहाराजांचा प्रत्यक्ष संबंध आल्यापासून आजपर्यंतच्या कालामधील अनेक विविध घटना एकसारख्या नजरेसमोरून धावताहेत असे भासते आहे. संयोग हा वियोगातः पाती असतो असा सिद्धांत आहे व तो सर्वांनाच–अंतःकरण असणारांना विदित असूनही जाणवल्याशिवाय रहात नाही. आणि हीच ती माया व हाच तो मोह होय.

हंसराज स्वामींनी श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य यांचे सदाचार नामक स्तोत्र प्रकरण ग्रंथावर एकवीशे ओवी लिहिली असून त्यामध्ये एके ठिकाणी ते असे म्हणतात, 'सद्गुरु समाधिस्थ झाला। शिष्य तयाचा हळहळला। व्यर्थ तो उपदेश गेला। विवेकेवीण' हे त्यांचे म्हणणे कितीही जरी खरे असले तरी आम्हा पामरांची वरील प्रमाणे झालेली अवस्था झाकू शकत नाही हे खरे. असो. गुरुमहारांची ही प्रथम वार्षिक पुण्यतिथी अधिकृत व नैतिक जबाबदारी आलेल्या समग्र विश्वस्तांनी गांगरून न जाता विवेकाचाच आश्रय करून पुण्यतिथीचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे.

**'श्रीगुरुचरण–प्रथमवर्षस्मरण'**

पौष वद्य अष्टमी ही दि. ३ फेब्रुवारी १९७५ सोमवार रोजी आली असून त्याचे अगोदर सात दिवस आश्रमात विविध कार्यक्रम आयोजित केले गेले. वर्षश्राद्ध या दृष्टीने दि. २ व ३ फेब्रुवारी रविवार-सोमवार दोन दिवस धर्मकार्य असते. पुढील वर्षापासून फक्त पौष वद्य अष्टमी हा एकच दिवस पुण्यतिथीचा राहील व आश्रमात आजपर्यंत होत असलेल्या सर्व उत्सवात हा श्रेष्ठ असा महोत्सव ठरेल. दि. २७ जानेवारी ते ३ फेब्रुवारी पर्यंत भजन, प्रवचन, गायन, कीर्तनादि कार्यक्रम झाले. सकाळी काही वेदपारायणादि धर्मानुष्ठानही झाले व शेवटचे दिवशी श्रद्धांजली समर्पण समारंभ आयोजित केला गेला.

या महोत्सवामधील यंदाचे विशेष आकर्षण म्हणजे शक्तिपात सांप्रदायाचे अध्वर्यू श्री. प. प. शिवोम्तीर्थ स्वामी महाराज हे मुद्दाम हृषिकेशहून पुण्यास आले. ही त्यांची उपस्थिती सर्वांनाच कल्याणकारक वाटत आहे.

गुरुमहाराजांचे उत्तराधिकारी पं. दत्तमहाराज हे जे नवीन काही उपक्रम

करून ज्ञानार्जनाची दालने निर्माण करू पाहत आहेत त्यांपैकी एक म्हणजे प्रत्येक वर्षी या पहिल्या पुण्यतिथीपासून वरील ‘ श्रीगुरुचरण–प्रथमवर्षस्मरण ’ या नावाचा एक छोटासा ग्रंथ या वार्षिक पुण्यतिथी दिवशी प्रसिद्ध करण्याचे ठरविले असून त्या ग्रंथद्वारा अनेक विविध विषयांचे व विद्वानांचे ज्ञानभांडार सर्व सामान्यांचे हाती यावे हा सद्हेतू आहे. याबाबत सर परशुरामभाऊ कॉलेजचे व्हाईस प्रिन्सिपॉल अर्थशास्त्रज्ञ डॉ. दिगंबरराव केरूर, पत्रकार श्री. नखाते, केसरीचे विश्वस्त व उपसंपादक श्री. हरिभाऊ कुलकर्णी, श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील सुप्रसिद्ध प्रवचनकार पं. भालचंद्रशास्त्री मुळे, श्रीक्षेत्र नाशिक येथील व्यासंगी वक्ते वाचस्पती श्री. विष्णूजी क्षीरसागर, सोलापूर येथील पंचांगकर्ते श्री. धुंडिराज-शास्त्री दाते, संस्कृतज्ञ डॉ. प्रा. राजाभाऊ जोशी, कविवर्य डॉ. प्रा. वि. म. कुलकर्णी, पुण्याचे पं. वेंकटेशशास्त्री जोशी, प्रभृति गुरुमहाराजांची काही भक्त मंडळी ब्रह्मश्री पं. दत्तमहाराजांचे हाकेस उभी आहेत व यांचेच सहकार्याने प्रतिवर्षी वरील ग्रंथाचे प्रकाशन व मधून मधून विविध विषयावरील प्रवचनमाला, व्याख्यानमालाही आश्रमात योग्य वेळी आयोजित केल्या जाणार असून जमल्यास प्रतिमासी एखादे छोटे पॅम्प्लेटवजा आश्रमवृत्तही प्रकाशित करण्याचा त्यांचा मानस आहे.

## ‘ विश्वस्तांची व्रत परिपालन निष्ठा व कसोटी ’

हे समग्र एक वर्ष म्हणजे विश्वस्तांच्या व्रत परिपालनाच्या निष्ठेची कसोटी म्हणूनच आश्रमाच्या इतिहासात नमूद केले जाईल. गुरुमहाराज हे या ट्रस्टचे संस्थापक सर्वाधिकारी व प्रधान विश्वस्त या तिहेरी नात्याने संबोधीत होते. त्यांचे पश्चात त्यांनीच नियुक्त केलेले आपले उत्तराधिकारी पं. दत्तमहाराज कवीश्वरशास्त्री महोदय हे सर्वाधिकारी व प्रधान विश्वस्त या दुहेरी नात्याने संबधित आहेत व इतर विश्वस्त मंडळी पूर्ववत् आश्रम संस्थेची सर्वांगीण उन्नती व्हावी व त्याचे उत्तम तऱ्हेने संरक्षण, संवर्धन व संगोपन व्हावे या तत्त्वनिष्ठेने सेवा करून आहेत.

सत्कार्यास नेहमीच अडीअडचणी येणे हे नित्याचे असते. त्याप्रमाणे या एक

वर्षात विविध अडचणीही निर्माण झाल्या परंतु त्याचा परिहारही गुरुमहाराजांनी दिलेल्या धैर्याने व नैतिक अधिष्ठानानेच होणार व होत चालला आहे असा आत्मविश्वासही निर्माण झाला आहे. पुणे येथील गुरुमहाराजांचे एक आत्मीय ऋणानुबंधीय सुप्रसिद्ध विधिज्ञ श्रीमान् बाबाराव भिडे हे गुरुमहाराजांचे वेळी जसे त्यांचे सर्व कायदा विषयक प्रश्न हाताळीत होते तसेच त्यांच्या पश्चातही हे त्यांचे सहकार्य पं. दत्तमहाराजांचे कारकीर्दीमध्येही पूर्ववत् चालू आहे. हेच गुरुमहाराजांच्या खऱ्या कृपेचे द्योतक होय.

सारांश, गुरुमहाराजांची ‘ दिव्य, भव्य व उदात्त परंपरा ’ कसल्याही प्रकारच्या ‘ राग द्वेषाला बळी न पडता ’ मोठ्या संयमाने व निष्ठेने परिपालन करण्याचे व्रत समग्र विश्वस्त मंडळी मोठ्या धैर्याने आचरून आहेत व पुढे नित्य संभाळून राहतील हीच त्यांची खरी कसोटी ठरणार आहे व हे सर्व गुरुमहाराजच करवून घेत आहेत असा पदोपदी अनुभव येत आहे. इतिशम्.

* *

॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥

[ पान ३२ वरून चालू ]

होते. महाविद्यालय आणि विद्यापीठ या क्षेत्रात काम करणाऱ्या माझ्यासारख्या अध्यापकाला हे प्रतिपादन ‘प्रबोधन’ कारक ठरले असल्यास नवल नाही.

## श्रीपाद श्रीवल्लभांचे कुरपूर

नित्याचा स्वीकृत व्यवसाय–व्यवहार श्रीमहाराजांच्या कृपेने नीट प्रगत होत राहिला. साधनही गतिमान राहिले. प्रसंगाने, संतसत्पुरुषांच्या वास्तव्याने आणि भगवन्ताच्या लीलेने पुनीत झालेल्या तीर्थक्षेत्रांच्या दर्शनाचा योगही येत गेला. त्यातील श्रीगुरुकृपा प्रकट करणारे दोन प्रसंग उत्कटतेने स्मरतात.

कुरवपूर हे श्रीपाद श्रीवल्लभांचे स्थान. आन्ध्र प्रदेशात रायचूरजवळ कृष्णेच्या प्रवाहात मध्यभागी विस्तीर्ण बेटाच्या स्वरूपात हे क्षेत्र आहे. येथे कृष्णामाता प्रचंड काय रौद्र गतीने वाहते. प्रवाहात पर्वतप्राय शिला इतस्ततः पसरलेल्या. पावसाळ्यात सर्व दिशांची वाट बंद होते. एन उन्हाळ्यातही पुरुषदीडपुरुष पाण्यामधूनच बेटावर जावे लागते. अशा अवघड जागी श्रीपाद श्रीवल्लभांचा शेवटचा संचार होता. रजक भक्ताची कथाही कुरवपूर येथे घडलेली. साधकांच्या कामाचा निर्णयही येथे त्वरित होतो. श्रीदत्त भक्तांना या स्थानाची ओढ नेहमीच असते. कुरवपुरी जाण्याचा कित्येक दिवसांचा संकल्प पुरा होण्याचा योग आला. प्रवासातील अनंत अडचणी विनासायास दूर होऊन एके दिवशी माध्यान्ही बारा वाजता कुरवपुरी आलो. आल्याबरोबर केवळ ‘धूळभेट’ घेण्याकरिता श्रीपाद-चरणांसमोर उभा राहिलो. आणि निमिषार्धात प्रत्यक्ष श्रीमहाराज तेथे आसनस्थ असल्याचे दिसू लागले. भान हरवले अष्टभाव जागृत झाले आणि सारा दिवस काहीशा उन्मनी अवस्थेत गेला. ही कथा श्रीमहाराजांना केव्हा निवेदन करू असे होऊन गेले. पुण्यास परतल्यावर श्रीमहाराजांचे दर्शन घेतले. भक्तिपूर्वक साष्टांग प्रणिपात करून सर्व अनुभव सादर केला. श्रीमहाराजांनी मन्द स्मित केले. आणि पाठीवरून हात फिरवीत म्हणाले. “आपल्या भावनेचे हे फल आहे. ही सर्व श्रीपाद वल्लभाची लीला आहे कोणत्याही घटनेचे कर्तृत्व श्रीमहाराजांनी स्वतःकडे कधी घेतले नाही. सारे कर्तृत्व ईश्वराचे त्याला स्मरून काम

करीत राहण्याची वृत्ती साधकांमध्ये स्थिरपद व्हावी या विषयी श्रीमहाराज अह-निंश दक्ष असत.

**श्रीदत्ताची राजधानी :**

श्रीनृसिंहवाडी हे श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराजांचे लीला स्थान. श्रीमद्-वासुदेवानंदांनी श्रीदत्ताची राजधानी सुखाची असे या स्थानाचे वर्णन केले आहे. श्रीमहाराजांचेही वाडीवर अपार प्रेम. गुरुद्वादशी हा श्रीपाद श्रीवल्लभांच्या निजानंद गमनाचा दिवस. याच दिवशी. श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी वाडी येथे आपल्या मनोहर पादुका स्थापून गाणगापुराकडे प्रयाण केले. श्रीमहा-राज वर्षभरात भारतात कोठेही असोत. गुरुद्वादशीस मात्र वाडीस धावून येत. साहजिकच गुरुद्वादशीच्या दिवशी श्रीमहाराजांच्या समवेत कृष्णास्नान, श्रीपादुकांचे दर्शन घडावे यासाठी सर्वच साधक उत्सुक असत मीही एका वर्षी गुरुद्वादशीच्या आधी एक दिवस सायंकाळी वाडीस पोचलो. श्रीमहाराजांचे दर्शन घेऊन दुसऱ्या दिवशी ' आपल्या समवेत स्नान घडावे ', अशी इच्छा व्यक्त केली. श्रीमहाराजांची प्रातः स्नानाची वेळ साडेपाचची होती. प्रवासाच्या दगदगीमुळे पहाटे उठणे मला शक्य झाले नाही. प्रातःस्नान चुकले. त्याहीपेक्षा श्रीमहाराजांसमवेत स्नान चुकले ही गोष्ट मनाला लागून राहिली. अपराधी वृत्तीने आठ वाजता श्रीमहाराजांच्या दर्शनास गेलो. पहाटे का आला नाहीत असा प्रश्नही न करता श्रीमहाराज म्हणाले, " दहा वाजता संगमावर जाऊ तयारी करा. " एकदा स्नान झालेले. तरीही पुनः स्नानास येण्याची तयारी हे वात्सल्य पाहून सर्वांचीच अन्तःकरणे भरून आली ओघाने इतर मंडळीही निघाली. श्रीमहाराजासह आम्ही सर्व संग-मावर आलो. स्नानाच्या तयारीने घाट उतरून पाण्यात पाऊल टाकले. ' पोहता येते का ? ' श्रीमहाराजानी प्रश्न केला. हो म्हणताच ' चला, तर ' असे म्हणून श्रीमहाराज पोहू लागले. आम्ही सर्वजण पैलतीरावर गेलो. श्रीमहाराजांनी. वयाची ऐंशी वर्षे केव्हाच ओलांडली होती. त्याणि तरीही विलक्षण कौशल्याने कृष्णेच्या प्रवाहात लीलया विहरत होते. प्रवाहात मध्यभागी श्रीमहाराज आणि भोवती आम्ही सर्व. श्रीमहाराजांनी स्वहस्ते सर्वांवर कृष्णेच्या पाण्याचे सिंचन

केले. मला गहिवरून आले. श्रीगुरुचरित्रातील गंगानुज प्रवाहान्तर्गत श्रीगुरु, सारी कथा चित्रवत् दिसू लागली. आधी ठरवूनही पहाटे वेळेवर न येण्याचा माझा अपराध. आणि तरीही प्रायश्चित्ताऐवजी श्रीमहाराजांच्या अपार वात्सल्याचा अनुभव ! श्रीनाथ म्हणतात ती, संतांच्या घरची उलटी खूण, ही अशारीतीने प्रत्ययास यावी; यापरते भाग्य ते कोणते ?

श्रीनृसिंहवाडीचे स्मरण झाले म्हणजे श्रीमहाराजांच्या शेवटच्या गुरुद्वादशीची ( १९७३ ) तीव्रतेने आठवण होते. श्रावणात श्रावणी कर्म आटोपून श्रीमहाराज श्रीजगदंबेच्या दर्शनास तुळजापुरास जाणार होते. तथापि अवचित आजारी पडून हा नियोजित कार्यक्रम स्थगित झाला. डॉक्टर मंडळींनी हृदयविकाराचे निदान केले. प्रवासातील अतिश्रम, वार्धक्य अशी मीमांसा झाली. श्रीमहाराजांचे निदान मात्र वेगळे होते. व्याधी हा प्रारब्धाचा भाग आहे; हृदयविकार हा डॉक्टरांचा सनज आहे. आपण मात्र साक्षित्वाने प्रारब्ध भोगावे, असे म्हणून श्रीमहाराज स्वस्त राहिले यथाकाळ श्रीभागवत सप्ताह संपन्न झाला गुरुद्वादशी आली आणि श्रीमहाराजांनी वाडीस जाण्याचा निर्णय केला. डॉक्टरांच्या दृष्टीने विश्रान्ती हवी होती. प्रवास टाळणे आवश्यक होते. ' देवाचे काम आहे, वाडीस गेले पाहिजे ' हा श्री महाराजांचा विचार होता. ' मृत्यू येणारच असेल तर देवासंनिध आला तर; काय वाईट ? ' असा त्यांचा प्रश्न. श्रीमहाराज वाडीस आले आणि कृष्णास्नान, श्रीपादुका दर्शन त्यासाठी शंभर एक पायऱ्यांची चढ–उतार–यथापूर्व क्षमतेने सुरू झाले. व्याधीची नावनिशाणी दिसेना. वैद्यकशास्त्राच्या दृष्टीने हा चमत्कार होता. आणि तो पाहण्याचे भाग्य आम्हाला लाभले.

**प्रदक्षिणा मंडप : श्रीगुरुचरित्राचा नवा अध्याय :**

वाडी येथे श्रीमहाराजांच्या संकल्पानेच प्रदक्षिणा मंडपाचे काम पूर्ण होत आले होते. या मंडपाची कथा म्हणजे श्रीगुरुचरित्राचा नवा आविर्भाव होता. वाडी यथील श्रीपादुका मंदिर लहानसे असून अक्षरशः कृष्णेच्या पात्रात उभे आहे. सभोवती दगडी फरशीचे प्रांगण आहे. मंदिरप्रदक्षिणा ही एक सर्वांना सुलभ

अशी महत्त्वाची सेवा. ऊनपावसात ही सेवा अति दुस्तर ठरते. अशा सेवक भक्तांना सर्वऋतुकालात काही शाश्वत छत्र लाभावे म्हणून श्रीमहाराजांनी संकल्प केला आणि अल्पवधीत तो सिद्धीसही नेला. वाडीचा इतिहास ज्यांना माहीत आहे त्यांना या मंडप कथेत श्रीमहाराजांचे अलौकिकत्व दिसल्याशिवाय राहणारी नाही.

वाडी येथील कृष्णेवरचा प्रशस्त घाट श्रीजनार्दन स्वामींच्या आज्ञेने श्रीनाथांनी बांधला असा इतिहास आहे. पुढे स्थानाचे वैभव वाढत गेले. कोल्हापूर सांगली येथील प्रशासकांना रस उत्पन्न झाला. श्रीपादुका मंदिर मोठे करावे असा काहींनी विचार केला. तथापि 'तसे काहीं करू नये' अशी देवाची परखड सूचना मिळाली. 'हवे असेल तेव्हा काही रचना करवून घेईन. आपण आपली अन्नछत्रे सांभाळावीत' असे सांगणे झाले. या इतिहासाच्या पार्श्वभूमीवर प्रदक्षिणामंडपाचे भव्य काम श्रीमहाराजांच्या संकल्पाने व्हावे यात श्रीमहाराजांचे अवतारित्व स्वयंसिद्ध होते; यात शंका नाही.

मोठा उत्सव करून प्रदक्षिणा मंडप श्रीचरणी अर्पण करावा असा प्रथमचा विचार होता. तथापि आता फार काल न थांबता गुरुद्वादशीच्या निमित्ताने वाडीस आलो आहोत तर आताच हे समर्पणाचे काम पुरे करावे असा श्रीमहाराजांनी निर्णय केला असावा, असे आज वाटू लागते. ही गुरुद्वादशी श्रीमहाराजांची शेवटची गुरुद्वादशी ठरली.

गुरुद्वादशीच्या दिवशी देवांची स्वारी ही रात्रभर जागी असते. पालखी देखील रात्रौ बारानंतर निघते. श्रीमहाराजही मंदिराजवळ बारा वाजताच येत. तथापि आज मात्र आठ वाजताच श्रीमहाराज खाली आले. कोणाला कल्पना नव्हती. साहजिकच सर्वांना साश्चर्य आनंद वाटला. विधिपूर्वक, श्रीमहाराजांनी प्रदक्षिणामंडप श्रीचरणी समर्पित केला. देवस्थानच्या वतीने विश्वस्तांनी स्वारी-वरील महावस्त्र प्रसाद म्हणून श्रीमहाराजांच्या अंगावर पांघरले. आणि याच क्षणी श्रीवासुदेवनिवासाचे एक विश्वस्त श्री. वैद्य यांनी श्रीमहाराजांच्या अनुज्ञेने उत्तरादाखल श्रीमहाराजांच्या वतीने भाषण करण्याची आज्ञा केली. समोर

प्रत्यक्ष श्रीभगवत् चरण–सभामंडपात श्रीमहाराज मंदिरासमोर मी उभा. आणि आता श्रीमहाराजांच्या वतीने उत्तराचे भाषण. माझ्या जीवनात अवचित आलेला हा परम भाग्याचा क्षण होता. श्रीगुरुकृपेची अभूतपूर्व वृष्टी होती. ही अनुभूती विलक्षण होती. आजपर्यंत अनेक प्रसंगांनी श्रीमहाराजांच्या साक्षित्वाने प्रकट भाषण करण्याचा क्षोग आला होता. तथापि आज वाडीमधे श्रीपादुकांसमोर हा योग होता. निजधामाला जाण्यापूर्वी श्रीमहाराजांनी दिलेला हा प्रसाद विशेष होता. वात्सल्याची ही परमावधी होती. प्रत्यक्ष प्रदक्षिणामंडपाच्या शिल्प-रचनेचे कार्य श्री. वैद्य प्रभृती साधकांनी अविरत श्रम करून सिद्धीस नेले होते. माझा काही हातभार असेल तर तो केवळ दूरान्वयाचा आणि असे असूनही प्रतिनिधिरूपाने सेवा करण्याची संधी मिळावी यात श्रीमहाराजांचे केवळ वात्सल्य होते. आणि त्यांच्या स्मरणातच आज वाटचाल चालू आहे.

## वेदधर्म्यांचा पुनरावतार : श्रीमहाराजांचे मृत्यूपनिषद :

१९७३ मधील गुरुद्वादशी ही लौकिक अर्थाने श्रीमहाराजांच्या जीवनातील शेवटची ठरली. श्रीमहाराज पुण्यास आले आणि त्यांचा आजार पूर्ववत् सुरू झाला. डॉक्टर्स, वैद्य, ज्योतिषी यांची गर्दी होऊ लागली, अनुष्ठाने होऊ लागली. श्रीमहाराज मात्र अलिप्तपणे सारा प्रकार न्याहाळीत शांतचित्ताने प्रारब्ध भोगीत होते. ही सारी स्थिती पाहून श्रीगुरुचरित्रातील वेदधर्मा–दीपक कथेचे स्मरण होत राही. प्रारब्ध भोगूनच संपवावे या तत्त्वाचा स्वत:च्या आचरणाने पाठ देणारा आणि त्यासाठी एकवीस वर्षे व्याधी सोसणारा वेदधर्मा गुरु अलौकिक होय. आणि एकवीस वर्षे वाराणसीत राहून विश्वनाथाचे दर्शनही न घेता गुरुसेवेत व्यग्र राहणारा दीपक शिष्य ही अलौकिक. श्रीमहाराजांच्या उत्तर चरित्रामध्ये त्या वेदधर्मा–गुरूची क्षणोक्षणी आठवण होत होती. आम्हाला मात्र दीपकाचे भाग्य लाभले नाही; याने मनाला क्लेश होतात.

श्रीमहाराजांच्या सानिध्यात अन्यथा अनेक विषयांची चर्चा होई. या काल-खंडात मात्र श्रीमहाराज स्वयं मृत्यूविषयी बोलत. ‘ सर्व घटनांचे नियामकत्व परमेश्वराकडे असले तरी मृत्यू हा खास ईश्वराधीन विषय आहे. मृत्यू कधी

येईल, कोठे येईल; आणि कशाने येईल याचे ज्ञान कोणासही निश्चयाने होत नाही; आणि होणारही नाही. त्या गोष्टी केवळ ईश्वराच्या स्वाधीन होत." असे श्रीमहाराजांचे प्रतिपादन असे.

'काशीमध्ये मरण यावे असे वाटते; परंतु ईश्वराची इच्छा तशी दिसत नाही.' असे श्रीमहाराज म्हणत. 'असे असेल तर काशीसच जाऊन राहावे;' काही जण सुचवीत. श्रीमहाराज चटकन उत्तर देत : 'जन्मभर काशीस राहूनही केवळ सहज सहल म्हणून बाहेर गेलेला बाहेरच मरण पावतो. त्यामुळे ईश्वर इच्छा हीच खरी!'

यावर आम्ही म्हणत असू. 'महाराज आपण स्वयं ईश्वरस्वरूप आहात. ग्रहांचा आपल्यावर परिणाम होण्याचे कारण नाही; त्यातून आपण इच्छामरणी आहात.' यावेळी श्रीमहाराज गंभीर बनत. आणि संथपणे बोलू लागत : "तसा प्रत्येक जण ईश्वरस्वरूपच आहे. शिवाय प्रत्यक्ष ईश्वरालाही अवतार धारण केल्यानंतर प्रारब्ध, मृत्यू या गोष्टी चुकल्या नाहीत. श्रीराम, श्रीकृष्ण यांची चरित्रे सर्वांना माहीत आहेत. मग माझ्यासारख्या सामान्याला या गोष्टी कशा चुकतील? आणि चुकवाव्यात तरी का?' असा प्रतिप्रश्न करीत. आणि पुनः बोलू लागत—"मी सामान्य चित्रकलाशिक्षक. माझ्या आयुष्यात येवढे वैभव आले. ही केवळ ईश्वरकृपा होय; श्रीगुरूंचा प्रसाद होय. आता अखेरच्या श्वासापर्यन्त श्रीगुरूंचे स्मरण चालू राहावे येवढीच प्रार्थना आहे; आणि सर्वांना येवढेच सांगणे आहे.' साधकांसाठी चंदनाप्रमाणे झिजलेली काया, अपार वात्सल्याने भरलेली कृपादृष्टी आणि हे निर्याणाचे प्रवचन-या दर्शनाने श्रवणाचे भान नाहीसे होई. अंतःकरण गलबलून येई आणि नेत्रांतून अश्रुधारा सुरू होत.

**श्रीमहाराजांचे इच्छामरण :**

श्री महाराज इच्छामरणी होते यात आम्हाला शंका नाही. कित्येक साधकांना ( त्यात मीही एक आहे ) साधनेत मिळालेले हे ज्ञान आहे. त्यातून आयुर्मर्यादा मांडावयाचीच तर ती 'ब्याण्णव' अशी दिसून येई. श्रीमहाराजांना आम्ही हे सांगत असू. त्यावर श्रीमहाराज केवळ स्मित करीत. आणि अधिक काही बोलत

नसत. प्रत्यक्षात मात्र श्रीमहाराजांनी लवकर जाण्याचा निर्णय केला असावा. वाडीच्या मंडपाचे काम पुरे झाले. श्रीमहाराज पुण्यास आले आणि प्रसंगाने सांगू लागले, ' वाडीचे काम राहिले होते. देवानी पुरे करून घेतले. आमच्या पूज्य मातुश्रींना त्यांच्या भावबलाने मिळालेला श्रीपादुकांचा प्रसाद हा आमचा दायभाग तोही आम्ही विश्वस्तांच्या स्वाधीन केला आहे. आणि विश्व कल्याणार्थ या श्री पादुकांची अर्चन भक्ती वैदिक संप्रदाय पद्धतीप्रमाणे अखंडित चालू ठेवावी असा त्यांना आदेशही दिला आहे. आता आमच्यापुरते काही राहिलेले नाही. श्रीगुरुस्मरणात देहत्याग व्हावा येवढीच इच्छा आहे. '

## मोक्षाचे मुक्तद्वार

श्रीमहाराजांचे बोलणे नेहमीच मार्गदर्शक राही. तथापि निर्याणाचा दिवस जसा जवळ येऊ लागला तसतसे मार्गदर्शन अधिक स्पष्ट होऊ लागले. श्रीमहाराजांचा आचारधर्मावर विशेष कटाक्ष. त्यांचे सारे जीवन हा आचारधर्माचा केवळ वस्तुपाठ होता. प्रसंगाने ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाचा उल्लेख येई. त्यावेळी श्री महाराज स्पष्टपणे सांगत– " ब्राह्मणांनी प्रथम आचारसंपन्न व्हावे. आणि मग या वादात शिरावे. आचारसंपन्न तपःपूत ब्राह्मण समाजाने नेहमीच वंद्य मानला आहे. इकडे आचारभ्रष्ट व्हावे आणि तरीही वर्णश्रेष्ठत्वाचा मान मागावा ही विसंगती आहे. "

" व्रतवैकल्य, अनुष्ठाने होतील तेवढी करावीत. परंतु न घडली तरी खिन्न होऊ नये. सर्वांनी सदाचाराने मात्र वागावे. निर्मळ अंतःकरण, सदाचार याने ईश्वराला संतोष होतो. **ईश्वर आहे** या भावनेने वागलात तरी पुरेसे आहे. " हे श्रीमहाराजांच्या अखेरच्या काळातील सांगणे होते.

श्रीमहाराजांनी अनेकांना सहजयोग दिला. सर्वांना सुलभ भक्तियोगही दिला. आणि मोक्षाचे मुक्तद्वार अखेरपर्यंत संपन्न ठेवले.

ब्याण्णव वर्षांची लौकिक आयुर्मर्यादा शक्य असूनही श्रीमहाराजांनी निर्याणाचा मुहूर्त काही वर्षांनी अलीकडे आणला. याला काय कारणे असतील हे केवळ अधिकारी पुरुष जाणू शकतील. माझ्यासारख्या साधकाला मात्र श्रीगुरुचरित्रामध्ये

याचे एक उत्तर दिसते. पूर्वजन्मीचा रजकभक्त आता राजा म्हणून भेटीस आला. त्या निमित्ताने गाणगापूरला इतरही अनेकांची ये–जा वाढू लागली आणि श्रीगुरूंनी श्रीशैलमल्लिकार्जुनी ऐक्य' होण्याचा निर्णय केला. रौद्री शान्ती महोत्सव झाला. आणि श्रीमहाराजांच्या या वैभवकाळात अधिकारी अनाधिकारी अशांची गर्दी होऊ लागली. अलीकडे श्रीमहाराज वाढत्या उपाधीबद्दल उल्लेख करीत "वीस नारायण येथे गर्दी होऊ लागली म्हणून काही निवांतपणा लाभेल या विचाराने श्रीवासुदेवनिवासनिर्मितीस संमती दिली. आता येथे तर गर्दी तुडुंब वाहात आहे. विश्रांतीसाठी दिवसा राहू द्या, रात्रीही वेळ नसतो. काय करावे? अशा स्थितीत साधन कसे चालू राहील? याचीच चिन्ता वाटते." आणि यात यत्किंचितही अतिशयोक्ती नव्हती. काही विश्रान्ती मिळावी म्हणून मुंबईस जावे तर तेथेही भक्तांच्या घरोघरी जाण्यासाठी शंभर–दीडशे पायऱ्यांची चढउतार दिवसभर चालू राही. काही का असेना, श्रीमहाराजांनी निर्याणाचा मुहूर्त अलीकडे आणला; हे सत्य आहे.

लौकिकात अलौकिक होऊ नये असे श्रीमहाराजांचे सांगणे असे. उत्सव–सत्कार–प्रसंगाने याचा मुद्दाम उल्लेख करीत. आणि या वचनाला अनुसरून मृत्यूही लौकिकरूपाने स्वीकारला यात शंका नाही. मृत्यूनंतरच्या व्यवस्थेविषयी श्रीमहाराजांनी काही निर्णय केला होता. "ज्या गावी निर्याण होईल तेथील स्थानिक परंपरेनुसार धर्मशास्त्रपूतरीतीनेच संस्कार व्हावा. श्रीवासुदेव निवासात श्रीगुरुपादुकांचे, श्रीवासुदेवाचेच अर्चन व्हावे. श्रीगुरुभक्ती वाढीस लागावी असा श्रीमहाराजांचा स्पष्ट आदेश होता. हे सारे चरित्र आमच्या साक्षीने घडले. विसाव्या शतकातील – शास्त्रनिष्ठा, आचारधर्म, गुरुभक्ती आणि अनासक्ती – यांचा हा दुर्मिळ आदर्श असा वस्तुपाठ होता.

**अव्यक्त स्वरूपातील मार्गदर्शन :**

श्रीमहाराजांचे निर्याण झाले. श्रीमहाराजांचे व्यक्तरूप अंतर्धान पावले मनाला मोठे उदास वाटू लागले. ही स्वाभाविक देहबुद्धी होती. तथापि आता श्रीमहाराजांना देहाचे बंधन उरले नाही. कृपेचा मार्ग अधिक मुक्त झाला.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

आणि त्याची अनुभूतीही साधकांना येऊ लागली. अशा एका अनुभवाचा उल्लेख येथे करतो.

श्रीमहाराजांच्या आशीर्वादाने प्रेरित होऊन पुण्यातील योगसेवा समितीने 'योग संप्रदाय दर्शन' ग्रंथ प्रसिद्ध केला. ग्रंथात श्रीमहाराजांनी स्वयं लिहिलेला **दिव्यशक्ति रहस्य** हा प्रदीर्घ लेख अंतर्भूत आहे. या घटनेला अनुलक्षून गेल्या नोव्हेंबरमध्ये लोणावळा येथील कैवल्यधामातील एका योगाभ्यासकाने एका इंग्रजी ग्रंथाचा अनुवाद मुद्दाम पाठविला. त्यात षट्चक्रांची चर्चा होती. ही षट्चक्रे नाभीखालील मूलाधारापासून मस्तकापर्यंत क्रमाने असल्याचे परंपरागत ज्ञान आहे. वरील ग्रंथात ही चक्रे मस्तकात मेंदूमध्ये असल्याचे प्रतिपादन आहे. हे प्रतिपादन सत्य नाही असे वाटे. तथापी निर्णय कोणी करावा? आम्ही स्वस्थ राहिलो. आणि दुसऱ्याच दिवशी स्वप्न दृष्टान्तामध्ये श्रीमहाराजांचे दर्शन. श्रीवासुदेव निवासात त्यांच्या नित्याच्या खोलीत श्रीमहाराज कुशीवर निजलेले. 'बरे नाही का?' असे आम्ही विचारले. त्यावर 'अलीकडे अशाच अवस्थेत विश्रांती घेत असतो.' हे महाराजांचे उत्तर. त्यानंतर क्षणभर थांबून आमच्याकडे पाहात श्री महाराज म्हणाले, "योगावर भलते काही वाचू नका. तुम्हीच संपादित केलेल्या योग संप्रदाय दर्शनातील 'दिव्यशक्ति रहस्य' या लेखाचे पुनः पुनः चिन्तन करीत राहा" असे सांगणे झाले आणि स्वप्न संपले.

## पुण्यनगरीचे तीर्थस्वरूप : श्रीमहाराजांचे योगपीठ :

महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून पुणे शहराचा लौकिक असला तरी ते तीर्थक्षेत्र असल्याचा काही उल्लेख मिळत नाही. मात्र श्रीमहाराजांचे अखंड वास्तव्य, मुठेच्या उत्तर तीरावर निर्माण झालेला श्रीवासुदेव निवास आश्रम, आश्रमात चालू असलेली धर्मकार्ये आणि संपन्न होत असलेले नित्यश्री नित्य मंगल—यामुळे ही पुण्यनगरीही आज तीर्थक्षेत्र ठरली आहे. श्रीनृसिंहवाडी येथील श्रीदत्तप्रभूंच्या मनोहर पादुका पाहून श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती गहिवरून येत आणि सांगत "गिरनार, माहूर अशा अवघड ठिकाणी राहणारा परमात्मा केवळ भक्तवात्सल्याने कृष्णेच्या पात्रात उघड्या माळावर येऊन उभा

आहे. " आणि आता हाच दयाघन परमात्मा श्रीमहाराजांच्या रूपाने असंख्य मुमुक्षु साधकांना मार्गदर्शन करण्याकरता या पुण्यनगरीत श्रीवासुदेव निवासामध्ये सर्व वैभवासह विराजमान आहे.

श्रीवासुदेव निवासाची निर्मिती हा महाराजांचा संकल्प असून श्रीमहाराजांचे उत्तराधिकारी श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या तपश्चर्येचे अमृत फल आहे. ज्या कुळात तीन पिढ्या सत्पुरुषांचा अवतार झाला अशा पावन कुलात श्रीदत्तमहा-राजांचा जन्म झाला. त्यांचे नामकरणही श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या आदेशाने झाले. न्याय–वेदान्त–धर्म–मीमांसा ही सारी प्राचीन विद्या श्रीदत्त महाराजांच्या रूपाने साक्षात् कृत असून श्रीमद्भागवताचे अंतरंग अधिकारी प्रवक्ते, अन्तःकरण भगवत् प्रेमाने आकंठ भरलेले; वृत्ती अन्तर्मुख, चालणे बोलणे सारे व्यवहार अखंड भावसमाधीत–सारे चरित्र श्रीनाथांचे स्मरण देणारे. अभयं सत्त्वसंशुद्धी इत्यादी श्रीभगवन्ताला अभिप्रेत असलेल्या दैवी संपत्तीच्या लक्षणांनी अलंकृत असे श्रीदत्तमहाराजांचे दर्शन मोठे प्रसन्न आणि कल्याणप्रद आहे. ईश संकेताने श्रीदत्तमहाराज आज श्रीमहाराजांच्या सहजयोगाचे आचार्यत्व करीत आहेत. श्रीवासुदेव निवासातील योगपीठावर असा महात्मा आज आसनस्थ आहे हे आमचे सौभाग्य होय. सर्वसाधकांवर श्रीदत्त महाराजांची कृपा कूर्म दृष्टी अखंड राहावी अशी प्रार्थना करून भक्तवत्सल श्रीमहाराजांच्या चरणी ही स्मरणसेवा समर्पित करीत आहे.

* *

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

ॐ श्रीसद्गुरू शरणम्

# संत कुळीचा राजा

लेखक : श्रीनिवास त्र्यं. नखाते

## ‘ जीवा ’च्या आचाराचा आदर्श

पूर्णावतार परमपूज्य श्रीसद्गुरू गुळवणी महाराज यांचा माझ्यावर ता. २० डिसेंबर १९५२ रोजी अनुग्रह होऊन मला कुंडलिनी जागृतीची दीक्षा झाली. तेव्हापासून अवघ्या ४।५ महिन्यांतच माझी नाशिकलाच, गायत्रीमंदिरातील सुप्रसिद्ध सत्पुरुष प्रातःस्मरणीय पूज्य श्री बाळशास्त्री फडके यांची गाठ पडली. पहिल्याच भेटीत त्यांनी स्वतः मी काही न सांगता मला कुंडलिनीजागृतीची दीक्षा कोणाकडून मिळाली असे विचारले. त्यांच्या या प्रश्नानंतर काही दिवसांतच सद्गुरू श्रीमहाराजांच्या अनुज्ञेने मी माझी बैठक श्रीबाळशास्त्रींना दाखविली. बैठक संपल्यानंतर श्री बाळ शास्त्री म्हणाले की, ‘ तुम्ही सिंहाचे बच्चे आहात. सिद्धी वा अन्य कोठल्याही अंतरायाशिवाय तुम्ही ब्रह्मसाम्राज्यपदावर बसू शकाल, अशा पद्धतीनेच श्रीमहाराजांनी तुम्हाला परमात्मशक्तीच्या स्वाधीन केले आहे. ’ श्रीबाळशास्त्री व श्री महाराज या दोघांचीही दृढ ब्रह्मभावावस्था होती. दोघांनाही कधीही जीवभ्रम नव्हता. तथापि तुम्हाआम्हा भक्त साधकां-करता ते अगदी जीवबुद्धी असलेल्या साधकाने जसे वागावे तसेच वागत असत. श्रीबाळशास्त्रींनी ‘ श्रीवासुदेव निवासात ’ येऊन श्री ब्रह्मसूत्रांचे पारायण केले. तेव्हा पहिल्या दिवशी श्रीमहाराजांनी त्यांना बोलावण्यासाठी आम्हा काही मंडळींना त्यांच्या निवासस्थानी पाठविले. श्री फडकेशास्त्री निवासात येताच श्रीमहाराजांनी श्री फडके शास्त्रींना साष्टांग प्रणिपात केला व ब्रह्मविद्वरिष्ठाला

नमस्कार असो असे म्हणून त्यांचे स्वागत केले. स्वतः श्रीमहाराज श्रीदत्तस्वरूप असूनही अगदी जीवस्वरूपच्च आहो अशा पद्धतीने सर्व आचार पाळीत असत हे अनेक प्रसंगांनी प्रत्ययास येत असे.

## वाढत्या भावऊर्मी

साधारणतः कोणीही सामान्य माणूस (आस्तिक वा नास्तिक) श्रीमहाराजांच्या प्रथम संपर्कात आला तर श्रीमहाराज सौजन्यमूर्ती आहेत असा ठसा त्याचे मनावर उमटे, तो कायम राहत असे एवढेच नव्हे तर हळू हळू गोड सुजनता, निर्मळ सज्जनता, प्रेमरूप संतता, अनासक्त परमात्मतता अशा वाढत्या श्रेणीच्या ऊर्मी भक्ताच्या मनावर उमटवीत असत. काही अपवादभूत भाग्यवंतांना ते स्वस्वरूप असल्याच्या निरतिशय सुखशांतीच्या सिंहासनावर बसवीत असत व निःशंक करीत असत. श्रीमहाराजांच्या मुळेच मला प. पू. श्रीधरस्वामींचेही अगदी जवळून दर्शन घडले. त्यांची भगवंदशता तर अनेकांना " शरणम् " बनली आहे.

## परमात्मइच्छेशी एकरूप

स्वामी शरीर–अस्वस्थ्यामुळे पुण्यास असता श्रीमहाराज त्यांचे भेटीस गेले. तेव्हा योगायोगाने मी डॉक्टर बेंद्रे व माझे परम सुहृद श्री.हरिभाऊ कुलकर्णी असे तेथे होतो. प. प. श्रीधरस्वामी त्यावेळी बोलत नसत. त्यांना श्रीमहाराजांनी विचारले की, " आपण आजारी कशाने झाला आहात ? " स्वामींनी लेखी उत्तरात म्हटले होते की, मी व देवता यांच्यामधे धर्मकार्याच्या कालपक्वतेबद्दल वाद आहे म्हणून मला हा उपद्रव होतो आहे. या उत्तरामुळे माझ्यासारख्या साधकास खालील शंका येणे साहजिकच नाही का ? ' श्रीस्वामीजी धर्मकार्य करू म्हणतात, तर त्यांना त्यांच्या सत्कार्यात देवतांनी उपद्रव देऊन अडथळे का आणावेत ? ' ही शंका श्रीमहाराजांशिवाय कोण दूर करणार ? परंतु मी संपूर्ण शरणागती भावाचा अभ्यासक असल्यामुळे ही शंका त्यांना विचारावी असेही माझ्या मनात आले नाही. श्रीस्वामींच्या उत्तरानंतर मी सकाळीच श्रीमहाराजांकडे गेलो असता ह्याच आशयाचा प्रश्न कोणी तरी श्रीमहाराजांना विचारल्याचे माझ्या ध्यानी आले. तेव्हा मी सावधपणे श्रीमहाराजांच्या खुलाशाकडे कान दिले.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

श्रीमहाराज म्हणाले की,' मी धर्मकार्य करतो हा भाव भारतीय (वैदिक) कल्पनेतील विश्वरचनेशी विसंगत आहे. या मायोपाधिक जगताच्या स्थितिगतीसाठी एक प्रकारची अधिकार श्रेणी श्रीभगवंताच्या संकल्पनाने तयार झाली आहे व त्याची इच्छा असल्याचा प्रत्यय तो " सत् " परमात्मा सतत प्रत्येकाला देत असतो. चांगले असले तरी त्यांच्या इच्छेविरुद्धचे सत्कार्यही मी करू शकत नाही, करणे बरोबर नाही. यावर कोणी असे विचारील की, सतीने आपल्या पातिव्रत्य प्रभावाने वा श्रीभागवतातील श्रीगोकर्ण महात्म्याने काही दिवस वा थोडा वेळ सूर्यस्तंभन केले नाही का ? "खरी स्थिती अशी की, पातिव्रत्याचे माहात्म्य पटावे म्हणून श्रीपरमात्म्याच्या इच्छेनेच त्या गोष्टी घडल्या." या श्रीमहाराजांच्या उत्तराने मी तर निःशंक झालोच, पण या उत्तरात श्रीमहराजांची परमात्म–इच्छेशी एकरूपता कशी होती याची ग्वाही मिळाली. तसेच संपूर्ण शरणागती, अद्वैतात्मक एकरूपता म्हणजे काय याचे पूर्ण साकार स्वरूप श्रीमहाराज आहेत, हेही मनोमन जाणवले. पण श्रीधरस्वामींनी श्रीमहाराजांना कुलदैवत श्रीतुळजा भवानीची महापूजा करण्यास सांगितले व श्रीमहाराज तेव्हापासून प्रतिवर्षी तशी पूजा करीत असत, याही घटनेत जीवभावात्मक साधकांना आदर्श आचार कसा ठेवावा हाच धडा मिळावा हे श्रीमहाराजांचे प्रयोजन होते यात कसली शंका ?

## देहभावाकडे पाठ फिरवा

श्रीमहाराजांमुळे आणखी एका प्रभावी विभूतीचे दर्शन त्यांच्या सान्निध्यातच मला घडले श्रीमहाराजांचे गुरुबंधू नारेश्वरचे संत श्रीरंग अवधूत हे माणगाव, बेळगाव करून परत श्रीनारेश्वरच्या वाटेवर असताना श्री महाराज असे म्हणत होते की, अवधूतांची भेट झाली तर बरे. त्यावेळी मी सकाळी श्रीमहाराजांचे पोट चोळीत असे. दुखणे कमीअधिक वाटल्यास मला केव्हाही कळवावे असे सांगून मी घरी येत असे. त्या दिवशी असाच चोळून घरी आलो आणि दोन प्रहरी नित्याप्रमाणे कचेरीत कामास गेलो. दोन प्रहरी ४–४॥ च्या सुमारास माझ्याकडे कोणी आल्याचा मला निरोप सांगितला. मी बाहेर येऊन कोण आहे हे पाहण्यापूर्वीच माझे एक गुरुबंधू मला दिसले. मी मनात चरकलो. की

श्रीमहाराजांचे पोटात अधिक त्रास होत असावा म्हणून मला हे बोलावणे असावे असे वाटले. बाहेर येताच गुरुबंधू म्हणाले की, श्रीश्रीरंग अवधूत महाराजांकडे आले आहेत; त्यांचे दर्शन घेण्यासाठी श्रीमहाराजांनी आपल्याला बोलावले आहे. या निरोपाने मला अपार आनंद झाला. मी तावडतोब २० नारायण गोवईकरांची चाळ येथे गेलो. तेथे श्रीअवधूत आरामखुर्चीवर बसले होते. त्यांच्या एका हाताला श्रीमहाराज काही सुखसंवाद करीत होते. मी अवधूतांना साष्टांग प्रणिपात केला. त्यांचा आंतरिक प्रभावही मला जाणवला. ते परतण्यापूर्वीच माझे एक परमप्रिय ( आमच्या दोघांच्या निरपवाद एक-रूपातील अन्य रूप ) डॉ. केरूर आले व त्यांनीही दर्शन घेतले. नंतर श्रीअवधूत गेल्यानंतर महाराजांनी आम्हास त्यांच्या प्रभावाच्या, सामर्थ्याच्या व अध्यात्म-वैभवाच्या गोष्टी सांगितल्या. त्या सांगताना, श्री महाराजांच्या प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती महाराजांवरील भक्तीच्या महापुरातच आपण उल्हसित आल्हादकपणे डुंबत आहो असे आम्हास वाटत होते. स्वतः श्रीमहाराज श्री वासुदेवानंद, दत्तस्वरूप असूनही श्री अवधूतांचा महिमा सांगत आहेत हे एकून साधनानिष्ठ जीवाने प्रत्येक भेटणारे भूत, व्यक्ती वा प्रसंग ब्रह्मस्वरूप, गुरुस्वरूप मानून प्रेमपूर्वक त्याचा महिमा जाणावा व वर्णावा हीच श्री महाराजांची शिकवणूक होती. "सकलमिदमहं चं वासुदेवः" हा भाव दृढ होऊन त्याचे आमरण सातत्य राहण्यासाठी कशी राहणी अनुसरावी याच हेतूने श्रीमहाराज अगदी सतत तळमळीने भक्तहितासाठी प्रत्येक गोष्ट अत्यंत दक्षतेने आदर्शवत् करून दाखवीत असत. श्रीरंग अवधूतांचे महानिर्वाण हरिद्वारकडे झाले. त्यानंतर त्यांच्या भक्तांनी त्यांचा जड देह नारेश्वरापर्यन्त विमान–मोटार इत्यादि वाहनातून आणला व नारेश्वरास त्यांची समाधी केली. श्रीअवधूतांच्या पुतळ्याच्या उद्घाटनासाठी श्री महाराज नारेश्वरासही गेले होते. अवधूतांची समाधी करून, पुतळा उभारण्या-बद्दल श्रीमहाराजांचे मनात अनुकूलच भाव होता. परंतु हरिद्वारसारख्या पावन तीर्थातून श्रीअवधूतांचा देह नारेश्वरला आणून तेथे त्यावर निर्वाणानंतरचे संस्कार करण्याबद्दल श्री महाराजांना फारसे बरे वाटत नव्हते. तसे त्यांनी त्यानंतर बऱ्याच वेळा काढलेल्या उद्गारांवरून दिसून येत असे. याचाच अर्थ असा की

जीवांनी, विशेषत: साधक जीवांनी देहाबद्दलची आसक्तीच नव्हे तर देहभावही सोडून देण्याचा सतत विवेकपूर्वक प्रयत्न केला पाहिजे, हेच श्रीमहाराजांना अभिप्रेत होते. याच संदर्भात श्रीमहाराज जीवभावाने नम्रतेचे किती तरी पाठ देत असत हे ध्यानी घेण्यासारखे आहे. श्री अवधूतांचे एक सच्छिष्य श्री नर्मदानंदजी ( श्री. ढेबर बी. एस्‌सी. एल्‌एल्‌ बी. ) म्हणून आहेत. ते श्रीगुरु-महाराजांचेही शिष्य आहेत. त्यांनी श्री अवधूतांच्या आदेशानुसारच नर्मदा-प्रदक्षिणा बऱ्याच वेळा केल्या. त्या काळातील त्यांचे अपूर्व अनुभव आहेत. यात्रा समाप्त झाल्यानंतर एकदा इकडची श्रीदत्त स्थाने पाहण्याच्या उपक्रमात ते श्रीनृसिंहवाडीस आले. तेव्हा श्रीमहाराज तेथेच होते. ते आलेले पाहताच श्रीमहाराज उठून उभे राहिले, एवढेच नव्हे तर त्यांनी श्रीनर्मदानंदजी यांना साष्टांग नमस्कार घातला. अशाच अद्वितीय वृत्तिदर्शनाची आणखीही एक घटना या ठिकाणीच ग्रथित करणे उचित ठरेल. श्री वासुदेवनिवास–प्रवेश, समर्पण-समारंभ व वास्तुशांती दिनाच्या दिवशी श्रीमत् शंकराचार्य ( एरंडे स्वामी ) श्री वासुदेव-निवासात आले होते. त्यांचे स्वागत श्रीमहाराजांनी त्यांना साष्टांग नमन करूनच केले. प. प. एरंडेस्वामी हे श्रीसद्‌गुरुमहाराजांचे शिष्यच होत हे अनेक साधक भक्त जाणतात. श्रीवाडीहून येणाऱ्या कोणाही पुजाऱ्याला श्रीमहाराज दत्तस्वरूप मानून नमस्कार करीत असत.

**नम्रता दृढ धरा :**

श्रीसद्‌गुरुमहाराजांच्या प्रेरणेने व अनुज्ञेनेच पावसचे संत स्वरूपानंद यांच्या दर्शनास आम्ही काही शिष्य बंधू-भगिनी गेलो होतो .तेव्हा साधु दिसती वेगळाले, परी स्वरूपी मिळले एकचि याची आंतरिक साक्ष पटली. श्रीस्वरूपानंदासमोर अस-ताना बैठकीत होतो त्याप्रमाणे मला ॐकारनाद सुरू होताच स्वामी म्हणाले की, आमचा हाच " सोऽहं " आहे. असे म्हणून त्यांनी बसून मला आपल्या साधने-तील नाद दाखविला ऐकविला. आणि मला नटवत् सर्व कामे करावीत असे सांगितले. श्री महाराज आणि स्वरूपानंद यांनी एकमेकांस पाहिले नव्हते. परंतु दोघांचे आंतरिक दळणवळण असावे असे मानण्याजोग्या किती तरी घटना

माझ्या निदर्शनास आल्या होत्या. त्या आताच्या या लेखात प्रस्तुत नाहीत. परंतु श्रीस्वामींच्या समाधीपूर्वी एक वर्षच ते जिवंत समाधी घेणार, त्यासाठी परवानगी मागितली आहे असे कळताच श्रीसद्गुरुमहाराजांनी याविषयीची समक्ष, चौकशी करण्यासाठी आम्ही ( मी व माझे सुहृद श्री हरिभाऊ कुलकर्णी ) यांनी पावसला जाऊन यावे असे सुचविले. त्यावेळी आम्हाला कळले ते असे की, हा देह त्याचा, त्याच्या शक्तीचे अधीन केला आहे. तेव्हा त्याच्याच इच्छेप्रमाणे काय ते होईल असा स्वामींचा बेत होता. हे कळले तेव्हा श्रीमहाराजांना बरे वाटले; त्यानंतर श्रीमहाराजांना हृदयविकाराचा झटका, त्यातून प्रकृतीची सुधारणा, पुन्हा वाढ-दिवसाच्या वेळी ताप उचकी वगैरे होऊन श्रीसद्गुरूंच्या प्रकृतीची काळजी सुरू झाली व अखेर ७-८ जानेवारी १९७४ पासून तर प्रकृतीतील चढ-उतार व त्याची परिणती अगदी अनिश्चित झाली. त्याच सुमारास श्रीसद्गुरू महाराजांनी लिहिलेले एक पत्र खाली उद्धृत करतो.

|| श्रीगुरुः शरणम् ||

श्रीमन् प. प. श्रीसत्यदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज यांचे चरण सेवेसी कृ. सा. न. वि. विज्ञापना—

श्री. सहस्रबुद्धे यांच्याबरोबर आपण कृपापूर्वक श्री स्वरूपानंदस्वामी महाराज यांच्या जन्मतिथीचा प्रसाद पाठविला तो पोहोचला. याबद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहे. श्रीस्वामीमहाराजांच्या कृपेने माझी प्रकृति आता थोडी बरी आहे. श्री स्वरूपानंदचरणी माझे अनंत प्रणाम प्रविष्ट करावेत, व अंतकाळी स्वरूपानुस्मरण राहावे एवढा आशीर्वाद असावा.

कळावे हे विज्ञापना

आपला

**वा. द. गुळवणी**

पत्रांत आपला आशीर्वाद मिळावा म्हणून उत्तरासाठी तिकिट पाठविले आहे. हे पत्र स्वयं बोलके आहे. जीवभावाचा उत्तुंग आविष्कार त्यात झाला असून

ब्रह्मरूप विभूतीहि अखेरपर्यंत किती दक्ष व नम्र असतात व आम्ही तृणाहुनि नीच हा भावच साधकांनी सतत ठेवावा याचा आदर्श कसा घालून देतात हीच या घटनेची अविस्मरणीय विशेषता नव्हे का ?

## मंगलदायक सदाशिव

फलटणचे ज्ञानदेवभक्त व अखंड उन्मनी उपभोगणारे श्रीगोविंद महाराज उपळेकरहि श्रीमहाराजांबद्दल अत्यंत आत्मीयभाव अभिव्यक्त करीत असत. एकदा ते श्रीमहाराजाकडे श्रीवासुदेव निवासात आले व त्यांच्या पद्धतीने श्री. महाराजांना उद्देशून श्रीशंकर दिसतो आहे असे उद्गार काढल्याचे प्रसिद्धच आहे. श्रीमहाराज शंकर असल्याची जाणीव सर्व शिष्यगणाने ठेवावी म्हणून त्यांनी हे उद्गार काढले का श्रीमहाराज शिव शंकर स्वरूपच होते हे त्यांच्या प्रचीतीस आले हे सामान्य भक्ताला प्रत्यक्षपणे कळेल की, नाही हा विषय बाजूला ठेवून असे निश्चित सांगता येईल की श्रीमहाराजांच्या सान्निध्यात असता आपण शिव मार्गाचे अखंड कापडी असून हा सदाशिव आपले रक्षण करण्यास आपली पाठराखणी करीत आहे ही जाणीव सतत ठेवीत असावे असेच भावतरंग आपल्या अंतःकरणात उमटतात. याचाच अर्थ श्रीसद्गुरु हे सर्व पातळीवर मंगलदायक सदाशिवच होते ही वस्तुस्थिति आहे. श्रीगोविंद महाराज उपळेकरांनी अनेकांना श्रीमहाराजाभिमुख करून चिंतामुक्त होऊन आत्मकल्याणाचा मार्ग अनुसरण्याची प्रेरणा दिली आहे. श्रीमहाराजहि श्रीगोविंद महाराजांना उन्मनी या अकरणात्मक भूमिकेहून स्वानंद साम्राज्य सिंहासनावर अधिष्ठित असलेले महापुरुषच मानीत असत. त्यांच्या भक्तांची त्यांच्यावरील निष्ठा दृढ व अविचल राहावी असाच प्रयत्न करीत असत. पुण्यातील नाथपंथीय श्रीशंकरनाथ महाराज यांनाहि श्री महाराज ' पर ब्रह्म 'च भासले.

## तुमचे महाराज खरे संन्यासी

औदुंबरला एक परम अधिकारी स्वसद्गुरु-सेवक प. प. श्रीनारायण स्वामी म्हणून श्रेष्ठ संन्यासी होते. आम्ही एकदा औदुंबरला जाण्याचे ठरविले तेव्हा

श्रीमहाराजांनी त्यांचे दर्शन करून येण्यास चुकू नये असे सांगितले. पूजनीय प. प. श्रीनारायण स्वामींना आम्ही भेटलो व त्यांचा कानडीचा सराव अधिक आहे असे पाहून मी त्यांच्याशी थोडासा कानडीतच संवाद केला. त्यात त्यांनी सद्गुरुसेवेची महती, सद्गुरु सेवा म्हणजे त्यांनी आखुन दिलेल्या आचरणाचे व साधनेचे अनुसरण इत्यादि गोष्टींचे विवरण केले. परंतु ते शेवटी म्हणाले, " तुम्ही आमच्याकडे का आलात ? " त्यावर मी म्हणालो की, " आमच्या परम सद्गुरूंनी आपले दर्शन घेऊन आपणास वंदन करण्याची आज्ञा दिली आहे. " त्यावर ते म्हणाले, " आम्ही वस्त्र संन्यासी. आपले महाराजच खरे संन्यासी आहेत. ते जीवन्मुक्त आहेत. त्यांनी मन आणि वासना यांचे संपूर्ण निर्मूलन केले आहे. " त्यावर मी म्हणालो की, " आपणहि त्यांना वंद्य मानता व आमच्या निष्ठेला दृढता देता ही आमच्यावर मोठीच कृपा आहे. " पुढे प. प. श्रीनारायणस्वामी श्रीवासुदेव निवासात आले असता हे दोघेही विद्वत् संन्यासी परस्परांशी मौनाने नम्रतेने सुखसंवाद करताना पाहण्याचे भाग्य मला लाभले.

## सर्व भावात समता

आता शेवटी एका खऱ्या अर्थाने महाविभूतीच्या संपर्काचे भाग्य मला लाभले आहे; त्यांचा व श्रीमहाराजांचाही संपर्क आला होता. त्या संबंधातून श्री महाराजांचे एक आगळेच दर्शन मला घडले.ती विभूती म्हणजे माझे परम हितकर्ते कम्युनिस्टपक्षीय श्री विष्णुपंत चितळे होत. मागे एकदा माझ्या जीवनाचे प्रयाग या माझ्या लेखात त्यांचा मी निर्देश केला आहे. पण आता एका घटनेचा पुनरुच्चार करून संतकुळींचा राजा श्रीगुळवणीमहाराज यांच्याकडे एक विशिष्ट पसायदान मी मागणार आहे. श्री विष्णुपंत चितळे हे १९६० च्या ऑक्टोबरमधे प्रथम आजारी पडले. ते काही दिवस डॉ. यशवंतराव फाटक यांच्या दवाखान्यात उपचारासाठी राहिले होते. तेव्हा श्रीमहारांजांचे काही शिष्य त्यांची चौकशी करण्यासाठी, त्यांच्या सेवेसाठी डॉ. फाटक यांच्या दवाखान्यात जात. तेव्हा त्यांचे कल्याण, प्रगती व्हावी या बुद्धीने श्री. विष्णुपंत त्यांच्या डोक्यावर हात ठेवीत असत. किंचित् बरे वाटू लागून श्री. विष्णुपंत घरी जाऊन विश्रांती घेत असता

त्यांनी श्रीमहाराजांना खालील निरोप पाठविला की, "मी आपल्या काही शिष्यांच्या मस्तकावर हात ठेवला. यात आपले अतिक्रमण करण्याचा काहीच भाव नव्हता. आपला याविषयीचा अभिप्राय कळवावा." यावर श्रीमहाराजांनी प्रत्युत्तरादाखल पाठविलेला निरोप श्रीमहाराजांच्या पूर्णावताराची प्रतीती देणाराच आहे. त्यांनी श्री विष्णुपंताना असे सांगण्याची आज्ञा दिली की, जीव, देवता, आत्मा–ब्रह्म या तीन भूमिकांवरून या घटनेबाबत (हात ठेवण्याच्या) विचार करता येईल. दोघांचाही जीव–भाव गृहीत धरून विचार केल्यास साधकांचे कल्याण हेच समान प्रयोजन दोघांचेही आहे. तेव्हा तुम्ही जे करत आहा त्या-बद्दल मनात यत्किंचित काहीही वाटण्याचे कारण नाही. दैवत पातळीत अपरिहार्यता आहे व ब्रह्मभावात एकताच आहे. या घटनेत श्रीमहाराजांच्या भक्तहिताचा आणि स्वतःच्या विनयभावाचाच प्रतिसाद मिळतो आहे.

## पुनर्जन्म पण ब्रह्मरूपच

श्रीमहाराजांचे माहात्म्य 'लोकांना' अलौकिक नसण्यातच होते. माझ्या मनातील त्यांची भक्ती व त्यांच्या महत्तमतेवरील निष्ठा, त्यांनी मला घडविलेल्या ब्रह्मविद्येच्या गंगोत्रीच्या स्नानातच आहे हे ध्यानी घेणे आवश्यक आहे. अशाच आणखी एका गोष्टीबद्दल लिहून श्रीमहाराजांचे पूर्णावतार दत्तयोगित्व त्यातही कसे प्रतिबिंबित झाले आहे याचे दिग्दर्शन करणे आवश्यक आहे. श्रीमहाराजांच्या ब्रह्मलोकगमनानंतर एका ठिकाणी त्यांचा आत्मा (?) येऊन बोलून गेल्याचे वृत्तपत्रात वाचले. त्याचप्रमाणे श्रीमहाराजांच्या सान्निध्यात असणाऱ्याना हे ठाऊक आहे की, मला पुन्हा द्विज (ब्राह्मण = ब्रह्मज्ञ) जन्म येणार आहे असे श्रीसद्गुरू म्हणत असत. काही जणांनी श्रीमहाराज पुन्हा आले आहेत असे सांगितल्याचे कर्णोपकर्णी ऐकले. यावर कित्येक जण असे विचारतील की, श्रीमहाराज जर पूर्णावतार दत्त होते तर त्यांना पुनः जन्म कसा ? त्यानाही मुक्ति नाही का ? त्यांच्यासारख्या सात्त्विक, छे त्रिगुणातीतासही शरीरकष्ट सोसावे लागले आणि मुक्तिही नाही, मग या सर्व विचारात विवेक नाही. श्रीमहा-राजांना शरीर कष्ट झाले, भोग म्हणून ते भागावे लागले, पण श्रीमहाराज

द्विसाहस्रीमधील योग व बोध या दोन्ही रहस्यामधील शेवटच्या श्लोकात म्हटल्याप्रमाणे " शुभाशुभ विनिर्मुक्तो देही ब्रह्ममयो भवेत् " ।। किंवा अदेह प्राण हृद्धर्मः । प्रारब्धाशीः सुखं व । इदं रहस्य बोधाख्य तज्ज्ञो ब्रह्म मयो भवेत् ।। याच अवस्थेचे मूर्त प्रतीक होते. श्रीवासुदेवानंद सरस्वती महाराज यांच्याकडून बोध मिळताच श्रीसद्‌गुरुमहाराज साधकांचे सिद्ध झाले होते. त्यांचा देहही ब्रह्ममय होता. आणि त्यांनी पुन्हा देहावेश केला तर तो देहही ब्रह्ममयच असणार आहे. अशा लीलाविग्रही संत कुळीच्या राजाच्या गुणगानाचा उपक्रम का करावा लागत आहे ? आमच्या गुरुमाउली समानच असलेल्या संत माऊली श्रीज्ञानदेवांनी हे अत्यंत चांगल्या शब्दांनी सांगितले आहे.

जिये गुरूसेवेविखी । माझा जीव अभिलाखी
म्हणोनिसोयचुकी । बोली केली ।।अ १३, ५५
एऱ्हवी असता हाती खुळा । भजनावानी आंधळा ।
परिचर्ये लागीं पांगुळा । पासूनि मंद ।। ५६ ।।
गुरुवर्णनी मुका । आळशी पोशिजे फुका ।
परि मनी आथी निका । सानुरागु ।।५७ ।।
तेणेचि पै कारणे । हे स्थळ पोखणे ।
पडळे मज म्हणे । ज्ञानदेवो ।। ५८ ।।

या स्तवन सेवेनें संत कुळीचा राजा पूर्णावतार दत्तयोगी श्रीमहाराजांनी प्रसन्न होऊन एवढेच द्यावे की,

त्वयि भक्तिं मे वर्धय, दुर्हृत्तम ईश नाशय अशेषम् ।
यच्च तवेष्टं तत्कुरु, मयि भो सर्वज्ञ वक्तुमसमर्थः ।।

आमच्या हृदयातील दुर्हृत्तम नष्ट करू आपल्यावरील आमच्या भक्तीची वाढ करा. मी स्वतः बोलण्यासही समर्थ नाही तेव्हा आपणास इष्ट असेल तेच करा ! ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु.

* *

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

# " माझे जीवनविषयक तत्त्वज्ञान "

( लेखक : डॉ. ह. वि. सरदेसाई, पुणे )

## तत्त्वज्ञान अगम्य नाही

तत्त्वज्ञान अथवा तत्त्वचिंतन हा एक मोठा गहन विषय आहे किंवा सामान्य संसारी माणसाला अगम्य आहे असे मानण्याचे काहीच कारण नाही. प्रत्येक माणूस केव्हा ना केव्हा तरी मानवाच्या मूळ प्रश्नांचा विचार करतोच. मी कोण? या जगात कसा आलो? माझा व इतर विश्वाचा संबंध काय? या जन्माचे ध्येय काय? मी कसे वागावे? ते तसे का वागावे? अशांसारख्या प्रश्नांचा विचार कोणाच्या तोंडून प्रगट होतो तर कोणाचे विचार मनातच राहतात. एवढाच फरक. यांची उत्तरे यथामती मिळण्यावर ज्याचे त्याचे आयुष्य कसे जाईल हे अवलंबून असते. या प्रश्नांना जितकी समाधानकारक उत्तरे मिळू शकतील तितका आयुष्याचा एकूण आराखडा भक्कम तयार होईल व मनःशांतीची बैठक पक्की होईल. थोर विचारवंत, तत्त्वज्ञ व धर्मसंस्थापक यांनी विचारधर्म म्हणून याच प्रश्नांचा ऊहापोह केला व याच तत्त्वांचा आधार घेऊन आचार कसे असावेत याचे मार्गदर्शनपर आचारधर्म सांगितले. मूळ विचार स्थलकालनिरपेक्ष होते, आचार ज्या त्या कालाला अनुसरून बदलणे अवश्य असते. अशा विचारांचा एक सांगाडा प्रत्येक माणसाने एकदा समजून घेणे अत्यावश्यक आहे.

## जीवन व उत्क्रांती

या विश्वात आपले जीवन ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे, कारण आपण जीव धरून आहोत म्हणूनच आपला व विश्वाचा संबंध आहे. जिवंत राहणे

याला फार महत्त्व आहे. सर्वच जीवजंतू नैसर्गिक प्रेरणेने जिवंत राहण्याची धडपड करत असतात. कसे जिवंत राहावे याची पुष्कळशी उत्तरे निसर्गाने बऱ्याच जिवंत प्राणिमात्रांना दिलेली दिसतात. निसर्गानेच भूक निर्माण केली. तहानेची जाणीव दिली. कामक्रोधादि भावनांना निर्माण केले. या नैसर्गिक गुणांना जिवंत राहण्याच्या दृष्टीने फार महत्त्व आहे. निसर्गाने घातलेले नियम पाळून राहू म्हटले तर निरोगी आयुष्य कंठणे सोपे जाईल व मानवेतर नैसर्गिक वातावरणातील प्राण्यांकडे पाहिले म्हणजे ते पटेलही.

निसर्गानेच दुसरी एक शक्ती प्राणिमात्राला दिलेली आहे. ती मानवजातीत विशेष दिसते. ती म्हणजे आहे त्या स्थितीतून उत्क्रांत होण्याची. आहे त्यापेक्षा अधिक चांगल्या स्थितीत जाण्याची. अधिक चांगल्या म्हणजे अधिक बुद्धिमान, अधिक समंजस, अधिक समाधानी, अधिक चारित्र्यवान्, अधिक नीतिमान स्थितीत जाण्याची. ही धडपडदेखील निसर्गतःच होत असते. फरक एवढाच की, व्यक्तीच्या आयुष्यात ती ज्याची त्याला करावी लागते व जमातीच्या बाबतीत अत्यंत संथ गतीने, लक्षावधी–कोटयवधी वर्षांत ती निसर्गतः होते. या दोन्ही प्रवृत्त्या नैसर्गिकच. परंतु कधी कधी एकमेकींविरुद्ध स्वरूप घेतात. काम-क्रोध लोभ-मोह-मद-मत्सर जेव्हा मनाचा ताबा घेतात तेव्हा मनाला जे प्रिय असेल ते करण्याकडे माणसाची प्रवृत्ती होते व ताबडतोब सुख मिळण्याच्या इच्छेची तृप्ती करण्याची धडपड सुरू होते. ही सर्व सुखे जशी ताबडतोब मिळतात, तशी ती अल्पकाळ टिकतात व सुखाचा काल संपल्यानंतर, सुख संपल्याचे दुःखच सुरू होते. शिवाय, अशा सुखाच्या प्राप्तीप्रीत्यर्थ बहुतेक वेळा इतर जनांना दुःख दिले गेले असते. त्याचा वचपा काढण्याकरता ती माणसं तयार होतात व आपण आपल्या सुखाकरता जे जे त्रास इतरांना दिले, ते ते सव्याज आपणास परत देतात. याकरता आपणास प्रियकर काय हे जरी आपल्या मनाने आपणास सांगितले तरी आपणा सर्वांचे श्रेय कशात आहे हे आपण आपल्या बुद्धीला विचारून तिच्या उत्तरावर आपले वागणे अवलंबल्यास चिरकाल शांती व समाधान मिळेल. हे ' श्रेयस्कर ' कसे ठरवावयाचे ? याची मूल्ये कोणती ?

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

## जीवनमूल्यात गुरुमूल्य श्रेष्ठ

ही मूल्ये देखील वेगवेगळी आहेत. माणूस अनेकविध अंगांनी जगत असतो. त्याला शरीर व मन असते. तो एका कुटुंबाचा प्रमुख अथवा घटक असतो. तो एकाद्या जातीचा अथवा धर्माचा असतो. त्याला कोणत्यातरी सामाजिक अथवा राजकीय पक्षाची बैठक असते. तो कोणत्यातरी भौगोलिक राष्ट्राचा असतो. अशा अनेकविध रूपांत त्याला वावरावे लागते. अशा वेळी कधी कधी व्यक्तिगत श्रेय व कौटुंबिक श्रेय यांत झगडा निर्माण होणे शक्य असते. कधी कधी कौटुंबिक श्रेय व सामाजिक श्रेय यांत भेद असणे शक्य असते. अशाकरता स्वतः व्यक्तिगत, कौटुंबिक व इतर सामाजिक अशा तीन मूलप्रकारांत समतोल ठेवता येणे हेच अत्यंत महत्त्वाचे असते. व्यक्तिगत श्रेयाचे काय? माणसाला स्वतःचे शरीर, मन, बुद्धी व आध्यात्मिक अशा प्रकारचे जीवन आहे. शरीर उत्तम ठेवण्याकरता, प्रकृती उत्कृष्ट ठेवणे हे पहिले मूल्य. त्याकरता अंतर्बाह्य स्वच्छता, नियमित व्यायाम, सकस आहार व मनःशांतीची गरज असते. मन निरोगी ठेवण्याकरता विचारांची देवाणघेवाण, मनोरंजन, आपल्या व सभोवतालच्या विश्वासंबंधीच्या अपेक्षा व वस्तुस्थितीचे योग्य ज्ञान, श्रद्धा, स्थैर्य व सुखाने कालक्रमणा करता येईल अशा परिस्थितीची गरज असते. बुद्धिमत्ता कुशाग्र असण्याकरता मेंदू व इतर प्रकृती तर उत्तम पाहिजेच, शिवाय मन देखील निरोगी व शांत असले पाहिजे. वैचारिक गोंधळ असता कामा नये व विचारांत भावनाविवशतेची ढवळाढवळ असता कामा नये. एका विषयावर सतत विचार करण्याचा अभ्यासही केला पाहिजे. आध्यात्मिक प्रगतीसाठी बाकीच्या सर्व गोष्टींची तर गरज असतेच, शिवाय, योग्य मार्गदर्शनाखाली स्वतः केलेल्या ध्यान–धारणा–समाधी आदींचा अभ्यास करावा लागतो. अर्थात, आध्यात्मिक प्रगतीचे इतरही मार्ग आहेतच. आध्यात्मिक प्रगतीचे ध्येय, ज्ञानप्राप्ती आहे. हे ज्ञान अनुभवात्मक आहे. या विश्वातील अणुरेणूत समाविष्ट असणारे तत्त्व व ज्याला "मी" या नावाने ओळखतो, तो, हे एकाच तत्त्वाचे आहेत याची अनुभूती म्हणजेच ही स्थिती. ही प्राप्त झाली की ब्राह्मी स्थिती म्हणावयाचे.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

अशी स्थिती प्राप्त झालेल्या माणसाचे विचार व म्हणून आचारही सर्वसामान्य माणसापेक्षा वेगळे असणारच. ही प्राप्त करून घेण्याकरता चार मार्ग–ज्ञान, योग, कर्म, भक्ती सर्वपरिचित आहेतच. आपण कोणता मार्ग घ्यावा ? आपणास समजले तर उत्तमच; नाही तर, ज्याला समजेल त्याच्याकडून मार्गदर्शन करून घ्यावयाचे. गुरूचे महत्त्व हेच. तो मार्ग दाखवेल, परंतु त्या मार्गाने जाण्याचे कष्ट स्वतः घेतले तरच या मानवी जीवनाच्या ध्येयप्राप्तीकडील वाटचाल फलदायी ठरेल.

## मूल्यनिष्ठेसाठी धैर्य

स्वतःसाठी जर वरील ध्येये तर कौटुंबिक व सामाजिक जीवनात काय ध्येय ठेवू शकतो ? कुटुंबप्रमुखाचे काम असे की, कुटुंबाच्या प्रत्येक घटकाची शारीरिक व मानसिक स्थिती उत्तम ठेवण्यास मदत करणे, त्यांना अन्न, वस्त्र, निवारा पुरविणे व व्यक्तिगत ध्येयप्राप्तीची जाणीव देऊन त्या दिशेने जाण्यास मदत करणे. हाच विचार सामाजिक बाबतीत आहे. कोणीही माणूस दुसऱ्यास जीवनध्येयाची प्राप्ती करून देऊ शकत नाही. फार तर योग्य मार्ग दाखवेल, मार्गातील अडथळ्यांचे वर्णन करेल, ते दूर कसे करता येतील याची माहिती सांगेल; पण ज्याचे प्रश्न त्यानेच सोडवले पाहिजेत. ते सोडवताना सर्वांचे सर्वकाल श्रेय कशात आहे याची जाणीव ठेवून व स्वतःच्या सद्असद्विवेकाला स्मरून निर्णय घ्यावे. समाजाचे, कुटुंबाचे आणि व्यक्तीचे हित कशात आहे हे पाहून वर्तन ठेवावे म्हणजे सर्व अर्थाने सुख, समाधान, तृप्ती, समृद्धी, ऐश्वर्य, संपन्नता व सुसंस्कृती लाभेल. समाजाचे जे पुढारी असतात त्यांना समाजापुढे असे विचार मांडणे व आपल्या स्वतःच्या वागणुकीतून ते प्रतीत होताना दाखविणे जरूर आहे. सर्वसामान्य माणूस अनुकरणप्रिय असतो. सामाजिक नेतेपण हे अनेकदा वैयक्तिक व कौटुंबिक सुखाचा त्याग अपेक्षिते. अशाप्रसंगी मोठे मानसिक धैर्य असावे लागते. व्यक्तिगत व कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पडल्या-खेरीज सामाजिक जबाबदारी, मोठेपणाच्या मोहाने घेतली तर पश्चात्तापाची किंवा विनाशाची पाळी येणे शक्य असते हा विचार नीट समजला पाहिजे.

शेवटी, ही सर्व मूल्ये समजली व मानली, तरी त्यांना चिकटून राहण्याचे

मनोधैर्यही हवे. चारित्र्य याचा अर्थच ह्या दोन्ही गोष्टींचा समावेश. केवळ मूल्ये मानून चालत नाही. ती प्रत्यक्षात आचरणात आणावी लागतात. तेव्हा परमेश्वराकडे मागणे हेच मागावयाचे की, मला सद्‌बुद्धी दे, व माझ्या सद्‌बुद्धीला सुचलेल्या मार्गाने जाण्याचे धैर्यही दे. ही बुद्धीच मला प्रकाशाकडे नेईल, अमृतत्वाकडे नेईल. ज्ञानाकडे नेईल. हे धैर्यच मला तेथे जाण्यास समर्थ करेल. अशा ज्ञान व धैर्याच्या चक्रांच्या रथाने जीवनाची वाट सहज पार पाडू या. इतरांनाही बरोबर नेऊ या. सर्वांचेच सर्वकाल भले होऊ द्या.

अशा आशयाची ' माझी जीवनविषयक विचारसरणी ' प. पू. योगिराज श्री गुळवणीमहाराज यांच्यासारख्या महापुरुषांच्या अल्पपरिचयाने ' तत्त्वज्ञानात्मक बनली ' व त्यामुळे मला जो ' सात्त्विक आनंदाचा लाभ ' घडतो हीच ' ईश्वरी कृपा ' होय अशी माझी ' धारणा ' असल्यामुळे तिचेच या ' श्रद्धांजलीत पर्यवसान ' झालेले आहे.

* *

# योगज्ञेश श्री गुळवणी महाराज

**महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार.**

अध्यात्म संप्रदाय आणि त्यामध्ये सांप्रदायिकांना येणारे अनुभव, विशेषतः गुरूशिष्य संबंध, हा एक स्वतंत्र असा प्रांत आहे. नित्याचे मानवी जीवन आणि त्यातील निर्बंध कोणाला सुटतात असे नाही. पण या निर्बंधांच्या पलीकडे जाऊन म्हणजे सत्वरजतम यांची नित्याची सृष्टि सोडून निस्त्रैगुण्याची कास धरावी आणि त्रिगुणातीत व्हावे हा ब्रम्हविद्येचा पंथ आहे. त्यात अधिकार मिळविणे

सोपे नाही. मी श्री. गुळवणी महाराज यांना पाहिले ते मी नूतन मराठी विद्यालयाचा मुख्याध्यापक असताना पाहिले. त्या शाळेतील एक गुणी चित्रकला-शिक्षक म्हणून पाहिले. त्या वेळेपासून त्यांना अध्यात्माची ओढ असावी असे दिसून येई. यथाक्रम त्यांनी या क्षेत्रात मोठा लौकिक संपादन केला. पण त्यांच्या बाह्य वृत्तीत मी फार पूर्वी पाहिली तशीच शालीनता व सरलता अखेरपर्यन्त अबाधित राहिली. श्रीगुरूकृपाकांक्षी निर्मळ भक्ताचे हे एक अनुकरणीय असे लक्षण आहे. सामान्य व्यवहार सामान्यांसारखेच करून अध्यात्म साधनेन मिळणारा आनंद मुक्त हस्ताने लुटणाऱ्यापैकी श्री. गुळवणी महाराज हे एक होते. अध्यात्माची ओढ ज्यांना लागली आहे त्यांना श्री. गुळवणी महाराजांच्या अध्यात्मिक स्वरूपाचे दर्शन होते. अनुभव येतो. अध्यात्मिक 'शक्तिपात' मुमुक्षांच्या मनात जी उत्क्रांती घडवून आणतो तीमुळे लौकिकात अलौकिक दिसले म्हणून ते आनंदोद्गार काढतात. अशी ही अभिनव अध्यात्मिक सृष्टि आहे.

आपल्या भारतीय संस्कृतीत अध्यात्मिक परंपरा अखंडित चालत आलेली आहे. तो एक आपला महनीय ठेवा आहे. नित्याच्या संसाराच्या पैलाड जे अव्यक्त आहे ते व्यक्त करून घ्यावे ही तळमळ बाळगणारे या अध्यात्म पंथाने चालतात. व्यक्तमध्य जो प्रपंच त्याचा स्तर अर्थातच निराळा आहे. माझ्या सारखे लहान जीव या व्यक्तमध्य स्तरातच धडपडत असतात. तरी ते अध्यात्माचे सूत्र न सोडताना ही धडपड करावी अशी आकांक्षा बाळगतात.

परम तपस्वी वासुदेवानंद टेंबे स्वामी, श्री शीलनाथ महाराज आदि अनेक थोर ब्रम्हज्ञानी सत्पुरुषांचे दर्शन मला घडलेले आहे. श्री. गुळवणी महाराज यांनी वासुदेवानंद सरस्वतींचे समग्र वाङ्मय जिज्ञासूंस उपलब्ध करून दिले आहे. अध्यात्मिक ज्ञानाचा संभार भारतीयांनी प्रेमपूर्वक जतन करावा आणि त्याचा यथाशक्ति लाभ घ्यावा आणि या लाभाने आपले संसार मंडित आणि एश्वर्य-संपन्न करून सर्व जनांचे परमभद्र प्रत्यक्षात उतरावे अशी माझी त्या अचिंत्य, अगम्य श्रीसच्चिदानंदाकडे विनवणी आहे.

*॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥*

## 'नमस्कार साष्टांग श्रीवामनाला'

**श्री**शक्ति ज्याचे पदी राहि नित्य ।
अनुभूति लाभे मुमुक्षूंस सत्य ॥
तुझा पाहिजे मात्र संकल्प झाला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥१

**वा**स्तव्य जेथे श्रीभगवतीचे ।
सदोदीत जेथे मांगल्य नाचे ॥
मिळे श्रीकृपे मुक्ति सायुज्यतेला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥२

**म**नी भाव ज्यांच्या सदा साधकांचा ।
परी पाहिजे भक्त सद्‍भावनेचा ॥
चिंता नुरे पावुनी श्रीकृपेला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥३

**न**को जावया घोर रानावनासी ।
पथी चालवीतो धरोनी करासी ॥
करी साउली ताप वारावयाला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥४

**रा**हे मुखी नाम श्रीसद्‍गुरूंचे ।
ते जाहले धन्य जन्मोनि साचे ॥
जरी पुण्य गाठी घडे दर्शनाला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥५

**व**सती जिथे अष्टही सिद्धि पूर्ण ।
साशंक का ? काय राहील न्यून ॥
शिवो न चिंता भयही मनाला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥६

**जी** जी उदे कामना अंतरात ।
ती ती सदा शीघ्रही प्राप्त होत ॥
भक्तांसि चिंतामणि प्राप्त झाला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥७

**गु**रूरूपि संपूर्ण रंगून जाता ।
हरी वाहतो सर्व संसार-चिंता ॥
नको अन्य काही पुरे भाव ज्याला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥८

**ळ** अक्षरा स्थान काव्यात नाही ।
परी या विणे योग ना साध्य होई ॥
'ळ' दर्शवितो इडा पिंगलेला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥९

**व**से शेषशक्ती मुलाधार-स्थानी ।
तिला जागवी सद्‍गुरु नान्य कोणी ॥
निघे जागता भेटण्या श्रीशिवाला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥१०

**णी** वाटते दर्शवी वाणि चारी ।
परा हो प्रभावी, अविद्येस वारी ॥
जयाच्या कृपे शक्ति लाभे जिवाला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥११

**म**हादेव श्रीशंकर आदिनाथ ।
प्रणेता जयाचा महायोग ख्यात ॥
प्रसारावया ज्या जगी योजियेला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥१२

**हा**केस शीघ्र प्रतिसाद, करी न कष्टी ।
भक्तासि, नित्य प्रतिपाळित कूर्म दृष्टी ।
पूर्णांतुनी पूर्ण, स्वरूपि आला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥१३

राहे सदा निर्भय निर्विकार ।
घालूनि श्रींच्या वरि सर्व भार ॥
रक्षावयासी कटिबद्ध झाला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥१४

जगी जन्मुनी जाहलो धन्य धन्य ।
असा सद्गुरु लाभला पूर्वपुण्य ॥
आद्याक्षरे गुंफूनि अर्पि माला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥१५

कवि :—कै. गुरुभक्त **नानासाहेब भागवत.** मुंबई

* *

## सद्गुरो, दावी मजला वाट

सद्गुरो, दावी मजला वाट ॥ धृ. ॥
कुठे जायचे ठाउक नाही
कसे पोचणे माहित नाही
मजला काही अवगत नाही
शोधितसे पळवाट ॥ १ ॥
चालायाला शक्ती नाही
तोल जातसे ठायी ठायी
नेत्र असोनी दृष्टी नाही
अवघड डोंगर–घाट ॥ २ ॥
पाउल टाके एकचि पुढती
फिरोनि घेतो तेचि मागुती
एका जागी चाल होइ ती
हाचि असे परिपाठ ॥ ३ ॥
खळगे-खाचा चुकवुनि नेई
कडेवरी मज उचलुनि घेई
मोह-मृगजळा अचूक दावी
दुस्तर जीवन-घाट ॥ ४ ॥

चालायाला शक्ती देई
दिव्य दिव्य ती दृष्टी देई
सांभाळोनी मजला घेई
मागतो, सेवेची वहिवाट ॥ ५ ॥

—मधुसूदन रा. खानवलेकर

* *

## ‘गुरुवरा पुनरपि घ्या अवतार’

गुरुवरा–पुनरपि घ्या अवतार
पुनरपि घ्या अवतार
गुरुवरा पुनरपि घ्या अवतार ॥ धृ ॥
शांति सुखाचा अखिल जनांसि
द्यावयासी आधार–गुरुवरा ॥
पुनरपि घ्या अवतार ॥ १ ॥
त्रितापपीडित सारी जनता
कोणी न उरला त्यासि रक्षिता
मायेची त्या घालुनि पाखर
करण्या या उद्धार ॥ २ ॥
भव-डोहचि हा अतीव दुस्तर
तेथुनि सुटका न होय सत्वर
कृपाहस्त शिरी ठेवुनि प्रेमळ
यावे करण्या पार ॥ ३ ॥
माय माउली तूचि अम्हाला
आशा जडली तव पदकमला
हुरहुर चित्ती विरह साहता
भेटुनि द्या आधार ॥ ४ ॥

दीन जनांचे करण्या पालन
महाशक्तिचे करुनी संचलन
आनंदित हे करण्या त्रिभुवन
या घेवुनी अवतार ।। ५ ।।
विरह दग्ध आम्ही गेलो होउन
शांत कराया कोणी न गुरुविण
यावे धावत घ्याया उचलुन
करण्यासी कैवार ।। ६ ।।
अनुगृहितांची हीच विनंती
आम्हा दर्शन सुख विश्रांति
लळा पुरविणे अपुल्या हाती
अमृत सांगे सार ।। ७ ।।
गुरुवरा पुनरपि घ्या अवतार ।।

कवि—**अमृत भावे**

* *

## ‘ उमजुनि घ्याहो गुरुमहिमा ’

उमजुनि घ्या हो, गुरु महिमा ।
जो कळे न निगमा, आगमा ।। धृ ।।
वर्णू जाता शब्दातीत तो
शब्द जन्मवी गुरुराया तो ।
प्रकाशासही प्रकाश दाता
अवर्णनीय गुरुमहिमा ।। १ ।।
चंद्राची शांतता वर्णिता
सद्गुरु शांती तुळे न चित्ता ।
अखंड शीतल सबाह्य अंतरी
विश्व वर्णि गुरुमहिमा ।। २ ।।

सर्वांसम, सहसर्वांपाशी
भेदभाव ना नृप-रंकाशी ।
आनंद शांती दयार्द्र नयनी
ना असे कुणि दुजा त्रिभुवना ॥ ३ ॥
चेतवुनि मन दावी उन्मन
विसरवि तत्क्षणि माझे मी-पण ।
अथांग प्रीती प्रसाद अनुपम
लाभवि हा गुरु गरिमा ॥ ४ ॥
उमजुनि घ्या हो गुरुमहिमा ।
जो कळे न निगमा—आगमा ॥

कवि—**अमृत भावे**

* *

॥ श्रीराम ॥

## ॥ श्रीवामनस्तवन नवरत्नहार ॥

(साकी)

नमितो त्यागी थोर विरागी **वामन**योगी सन्त ।
गुळवणी कुळी मूर्त जाहला दत्तराज भगवंत ॥ १ ॥
सद्गुरुवर्या **वामन**राया शक्तिपातयोगेशा ।
कृपाकटाक्षे सहज तोडिशी पदनत जन-भवपाशा ॥ २ ॥
बळिच्या दारी यती **वामन** बटुरूपाने आला ।
गुळवणी कुळी **वामन**नामे तोच गमे अवतरला ॥ ३ ॥
पुण्यपत्तने अनंतपुण्ये केली सुफलित झाली ।
म्हणुनी तेथे **वामन**रूपे दत्तमूर्ति ही रमली ॥ ४ ॥

**करुणाचंद्रा, कृपाभास्करा** योगज्ञानवनेशा ।
**सद्गुरुवर्या प्रबोधसूर्या वामन** नभसंकाशा ॥ ५ ॥
कितिक तारिले कितीक केले संकटातुनी मुक्त ।
करुणावरुणालया **वामना** भक्तांचा तू भक्त ॥ ६ ॥
गुरुस्वरूपानंद रूप तो **वामन** पूर्णानंद ।
मूर्त जाहला मानवरूपे योगलतेचा कंद ॥ ७ ॥
परात्परा हे परमानंदा आनंदाच्या कंदा ।
गुरुवर **वामन** मनोहरा तव सदैव दे मज छंदा ॥ ८ ॥
मोह निवारी करुणावारी राशि कृपेची लहरी ।
तो सद्गुरुवर **वामन** माझा पूज्य सखा संसारी ॥ ९ ॥

★ ★ ★ ★

गुरुभावाच्या सूत्री ओवुन साकी नवरत्ने ही ।
**दत्तदास** तो हार गुंफुनी **वामन** कंठी वाही ॥

**श्रीसद्गुरुवामनार्पणामस्तु**

काषायांबरमंडित काया दंड कमंडलु हाती ।
पदी खडावा चटचट वाजत सद्गुरु चालत येती ॥
आला आला सद्गुरु **वामन** योगाधीश्वर आला ।
चला जाउया हृदयि धरूं या त्याच्या पदकमलाला ॥
**दिगंबर** म्हणा **दिगंबर** म्हणा **श्रीपाद** म्हणा भावे
**वल्लभ** म्हणुनी **दिगंबराचे** नाम सदोदित घ्यावे ।

कवि—**द. ग. जोशी** ऊर्फ **दत्तदास**
क्षेत्र बसणी ( रत्नागिरी )

✳ ✳